यांची दयनीयता विशद करतांना डॉ. भाऊ लोखंडे लिहितात की, ''विविध जाती-जमातीत विभक्त असलेल्या या अस्पृश्य व दलित जनतेच्या दु:खाची जातकुळी एकच आहे आणि त्यातून मुक्त होण्याचा मार्गही एकमेव आहे, याची त्यांना बालबाल खात्री वाटत असे. ते सर्वच्या सर्व अस्पृश्य आहेत हे एक, दु:ख दुसरे दु:ख ते सर्व सवर्ण हिंदुच्या पदरी अक्षरश : गुलामासारखे जीवन जगतात.'' तिसरी गोष्ट ते आर्थिकदृष्ट्या अत्यंत गरीब, सामाजिकदृष्ट्या हीन, सांस्कृतिक व शैक्षणिकदृष्ट्या अति मागासलेले आहेत. वेगवेगळ्या प्रदेशात, राज्यात व खेडोपाडी पसरलेल्या व अस्पृश्य समाजाचे दु:ख एक, प्रश्न एक आणि त्यातून मुक्तीचा मार्गही एकच. डॉ. आंबेडकरांच्या या विचारांना पुष्टी देणारी मते अनेक महानुभावांनी व्यक्त केली होती. वजा राममोहन रॉय म्हणत, ''आज हिंदू लोक ज्या धर्मपध्दतीचे आचारण करीत आहेत ती त्यांच्या हितसंवर्धनाच्रूा दृष्टीने इष्ट नाही. अनेक जाती-उपजाती निर्माण करणाऱ्या जातिभेदाने त्यांची राष्ट्रभावना नष्ट झाली आहे. निदान राजकीय हित आणि सामाजिक सुख यासाठी तरी त्यांच्या धर्मात काही बदल होणे आवश्यक आहे. पंडित सीताराम यांच्या मते, 'मुर्तिपुजा, बलिदान व चातुर्वर्ण्य हा हिंदू धर्माचा पाया असून एकतर तो पाया उखडून काढला पाहिजे किंवा ब्राम्हाणांनी त्यातून बाहेर तरी पडले पाहिजे. लोकहितवादी म्हणत, मनुष्यमात्रास तुच्छ मानू नये. जाती अभिमान नसावा. सर्वांनी दयापूर्वक वागावे, सर्वांचे कल्याण करावे. गोपाळ गणेश आगरकर म्हणत, जन्मसिध्द चातुर्वर्ण हे समाजाचे स्थितितत्व आहे. त्यांच्या अंगी परंपरागत स्थिती कायम ठेवण्याचे सामर्थ्य असले तरी समाजाची प्रगती होण्याच्या दृष्टीने ते अगदीच कुचकातमाचे आहे. जन्मसिध्द चातुर्वर्ण सोडून द्यावे लागणार आहे. महाराज सयाजीराव गायकवाड म्हणत, अस्पृश्यांचा किंवा अतिशूद्रांचा सामाजिक दर्जा वाढविण्याचा व त्यांची स्थिती सुधारण्याचा बिकट प्रश्न सोडविण्यास मनाचा विकास, जोरदारपणा व धैर्य यांची जरुरी असते. शिक्षण हाच त्यावर रामबाण उपाय आहे. बॅ। सावरकरांचे 'जात्युच्छेदक' निबंधातील विचार परखड आहेत. रत्नागिरीतील पतीतपावन मंदिप्रसिध्दच आहे. साने गुरुजींन पंढरपूरच्या विठोबापुढे अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी आरमरण उपोषणच आरंभिले होते. साक्षात महात्मा गांधी स्वत:ला सनातनी म्हणवित. मला स्वत:ला जातीपध्दती आणि वर्णाश्रम व्यवस्था मान्य

आहे. प्रत्येक माणसाने आपला वडिलोपार्जित व्यवसाय करावा असे ते आग्रहाने सांगत असले तरी अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे तो नष्ट केलाच पाहिजे. जोपर्यंत अस्पृश्यतेचा कलंक आहे तो पर्यंत स्वराज्य मिळाले तरी ते खरेखुरे स्वराज्य नव्हे. केलेल्या पापाचे प्रायश्चित्त म्हणूनच पश्चात्तापदग्ध होवून ते फेडण्यासाठी आपण अस्पृश्यता निवारण केले पाहिजे असेही ते म्हणत.

**डॉ. आंबेडकरांचा आदर्श समाज**

हिंदूंना समजूतदारपणे सुधारणा घडवून आणण्यास प्रवृत्त करतांना डॉ. आंबेडकरांनी सांगितले की, हिंदू धर्म हा अस्पृश्य वर्गाचा धर्म असावा असे असेल तर तो सामाजिक समता प्रदान करणारा धर्म होणे अगत्याचे आहे. परंतु हिंदू धर्मास सामाजिक समतेचे तत्वच मुळात मान्य नाही. उलट हिंदू धर्म हा चातुर्वर्णावर आधारित विषम सामाजिक व्यवस्था मान्य करतो. त्यामुळे हिंदू समाज हा ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णाच्या उतरत्या श्रेणीच्या तुच्छतेत व चढत्या श्रेणीच्या द्वेशात विभाजित झालेला आहे, तेव्हा हिंदू धर्म हा सामाजिक विषमतेचा धर्म व्हावयाचा असेल तर हिंदू धर्मानें चातुर्वर्ण समाजव्यवस्थेचे तत्त्व झुगारुन देणे आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकर अशा समाजाची निर्मिती करु इच्छित होते की, जेथे व्यक्तीला आपल्या विकासासाठी पूर्ण:त स्वातंत्र्य देत असेल आणि त्यांच्या सन्मानाचे रक्षण करीत असेल. ते असे म्हणत होते की, व्यक्ती समाजाचा निर्माता आहे, त्याचा दास नाही. त्यामुळे समाजव्यवस्था अशी असायला पाहिजे की, ती व्यक्तीच्या विकासासाठी अनुकूल पार्श्वभूमी तयार करेल. जर कोणतीही व्यवस्था व्यक्तीच्या विकासाची संधी प्रदान करु शकत नसेल तर तो प्रगतिशिल व टिकावू बनू शकत नाही. म्हणजेच डॉ. बाबासाहेब समाज आणि व्यक्ती यांच्यामध्ये एकतर्फी संबंधाचे समर्थक नव्हते. त्यांचे मत असे की, दोघामध्येही दुतर्फी संबंध आहे. अर्थात दोन्ही एकदुसऱ्याच्या निर्मितीत आणि विकासात योगदान देतात. असे नाही की केवळ समाज व्यक्तीच्या निर्मितीत योगदान देते आणि व्यक्ती समाजाच्या विकासात कोणतेच योगदान देत नाही. अशाप्रकारे त्यांनी समाज आणि व्यक्ती यांच्यामधील संबंधाला मशिन आणि त्यांचे भाग अथवा सावयव आणि त्यांचे अवयव यांच्यामध्ये दिसून येणाऱ्या संबंधापेक्षा भिन्न असल्याचे दाखवून दिले. तसेच त्याचे स्वरुप पाण्याचा थेंब व समुद्र यांच्यातील संबंधाच्या स्वरुपापेक्षा वेगळे असल्याचे सांगितले आहे. कारण थेंब समुद्रात मिळून स्त:चे अस्तित्व संपवितो. परंतु व्यक्ती समाजात राहूनही त्यांच्या नियमाप्रमाणे शासित होत असूनही आपले अस्तित्व गमावत नाही तर कायम ठेवतो. त्याचे एक स्वतंत्र जीवन असते. त्याची एक वेगळी ओळख असते. तो केवळ समाजाच्या सेवेसाठीच जन्म घेत नाही तर आपल्या विकासासाठी सुध्दा काम करतो. तो समाजाच्या नियमांचे अनुसरण मुक्या दासाप्रमाणे करीत नाही तर त्याच्यात संशोधन करणे व आवश्यकता पडल्यास त्यांच्यात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी संघर्षसुध्दा करतो.[७]

डॉ. बाबासाहेब कोणत्याही अशा समाजाचे पक्ष घेत नव्हते की ज्यात कोणत्याही व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे हनन होईल. ते असा समाजसुध्दा मानत नव्हते ज्यात व्यक्तीच्या सन्मानाचे रक्षण होत नाही. म्हणूनच ते जातीव्यवस्थेसाठी सर्व प्रकारच्या सर्वाधिकारवादी व्यवस्था मग ती हुकुमशाही तर सोडाच पण समाजवादी समाजव्यवस्था असली तरी तिच्या विरुध्द होते. कारण

जाती व्यवस्था काही लोकांना भू-देवतेच्या रुपात महिमा मांडणारी असली तरी स्त्रिया, शूद्र व दलितांसहित समाजातील बहुतांश लोकांच्या सन्मानाला खंडित करते आणि त्यांना पशुपेक्षाही हीन जीवन जगण्यास बाध्य करते. अशा व्यक्तिगत स्वातंत्र्याचे हनन जर जातीसहित सर्व सर्वाधिकारवादी व्यवस्था करीत असतात. त्यात फरक फक्त ऐवढाच आहे की, जेथे जातीव्यवस्था आहे ती व्यक्तिक स्वातंत्र्याचे परिशीलन परमेश्वरी इच्छेच्या उल्लंघनाच्या नावावर करीत असते तर साम्यवादी व हुकुमशाही व्यवस्थेत तेच कार्य आर्थिक विषमता कमी करणे अथवा आर्थिक विषमता कमी करणे अथवा आर्थिक विकासाची गती शीघ्र करणे या दृष्टीने केली जाते.[८]

डॉ. बाबासाहेबांचे असे मत होते की, माझ्या आदर्श समाजाची व्यवस्था स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यावर आधारित असेल. ती या दृष्टीने गतिमान असेल की त्यात कोणत्याही एका भागात झालेल्या परिवर्तनाला दुसऱ्या भागात पोहचविण्यासाठी विभिन्न रस्ते असतील. त्यात अनेक हित असतील, जे सचेतन स्वरुपात संचारित व भागीकृत असतील. त्यात संम्मीलीत होणाऱ्या विधानासोबत संपर्काचे अनेक स्वतंत्र बिंदू असतील. दुसऱ्या शब्दात त्यात सामाजिक आंतरक्रिया असेल. वास्तविकत: हेच बंधुभाव आहे. ती सोबत राहण्याची व संयुक्त अनुभवाचे आदान-प्रदान करण्याची एक विधी आहे की, ज्यात अनेक सहकाऱ्यांप्रती आदर व सन्मानाचा दृष्टिकोन विकसित होईल.

डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचे मर्म विशद करताना दादा धर्माधिकारी लिहितात की, ''अस्पृश्यता निवारण्याची व अस्पृश्योधाराची चळवळ महाराष्ट्रात मा. ज्योतीबा फुले, कर्मवीर शिंदे यासारख्या काही समाजसेवकांनी अत्यंत कळकळीने व चिकाटीने केली. पण त्यांच्यात आणि डॉ. आंबेडकरात एक मूलभूत फरक आहे. डॉ. आंबेडकर हे स्वत: अस्पृश्य होते. इतरांनी केलेल्या कार्यात अस्पृश्योध्दाराची भावना असेल, पण डॉ. आंबेडकरांनी केलेल्या अस्पृश्योध्दाराच्या चळवळीत स्वातंत्र्य व स्वत्व-विकसित भावना होती. त्यामुळे अस्पृश्य समाजाच्या ठिकाणी आत्मप्रत्यय आणि स्वातंत्र्याकांक्षा जशी त्यांना निर्माण करता आली तशी इतर कोणालाही निर्माण करता आली नाही.''[९]

स्वातंत्र्याचा भारतीय संदर्भातील प्रश्नाबाबत डॉ. बाबासाहेबांचे मत आहे की, जे लोक जातीव्यवस्थेचे समर्थक आहेत ते जीवन, दळणवळण व संपत्तीच्या अधिकारासंबंधीच्या स्वातंत्र्याचा तर सहजरित्या स्वीकार करतील, परंतु व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य न देण्याचा अर्थ दास्यत्व कायम ठेवणे हेच होईल. कारण दास्याला केवळ कायद्याच्या अधीनतेशी नाही तर त्याचा अर्थ समाजाच्या अशा अवस्थेशी आहे की ज्यात काही लोक दुसऱ्यांशी अशा उद्देशाने दुसऱ्यांच्या वर्तनाला नियंत्रित करतात, त्याला स्विकार करण्यास बाध्य करतात. जातीव्यवस्था समाजाच्या अशाच स्थितीचे द्योतक आहे. कारण त्यात काही लोकांना आपल्या मर्जीच्या विरुध्द असे व्यवसाय स्वीकारण्यास बाध्य व्हावे लागते. जे त्यांच्यासाठी दुसऱ्यांनी पूर्वनिर्धारित करुन ठेवलेले असतात. समाजाची ही दशा म्हणजे दास्यत्वच आहे.

डॉ. बाबासाहेबांना भारतात नवा मानव निर्माण करण्याचे; समता स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्वावर आधारित नवसमाज घडविण्याचे आणि मानवतेचे शिक्षण देणारा, मानवाची पूजा करणारा, नवीन धर्म साकार करण्याचे आणि अस्पृश्यता संपवून मानवी हक्काची पहाट फुलविण्याचे वेध लागले होते. समतेच्या बाबतीत डॉ. बाबासाहेबांचे मत होते की,

समाजात सर्व लोक सारखे नसतात. तरीसुध्दा समतेला एका नियामक सिध्दांताच्या रुपात स्वीकारले पाहिजे. तरीपण त्यांनी सर्व प्रकारच्या समानतेला समानरुपाने आपत्तिजनक संबोधले नाही. त्यांचे मत असे की, अशी असमानता जी नैसर्गिक अथवा व्यक्तीची स्वत:तील कमतरता व आळशीपणामुळे उत्पन्न होत असेल तर त्याला दूर करण्यासाठी समाजाला प्रयत्न करण्याची गरज नाही. परंतु जर असमानता व्यक्तीवर लादल्या गेली असेल तर ती दूर करण्यासाठी समाजाद्वारे प्रयत्न करण्याचे औचित्य आहे. डॉ. बाबासाहेबांच्या मते, व्यक्तीची कार्यक्षमता तीन गोष्टींवर निर्भर असते. त्यातील पहिली म्हणजे शारीरिक वंशसंक्रमण दुसरी म्हणजे सामाजिक जबाबादारी, जसे : पितृत्व देखरेख, शिक्षण, विज्ञान, संपत्ती इत्यादी व तिसरी म्हणजे व्यक्तीचे स्थानिक प्रयत्न. डॉ. आंबेडकरांच्या मते, वरीलपैकी तिसऱ्या बाबीवर व्यक्तीमध्ये असमानता असेल तर त्यांच्याशी असमान व्यवहार केल्या जावू शकते. परंतु जे पहिल्या दोन बाबतीत असमानता असेल त्यांना जेव्हापर्यंत समान बनविल्या जात नाही तेव्हापर्यंत तिसऱ्या बाबीला असमान होण्याच्या कारणामुळे त्यांच्यासोबत असमान व्यवहार करणे उचित नाही. दुसऱ्या शब्दात जे लोक आपल्या कर्तृत्वाने नाही तर दोषपूर्ण कायदे व दोषपूर्ण व्यवस्थेमुळे केवळ ऐतिहासिक आधारावर ते केवळ सामाजिक, आर्थिक व राजकीय आधिकारापासून वंचित राहिले नाही तर समाजात दाश्यत्वाचे पिडित जीवन जगण्यास बाध्य झाले, त्यांना समानतेच्या अधिकाराच्या सार्थक उपयोगासाठी क्षतिपूर्तीच्या दृष्टीने विशेष संरक्षण करुन देणे आवश्यक आहे. अशाप्रकारे वंशानुक्रमाण जणित दोषांच्या प्रति संरक्षणात्मक मार्ग स्वीकारल्या गेल्या पाहिजे.

डॉ. बाबासाहेबांच्या आदर्श समाजव्यवस्थेचा सर्वात महत्वपूर्ण तत्व म्हणजे बंधुता हा आहे. बंधुता याचा अर्थ समाजात सर्वांमध्ये बंधुत्वाची भावना असणे हे होय. ही भावना सामाजिक जीवनाला एक बनविते व तिला मजबूत बनविते. वास्तविकत: आदर्श समाजाशी डॉ. बाबासाहेबांचा आशय बंधुत्व भावनेशी आहे. कारण असे झाले तरच समाजातील सर्व व्यक्ती अथवा वर्गाचे आपसात संमिश्रण शक्य होते.

डॉ. बाबासाहेबांच्या मते एका आदर्श समाजात स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ह्या तिन्ही असणे गरजेचे आहे. समानतेअभावी स्वातंत्र्य काही लोक उर्वरित लोकांवर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याची संधी देते. तसेच स्वातंत्र्याअभावी समानता व्यक्तीला स्वविवेकाने कार्य करण्याची क्षमता कमी करते आणि त्यांच्या सृजनात्मक शक्तीला कुंठीत करते. तसेच बंधुतेअभावी स्वातंत्र्य आणि समानता व्यक्तीच्या सामान्य कार्यव्यवहार पध्दती बनत नाही, तर त्यांना लागू करण्यासाठी पोलिसांची गरज पडते.[१०]

लोकाशाहीच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब लिहितात की, आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचेही स्वरुप दिले पाहिजे. राजकीय लोकशाहीतील आधारभूत अशी सामाजिक लोकशाही नसल्यास ती टिकू शकत नाही. सामाजिक लोकाशाही म्हणजे स्वतंत्र्य, समता व बंधुभाव यांना जीवनाचे सिध्दांत म्हणून मान्य करणारी जीवनप्रणाली होय. डॉ. बाबासाहेबांच्या मते, लोकशाहीच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय संरचनेचे निर्णायक तत्वे एक आहेत परंतु या प्रत्येकात उपस्थित स्थिती एकसारखी नसते. जसे : राजकीय लोकशाहीत स्वातंत्र्याला आणि आर्थिक लोकशाहीत समानतेला तर सामाजिक लोकशाही बंधुत्वाला अधिक महत्व दिले जाते. यात डॉ. बाबासाहेब बंधुत्वाला अधिक महत्व यासाठी देतात

की, त्यांचे असे मत होते की, बंधुत्वाच्या अभावी स्वातंत्र्य आणि समता सामाजिक बंधुत्वासाठी आवश्यकसुध्दा आहेत. दुसऱ्या शब्दात सामाजिक लोकशाहीसाठी राजकीय व आर्थिक लोकशाही असणे आवश्यक आहे. असे शक्य नाही की, राजकीय संरचना सरंजामशाहीची असो आणि आर्थिक संरचना बलुतेदारी पध्दतीवर उभी असते परंतु सामाजिक सरंचना लोकशाहीची असो याच प्रकारे सामाजिक संरचना जर जाती व्यवस्थेवर उभी असेल तर राजकीय व आर्थिक सरंचना लोकशाही पध्दतीची बनविणे कठीण होईल.

समाजात स्वातंत्र्य आणि समतेची स्थापना संविधान आणि कायद्याद्वारे केल्या जावू शकते. जगातील अनेक देशात असे झाले सुध्दा आहे. परंतु कायद्याद्वारे लोकांमध्ये बंधुभाव निर्माण करता येत नाही. आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि उद्योगांनी समाजात स्वातंत्र्याच्या संघर्षाला सतेज केले आहे आणि समाजाच्या पूणर्स्थापनेवर जोर दिला आहे. परंतु बंधुत्व भावनेच्या विकासात विज्ञानसुध्दा विफल ठरला आहे.

संविधानाच्या उद्देशिकेत व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता-एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रबंधित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या दृष्टीने सारासार विचार केला तर डॉ. आंबेडकरांचे धम्मचक्र प्रवर्तन हे संविधानानंतर संविधानातील उदि्दष्टांना प्राणभूत करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने टाकलेले पुढचे पाऊल होते. डॉ. बाबासाहेब एक न्यायपूर्ण समाजाची निर्मिती करु इच्छित होते. अर्थात एक असा समाज की, ज्याची रचना स्वातंत्र्य समता व बंधुत्व या सिध्दांतावर आधिरित असेल. ज्यात सर्व व्यकती, संवर्ग व समूहासोबत न्याय होईल. डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीने स्वातंत्र्य, समता व बंधुता हे सामाजिक न्यायाचे निर्णायक तत्वे आहेत. तसेच ते लोकशाही समाजाचे आधारभूत सिध्दांतसुध्दा आहेत. त्यांना एकदुसऱ्यापासून वेगळे करता येत नाही कारण यात एकाचा अभाव याचा अर्थ दुसऱ्याचा अभाव होय. असे सुध्दा असू शकते की, कोणत्या वेळी कोणत्या समाजात कोणते एखादे तत्व अन्य तत्वांच्या तुलनेत अधिक महत्वपूर्ण मानले असले तरी बंधुत्वाला त्यांनी आधिक महत्व दिले. कारण ते जाणून होते की, बंधुत्वाअभावी त्यांच्या आदर्श समाजची परिकल्पना फलित होवू शकत नाही. त्यांचे मत होत की, स्वातंत्र्य व समानता बंधुभावाच्या विकासासाठी आवश्यक नाही. याउलट जर समाजात व्यक्ती व समूहामध्ये बंधुभावाची भावना असेल तर त्यात स्वातंत्र्य व समानता यांचा आपोआप विकास स्वाभविकरित्या होईल असे त्यांचे ठाम मत होते.

डॉ. बाबासाहेबांनी दलित, पिडीत आणि शोषित मानवतेला मौलिक स्वातंत्र्य व नागरी आधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष सुरु केले. समोर जावून राज्य समाजवादाच्या माध्यमाने त्यांनी शेतीला सार्वजनिक अधिकाराच्या कक्षेत आणण्याचा, सामूहिक शेती पध्दती अमलात आणण्याचा तसेच मूलभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी केली. ही मागणी उचलून धरतांनाच संविधानाच्या माध्यमाने समाजात समासनता प्रस्थापित करण्यावर जोर दिला की, ज्यामुळे ते मजबूत होवू शकेल. जीवनाच्या शेवटच्या क्षणी त्यांनी बौध्द धम्म ग्रहण केले व आपल्या अनुयायांना त्याचे अनुकरण करण्याचे आवाहन केले व सांगितले की, बौध्द धम्माचा प्रचार व प्रसार हीच मानवतेची खरी सेवा आहे. त्यांचा असा विचार होता की, स्वातंत्र्य आणि समतेला कायद्याच्या माध्यमाने लागू केल्या जावू शकते, परंतु त्यांना लोकांच्या अंत:करण्यात व आचरणात उतरविल्या जावू शकत नाही. हे कार्य धम्माद्वारेच शक्य आहे. हिंदू धर्माच्या संदर्भात त्यांचे मत असे की, जेव्हापर्यंत हिंदू धर्म आहे तेव्हापर्यंत

जातिभेदाची मानसिकता राहील. त्यामुळे हिंदू समाजात स्वातंत्र्य, समता व बंधुता यांचा अभाव कायम राहील. कारण हिंदू धर्म अंत:रीकरणाच्या पूर्ण विरुध्द आहे. याउलट बौध्द धम्म तर्क, अनुभव व नैतिकतेवर आधारित आहे. त्याच्या वैचारिकतेची वीण स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या सिध्दांतावर विणलेली आहे. स्वांतत्र्य हे बौध्द धम्माचे मूलतत्व आहे. समानता त्याचा अभाव आहे. बौध्द जीवनपध्दतीत समानता, धार्मिक व आर्थिक आधारावर व्यक्ती व समुहामध्ये कोणतेच भेद नाही. कारण स्वातंत्र्य आणि समानता बौध्द जीवनाचे सहज व स्वाभाविक गुण आहेत. म्हणूनच बौध्द धर्मीयांमध्ये बंधुत्वाचा विकाससुध्दा सहज, स्वाभाविक आणि स्थायी स्वरुपात होते. म्हणूनच आदर्श अथवा सामाजिक लोकशाहीच्या स्थापनेसाठी डॉ. बाबासाहेबांनी भांडवलशाही अथवा समाजवादाचा नाही तर बुध्दांचा मार्ग निवडला की समाजात स्वातंत्र्याचा नावावर जीवघेणी स्पर्धा व समतेच्या नावावर सर्वस्वी अधिनायकवादाला वाव मिळू नये. कारण बौध्द धम्मात स्वातंत्र्य व समता, प्रज्ञा, प्रेम आणि करुणा यांनी अद्भुत आणि बंधुभावाने ओतप्रेत भरलेले असल्यामुळे संयमित व मर्यादित होतात. अर्थात सामाजिक क्रांतीला साकार करण्याच्या उद्देशाने बौध्द धम्मांतरण करुन डॉ. बाबासाहेबांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर १४ ऑक्टोबर १९५६ ला धम्मचक्र प्रवर्तन करुन देशात सामाजिक व सांस्कृतिक क्रांतीचा शंखनाद केला. त्याची सफलता किती मिळाली हे आपण अनुभवतोच आहोत.

**संदर्भ**

१. डॉ. यशवंत मनोहर, मुख्य संपादन – डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १४ एप्रिल १९९१, पृ. क्र. १२.
२. आर. जी. सिंह भारतीय दलितों की समस्याएँ एवं उनका समाधान, मध्यप्रदेश हिंदी अकादमी, भोपाल, १९८६, पृ. क्र. ९
३. हि ल. कोसारे – डॉ. आंबेडकरांनी केलेली आंदोनले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १४ एप्रिल १९९१, पृ. क्र ५५
४. डॉ. बी. आर. आंबेडकर – शूद्र पूर्वी कोण हेत, सुगत प्रकाशन, नागपूर-द्वितीय आवृत्ती, १९९१ पृ. क्र. १६८
५. राम गोपाल सिंह- डॉ. आंबेडकर : सामाजिक न्याय एवं परिवर्तन, नॅशनल पब्लिकेशन हाऊस, जयपूर एवं दिल्ली, २००६, पृ. क्र. ३
६. प्रा. डॉ. भाऊ लोखंडे – आंबेडकरी क्रांतीचे सिंहावलोकन, लोकराज्य, ऑक्टो. २००६, पृ. क्र. १२
७. डॉ. बी. आर. आंबेडकर –द स्पोक आंबेडकर (संपा) भगवान दास, आंबेडकर साहित्य प्रकाशन, बंगलोर, १९८०, पृ. क्र. २७
८. आर. जी. सिंह – डॉ. आंबेडकर : समाज वैज्ञानिक, मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, भोपाल, १९९२, पृ. क्र. १७
९. प्रा. डॉ. भाऊ लोखंडे – आंबेडकरी क्रांतीचे सिहांवलोकन, लोकराज्य, ऑक्टो. २००६, पृ. क्र. १२
१०. भगवान दास (संपा.) द स्पोक आंबेडकर (वाल्युम-२), बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, जालंधर, १९६८, पृ. क्र. १८८

# २. महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थितीविषयीचे विचार - एक अभ्यास

**डॉ. अमितकुमार शंकरराव गागरे**
सहाय्यक प्राध्यापक, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सातारा.

**प्रस्तावना**

महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील श्रेष्ठ समाजसुधारक आणि समाज चिंतक होते. आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे ते आद्य प्रवर्तक होत. फुले हे एक कृतिशील समाजसुधारक होते. त्यांनी जे विचार मांडले ते त्यांनी प्रत्यक्षातही आणले. महात्मा फुले यांनी स्री शिक्षण, अस्पृश्यांचे शिक्षण, विधवा पुनर्विवाह, याचा पुरस्कार केला तर सामाजिक अनिष्ट रुढी यांना विरोध केला. महात्मा फुले यांनी विपुल अशी ग्रंथसंपदा लिहिली या ग्रंथातून त्यांनी आपले समाज सुधारणे विषयीचे विचार मांडले. शेतकऱ्यांचा असूड या पुस्तकात महात्मा फुले यांनी शेती व शेतकऱ्यांच्या स्थिती बद्दल आपले चिंतन लिहिले आहे. हे सर्व चिंतन त्यांच्या तत्कालीन शेतकरी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यांनी लिहिले आहे.

**शेती व शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल फुले यांचे चिंतन**

शेतकऱ्यांचा आसूड या आपल्या पुस्तकात महात्मा यांनी शेती व शेतकऱ्यांच्या विषयी सविस्तर विवेचन केले आहे. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कसा वाढत जातो, शेतीत खपणारी शेतकऱ्यांची मुले कशी आहेत शेतकऱ्यांच्या घराची रचना व घरातील वस्तू कोणत्या असतात व त्या कशा ठेवलेल्या असतात, शेतीची अवजारे शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या अंगावरील दागदागिने, शेतकरी दररोज जे अन्न खातो ते अन्न लग्नातील पदार्थ आदींचे अत्यंत सविस्तर व वास्तववादी चित्र फुले रेखाटतात. शेतकऱ्यांचे दरिद्री घर त्यांच्या लिखाणातून अंतर्बाह्य साकार झाले आहे. ब्रिटिशांचा अंमल प्रस्थापित झाल्यापासून गोहत्या झाल्याने बैलांची पैदास कमी झाली, दुष्काळात चारा पाण्याची टंचाई, गायरानची कमतरता, खतांचा अभाव, बागायती क्षेत्रातील घट यामुळे जनावरांची संख्या कमी होऊन त्याचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर कसा झाला हे त्यांनी स्पष्ट केले. डुकरे पिकांचा नाश करतात व बाजारपेठेत दलाल त्यांचे शोषण करतात. सावकार ही पिके येताच कर्जवसुलीसाठी येतात त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती काही लागत नाही हे फुले यांचे निरीक्षण होते. ब्रिटिशपूर्व काळात भारतीय संस्थानिक व राज्यकर्ते यांच्याकडे शेतकरी कुटुंबातील एका तरी व्यक्तीला नोकरी मिळे, परंतु ब्रिटिशांनी त्यांची राज्य नष्ट केल्यामुळे शूद्र बेकार झाले असे फुले दावा करतात. ब्रिटिश सरकारने शेतसारा वाढविला जंगले स्वतःच्या ताब्यात घेतली विविध

राज्यमार्गावर जकातीची नाके बसवून जकात वसूल केली पाटबंधारे खात्याने पाणीवाटपात नियमितपणा ठेवला नाही, या सर्व गोष्टींचा परिणाम शेतकरी वर्गावर कसा झाला हे फुले सांगतात इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती नंतर तेथे तयार झालेला माल भारतीय बाजारपेठेत विकल्याने ढोर, चांभार, लोहार, विणकर, हे बेकार झाले व त्यांचे उत्पादन बंद पडले. ब्रिटिशांना त्यामुळे कच्चामाल कमी किमतीत मिळाला, त्यामुळे ब्रिटीश कोट्याधीश झाले, परंतु येथील कारागीर व शेतकरी वर्ग हा मात्र संकटात सापडला. आठ बैल ठेवणाऱ्या शेतकऱ्याची स्थिती ही गोऱ्या शिपाई यापेक्षा वाईट आहे हे फुले यांचे तत्कालीन निरीक्षण होते.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी ब्रिटिशांनी काय करावे यासंबंधी फुले यांनी खालील मार्ग सुचविले होते**

1. शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त बायका करू नयेत आपल्या मुला-मुलींचे बालविवाह करू नये यासाठी सरकारने कायदा करावा.
2. शूद्र शेतकऱ्यांची मुले सरकारी हुद्दे चालविण्यास लायक होईपावेतो ब्राह्मणास त्यांच्या जातीच्या संख्येच्या प्रमाणापेक्षा सरकारी हुद्दयाच्या जास्त जागा देऊ नयेत.
3. गावची पाटील की देण्यासाठी मराठी सहावी इयत्ता पास ही अट ठेवावी दारूबाज पाटलावर नजर ठेवावी.
4. शेतकऱ्यांच्या मुलास अन्न, वस्त्र, पुस्तके, वगैरे पुरवून त्यांच्या मुलांकरिता बोर्डिंग शाळा काढाव्यात.
5. शेतकऱ्यांच्या तुलनेत लष्कर न्याय जंगल पोलीस शिक्षण आदी सरकारी खात्यातील गोऱ्या व काळ या कर्मचाऱ्यांना जास्त उत्पन्न आहे. शेतकऱ्यांना दर महा दर माणशी फक्त तीन रुपये मिळतात याउलट युरोपियन व हिंदी अधिकाऱ्यांना जास्त पैसा मिळतो त्यांना पंधरा रुपये दरमहा किरकोळ खर्चास किंवा दारू पाण्यात पुरत नाहीत म्हणून सरकारने त्यांचे पगार कमी करावेत.
6. सर्व लोकल फंड शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी खर्च करावा.
7. सरकारने पाटील की सहित कुलकर्णी यांच्या कामाची परीक्षा घ्यावी व ते काम एकाच जातीकडे सोपवू नये.
8. शेतकऱ्यांवरील कर्जाचे ओझे कमी करावे.

**शेतकऱ्यांच्या आर्थिक दुरावस्थेची कारणे**

1. जंगल खात्याचे धोरण
2. ग्राम उद्योग देशोधडीला लागले
3. अपुरी शेती
4. अनुत्पादक शेती

5. सरकारी कर वसुली
6. सरकारी उधळपट्टी
7. शेतकऱ्यांमधील अज्ञान आळस सुखासीनता धर्मभोळेपणा व्यसन आसक्ती

**शेती सुधारणे संबंधी महात्मा फुले यांच्या उपाय योजना**

1. गोरे लोक व मुसलमान यांनी गाई-बैलांना ऐवजी शेळ्या मारून खाव्यात. त्यासंदर्भात एखादा कायदाच करावा म्हणजे शेतीसाठी बैलांचा पुरवठा होऊन शेतीची मशागत होईल व शेणखताचा पुरवठा होईल ही सूचना महात्मा फुले यांची प्रखर बुद्धिनिष्ठा व सूक्ष्म निरीक्षण स्पष्ट करते.
2. लष्करासह पोलीस खात्यातील शिपायांकडून जागोजागी तालीवजा बंधारे बांधून घ्यावेत, तसेच त्यांच्याकडून डोंगर टेकड्या यांमधील दऱ्याखोऱ्या नी तलाव तळी बांधावीत.
3. प्रत्येक गावच्या शेतांची पाहणी पाण्याड्याकडून करून प्रत्येक गावचा पाण्याच्या खुणा दाखवणारा नकाशा तयार करावा. विहिरी खोदून बांधून काढणाऱ्या शूद्र शेतकऱ्यास बक्षिसे द्यावीत.
4. सरकारने इतर देशातील नाना प्रकारच्या उत्तम शेळ्या, मेंढ्यांची वेणी खरेदी करून भारतात आणावीत. त्यांची येथे पैदास करावी म्हणजे खतांचा अधिक पुरवठा होईल व लोकर जास्त मिळेल आणि शेती सुपीक होतील.
5. सरकारी जंगलातील रानटी जनावरांपासून शूद्र शेतकऱ्यांच्या शेतांचा बचाव करण्यासाठी गावठी पद्धतीच्या बंदुका वापरण्यास त्यांना परवानगी द्यावी. रानडुकरं पासून शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सरकारने पोलीस खात्याचे सहकार्य द्यावे. ते त्यांनी केले नाही तर अशा प्रकारातून होणाऱ्या नुकसानीस पोलिसांना जबाबदार धरून त्यांच्या पगारातून नुकसान भरपाई कापून घ्यावी.
6. शेत पिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेऊन उत्तम शेतकऱ्यास बक्षिसे द्यावी.
7. सरकारी खर्चाने विलायतेतील शेतकी शाळा पाहण्याकरता शेतकऱ्यांची मुले पाठवावीत.
8. शेतकऱ्यांच्या मुलास शेतकी संबंधी चे ग्रंथ व प्रशिक्षण मोफत द्यावेत.
9. नदी नाले व तलावातील साचलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत घेऊ द्यावा.
10. ज्या-ज्या गावची गायराने ब्रिटिश सरकारने जंगल खात्याकडे वर्ग केली आहेत ती त्या गावांना परत द्यावीत.
11. सरकारने मुरळ्या तमासगीर नाटककार या लोकांवर सक्त नजर ठेवून त्यांना शिक्षा कराव्यात. त्याशिवाय अज्ञानी शुद्र शेतकऱ्यांच्या नीतीत व शरीर प्रकृतीत फरक पडणार नाही.
12. 1877 मध्ये धनकवडी पुणे येथे दुष्काळ पिडीत विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया बालकाश्रम आची स्थापना केली.

13. जुन्नर पुणे येथील शेतकऱ्यांचा सावकारी विरुद्धचा लढा ज्योतीबांनी यशस्वी केला.
14. 1888 मध्ये ड्युक ऑफ कॅनॉट भारताच्या भेटीवर आले असता ज्योतीबांनी पारंपारिक शेतकऱ्यांच्या वेशात त्यांची पुणे येथे भेट घेऊन भारतीय शेतकऱ्यांच्या हलाखीचे दर्शन घडविले.

वरील सर्व सूचनांवरून महात्मा फुले यांचे तत्कालीन शेतकरी जीवनाविषयीचे सूक्ष्म निरीक्षण दिसून येते तसेच त्यांनी केलेल्या सूचना अत्यंत दूरदृष्टीचा व आजच्या आधुनिक काळातही लागू पडणाऱ्या आहेत.

**शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सरकारकडे पुढील मागण्या केल्या**

- शेतकऱ्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.
- शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून वसतिगृहांची स्थापना करावी.
- कनिष्ठ वर्गातील शिक्षकांची नेमणूक करावी.
- शेतकर्यांच्या मुलांना व्यावसायिक शिक्षण द्यावे.

**ब्रिटिशांचे शेती धोरण या विषयीचे महात्मा फुले यांचे विचार**

1. शेतकरी हाच या देशाचा पोशिंदा आहे, या ठोस भूमिकेतूनच त्यांनी शेतकऱ्याचा आसूड हा ग्रंथ लिहिला होता. कृषी औद्योगीकरणाचा शेतीच्या अत्याधुनिकीकरण आचा ते आग्रह धरीत असत. ब्रिटिश राजवटीत नवी महसूल पद्धत अमलात आली जमिनीच्या तुकड्याची मोजणी करून त्यास भूमापन क्रमांक दिला गेला प्रत्येक खेड्याचा नकाशा तयार करून जमिनीच्या प्रत्येक तू कड्यावरील महसूल निश्चित केला व महसुलाचे हे दर 30 वर्षासाठी निश्चित केले या सर्व जमीन विषयक सुधारणा बद्दल फुले ब्रिटीशांचे अभिनंदन करतात परंतु ब्रिटिश राजवटीतही शेतकऱ्यांचा भार कमी झाला नाही ही वस्तुस्थिती ही ते निदर्शनास आणून देतात.

2. ब्रिटिश राजवटीत भारताची जी भौतिक प्रगती झाली त्याबद्दल फुले ब्रिटिश राजवटीचे कौतुक व समर्थन करतात ब्रिटिशांनी भारतात रस्ते बांधले पूल बांधले रेल्वे आणली सरकारी इमारती बांधल्या कायदा व सुव्यवस्था निर्माण केली तसेच ठक दरोडेखोर यांच्यापासून लोकांना संरक्षण दिले आधुनिक उत्पादन पद्धती आधुनिक शिक्षण पद्धती आणली यासाठी ते ब्रिटीशांचे कौतुक करतात परंतु ब्रिटिश राजवटीत निर्माण झालेल्या विदेशी वस्तू वापरण्याच्या वृत्तीमुळे येथील हस्त उद्योग लघु उद्योग बंद पडले व भारताचे आर्थिक नुकसान कसे झाले याचीही चिकित्सा करतात.

3. इंग्लंड मधून भारतात आयात होणाऱ्या कापडावर ब्रिटिशांनी आयात कर रद्द केला त्यामुळे भारतातील कापड उद्योगाचे नुकसान झाले व विदेशी कापड मोठ्या प्रमाणात भारतात आले ही बाबही ते नमूद करतात ाजीपाला विकणाऱ्या शेतकऱ्यास नगरपालिकेची जकात गाडी भाडे देऊन काहीच शिल्लक राहत नाही ही वस्तुस्थिती ते मांडतात ब्रिटीश लोकांनी कच्चामाल कमी किमतीत खरेदी करून त्यांच्या

देशात नेऊन पक्का माल जास्त किंमत लावून भारतीय बाजारपेठेत विकून भारतीय यांचे फार मोठे आर्थिक शोषण केले ही वस्तुस्थिती ही त्यांनी आपल्या लिखाणात अनेक ठिकाणी मांडली आहे.

**समारोप**

फुले यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न समरसतेने समजावून घेतले त्यांची चिकित्सा केली आणि या कष्टकरी वर्गाची कैफियत गव्हर्नर जनरल व इतर वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे सडेतोडपणे मांडली शेती सुधारणे संबंधी त्यांनी सुचवलेले उपाय 150 वर्षानंतरही उपयुक्त व महत्वाचे आहेत. शेतकऱ्यांची दुर्दशा दयनीय अवस्था कर्जबाजारीपणा व त्यांचे होणारे शोषण यासंबंधीचे चिंतन फुले यांच्याशिवाय त्यांच्या समकालीन इतर सुधारकांनी केले नाही असे दिसते शेती व शेतकरी यांचा समग्रपणे व सुसंगतपणे विचार करणारे फुले हे पहिले व एकमेव सुधारक आहेत भारतात एकूण परंपरेतच शेतीचा एवढा गंभीरपणे विचार कोणी केला नव्हता भारतीय शेतकऱ्यांची दुःखी समस्या व एकूण स्थिती मांडणारे फुले हे आधुनिक भारतातील पहिले पुरुष होत. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी महात्मा फुले यांना कृषी अर्थशास्त्रज्ञ असे म्हटले फुले यांनी शंभर वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे रेखाटलेले चित्र अत्यंत वस्तुनिष्ठ होते. महात्मा फुले यांच्या विचारांचा आदर्श घेऊन आजच्या सत्ताधाऱ्यांनी शेती व शेतकरी यांच्या सुधारणेसाठी प्रयत्न केले तर खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांच्या विचारांचा विजय झाला असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ**

1. महाराष्ट्रातील समाज सुधारक, अविनाश धर्माधिकारी, चाणक्य मंडल परिवार पुणे जानेवारी 2004
2. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, एस. एस. गाठाळ, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
3. महाराष्ट्रातील समाज सुधारक, अमित देशमुख, नितीन कदम, सिम्पली पॉईंट पब्लिकेशन, सोलापूर.
4. शिक्षण प्रक्रिया व थोर शिक्षणतज्ज्ञ, एल.जी. देशमुख, फडके प्रकाशन, कोल्हापूर

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# ३. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आजन्म विद्यार्थी असलेला महामानव

**डॉ. जाधव अंकुश नाथा**
आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा.

**सारांश**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणजे विद्वत्तेच्या अद्भुत रसायन होते. प्रचंड विद्याव्यासंग, विविध विषयांचा अभ्यास, हे सर्व प्राप्त करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, घेतलेले कष्ट समजावून घेतले, की त्यांच्या विद्वत्ते पुढे माणूस आपोआप नतमस्तक होतो. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले होते शिक्षणाची शक्ती त्यांनी ओळखली होती समाज व राष्ट्र उधदन्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही या विचारातून त्यांची झालेली जडणघडण, समृद्ध वाटचालीसाठीचे त्यांचे प्रयत्न सारे आजच्या विद्यार्थ्यांनी जाणून मार्गक्रमण केले तर भविष्याची वाट निश्चित प्रकाशन झाल्याशिवाय राहणार नाही.

एकोणिसाव्या शतकाच्या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी होते आणि त्यावेळी त्यांनी देश-विदेशातील मोठ् मोठ्या पदव्या प्राप्त केल्या. हा एक प्रकाराचा चमत्कारच होता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील रामजी हे सैन्यदलामध्ये सुभेदार होते. त्यांनी 14 वर्ष सैन्यदलामध्ये हेडमास्तर म्हणून काम केले. अत्यंत करारी धीरगंभीर शिस्तीचे व प्रेमळ असा त्यांचा स्वभाव होता. आपला मुलगा भीमराव यांच्यावर त्यांनी लहानपणी फार चांगले मूल्यसंस्कार केले. त्यामध्ये शिक्षण, शिस्त, स्वावलंबन, आणि स्वाभिमान कठोर परिश्रम या मूल्यांचा समावेश होता. आपला मुलगा चांगला शिकून तेवढा चांगला माणूस झाला पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. त्यांना पैशापेक्षा शिक्षण ज्ञानाची आस होती म्हणून त्यांनी प्रचंड प्रतिकूल वातावरणातही भीमराव आंबेडकर यांना शिक्षणास प्रवृत्त करून या देशातला एक महान विद्वान बनविले. जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर साताऱ्याच्या शाळेत शिकत होते, तेव्हा लहानपणी त्यांची अवस्था इतर सर्वसामान्य मुलासारखीच होती. शाळेत शिक्षक जेवढे शिकवायचे तेवढाच अभ्यास करत शाळेतून आल्यानंतर दप्तर भिरकावून दुसऱ्या दिवशीच थेट दप्तराला हात लावीत. त्यानंतर अभ्यासाचा आणि त्यांचा काही संबंध नसायचा लहान वयात त्यांच्यातील हुशार विद्यार्थी दिसला नाही, पण नंतर त्यांचे वडील रामजी सुभेदार यांनी त्यांच्यामध्ये वाचनाची गोडी निर्माण केली त्यांना वेग वेगळी पुस्तके वाचायला देली व काही पुस्तके त्यांच्याकडून तोंडपाठ करून घेतली त्यामुळे त्यांना एवढी शिक्षणाची गोडी लागली की ते हातातील पुस्तक सोडता सोडत नसत. आपण वाचले आहेच की नाही हे वडीलांकडून खातर जमा केल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे, बाबासाहेबांनी पावाच्या तुकड्यावर राहुल ग्रंथालयात बसून अभ्यास केला. पुस्तकासाठी घर बांधले म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडण-घडणीत रामजी यांचा फार मोठा लौकिक वाटा आहे.

पुढे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जीवनामध्ये शिक्षणाला फारच महत्व दिले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे त्यांना चांगले माहित होते, म्हणून त्यांनी आपल्या जीवनात अस्पृश्यतेचे,गरिबीचे, चटके सहन करून आपले शिक्षण पूर्ण केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वतःला नेहमी विद्यार्थी समजत असत. 1933 मध्ये परळ येथील एका सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. माझे सर्व आयुष्य विद्यार्थी म्हणून जावे अशी माझी इच्छा होती. ज्ञानाची भूक भागावी म्हणून मी पोटाची भूक मारून अनेक ग्रंथ खरेदी केले.एखादी प्राध्यापकाची नोकरी पत्करून ग्रंथ वाचण्यात सुरेख काळ कंठावा अशी माझी पहिली इच्छा होती. परंतु त्यांच्या डोळ्यासमोर सामाजहित असल्याने त्यांना जास्त काळ प्राध्यापक राहता आले नाही. मात्र त्यांनी आयुष्यात कधीच पुस्तकाची नाते तोडले नाही, म्हणूनच पुस्तकासाठी घर बांधणारा,

आलेल्या पैशातून सदैव पुस्तके खरेदी करणारा हा महामानव या देशातील सर्वात विद्वान महापुरुष ठरला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र इतिहास, तत्त्वज्ञान, राजकारण ,पत्रकारिता, शिक्षण, नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, अशा कितीतरी विषयाचा अभ्यास केला. तसेच जगातील अनेक राज्यघटनांचा अभ्यास केला. या अभ्यासातून मानवी दुःख ,दैन्य दूर करण्याचा प्रयत्न केला,त्यांनी बत्तीस विषयामध्ये पदव्या संपादन केल्या होत्या, म्हणूनच त्यांना पाचशे ग्रॅज्युएशनच्या बरोबरीचा महामानव असे म्हटले जाते. त्यांनी अनेक अभ्यासक्रम वेळेच्या आत पूर्ण केले 8 वर्षांचा अभ्यासक्रम त्यांनी दोन वर्षे तीन महिन्यांमध्ये पूर्ण केला, म्हणून त्यांना विसाव्या शतकातील सर्वात बुद्धिमान म्हणून ओळखले जाते.

हॉर्वर्ड विद्यापीठाने जगातील शंभर विद्वानांचा समावेश असलेला ,दी मेकर्स ऑफ वर्ल्ड, हा ग्रंथ प्रकाशित केला.यामध्ये पहिले नाव तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध यांची तर चौथे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या उद्धारासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. अशी जाणीव नेहमी होत असे, ते म्हणत शिक्षण हेच सामाजिक क्रांतीचे साधन आहे, म्हणून शासनाने सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे असे त्यांना वाटे. माणसाला माणूस म्हणून जगण्याची जाणीव शिक्षणातूनच निर्माण होते. त्यासाठी त्यांनी आपल्या संबंध जीवनात शिक्षणावर भर दिला. 14 नोव्हेंबर 1954 रोजी हैदराबाद येथे एका विद्यार्थी मेळाव्यात समोर बोलताना ते म्हणाले होते, मी फार अभ्यास केला असल्यामुळे लोक मला भितात दुसऱ्याने वर्षभर प्रयत्न करूनही जे काम होत नाही ते काम मी एका मिनिटात करतो. एवढे शिक्षणाचे महत्त्व आहे, विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग केवळ नोकरी मिळवणे एवढ्यासाठी न करता इतिहास, तत्त्वज्ञान, साहित्य, मानसशास्त्र, इत्यादी विषयांचे ग्रंथ वाचण्यासाठी करावा. त्याचबरोबर शिक्षणातून आपले व्यक्तिमत्व ही विकसित करायला हवे विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबातील, गावांमधील इतर अशिक्षित लोकांना चांगले राहण्यासंबंधी मार्गदर्शन करावे. सामाजिक उद्धाराच्या चळवळीत सुशिक्षित तरुणांनी सहभागी झाले पाहिजे असे ते म्हणत, 14 जानेवारी 1948 रोजी मुंबईत धोबी तलाव नाईट हायस्कूलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एक सभा घेतली होती. त्या वेळी बोलताना ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी वक्तृत्वशैली अंगावरली पाहिजे. लोकसत्ताक राज्य असलेल्या युगात वक्तृत्वाची फार आवश्यकता आहे. आपण शत्रूचा देखील आपल्या प्रभावी वक्तृत्वाने समाचार घेऊ शकतो. शिक्षण आणि विद्या याशिवाय आपला उद्धार होणार नाही विधेशिवाय राजकारणाच्या दोऱ्या आपल्या हाती येणार नाहीत, स्वच्छता राखणे, चांगले कपडे , स्वाभिमान बाळगणे, व भरपूर वाचन करणे या गोष्टीची विद्यार्थ्यांना गरज आहे. यासाठी मात्र प्रचंड कष्ट करण्याची तयारी विद्यार्थिनी ठेवली पाहिजे. ते म्हणतात,सुरवातीला प्राध्यापक असताना मी माझे भाषण 12 ते 13 वेळा लिहून काढत असे आणि जेव्हा माझ्या मनाची पक्की खात्री होईल तेव्हाच मी भाषण देत असे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची इंग्रजी भाषा समृद्ध करण्यासाठी त्यांचे वडील रामजी सुभेदार यांनी त्यांना तर्खडकरांची इंग्रजीची पुस्तके अभ्यासासाठी दिली होती.हि पुस्तके त्यांनी मुखोदगत केली होती.त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची इंग्रजी भाषा उत्तम होती.

तर्खडकरांचे रोज अर्धे पुस्तक वाचून संपवत असत. गोखल्यांच्या अंक गणिताच्या पुस्तकातील गणितेही रामजी बाबांनी एका ओळीत सोडवून बाबासाहेबांच्या अभ्यासासाठी दिली होती. रोज मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत जागून अभ्यास करण्याची सवय त्यांना वडिलांनीच लावली होती. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वाचनाची एकाग्रता वाढली होती, आणि त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण झाली आर्थिक चणचण असतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना नवीन पुस्तके खरेदी करून देऊन त्यांची वाचनाची आवड प्रचंड जोपासली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अशा

प्रतिकूल परिस्थितीत स्वतःला झगडून दरवर्षी चांगल्या गुणांनी पास होऊन 1907 साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या काळातील समाजसुधारक सी.के.बोले यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार झाला. त्या वेळी दादासाहेब केळूसकर सुद्धा उपस्थित होते. या दोघांनी पुढे बाबासाहेबांचे महाविद्यालय शिक्षण सुरू करावे अशी सूचना केली, आणि पुढे बाबासाहेब उच्यशिक्षणाकडे वळले. कोलंबिया विद्यापीठात ते जेव्हा शिक्षणासाठी गेले तेव्हा सुरुवातीचा सहा महिन्याचा काळ त्यांनी तेथे मित्रांसमवेत खेळण्यांमध्ये घालविला. मात्र त्याना जाणीव झाली की आपण जर असेच खेळून वेळ वाया घालवत असू तर आपले शिक्षण कसे पूर्ण होईल, आपण विद्वानांच्या पंगतीत जाऊन कसे बसणार? त्यामुळे त्यांनी पुढे सर्व खेळ बंद करून स्वतःला अभ्यासात एवढे गुंतवले, की अभ्यासासाठी त्यांना दिवसाचे 12 तास ही कमी पडू लागले. खोलीमध्ये अभ्यास करताना आजूबाजूच्या मुलांचा खेळण्यांचा खूप आवाज येत असे. तेव्हा ते कानामध्ये कापसाचे बोळे घालून अभ्यास करत असत.

त्याकाळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सर्वात उच्चविद्याविभूषित असल्याने त्यांना सामाजिक प्रश्नाची उत्तम जाण होती. त्यामुळे कुठल्याही प्रश्नावर ते प्रभावीपणे सादरीकरण करत असत डॉ. बाबासाहेब आंबेडकरच आपल्या देशाची घटना उत्तम लिहू शकतात असा घटना समितीच्या सदस्यांना विश्वास असल्याने त्यांच्यावर राज्यघटना लिहिण्याची जबाबदारी आली आपल्या प्रचंड बुद्धिमत्तेने हे काम त्यांनी लीलया पेलले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणाबद्दल प्रचंड आस्था असल्याने व गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या हेतूने त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या माध्यमातून त्यांनी औरंगाबाद व मुंबई येथे मिलिंद व सिद्धार्थ ही दोन महाविद्यालये स्थापन केली.आपल्या शिक्षणाचा त्यांनी स्वतःसाठी उपयोग केला नाही. आपले शिक्षण समाजासाठी उपयोगी पडले पाहिजे, म्हणून त्यांनी 9 मार्च 1924 रोजी बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन केली. तिचा महत्वाचा उद्देश हा होता की बहिष्कृतामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, वाचनालये व वस्तीग्रहे काढणे ,शिष्यवृत्त्या देणे ,आर्थिक उन्नतीच्या योजनासाठी अधिकाऱ्यास भेटले. यासंदर्भात त्यावेळी डॉ.

बाबासाहेब आंबेडकर आपल्या भाषणात म्हणाले, मी आपल्या समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून कसोशीने आणि प्रामाणिकपणे काम करणार आहे .त्यासाठी मी एवढा विद्याअभ्यास केला आहे .मी मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग केवळ माझे कुटुंब व जात त्यासाठी करणार नाही तर सर्व समाजासाठी त्याचा उपयोग करीन.

या देशातील जातीयता नष्ट व्हावी असे त्यांना नेहमी वाटायचे म्हणून त्यानी ,अंनिहीलेशन ऑफ कास्ट, हा ग्रंथ लिहिला. त्यांनी आपले जीवन लोकांसाठी समर्पित करून शिक्षणाचा उपयोग खऱ्या अर्थाने या देशातील शोषित, पीडित ,वंचित ,उपेक्षित ,दलित आदिवासी, कष्टकरी, यांच्यासाठी केला. ते आजन्म स्वतःला विद्यार्थी समजत असत त्यांनी आयुष्यभर आपल्या हातातील पुस्तक खाली पडू दिले नाही. भारतीय राज्यघटनेची निर्मिती ही त्यांच्या विद्या संपतेची देणगी मानावे लागेल

**संदर्भ ग्रंथसूची**


- विकिपीडिया आणि हिंदू प्रतिभा दर्शन –रविकुमार सुरुची प्रकाशन,दिल्ली.
- प्रभावी भाषणे कशी कराल –डॉ.राम कुलकर्णी विद्या भारती प्रकाशन, पुणे.
- जीवन शिक्षण जून -जुलै विशेषांक 2015
- शोधाच्या नव्यागाथा (संपादक ) हरि नरके महाराष्ट्र राज्य प्रकाशन.
- http://www.excellencein-writing-com
- The Real of M Learning Feature of E Learning Access on Google 18-10-2018

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# ४. भारतातील ग्रामीण समुदाय : स्वरुप, प्राचीनता, इतिहास व बदल

**Dr. Deoman Shrikrushna Umbarkar**
Late. Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana.

**ग्रामसंस्था**

स्वतंत्र रीत्या अगर सामूहिक रीत्या स्वतः कसत असलेल्या जमिनीजवळ राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या कायम वस्तीला ग्राम असे सामान्यतः म्हटले जाते. शेती करण्याची कला किंवा तंत्र मानवाला अवगत झाले, तेव्हापासून ग्राम किंवा खेडेगाव हे अस्तित्वात आले. अन्नधान्याच्या शोधार्थ मानव भटकत होता, तेव्हा त्याला एकाच ठिकाणी कायम वस्ती करून राहणे शक्य नव्हते. म्हणून खेडेगावाचे कायम स्वरूप, हे शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या लोकांच्या अन्नधान्याच्या किमान गरजा भागवण्याइतकी उत्पादनक्षमता असलेली जमीन उपलब्ध असण्यावर अवलंबून असे. जमिनीची अशी क्षमता ही मूलतः जमिनीचा गुण आणि जमीन कसण्याकरिता उपलब्ध असलेले ज्ञान आणि अवजारे यांवर अवलंबून असते. जमीन चांगली असेल किंवा जमीन लागवडीखाली आणण्याचे तंत्रज्ञान प्रगत असेल, तेथे वस्ती मोठी असणे स्वाभाविक आहे. खेडेगाव हे मुळातच शेतजमिनीवर आधारित असल्यामुळे व स्वतः कसत असलेल्या शेताजवळ राहण्याची मानवाची सहजप्रवृत्ती असल्यामुळे, त्याच्या आकारावर साहजिकच मर्यादा पडतात. म्हणून खेडेगाव हे नगरापेक्षा किंवा शहरापेक्षा आकाराने लहान असते. खेडेगावाचे स्वरूप हे (१) भौगोलिक, प्रादेशिक किंवा परिस्थितिविज्ञानात्मक, (२) सामाजिक रूपरचनात्मक, (३) सामाजिक संस्थात्मक आणि (४) सांस्कृतिक असे चतुर्विध आहे.

**खेडेगावाचे सामाजिक रूपरचनात्मक स्वरूप**

सामाजिक रूपरचनेत सामाजिक व्यवच्छेदन किंवा प्रभेदन (डिफरेन्शिएशन), स्तरीकरण (स्ट्रॅटिफिकेशन) आणि गतिशीलता (मोबिलिटी) हे विषय येतात आणि ते विशेषतः केंद्रीकृत ग्रामसमुदायाशी संबंधित आहेत. व्यवच्छेदन हे गावात जे अलग अलग गट निर्माण होतात व त्यांच्या सदस्यांमध्ये जो आपपरभाव अनेक सामाजिक संबंधांतून व्यक्त होतो, त्यांवरून दिसून येते. या सामाजिक गटांच्या प्रभेदनाच्या मुळाशी सर्वसामान्यपणे पुढील कारणे असतात : (१) रक्तसंबंध, वंशसंबंध किंवा समाईक पूर्वज यांत लोकांच्या समजुतीला महत्त्व असते. त्यातील खरेखोटेपणाला नाही. (२) विवाहसंबंध. (३) समान धर्म, श्रद्धा, कर्मकांड इत्यादी. (४) भाषा, बोली आणि लोकनीतीतील सधर्म्य. (५) जमिनीची समाईक मालकी आणि तिचा वापर. (६) प्रादेशिक सामीप्य किंवा एकमेकांच्या शेजारी राहणे. (७) सामाजिक हक्क-कर्तव्यांच्या व शासकीय व्यवस्थेच्या बाबतीतील समाईक जबाबदारी. (८) व्यावसायिक हितसंबंध. (९) अनेक प्रकारचे आर्थिक हितसंबंध. (१०) समाईक सत्तेखाली वावरणे. (११) एकाच धार्मिक, शासकीय, शैक्षणिक किंवा इतर सामाजिक संस्थांशी संलग्न असणे. (१२) समाईक संरक्षणाची यंत्रणा. (१३) समाजजीवनातील परस्पर साहाय्याचे सातत्य. (१४)

जीवनाची सर्वसामान्य पद्धत, अनुभव आणि सामाजिक व्यवहार हे समान, समाईक किंवा एकत्रित असणे. या कारणांपैकी रक्तसंबंध, धर्म, विवाह, भाषा आणि जमिनीची समाईक मालकी यांमुळे निर्माण झालेले गट अधिक घनिष्ट संबंधांचे असतात. ग्रामीण समुदायात यांमुळे निर्माण झालेले छोटेमोठे गट असतात. कुटुंब आणि सगेसोयरे यांचा गट हा या दृष्टीने अतिमहत्त्वाचा ठरतो. परंतु समुदाय हाच एक मोठा गट असतो. कारण त्याच्या मागे वर उल्लेखिलेली सर्वच कारणे असतात. ग्रामीण समुदाय हा या दृष्टीने एक मोठा परंतु नागरी समाजाच्या तुलनेने कितीतरी लहान असा प्राथमिक गट असतो. नित्य-नैमित्तिक व्यवहारांतील अनेक अन्योन्य संबंधांच्या धाग्यांनी तसेच इतिहास, परंपरा व अनुभव यांच्या साधर्म्याने व समाईकतेने आणि शासकीय, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाच्या स्वयंपूर्णतेने समुदायाच्या सदस्यांमध्ये आपल्या समुदायाबद्दल आपुलकी निर्माण झालेली असते. कुटुंबात जन्मलेले मूल ज्याप्रमाणे कुटुंबातील सदस्य आणि त्यांच्यातील परस्परसंबंध यांचे सातत्य गृहीत धरते त्याप्रमाणे ग्रामीण समुदायाचा सदस्य हा त्यातील सामाजिक संबंध हे चिरंतन स्वरूपाचे आहेत, असे समजून वागतो. त्याला काही पर्याय असू शकेल, याची कल्पनादेखील त्याच्या मनाला शिवत नाही. म्हणून प्रचलित सामाजिक संबंध हे त्याच्या दृष्टीने अंतिम स्वरूपाचे बनतात. हे संबंध टिकविणे हेच त्याचे कार्य ठरते. सामाजिक संबंध हे त्याच्याकरिता साधन न बनता साध्य बनतात. वर उल्लेखिलेल्या कारणांमुळे जवळीक अधिक निर्माण झालेल्या व्यक्तींचा औपचारिक वा अनौपचारिक गट बनतो. त्या गटापुरता संबंधित व्यक्तींच्या मनात आपलेपणा असतो आणि इतर गटांतील व्यक्तींबद्दल परकेपणा असतो. समुदाय सर्व दृष्टींनी स्वयंपूर्ण असेल, म्हणजे समुदायाच्या व समुदायातील व्यक्तींच्या सर्व गरजा ह्या बाह्य संपर्काशिवाय भागविल्या जात असतील आणि समुदायातील व्यक्तींचे व गटागटांचे संबंध हे कायम स्वरूपाचे असतील, तर समुदाय हाच महत्त्वाचा गट ठरतो. अशा समुदायातील भेदात्मक इतर गट हे सामुदायिक जीवनास पूरक म्हणून राहतात किंबहुना गटाधिष्ठित जीवनावरच सामुदायिक जीवन आधारलेले असते.

**प्राचीन भारतीय ग्राम**

वाल्मीकी रामायणात 'घोष' व 'ग्राम' अशा दोन प्रकारच्या खेड्यांचा उल्लेख आहे. त्यांवरील अधिकाऱ्यांना अनुक्रमे घोष-महत्तर व ग्राम-महत्तर म्हणत. घोष हे ग्रामापेक्षा लहान असे. रामायणात ग्रामणी नावाच्या अधिकाऱ्याचाही उल्लेख आहे. ग्रामणीचा मान व अधिकार मोठा असावा. कारण जेव्हा रामाने रावणाचा वध केला, तेव्हा देवांनी रामाची स्तुती करताना त्याची तुलना ग्रामणीशी केली होती. महाभारतातही घोष व ग्राम यांचा उल्लेख आहे. घोष म्हणजे गौळवाडा, हा साहजिकच जंगलाजवळ वसलेला असे. घोषाच्या रहिवाशांना गोप म्हणत असत. मनू मात्र गावच्या अधिकाऱ्यास 'प्रग्रामिक' म्हणून संबोधतो. ग्रामिकाने कर वसूल करून सर्वसामान्य प्रशासन करावयाचे असा संकेत होता. ग्रामिकाच्या वरचा अधिकारी 'दशी' हा दहा ग्रामांचा प्रशासकीय अधिकारी. वीस गावांचा अधिकारी 'विशंतीश', शंभर गावांचा अधिकारी 'शती' किंवा 'शतग्रामाधिपती'. त्याच्यावरील एक सहस्र गावांचा प्रशासकीय अधिकारी सहस्र-ग्रामाधिपती म्हणून ओळखला जाई.

ग्रामणी जरी राजाने नेमलेला असला आणि त्याला प्रशासकीय अधिकार असले, तरी ग्रामवृद्धांच्या (ग्रामपंचायतीच्या) साहाय्याने व सल्ल्यानेच तो कारभार करीत असे. हे ग्रामवृद्ध म्हणजे कुटुंबप्रमुखच असत. जर ग्रामणीने परंपरेविरुद्ध किंवा रूढ चालीरीतींच्या विरुद्ध वर्तन केले, तर त्यास सुधारण्याचे व शिकविण्याचे कार्य ग्रामवृद्ध करीत. राजा व प्रजा यांचे परस्परसंबंध ग्रामणी या अधिकारपदात पुरेपूर व्यक्त होत. ग्रामणी हा जरी राजाने नेमलेला असला, तरी तो लोकांमधीलच एक असल्याने तो त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करीत असे. गावाचे रक्षण करणे, हे ग्रामणीचे पहिले कर्तव्य. त्याकरिता तो स्वयंसेवक व रक्षक यांचे एक पथक तयार करी. कर वसूल करून त्याची नोंद करून ठेवी. सर्व महत्त्वाचे कागद त्याच्याच अधिकारात असत व तो सर्वांच्या सहकार्याने कार्य करीत असे. ग्रामणीला काही न्यायाधिकारही असत.

न्यायदान हेसुद्धा गावाच्या पातळीवरच होत असे. राजाच्या दरबारी फक्त अपील होत असे.महाभारताच्या 'शांतिपर्वा'त भीष्माने युधिष्ठिरास या न्याय देणाऱ्या संस्थांच्या कार्याबद्दल पुष्कळ माहिती सांगितली आहे. राजेशाहीच्या उदयापूर्वी अस्तित्वात असलेल्या स्थानिक न्यायसंस्थेस राजदरबारीही मान्यता होती. राजा हा कायदा बनवत नसे, तर परंपरेने रूढ झालेल्या नियमांचे तो फक्त पालन करी. म्हणून ग्रामीण न्यायसंस्थेच्या निर्णयाविरुद्ध राजाकडे अर्ज आला, तरी या नियमांस अनुसरूनच त्याचा विचार होई.

**बुद्धकालीन भारतीय ग्राम**

ख्रि. पू. पाचव्या शतकापासून बौद्ध व जैन धर्मग्रंथांत भारतातील शेतीव्यवस्थेबाबत व स्वयंपूर्ण ग्रामसंस्थेबाबत निर्देश आढळतात. बौद्ध साहित्यात गावे, नगरे व किल्ले यांच्या रचनेबाबत व व्यवस्थेबाबत बराच तपशील दिलेला आहे. गम, निगम, कुळ व नागरक यांच्याबद्दलही उल्लेख आहेत. जैनांच्या ग्रंथांत घोष, खेत, खर्वाट, ग्राम, पल्ली, पत्तन, संवाह, ऊआगर, मातंब, इ. प्रकारच्या वस्त्यांबाबत उल्लेख आलेला आहे. बौद्ध जातकांमध्ये सर्वसाधारण खेड्यात १,००० कुटुंबसंख्येपर्यंतची व्यवस्था वर्णिलेली आहे. गावातील घरे एकमेकांच्या इतकी जवळ असत, की एका घराला लागलेली आग संपूर्ण गावभर सहज पसरत असे. प्रत्येक गावास दरवाजा असे. त्यापलीकडे फळबागा व त्यानंतर शेतजमीन असे. ग्रामक्षेत्र असे. शेतसंरक्षक हा फासाच्या व कुंपणाच्या साहाय्याने पिकांचे हिंस्र पशुपक्ष्यांपासून संरक्षण करीत असे. ग्रामक्षेत्राच्या पलीकडे सार्वजनिक कुरण असे व श्रेष्ठकनिष्ठ हा भेद न करता गुराढोरांस चारण्याचा हक्क सर्वांना समान असे. जातकांत गावच्या गुराढोरांना कुरणात चारणाऱ्या गोपालकाबद्दल माहिती आहे.

गावातील शेतजमिनीची मालकी ही खाजगी स्वरूपाची असे. शेतांची सीमा नीट आखलेली असे. सहकारी पद्धतीने जलसिंचन चाले. बहुधा शेताच्या सीमा पाण्याच्या पाटांनी नक्की होत. पाण्याचा पुरवठा हा मुखियाच्या वा पाटलाच्या अधिकाराखाली येत असे.

गावाच्या कुरणावर व जंगलावर सर्वांचा समान हक्क असे. पडलेले जंगल-लाकूड विनामूल्य नेता येत असे. कुरणाच्या किंवा जंगलाच्या कुठल्याही भागाचा क्रय-विक्रय होत नसे, त्यावर आनुवंशिक मालकी हक्क सांगता येत नसे.

राजाने इनाम म्हणून ब्राह्मणास किंवा इतर कुणास एखादे गाव बक्षीस जरी दिले, तरी गावजमिनीचा मालकी हक्क त्यास मिळत नसे.

**मौर्यकालीन ग्रामसंस्था**

गावाच्या सीमा नदी, पर्वत, जंगम, पाणवठे, तलाव, बांध, झाडे इत्यादींच्या आधारे नक्की कराव्यात, असे कौटिल्याने अर्थशास्त्रात म्हटले आहे. दोन गावांमधील अंतर एक किंवा दोन कोस असावे, म्हणजे मदतीच्या वेळेस एकमेकांना चटकन मदत करता येते. दहा गावांच्या संघटनेस 'संग्रहण', दोनशे गावांच्या संघटनेस 'कर्वाटिक', चारशे गावे असल्यास 'द्रोणमुख' आणि आठशे गावे असल्यास 'महाग्राम' म्हणत असत. महाग्रामास प्रशासकीय नाव 'स्थतनुज', असे होते. कदाचित स्थतनुजपासूनच आधुनिक ठाणे हा शब्द प्रचलित झाला असावा. आजच्या प्रमाणेच स्थतनुज हे व्यापाराचे व जत्रेचे केंद्र असे.

गावाचा प्रशासकीय नोकरवर्ग पुढीलप्रमाणे असे : (१) अध्यक्ष— गावचा मुख्य, (२) सांख्यक— हिशेब ठेवणारा, (३) स्थानिक— निरनिराळ्या श्रेणीचे अधिकारी, (४) अनिकस्त (पशुवैद्य), (५) जंधाकारिक (ग्रामदूत). यांशिवाय गावाच्या स्वच्छतेसाठी चिकित्सक व घोड्यांच्या देखरेखीसाठी अश्वदमक नावाचा अधिकारी असे. या सर्व अधिकाऱ्यांना करमुक्त जमीन मिळत असे, पण ती जमीन ते विकू शकत नसत किंवा गहाणही ठेवू शकत नसत.

सम्राट चंद्रगुप्ताच्या काळी (इ.स.पू. ३२२—२९८) लोकसंख्येनुसार, ज्येष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे गावांचे वर्गीकरण करण्यात येत असे. त्यांचे आणखी विभाजन पुढीलप्रमाणे करण्यात येत असे : (१) ग्रामग्र — महसूल भरणारी गावे. (२) परिहारक — महसूल माफ असलेली गावे. ही गावे अध्यापकांस व पुजाऱ्यांस देण्यात येत. महसूल गोळा करून तो स्वतः वापरण्याची सवलत त्यांना होती. त्याबद्दल शिक्षणाचा प्रसार करणे व लोकांना धर्माप्रमाणे वागावयास मदत करणे, ही कर्तव्ये त्यांनी पार पाडावयाची असत. (३) आयुधुज — या गावांनाही कर माफ असे. त्याबद्दल युद्धाच्या वेळी सैनिक पुरविण्याचे कार्य या गावांचे असे. (४) काही गावे कर रोखीने न भरता वस्तूंच्या स्वरूपात भरत. शेतमाल, पशू, जंगलातील उत्पन्न, चांदी, सोने, माती, शंख, धातू, मजुरी इ. रूपाने ते कर भरीत असत.

**महाराष्ट्रातील ग्रामसंस्था**

महाराष्ट्रातील ग्रामसंस्था ही भारतीय ग्रामसंस्थेचे एक प्रदेशविशिष्ट रूप आहे. महाराष्ट्रात तीन प्रकारची खेडी प्रामुख्याने दिसतात. पहिला प्रकार म्हणजे बीजात्मक किंवा केंद्रीय गाव. ही गावे आसपासच्या शेतांमुळे अगदी अलग दिसून येतात. दख्खनच्या पठारी प्रदेशात ही गावे आहेत. असल्या गावांची शेते दुसऱ्या गावांच्या शेतांना लागून असतात व बहुतेक गावांना दाखविण्याजोग्या सीमा नसतात. दुसऱ्या प्रकारची गावे पश्चिम किनाऱ्यावर कोकणात आढळतात. बहुतेक रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस लंबरेषेत गावे पसरलेली असतात. प्रत्येक घराच्या आवारात नारळी-पोफळीची झाडे असतात व घरांना कुंपण असते. अरबी समुद्रात मिळणारे ओढे एका गावास दुसऱ्या गावापासून वेगळे करतात. जेथे असे ओढे नसतात, तेथे एका गावाची हद्द संपून दुसऱ्या गावाच्या हद्दीत गेल्याचे परक्या माणसास कळत नाही. या गावात दोन प्रकारची शेती होते : बागायती व भातशेती. नारळी, सुपारी, केळी, फणस, काजू इत्यादींची झाडे घराजवळच कुंपण

घालून लावतात, तर भाताची शेते बहुधा घरापासून दूर असतात. तरी शेतांची जागा व घरांची जागा यांत फरक केला जात नाही. तिसऱ्या प्रकारची गावे नैर्ऋत्येस सातपुड्याच्या डोंगरांत आहेत. तेथील शेतात दोन किंवा तीन घरे आढळतात. ही घरे नातेवाईकांचीच असतात वडील आणि विवाहित मोठी मुले किंवा विवाहित भाऊ या झोपड्यांतून राहतात. दुसरा घरांचा गट सु. अर्ध्या किमी. अंतरावर असतो. एका गावातील काही घरे दुसऱ्या गावातील घरांच्या जास्त निकट असतात. लागवडीची जमीन व घरे यांत फारसे अंतर नसते. त्यामुळे गावाचे अंगीभूत ऐक्य किंवा स्वतंत्र घटक असलेली गावे येथे सापडत नाहीत. महसूल खात्याने दगडांच्या ढिगाऱ्यांच्या साहाय्याने गावांच्य सीमा निश्चित केल्या आहेत तेवढ्याच.

केंद्रीकृत खेड्यांत गावातील रस्ते व बाहेरगावी जाणारे रस्ते वेगळे आढळतात. गावातील रस्त्यांना आळी, गल्ली किंवा बोळ म्हणतात. एका जातीची किंवा व्यावसायिकांची घरे असलेली आळी (ब्राह्मणआळी, तांबटआळी इ.), गल्ली किंवा बोळ म्हणजे अरुंद रस्ता. गावापासून थोड्या अंतरावर असलेल्या वस्तीस वाडी म्हणतात. शासन, आर्थिक तसेच सामाजिक-सांस्कृतिक व्यवहार या दृष्टींनी ही वाडी गावाचाच एक भाग असते. गावात पाटलाचे व इतर वंशपरंपरागत ग्रामसेवकांची घरे असतात. वाडीत कधीकधी एक मोठे कुटुंब आपले नातलगांसह राहत असते. कधीकधी मुख्य घरे गावात असतात, तर वाडीत हंगामी स्वरूपाच्या झोपड्या असतात. कधीकधी वाडीत फक्त एकाच जातीची वसाहत असते. एखाद्या जातीस व्यवसायासाठी जितकी जागा लागते, ती गावात उपलब्ध होत नाही म्हणून ते वाडी करून राहतात. सातारा जिल्ह्याच्या पूर्वेस धनगरांच्या बनगरवाड्या आहेत. त्यांना आपल्या शेळया-मेंढ्या ठेवण्यास जास्त जागा लागते. वाडी बहुधा जातीच्या, कुळाच्या किंवा जमातीच्या नावाने असते. उदा., रामोशीवाडी, शिंदेवाडी, ब्राह्मणवाडी इत्यादी.

सामान्यतः एका जातीचे लोक एकाच ठिकाणी वस्ती करून राहतात. गावाच्या टोकास व कधीकधी गावापासून दूरही अस्पृशांची वस्ती असते. यांना संस्कृतमध्ये अंतेवासी व मराठीत वेसकर (वेशीजवळ राहणारे किंवा वेशीचे रक्षण करणारे) म्हणतात. त्यांच्या वस्तीस वाडा या नावाने संबोधतात. उदा., महारवाडा, मांगवाडा, कुंभारवाडा, कोळीवाडा इत्यादी. बाहेर राहणारे सगळेच अस्पृश्य असतात, असे नाही. काही व्यावसायिकांना जास्त जागा लागते म्हणूनही ते गावाच्या वेशीजवळ किंवा दूर राहतात. पश्चिमेची शुद्ध हवा मिळावी म्हणून बऱ्याच ठिकाणी अस्पृश्यांची घरे पूर्वेस असतात. तसेच त्यांचे पाणवठेही नदीच्या खालच्या बाजूला असतात.

पूर्वी गावाचे आर्थिक जीवन हे बलुतेदारी पद्धतीने चालत असे. महाराष्ट्रातील बारा बलुतेदार हे कारागीर असल्याने त्यांचा हक्क जास्त मानला जातो. हे सर्व बलुतेदार एकाच गावात असतात असे नाही. याशिवाय इतर काही जातींच्या लोकांनाही बलुते दिले जाते. कोणाला बलुते म्हणून धान्य द्यावे किंवा नाही, हे गावकरी ठरवतात. गावातील बहुसंख्य कुटुंबे, म्हणजे ६० ते ७० टक्के लोक मुख्यत्वे शेतीचा धंदा करतात. ह्यांपैकी काही जमिनीचे मालक असतात, तर काही खंडाने शेती करतात. गावात एकदोन दुकानदार असतात. शिवाय चांभार, वाजंत्री व ताशेवाले, खाटिक, देवळाचा पुजार, धनगर, सुतार रामोशी इत्यादींची एकदोन कुटुंबे असतात. काही फिरत्या टोळ्या दरवर्षी पावसाळ्यानंतर गावात येतात, काही दिवस राहून गावकऱ्यांपुढे तमाशा, कसरतीचे खेळ, नाच, माकडांचे किंवा अस्वलांचे खेळ करतात किंवा

भांड्याकुंड्यांची दुरुस्ती करून धान्य अथवा पैसे मिळवतात. पुष्कळदा धंदे करणाऱ्या जातींच्या मालकीचीही काही जमीन असते पण ती बहुधा खंडाने दिलेली असते. जमीनमालक व खंडकरी सुतार, लोहार, महार इत्यादींना दरवर्षी त्यांच्या कामाबद्दल बलुते म्हणून धान्य देतात. ह्यांतच न्हावी, मांग, सुतार, चांभार, पुजारी, कुळकर्णी, महार इत्यादींचा समावेश होतो. इतर व्यावसायिकांना — उदा., गोंधळी, कीर्तनकार, देवीच्या उत्सवांत नाच-गाणी करणारे लोक ह्यांना — काही पैसेही देण्याची प्रथा आहे. गावातील लोक थोडे सधन असले, तरच तेथे सोनार आढळतो. त्याला रोख पैसेच देतात व घरात लग्नकार्य किंवा इतरही काही समारंभ असेल, तर त्याला जेवायलाही बोलावतात. सर्वसाधारणपणे ग्रामीण लोकांपैकी सु. १५ टक्के लोक विशेष प्रकारच्या कौशल्याचे काम (उदा., सुतार, सोनार, कुंभार) करतात असे दिसून येते.

गावाचे समाजजीवन जातीजातींतील परस्परसंबंधांनी ठरविले जाते. समाजजीवनाचा व स्तरीकरणाचा जवळचा संबंध असतो. गावाबद्दल आपुलकी असली, तरी रोजच्या व्यवहारात लोक आपापले स्तर सोडून सामाजिक संबंध ठेवीत नाहीत. बलुतेसंबंध मात्र पाळले जातात. एकमेकांच्या बैलगाड्या किंवा बैल शेतीसाठी वापरले तरी चालते. कोणी कोठे बसावे, कोणाबरोबर चिलीम ओढावी इ. गोष्टीही ठरलेल्या असतात.बहुतेक व्यक्तींचे जीवन सग्यासोयऱ्यांमध्येच व्यतीत हाते. प्रत्येक जातीची एक नियंत्रण यंत्रणा असते. मराठा, ब्राह्मण, गुरव यांत ही यंत्रणा अनौपचारिक स्वरूपाची असते. विवाहादी कार्यात लोक जातिनियमनांच्या उल्लंघनांची चर्चा करतात व तीतून मार्ग काढतात. कुंभार, न्हावी, परीट, चांभार, महार, मांग इ. जातींत मात्र पंचायतींची औपचारिक यंत्रणा आढळून येते.गावात मुलकी पाटील व पोलीस पाटील असे दोन पाटील असतात. यांशिवाय गावचे व प्रत्येक जातीचे पुढारी असतात.गावातील सण, उत्सव व इतर धार्मिक कार्यक्रम गावच्या एकात्मतेस मदत करतात. यांत इतर गावांचे लोकही पाहुणे म्हणून भाग घेतात. बाहेरच्या लोकांसमोर गावाची वैशिष्ट्ये व एकता दिसावी, असा प्रयत्न केला जातो. होळी, दसरा यांसारख्या सणांच्या वेळी गावाचे सर्व लोक त्यांत भाग घेतात. याशिवाय प्रत्येक जातीचे सण आणि त्या त्या जातीतील इतर धार्मिक समारंभ वेगवेगळे असतात. महाराष्ट्रातही लोकाचाराचे विशिष्ट नमुने आहेत. त्या अनुषंगाने धार्मिक पद्धतींतही फरक पडतो.

ब्रिटिशांच्या आगमनापासून महाराष्ट्राच्या ग्रामसंस्थेतही बरेच बदल होत आले. आर्थिक व्यवहारांत बलुतेदारी जवळजवळ मोडकळीस आली आहे. महाराष्ट्रातील जातिनिष्ठ धंद्यांत शिंप्याचा धंदा बहुतेक सर्व जातींनी उचललेला आहे. काही गावांतून सुताराचा धंदा स्थानिक महार करताना दिसतात. अर्थात ज्या गावात सध्या जातीचा सुतार नाही, तेथेच असे घडलेले आहे. बलुतेदारी मोडत चालली असली, तरी पूर्वीचे जातिव्यवस्थेतील धंदे त्या त्या जातींच्याच हातात अजूनही आहेत. गावांचा शहरांशी संबंध वाढल्याने, गावांत साखर कारखाने इत्यादींची भरभराट झाल्याने तसेच विकास-गट, नवीन ग्रामपंचायती व निवडणुका यांमुळे गावांचे आर्थिक व सामाजिक जीवन आमूलाग्र बदलले आहे. जातिपंचायतींचा प्रभाव कमी झाला आहे. अस्पृश्य लोकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे तसेच अनेक अस्पृश्यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे खूप जागृती झाली आहे. अजून गावाचे ऐक्य धार्मिक सणांच्या वेळी दिसून येते. जातीजातींतील उच्चनीचतेच्या भावना कमी झाल्या आहेत व आपापसांतील सामाजिक संबंध सुधारत आहेत. दळणवळण

व शिक्षणाचा प्रसार वाढल्याने तसेच नवे नेतृत्व पुढे येत असल्याने ग्रामसंस्थेच्या अलगपणाच्या जुन्या कल्पना बदलत चालल्या आहेत.

कारखानदारीची वाढ झाल्याने तसेच शेतीवर अवलंबून असणारांची संख्या वाढल्याने शहरांकडे धाव वाढली आहे. विशेषतः ज्या अस्पृश्य लोकांना आपला सामाजिक दर्जा सुधारून घ्यावयाचा आहे, त्यांना शहरात येऊन राहणे सोयीचे वाटते. शेतीची तंत्रे सुधारल्याने शेतकरी अधिक प्रगत स्थितीत आहे. एकत्र कुटुंबसंस्थेच्या जागी केंद्र कुटुंबांचा प्रादुर्भाव होत आहे. जातिसंस्थेतील स्थित्यंतरांचा सर्वांत मूलभूत परिणाम ग्रामसंस्थेवर होत आहे. ग्राम हा सांस्कृतिक दृष्ट्या स्वतंत्र घटक राहील, की प्रादेशिक संस्कृतीचा घटक बनेल हे आत्ताच सांगणे कठीण आहे. ग्रामीण समुदाय आणि नागरी समाज हे समाजव्यवस्थेचे विरुद्ध टोकाचे दोन नमुने आहेत. ग्रामीण समुदाय हा मुख्यत्वे शेती आणि तत्संबंधीच्या जोडधंद्यांशी अधिक निगडित असतो, तर नागरी समाज हा बिगरशेती उत्पादनाशी व सेवाभावी व्यवसायांशी अधिक निगडित असतो. ग्रामीण समुदाय हा आकाराने लहान असतो त्याचप्रमाणे भाषा, संस्कृती, परंपरा या दृष्टींनी एकजिनसी, प्राथमिक स्वरूपाच्या व्यवसायात गुंतलेला, बाह्यसंपर्कापासून अलिप्त आणि बाहेरील लोकांना आत घेण्यापेक्षा गावातील लोकांना बाहेर पाठविणारा असा असतो. ग्रामीण समुदायात व्यवसाय आनुवंशिक बनण्याची शक्यता अधिक असते, यामुळे स्तरीकरणही आनुवंशिक बनते. यामुळे कुटुंबाचे व कुटुंबप्रमुखाचे महत्त्व अधिक असते. याउलट नागरी समाज हा आकाराने मोठा आणि भाषा, संस्कृती, परंपरा या दृष्टींनी बहुजिनसी असतो. प्रत्येक व्यवसाय तेथे मोठ्या प्रमाणावर चालतो कारण त्या व्यवसायाचा फायदा त्या त्या नगरात राहणाऱ्या लोकांकरिताच नव्हे, तर दूरवर पसरलेल्या लोकांनाही व्हावयाचा असतो. काही व्यवसाय असे असतात, की त्यांचे उत्पादन हे जागतिक बाजारपेठांकरिता होत असते. नागरी उत्पादन व्यवसायांत आधुनिक काळात यंत्रतंत्रांचा वापर अधिक होऊ लागला आहे. उद्योगव्यवसायांचा वाढता आवाका, यंत्रतंत्रांचा वापर आणि गुणानुक्रमाने मिळणारे काम व सामाजिक स्थान यांनी कुटुंबाला दुय्यम स्थान प्राप्त झाले. व्यवसाय कौटुंबिक राहिला नाही. त्यामुळे व्यावसायिक हितसंबंध आणि कौटुंबिक हितसंबंध यांची फारकत झाली आहे. अर्थव्यवस्थेत कुटुंबाऐवजी व्यक्तीला महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक हितसंबंधांवरून राजकीय हितसंबंधांचे स्वरूप ठरत असल्याने शासकीय वा राजकीय व्यवस्थेतही कुटुंबाला विशेष स्थान राहिलेले नाही. सर्व हितसंबंध अशा रीतीने नागरी समाजात कुटुंबनिरपेक्ष बनत चालले आहेत. यामुळे व्यक्तींची सामाजिक गतिशीलताही वाढली आहे. कुटुंबावरून व्यक्तीचे सामाजिक स्थान न ठरता व्यक्तीवरून कुटुंबाचे स्थान ठरते. यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीचे विघटन होत चालले आहे.

ग्रामीण समुदायाचे पूर्वीचे प्रादेशिक स्वरूप आता कमी होत चालले आहे. सामूहिक संरक्षणाची आवश्यकता कमी झाल्याने, दळणवळणाची यांत्रिक साधने उपलब्ध असल्याने व वीज, पाणीपुरवठा, रस्ते यांची सोय असल्यामुळे मुख्य गावठाण सोडून आपल्या शेतावर जाऊन राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. शेती-उत्पादन हे बहुधा ग्रामीण रहिवाशांच्या उपभोगापेक्षा बाजारपेठांकरिता होत असल्याने शेतकऱ्यांचा शहरांशी व शहरी बाजारपेठांशी अधिकाधिक संबंध येत असून गावकऱ्यांशी असलेला पूर्वीचा संबंध नष्ट होत चालला आहे. गावकऱ्यांचे सामाजिक संबंध हल्ली पूर्वीसारखे

वारंवार येत नसल्याने व त्यांचे संबंध अपरिहार्य राहिले नसल्याने, गावकऱ्यांत पूर्वीची एकात्मता राहिलेली नाही. शेतीबरोबर इतर अनेक जोडधंदे निघाले आहेत. या निमित्ताने तसेच व्यापाराकरिता व शासकीय व्यवस्थेच्या निमित्ताने गावात अनेक नागरी रहिवाशांचा प्रवेश झाला आहे. त्या गावाबद्दल अगर गावाच्या परंपरेबद्दल आत्मीयता नसलेल्या लोकांचा प्रवेश गावात होत असल्यामुळे व गावातील लोक शहरांतून आपल्याबरोबर शहरी संस्कृतीचे संस्कार आणीत असल्यामुळे गावातील पूर्वीचा सांस्कृतिक एकजिनसीपणा नष्ट होत आहे. गावातील शेतीनिष्ठ संस्कृती लोप पावत असून, त्या जागी उद्योगधंद्याची व्यापारी संस्कृती उदयास येत आहे.पूर्वीचे प्रभेदन व स्तरीकरण यांनाही पूर्वीसारखे आनुवंशिक स्थान राहिले नाही परंतु भारतात मात्र जातिव्यवस्थेमुळे अजूनही घरांची मांडणी जातीवरच आधारलेली दिसते. याचे कारण आज तरी आर्थिक किंवा व्यावसायिक नसून धार्मिकच आहे.पूर्वीच्या सामाजिक संस्थाही आज मोडत चालल्या आहेत. अर्थव्यवस्था व शासनव्यवस्था यांची ताबेदारी आता विशिष्ट कुटुंबाकडे राहिलेली नाही. शिक्षण सर्वांना खुले केल्यामुळे आणि त्या शिक्षणाच्या आधारे परंपरा सोडून कोणताही व्यवसाय पतकरण्याची मुभा सर्वांना असल्याने पूर्वीची स्तरीकरणाची चाकोरी सैल होऊन गतिशीलता वाढलेली आहे. परिणामतः जुन्या पारंपरिक ग्रामसंस्थेचे स्वरूप झपाट्याने बदलत चालले आहे.

**संदर्भ**

1. Altekar, A. S. Village Communities in Western India, Bombay, 1927.
2. Baden-Powell, B. H.The Indian Village Community, London, 1896.
3. Chiva, I. Rural Communities : Problems, Methods and Types of Research UNESCO, 1958.
4. Desai, A. R. Ed. Rural Sociology in India, Bombay, 1961.
5. Dube, S. C. Indian Village, London, 1959.
6. Dube, S.C. India's changing Villages, London, 1963.
7. Loomis, Charles Beagle, Rural Sociology, The Strategy of Change, Englewood-Cliffs, 1964.
8. Maine, Sir Henry, Village Communities in the East and West, London, 1972.
9. Malaviya, H. D. Village Panchayats in India, New Delhi, 1956.
10. Marnott, Mukim, Ed. Village India, Chicago, 1960.
11. Majumdar, D. N. Caste and Communication in an Indian Village, Bombay, 1962
12. Orestein, Henry, Gaon : Conflict and Cohesion in an Indian Village, Princeton, 1965.
13. Redfield, Robert, Peasant Society and Culture, Chicago, 1956.
14. Sanderson, Dwight, Rural Sociology and Rural Social Organization, New York, 1942.
15. Sorokin, P. A. Zimmerman, C. C. Galpin, C. J. A Systematic Source Book in Rural Sociology, Vol. I—III, New York, 1965.
16. **आत्रे, त्रिं. ना. गांव-गाडा, मुंबई, १९५९.**
17. **कर्वे इरावती, हिंदूंची समाजरचना**, नागपूर, १९६४. कुलकर्णी, मा. गु. मुटाटकर, रामचंद्र

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# ५. दुर्बल घटकात न्याय, स्वातंत्र्य व समतेची पेरणी करणारे डॉ. आंबेडकर

**प्रा. धर्मदास वि. घोडेस्वार**
सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, चिंतामणी महाविद्यालय पोंभूर्णा, जि. चंद्रपूर.

**सारांश**

भारतीय समाजातील विषमतावादी समाजरचनेमुळे समाजातील बहुसंख्यक अशा घटकांना न्याय, स्वातंत्र्य, समता या मुल्यापासुन वंचीत रहावे लागले. डॉ. आंबेडकरांनी समाजाच्या या परिस्थितीत आमुलाग्र बदल घडवुन आणन्यासाठी व्यापक लढा दिला व कायद्याच्या आधारावर समाजातील शोषीत, पीडीत, वंचीत व एकूणच दुर्बल घटकांना समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य, समता यावर आधारीत विचारांची पेरणी केली, नव्हे तर त्यास सामाजिक चळवळीच्या माध्यमातुन कृतीशीलतेचे पाठबळसुद्धा दिले. ज्या समाजाचे वर्षानुवर्षे शोषण झाले, ज्यांच्यावर अन्याय अत्याचार झाला, व जे आपल्या हक्कापासून वंचीत राहीले होते अशांना कायद्याच्या पाठबळाने संरक्षण प्राप्त करून देण्याचा डॉ. आंबेडकरांचा सुरूवातीपासूनच कयास होता या अनुषंगानेच त्यांनी संविधान निर्मितीचे महत्त्वपुर्ण कार्य हाती घेवुन यातुन वंचीत व दुर्बल घटकांना विविध तरतुदीद्वारे विशेष संधीची उपलब्धता करून दिली. पारंपारीक समाजरचनेला छेद देवुन नव्या समाजाची निर्मिती करण्याच्या उदात्त हेतुने व्यक्ती व समाजाच्या सर्व अंगाना स्पर्श करणाऱ्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुरस्कार केला. व्यक्तिच्या विकासात धर्माच्या आवश्यकतेचे प्रतिपादन करतांनाच धर्म हा न्याय व समता या मुल्यावर आधारीत असावा या तत्वावर धर्मविषयक विचारालाही सामाजिक न्यायाची जोड दिली. डॉ. आंबेडकरांचा समान न्याय हक्काचा लढा हा सर्वव्यापक व सर्वसमावेशक होता. यात दुर्बल व अबला म्हणून गणलेल्या व पुरूषी मानसीकतेचा शिकार झालेल्या स्त्रीची दास्यत्वातुन मुक्ती सुद्धा प्रामुख्याने अंतर्भुत होती. अशातच समाजातील कामगार व कष्टकरी वर्गाचे होणारे शोषण व त्यांची करण्यात येणारी पिळवणूक दुर करण्याचा विडाही त्यांनी उचलला. एकूणच समाजातील उपेक्षीत, दुर्बल घटकांच्या उत्कर्षासाठी त्यांनी हाती घेतलेली सामाजिक चळवळ ही समताधीष्ठीत समाजाची निर्मिती करणे या उदात्त हेतुनी अंतर्नीहीत होती.

**बिज शब्द :—** मानवी तत्व, विषमता, परीवर्तन, कायदा, दुर्बल घटक, समताधिष्ठीत समाज, सामाजिक न्याय, अधिकार, उत्कर्ष.

**प्रस्तावना**

स्वत: अस्पृश्य जातीत जन्मल्यामूळे डॉ. आंबेडकरांना संपुर्ण आयुष्यभर जातीय उच्चनिच्चता व सामाजिक विषमतेचे अग्निदाह सहन करावे लागले. तत्कालीन भारतीय समाजात सर्वोच्च विद्याविभूषित असून देखील जातीय भेदभावाच्या नावावर त्यांना पदोपदी अपमानास्पद वागणूक मिळाली असल्यामूळे देशातील अर्धनग्न, अर्धपोटी, अगतीक, मागास, निरक्षर व दुर्बल समाजबांधवाचे काय हाल असतील याची त्यांना पुरती कल्पना होती. मानवाचा जन्म हा गुलाम म्हणुन जगण्यात झाला नसुन मानवतेच्या समान न्याय तत्वावर आधारीत सामाजिक जीवन पध्दतीवर जगण्यासाठी झाला आहे. मात्र भारतीय समाजातील वर्णव्यवस्था व

जातीप्रथेमुळे वर्णव्यवस्थेतील शेवटचा घटक असलेल्या शुद्रातिशुद्र समाजाला हे तत्व नाकारल्या जाऊन स्पृश्य — अस्पृश्य या तत्वाच्या आधारे त्याचे शोषण करण्यात आले. या अनूषंगाने डॉ. आंबेडकरानी सामाजिक सौख्य व राष्ट्रीय ऐक्य आणण्यासाठी प्रचलीत जुलूमांचा चिरेबंद वाडा तोडावाच लागेल अशी खुणगाठ मनात बांधली व समाजातील दुर्बल वंचीत शोषीत घटकाला खुल्या समाज रचनेत समानतेच्या तत्वावर जगण्याचे हक्क मिळवून देण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य व समतेच्या तत्वांची पेरणी केली.

भारतीय समाजातील कालविसंगत प्रथा, रूढी व परंपरामुळे तसेच समाजात खोलवर रूजलेल्या जातीप्रथेमुळे व्यक्तीच्या अधिकाराबाबत असमानतेची स्थीती होती. विषमतेवर आधारीत समाजाची निर्मिती करण्यात येऊन श्रेष्ठ—कनिष्ठ, उच्च—निच असा भेदभाव करून समाजातील बहूसंख्यक वर्गाला अंत्यत हीन दर्जाचे व कवळी मोल जीवन वाटयाला आले होते. उपेक्षीतांचे जीवन जगणारा असा हा बहूसंख्यक समाज अगदी विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत अस्पृश्य म्हणून आपल्या विविध हक्कापासून वंचित होता. अशातच लोकसंख्येच्या दृष्टिने निम्मा भाग असलेल्या स्त्री जातीलाही पुरूषी मानसिकता व सनातनी प्रथमुळे अन्यायाची वाटेकरी होत गुलामीचे जीणे प्राप्त झाले होते. एकूनच भारतीय समाजातील विषमतावादी समाजरचना व स्त्री—पुरूषाच्या अधिकाराबाबतची असमाधानकारक स्थितीने गंभीर रूप धारण केले होते. या स्थितीत आमुलाग्र परिवर्तनासाठी व संपुर्ण भारतीय समाजाची मानवतेच्या व मानवी प्रतिष्ठेच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता तसेच जातीविरहीत व वर्गविरहीत समाजाच्या मानवी मुल्यावर उभारणी करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी विडा उचलला.

स्वातंत्र्यपुर्व काळातही अनेक उदारमतवादी विचारवतांनी तसेच विविध समाज सुधारकांनी समाज परिर्वनासाठी सामाजिक चळवळीच्या माध्यमातून भारतीय समाजातील जाचक रूढी, परंपरा व सनातनी प्रथेवर वेळोवेळी घणाघाती प्रहार केले. त्यांच्या या महान कार्यामुळे भारतीय समाजाची ही गंभीर स्थिती बदलवीण्याची पायाभरणी झाली असले तरी या सर्व प्रयत्नांना कायद्याचे कुठलेच पाठबळ नव्हते. त्यामूळे अस्पृश्य म्हणून ज्या समाजाची पदोपदी अव्हेलना होत होती व ज्यांना अमानवी वागणूक देवून ज्यांच्या सोबत भेदभावपुर्वक व्यवहार करण्यात येत होता यात विशेष स्वरूपात काहीही बदल झालेला नव्हता. म. गांधी सारखे समाजसूधारक व काही नेते मंडळी सुध्दा धार्मिक व राजकीय दृष्टिकोणातूनच यावर उपाय शोधून समाताधीष्ठीत समाजरचनेसाठी उच्च जातीतील लोकांचे हद्य परिवर्तन करणे व अस्पृश्य जातीतील लोकाप्रती चांगल्या वागणुकीची अपेक्षा करणे अशी मयार्यदीत भूमिका घेतली. असे असले तरी या परीस्थीत परीवर्तन घडवून आणण्यासाठी कायद्याचा पाठबळ देण्याचा ठोस प्रयत्न झालेला नव्हता त्यामुळे या परिस्थितीची गंभीरता अधिक प्रकर्षाने जाणवत होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र या सर्वापेक्षा वेगळी भूमिका घेत सामाजिक समता प्रस्थापीत करण्यासाठी व उपेक्षीत, वंचित अशा बहूसंख्य घटकांना न्याय व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी भारतीय समाजात खोलवर रूजलेल्या जातीव्यवस्थेच्या समुळ उच्चाटनावर जोर दिला. वर्षानूवर्षे व पीढयान—पीढया ज्या समाजाचे शोषण झाले व ज्याच्यांवर अन्याय, अत्याचार झाला अशांना कायद्याचे सरंक्षण प्राप्त करून देण्याचा त्यांचा सुरूवातीपासूनच कयास होता. डॉ. आंबेडकर म्हणतात, ''समाजातील वंचीत, दूर्बल घटकांना प्रतिनिधीत्वाची संधी मिळाल्यास या घटकांची सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रगती होऊन त्याचा परिणाम हा त्यांच्या पारंपारीक व्यवसायाच्या बदल स्वरूपात होऊन या घटकांचे जीवनमान नक्कीच उंचावता येण्यास

मदत होईल'' भारतीय समाजातील विषमता ही कायद्याच्या प्रक्रियेद्वारे दुर करतांनाच डॉ. आंबेडकरांनी ज्यांना शेकडो वर्षापासून आपल्या न्याय व हक्कापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. त्यांना विशेष संधी देणे ही गरज ओळखूनच संविधान निर्मितीचे ऐतिहासीक कार्य करतांना कोणत्याही विरोधास न जुमानता उपेक्षीत, वंचित अशा दुर्बल घटकांना विशेष संधीच्या तरतूदीची उपलब्धता करून दिली.

भारतीय समाजाचे वैशिष्टय असे की, या समाजात ब्राम्हण, क्षत्रिय यासारख्या उच्च वर्णाच्या व जातीच्या लोकांनी सत्ता संपत्ती व प्रतिष्ठा यांचा फार मोठा वाटा बळकावला आणि समाजातील बहूसंख्यक वर्गाला या तीनही गोष्टीपासून वंचित ठेवल्या गेले व सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारीत भारतीय समाजाची निर्मिती करण्यात आली. वर्ण व जातीसंस्था असणाऱ्या भारतीय समाजव्यवस्थेने हजारो वर्षे बहूसंख्यक समाज घटकांना सामाजिक न्यायापासुन परावृत्त केले. अशा पांरपारिक समाजरचनेला आधारभूत असलेली मुल्य व्यवस्थेचे उच्चाटन करून त्याऐवजी नवसमाजाची उभारणी केल्याखेरीज बहूसंख्यक घटकाला सामाजिक न्याय मिळणे शक्य नाही. अशा उदात्त हेतूने आंबेडकरांनी सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुर्रस्कार केला. त्यांनी मांडलेली सामाजिक न्यायाची संकल्पना, समाजजिवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारी होती. त्यांच्या मते, '' प्रत्येक राष्ट्राचे आणि राज्याचे कर्तव्य आहे की, व्यक्तीला आवश्यक असणारे मुल्य, समता, स्वातंत्र्य, बधुंता, न्याय, समाजवाद, लोकशाही, नैतिकता आणि प्रत्येक मानवाच्या सन्मानाची रक्षा करावी आणि समाजव्यवस्थेत त्यांना सारख्याच सोयी आणि संधी देण्यात याव्यात.''

डॉ. आंबेडकरांना सर्व स्त्री — पूरूषांना समान न लेखनारा समाज हा सामाजिक न्यायाचा शत्रू वाटतो. तसेच धर्माला सुध्दा मुलतः व तत्वतः सामाजिक असे संबोधून धर्म हा व्यक्तिविकासाला प्राधान्य देणारा आणि सामाजिक न्यायाची प्रस्थापना करणारा असला पाहिजे असे ते म्हणतात. सार्वजनिक जीवनामध्ये धर्माची आवश्यकता मान्य करून धर्म हा समता आणि न्याय या मुल्यावर आधारीत असावा असे मत प्रतिपादन करून धर्मविषयक विचाराला सुध्दा सामाजिक न्यायाची जोड दिली. अशातच ते राजसंस्थेचा उद्देश हा सामाजिक न्यायावर आधारीत समाजाची उभारणी करणे असायला पाहिजे असे म्हणतात. एकूणच त्यांचा सामाजिक न्यायाचा लढा हा सर्वव्यापक अर्थाने ओतप्रत होता. सामाजातील शोषीत, पीडीत, दलीत, आदिवासी व एकूणच समस्त दुर्बल घटकांना विशेष संधी व सोयीची उपलब्धता करून अशा अधिकारवंचीतांना जास्तीत जास्त लाभदायक ठरेल अशी सामाजिक, आर्थिक विषमतांची फेरचना करणे हे आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत अभीप्रेत आहे.

भारतीय समाजव्यवस्थेतील भीषण आणि घृणास्पद विषमतेचे समुळ उच्चाटन करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आपले संपुर्ण आयूष्य खर्ची घातले. समाजातील शोषीत, पीडीत, वंचीत घटकांना न्याय व हक्काची उपलब्धता करून समान प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच वषानुवर्ष अन्यायाची वाटेकरी होऊन पुरूषी मानसीकतेची शिकार झालेल्या दुर्बल व अबला म्हणून संबोधल्या गेलेल्या तसेच चार भींतीच्या आत अत्यंत हलाकीचे व कष्टमय जीवन व्यतीत करणाऱ्या भारतीय स्त्रीच्या उध्दाराच्या कार्यातही डॉ. आंबेडकराचे योगदान हे अमुल्य व अतुलनीय ठरते. स्त्रियावर होत असलेला अन्याय दुर व्हावा, तीला मानाचे व सन्मानाचे स्थान मिळावे व सन्मानाने जगता यावे, ती स्वतंत्र व सक्षम असावी यातच स्त्रीसंबधात भारतीय संस्कृतीतील अमानवी विचारांना डॉ. आंबेडकरानी छेद देवून त्यांची गुलामीतून मुक्तता करण्यासाठी आटोकाट प्रयत्न

चालविले. त्यांना सामाजिक सुविधांची प्राप्ती करून व्यापक हक्कासाठी चळवळ हाती घेतली व त्या अनुषंगाने वेळोवेळी आंदोलनही पूकारले.

मजूर मंत्री असतांना डॉ. आंबेडकरांनी गीरणी तसेच कारखाण्यात काम करणाऱ्या स्त्रियांना समान कामाचा समान मोबदला मिळावा यासाठी पुरूषांच्या बरोबरीचे वेतन, स्त्रियांना बांळतपनाची रजा, कामगार महिलांच्या मुलांसाठी कामाच्या ठीकाणी पाळणा घरे, व वयात आलेल्या पुरूषाबरोबर स्त्रियानांही मताधीकार असावेत अशा मागण्या मान्य करून घेतल्या. यानंतरच्या काळातील पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्याकरिता व राजकीय, सामाजिक, धार्मिक , आर्थिक असे संपुर्ण अधिकार बहाल करण्याच्या दृष्टिने डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड बिल हे स्त्रियांसाठी सुरक्षाकवच होते. सरकारच्या नाकर्तेपणामुळे हे बिल नाकारले जाऊन या बिलाचे कायद्यात रूपांतर होऊ शकले नसले तरी मात्र या बिलाच्या आधारावरच राज्यकर्तांना पुढे जाऊन सक्षमीकरण व स्त्रियांच्या समान न्याय व हक्कासाठी विविध कायदे करणे भाग पडले. डॉ. आंबेडकरांनी कायद्याला समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून संबोधले म्हणूनच त्यांना स्त्री बंधनाच्या बेडया तोडुन समाजात स्त्री पुरूष समानता प्रस्थापीत करण्यासाठी जुन्या कायद्याची संहिता बदलवून ती स्त्री केंद्रीत करण्यासाठी प्रयत्न चालविले. या सर्व प्रयत्नाची परिणीती म्हणजे भारतीय राज्यघटनेतील उद्देशपत्रिका तसेच मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे इ. च्या माध्यमातून भारतीय स्त्रियांना सर्व प्रकारची सूरक्षितता प्रदान करण्यात आली आणि स्त्री स्वातंत्र्यांचा पुर्रस्कार करण्यात आला.

डॉ. आंबेडकरांनी हाती घेतल्या सामाजिक चळवळीत समाजातील केवळ दलित, पददलीत, शोषीत, पीडीत अशा बहूसंख्यक घटकांचीच दास्यातून मुक्तता करून त्यांना समान तत्वांवर वागणूक देण्याचा ध्यास नव्हता तर कामगार, कष्टकरी अशा संघटीत व असंघटीत क्षेत्रातील काम करणाऱ्या वर्गाची व्यथा दुर करण्याचा व्यापक संकल्पही त्यात होता. डॉ. आंबेडकरांनी कामगार वा श्रमिक म्हणून गणल्या गेलेल्यांना भांडवलदारीच्या वेटबिगारीच्या कचाटयातुन व कारखानदारांच्या दास्यश्रृंखलेतुन मुक्त करून त्यांना न्याय मिळवून दिला. केवळ दुर्लक्षित कामगारांनाच नव्हे तर समाजातील दूर्बल कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी १९३६ मध्ये स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. कामगारांचा पालनहार म्हणून मानणाऱ्या व आपल्या राजकीय ध्येय सिध्दीसाठी कामगांराना राबविण्याऱ्या तत्कालीन कम्युनिस्ट पक्षावर कठोर टिकास्त्र ओढुन कामगारांना राजकीय सापळयातून मुक्त करण्यासाठी व राजकारणविरहीत एका अभेदय संघटनाच्या उभारणीकरीता डॉ. आंबेडकरांनी सर्व मजूर वर्गाला कळकळीचे आवाहन केले.

व्हॉईसरॉय कौंसिलमध्ये कामगार मंत्री असतांना डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या हिताचे अनेक कायदे मंजुर करून घेतले. कामगार हा औद्योगिक क्षेत्रातील अविभाज्य घटक आहे. भारताला आर्थिक दृष्टया सक्षम व्हायचे असेल तर औद्योगीक क्षेत्रात शांतता असणे गरजेचे आहे ही भूमिका त्यांनी घेतली. कामगारांच्या हाती असणाऱ्या हरताळ या शस्त्राची जाणीव त्यांना होती म्हणूनच त्यांनी त्रिपाठी समितीतील सरकारी सदस्यांना, कामगार नेत्यांना व इतर सदस्यांना कामगार क्षेत्रातील कामगारांच्या मनातील असंतोष कमी व्हावा यासाठी प्रयत्न करावे अशी सूचना केली. याच कामगार क्षेत्रात काम करणारा स्त्री वर्ग सूध्दा मोठया प्रमाणात होता. या स्त्री वर्गाच्याही भरपूर समस्या होत्या. अशावेळी या उपेक्षीत वर्गासाठी बाबासाहेबांनी माईन्स मॅटर्निटी बेनिफीट ॲक्ट, वुमेन लेबर वेलफेअर फंड, वूमेन ॲन्ड चाईल्ड लेबर प्रोटेक्शन ॲक्ट इ. असे विविध कायदे मंजूर

करून घेतले व सर्व स्त्री कामगारांना न्याय मिळवून दिला. वास्तविक पाहता भारतीय कामगार नेत्यांना आपल्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी विविध प्रकारचा संघर्ष करावा लागलेला दिसतो मात्र बाबासाहेबांनी आपल्या चातूर्य व विद्वत्तेच्या बळावर मजुर मंत्री असतांना सरकारी कर्मचारी व खाजगी क्षेत्रातील कामगारासाठी घेतलेली भूमिका व पूर्णत्वास नेलेले कार्य हे असामान्य ठरते.

डॉ. आंबेडकरांनी भारत देशाला दिलेली एक अमुल्य भेट म्हणजे या देशाचे 'संविधान' होय. भारतीय संविधान हे मानवतावादी तत्वज्ञानावर आधारीत असून यात कोणत्याही भेदभावाविना समाजातील सर्व स्तरातील लोकांना सामाजिक न्याय व त्यांचे हक्क मिळवून देण्यास कठीबध्दता आहे. भारतीय समाजव्यवस्थेत मूलगामी परिवर्तन व्हावे यासाठी समाना काम समान वेतन, मोफत व सक्तीचे शिक्षण, दलित व मागास वर्गीयांना समान संधी बरोबरच विशेष आरक्षण, स्त्रिया बालके, अल्पसंख्याक व अन्य दूर्बल घटकांच्या विकासासाठी विशेष तरतूदी, अस्पृश्यता निर्मुलन अशा अनेक बाबी भारतीय संविधानाच्या विविध कलमामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. मानवतावादी दृष्टिकोनातून तळागाळातील लोकांना संधीची उपलब्धता करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामावुन घेणे व समताधिष्टीत समाजाची रचना करणे असे व्यापक लक्ष भारतीय संविधानात अपेक्षित आहे.

**निष्कर्ष**

माणसाला माणूस म्हणून जगता यावे म्हणून भारतीय समाजतील शोषीत, पीडीत, वंचीत, दलीत आदीवासी व दुर्बल घटक यांच्या न्याय व हक्कासाठी डॉ. आंबेडकरांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत संघर्ष केला. या सर्व घटकांना सामाजिक व राजकीय प्रवाहात सामील करून त्यांना अधिकाराची प्राप्ती करून देणे, त्यांची धार्मिक गुलामगीरीतून मुक्तता करणे आणि एकूणच मानव जातीच्या प्रतिष्ठेकरीता व त्यांच्या कल्याणाकरिता निकराने लढण्यासाठी प्रेरीत करण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. त्यांचे हे कार्य केवळ सामाजिक क्षेत्रा पूरतेच मर्यादीत नव्हते तर आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक इ. अशा मानवी जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणाऱ्या विषयावर वैचारीक मांडणी करून मानवाच्या कल्याणाचा, उध्दाराचा व मानवी उत्कर्षाच्या विचारांची पेरणी केली. म्हणुनच भारतीय समाजातील दलित, आदिवासी, भटके व महिला वर्ग इ. च्या कल्याणासाठी व त्यांच्या न्याय—हक्कासाठी डॉ. आंबेडकरांनी केलेल्या विविध सामाजिक चळवळीचा इतिहास हा सामाजिक न्यायाच्या चळवळीचा इतिहास ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची**


- डॉ. पानतावने गंगाधर, १९९८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन पुणे,
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, २००२, लेखन आणि भाषणे, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
- डॉ. आंबेडकर बाबासाहेब, दलितांचे शिक्षण संपादक, प्रदिप गायकवाड, क्षितीज प्रकाशन, नागपुर.
- प्रा. गायकवाड यादव, भारतरत्न, डॉ. आंबेडकर बाबासाहेब (जीवन आणि कार्य)
- काणे प. सी., प्रमुख भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचारक, पिंपळापुरे ॲण्ड पब्लीशर्स नागपुर.

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# ६. ग्रामीण असंघटित क्षेत्रातील कष्टकरी महिलांच्या समस्या

**प्रा. ढोबळे गोविंद नागनाथराव**
क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली.

भारतीय समाजात पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व असल्यामुळे नेहमीच समाजात वेगवेगळया पातळीवर स्त्रियांवरती अन्याय झालेला पहावयास मिळतो. भारतात जवळपास ६९ टक्के लोक ग्रामीण समाजात राहतात. ग्रामीण समाजातील लोकांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगिक विकासाकडे मोठया प्रमाणात लक्ष्य देण्यात आले त्याचा परिणाम ग्रामीण समुदायात ही पहावयास मिळतो. शेती बरोबरच लघु उद्योग ही सुरू झाले या सर्व ठिकाणी पुरूषांबरोबर स्त्रियाही कष्टाची कामे करतात परंतु पुरूषाला ज्याप्रमाणे आर्थिक मोबदला मिळतो त्या प्रमाणात स्त्रियांना मिळत नाही. भारतीय संविधानाने दिलेले मुलभुत हक्क आणि अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. त्याचप्रमाणे महिला आणि समाजातील दुर्बल घटकासाठी विषेश कायदे करण्याची तरतूद घटनेमध्ये केलेली आहे तरी सुध्दा महिलावरती अनेक प्रकारे अत्याचार होत असतात. बदलत्या काळानुसार असंघटित ठिकाणी काम करणाऱ्या महिला समोरील आव्हाने दिवसेंनदिवस वाढत असल्याचे दिसुन येत आहे अलिकडच्या काळात असंघटीत कष्टकरी महिलावरती झालेल्या घटना विचारात घेऊन त्यांच्या संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करणे क्रमप्राप्त आहे.

**संशोधनाची उद्देश**

1. असंघटीत क्षेत्रातील कष्टकरीमहिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
2. असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिलांच्या श्रम शोषणचे वास्तव तपासणे.

**गृहितके**

1. असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती खालावलेली दिसून येते.
2. असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिलांच्या श्रमाचे शोषणचे होते.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा आधार घेऊन माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, पुस्तके, शोध निबंध व इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आलेला आहे.

ग्रामीण समाजातील असंघटीत कामगार महिला ज्याठिकाणी काम करतात त्याठिकाणचा सातत्याने बदलणारा मालक वर्ग, कामाचे अनिश्चित व असुरक्षित स्वरूप त्यामुळे अनेक अडचणीला सामोरे जावावे लागते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात शेती सुधारण्याकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले त्यामुळेच मोठया प्रमाणात बागायती शेतीचे क्षेत्र वाढले. त्या बागायती शेतीमध्ये मोठया प्रमाणात कामगारांची आवश्यकता लागते म्हणून या ठिकाणी मोठया प्रमाणात स्त्रिया काम करतात. तसेच छोटे—मोठे उद्योग ज्यामध्ये कुक्कूटपालन,

वराहपालन, फलोत्पादन, बेकरीचे पदार्थ, विटभट्टी कामगार, ऊस तोडणी कामगार, बांधकाम मजूर, दुग्धव्यसाय इत्यादी अनेक ठिकाणी महिला काम करीत असतात.

शेतीच्या उत्पादनामध्ये शेतमजुरांचा सहभाग महत्वाचा मानला जातो, एकुण ग्रामीण लोकसंख्येत शेतमजुरांचे प्रमाण अधिक असते. सन २०११–१२ मध्ये एकूण शेतमजुरापैकी ६२ टक्के स्त्रियांचे प्रमाण आहे. तरी या कष्टकरी महिला आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेले असतात.

**असंघटित कामगार — संकल्पना**

पहिल्या राष्ट्रीय श्रम आयोगाने असंघटित कामगार ही संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे की ज्यांना रोजगाराचे तात्पुरते स्वरूप, अज्ञान आणि निरक्षरता, व्यवसाय किंवा कामाचे विस्कळीत व लहान स्वरूप, कामाच्या स्वरूपामुळे मालक वर्गाकडे एकवटलेल्या शक्ती, अशा सारख्या समस्यांमुळे सामुदायिक उद्‌िष्टये प्राप्त करण्यात अडचणी येतात व ती संघटित होऊ शकत नाहीत, अशा कामगारांचा उल्लेख असंघटित कामगार म्हणून करता येईल. तसेच ही संकल्पना खालीलप्रकारे ही वापरली जाते. १) कामाच्या ठिकाणी असणारी कामगार संख्या १० पेक्षा कमी. २) रोजगाराचे— कामाचे विस्कळीत — अनियमित स्वरूप ३) कामगार— मालक संबंधाची अनिश्चितता. इत्यादी प्रकारे.

आज ग्रामीण समाजात मोठया प्रमाणात शेती व्यवसाया बरोबरच अनेक छोटे मोठे उद्योग—धंदेही निघत आहेत अशा सर्व ठिकाणी कामगारांची आवश्यकता असते. म्हणूनच मोठया प्रमाणात स्त्रियांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होत आहेत परंतू दुसरीकडे त्यांच्यावरती अनेक प्रकारे अन्याय झालेला पहावयास मिळतो.

**१. असमान आर्थिक मोबदला**

ग्रामीण समाजातील महिला या असंघटीत असल्यामुळे मोठे जमीनदार, छोटे उद्योजक हे स्त्रियांना कामासाठी बोलावतात. त्यांच्याकडून अधिकची कामेसुध्दा करून घेतात मग ज्या प्रमाणात पुरूषांना मजुरी दिली जाते त्याच प्रमाणात स्त्रियांना दिली जात नाही. कितीतरी असे अनेक व्यवसाय आहेत की उदा. बागायतीची कामे, बांधकामाची क्षेत्रे, छोटे उद्योग व्यवसाय यामध्ये स्त्रियांनाच रोजगार दिला जातो कारण काम हे पुरूषा बरोबरीचेच करीत असतात तसेच कामात कसुरपणाही करत नाहीत म्हणून अधिक प्रमाणात स्त्रियांना कामासाठी शोधले जाते. या सर्व स्त्रिया संघटीतपणे एकत्र येवून कामाचा मोबदला ठरवत नसतात याचाच फायदा हा जमीनदार, व्यावसायिक मालक वर्ग घेत असतो. स्त्रियांनी सुध्दा आपल्या कामाचा मोबदला ठरवलेला नसतो. भारत सरकारने इ.स. १९७४ साली जरी समान काम व समान वेतन अशी कायद्यात्मक तरतूद केली असली तरी प्रत्यक्षात मात्र असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्यासाठी त्याची अंमलबजावणी लागू होत नाही. मुळातच महिलांना या कायद्याची माहिती नसते.

**२. रोजगारातील अनिश्चितता**

असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना वर्षभर काम मिळत नसते. ऋतुमानानुसार त्यांना कामाचे स्वरूप ठरलेले असते. त्यामुळे अनेक स्त्रियांना रोजगारसुध्दा मिळत नसते. भारतात मोठया प्रमाणात शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे पिक पध्दतीही तशीच घेतली जाते. त्यामुळे विशिष्ट कालावधीतच अधिक रोजगार मिळतो मात्र नंतर त्यांना घरी बसावे लागते त्यामुळे स्त्रिया आपल्यालाच काम मिळावे यासाठी मालक वर्गाची मर्जी सांभाळतात. आणि तो ज्या प्रमाणात आर्थिक मोबदला देतो त्याचा स्विकार करतात. कधीकधी तर अनेक महिने स्त्रीयांना कामच मिळत नाही कारण कमी पैशामध्ये काम करण्यास अनेक महिला तयार होतात. त्याचा परिणाम असा होतो की सर्व स्त्रिया अधिकची कामे करतात मात्र मोबदला कमी घेतात. कारण कामाचे स्वरूप हे अनिश्चित असते.

**३. कामाच्या ठिकाणची असुरक्षितता**

असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कोणत्याही कामगारांना मग पुरूष असो अथवा स्त्री यापैकी कुणालाही कोणत्याच प्रकारची सुरक्षितता नसते. कारण औद्योगिक क्षेत्राशी संबंधीत कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी मालक वर्ग हा बांधील नसतो त्याचाच परिणाम कष्टकरी महिलांच्यावरती झालेला पाहावयास मिळतो. अशा अनेक घटना पाहावयास मिळतात की स्त्रियांना कामे करताना नैसर्गिक आपत्तीमुळे आपले प्राणही गमवावे लागले आहेत तर काहींना विकलांगता स्विकारावी लागलेली आहे. बागायती क्षेत्रात काम करताना अनेक प्रकारची औषधे वापरावी लागतात त्याचा अप्रत्यक्षपणे परिणाम त्यांच्या शरीरावरती होवून अनेक प्रकारचे त्वचा रोग झालेले पाहावयास मिळतात तर काही महिला छोटया उद्योगात काम करताना अपघाताच्या बळी ठरतात तसेच शेतीची कामे करताना सुध्दा सर्पदंश, अतिउष्णता याचाही सामना करावा लागतो. मात्र अशा अतिप्रसंगाच्या वेळी त्यांना कुठल्याही स्वरूपाच्या सुरक्षिततेची तरतूद मालक वर्गाकडून केली जात नाही. भारतात प्रत्येक वर्षी १५ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस म्हणून साजरा केला जातो कारण संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने सन २००७ मध्ये दरवर्षी १५ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस म्हणून साजरा करण्यासंबंधी ठराव केला गेला कारण ग्रामीण महिलांचे महत्वाचे योगदान असल्याचे नमूद केले आहे. तरी सुध्दा असंघटीत कष्ट करणाऱ्या महिलांना अनेक प्रश्नांना सामोरे जावावे लागते.

**संदर्भसूची**


1. औद्योगिक समाजशास्त्र– डॉ. गुरूनाथ नाडगोंडे
2. औद्योगिक संबंध आणि श्रम कायदे – डॉ. अलोनी बोधनकर
3. असंघटित कामगार – डॉ. सतिश शिरसाठ
4. महिला व बालविकास विभाग – महाराष्ट्र शासन
5. वर्तमानपत्रे व मासिके – ( योजना–एप्रिल २०१७, साधना–असंघटित कामगार विशेषांक, दै. महाराष्ट्र टाईम, दै.लोकसत्ता, दै.सकाळ, दै.लोकमत इत्यादी)

# ७. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींच्या अर्थव्यवस्थेला समाजशास्त्रीय अभ्यास

**श्री. खुशाल जिवन सातपुते**
संशोधक विद्यार्थी, महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी, जि. गडचिरोली.
**प्रा. डॉ. रविंद्र वि. विखार**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा, जि. गडचिरोली.

**सारांश**

सर्वच प्रकारच्या समाजामध्ये अर्थव्यवस्था हे एक अभिन्न अंग आहे. प्रत्येक समाजात अर्थव्यवस्थेचे स्वरूप भिन्न आहे. कारण विभिन्न समाजातील लोकांच्या गरजा आणि त्या गरजा पूर्ण करण्याच्या पध्दती भिन्न आहे. गडचिरोली जिल्हयातील आदिवासींचे जीवन निसर्गाशी संबंधीत असून निसर्गावर, जंगलावर आधारलेले असून त्यांना आपल्या गरजजा भागवितांना निसर्गाशी सतत तडजोड व संघर्ष करावा लागतो. आदिवासी लोक मर्यादितरित्या उपलब्ध साधनसामुग्रीच्या सहाय्याने आपल्या मर्यादित गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. या शोध निबंधाच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील आदिवासींच्या उत्पादन साधनांचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**बिज शब्द**:— आदिवासी, तेंदूपत्ता, मोहफुले, ताडी, टेंभुर्णी इ.

**प्रस्तावना**

आज देशपातळीवर आणि विशेषत: राज्य पातळीवर गडचिरोली जिल्हा जंगलव्याप्त, आदिवासी मागास, नक्षलप्रभावीत जिल्हा म्हणून ओळखला जातो. आदिवासी जिल्हा म्हणून गडचिरोली जिल्हयाची ओळख आहे. २६ ऑगस्ट १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्हयाचे विभाजन होवून गडचिरोली जिल्हयाची निर्मीती झाली. सद्यस्थितीत गडचिरोली जिल्हयाचा एकूण भूभागापैकी जवळपास ७६.०० टक्के भूभाग हा जंगलांनी व्यापलेला आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार गडचिरोली जिल्हयातील एकूण लोकसंख्यापैकी ३८.३० टक्के लोकसंख्या हि आदिवासी जमातीची आहे. (एकूण लोकसंख्या —३,७१,६९६) आदिवासींची संख्या आहे. यात प्रामुख्याने गोंड, माडीया, राजगोंड, कोलाम, परधान, इत्यादी आदिवासी जमाती आहेत. आदिवासींच्या लोकसंख्येचा विचार करता महाराष्ट्रात नंदूरबार नंतर दुसऱ्या क्रमांकाचा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो.

कोणताही समाज हा अर्थव्यवस्था विरहीत राहूच शकत नाही. त्याला गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समाजसुध्दा अपवाद नाही. प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या आर्थिक क्रियेत सहभागी व्हावेच लागते. गडचिरोलीतील आदिवासींच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांचा अभ्यास करतांना त्यांची अर्थव्यवस्था विचारात घेवून त्याचा अभ्यास करणे गरजेचे असते. मानवाच्या मूलभूत गरता अन्न, वस्त्र, निवारा होय. मानवाच्या गरजा हया कधिही न संपणाऱ्या आहेत. तरीपण आदिवासी समाजाचा विचार करता असे लक्षात येते की,

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समाज हा प्रामुख्याने शहरी जिवन शहरी वातावरणांपासून अलीप्त असल्यामुळे येथील आदिवासींच्या गरजा हया मर्यादित स्वरूपाच्या दिसतात. त्या मर्यादित स्वरूपाच्या गरजा पूर्ण करतांना त्यांना झगडावे, विविध समस्यांना तोड द्यावे लागते. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमातीच्या आर्थिक गरजा, उत्पादन साधनांचा समाजशास्त्रीय विस्तृत आढावा घेवूया.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

1. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमातीचे राहनीमान दर्जा लोकजीवन अभ्यसणे.
2. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समुदायांचे आर्थिक उत्पन्नाची साधने, उत्पदनांचे स्त्रोत अभ्यासणे.
3. आदिवासींच्या मूलभूत गरजांच्या पूर्तीकरीता निसर्गावर, जंगलावर आधारलेले समाजजिवन अभ्यासणे
4. आदिवासींचे शहरी भागापासून अलिप्त जिवन व मर्यादित गरजा, कौटुंबिक उत्पन्नात स्त्रियांचा सहभाग अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके**

1. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमातींचे जिवन हे निसर्गावर आधारलेले आहे.
2. गडचिरोलीतील आदिवासींना वर्षभरातील शेतीचे हंगामानंतर बराज काळ बेरोजगार रहावे लागते नंतरच्या काळात कोणताही रोजगार उपलब्ध नाही.
3. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमातीचे उत्पन्नाचे साधन, उत्पन्नाचे स्त्रोत हे वनांवर, निसर्गावर आधारलेले आहे.
4. आदिवासींच्या गरजा हया मर्यादित स्वरूपाच्या असून जगाच्या विकासाचा विचार करता आदिवासी समाज विकासाच्या प्रवाहापासून कोसो दूर आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनात गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमातीच्या लोकांची उत्पादनाची साधने, आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करावयाची असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दती सामाजिक सर्वेक्षण पध्दतीची निवड केलेली आहे.

**संशोधनाची साधने (तथ्य संकलन)**

प्रस्तुत संशोधनाकरीता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा, निरीक्षण यांचा वापर केला गेला. प्रत्यक्ष माहितीच्या संकलनाकरीता निरीक्षण, मुलाखत तंत्र आणि सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला. दुय्यम स्त्रोतामध्ये वर्तमानपत्रे, मासिक, इंटरनेट, टि.व्ही. या स्त्रोतांचा उपयोग केला आहे.

**गडचिरोली जिल्हयातील आदिवासींचे विविध उत्पादन साधने**

मानवाने आपल्या विकासाच्या प्रक्रियेत आपल्या दैनिक गरजा भागविण्यासाठी सभोवतालचे पर्यावरण व परिस्थिती या साधनांचाच उपयोग करू लागला. मानव आपण राहत असलेल्या प्रदेशात ज्या गोष्टी सहज उपलब्ध होतात त्यांचा उपयोग करून आपल्या गरजा भागवू लागला. त्याचप्रमाणे गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समाजातील लोक निसर्गावर आधारित, जंगलावर अवलंबून आपल्या मर्यादित स्वरूपाच्या गरजा

मर्यादित साधनांचा उपयोग करून पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशिल असतो. गडचिरोली जिल्हयातील आदिवासींचे विविध उत्पादन साधनांचा सविस्तर माहीती पाहूया.

**१. वनउपजआधारीत स्त्रोत**

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी जमात ही डोंगर दऱ्या, खोऱ्यात तसेच दाट जंगली भागात वास्तव्यास आहे. आदिवासी समाज आपल्या सभोवताली असलेल्या जंगलातील विविध साधनांचा उपयोग उपभोग स्वत:चे उत्पादन साधन म्हणून करत आहे. ती उत्पादन साधने पुढीलप्रमाणे.

**अ. तेंदूपत्ता संकलन :** ग्रामीण भागत अशिक्षीत प्रमाण जास्त असल्यामुळे ग्रामीण भागात विडया ओढण्याचे व्यसन सर्वत्र आढळते. विडया बनविण्यासाठी कारखाण्यांना टेंभुर्णीच्या झाडांच्या पानांची मोठया प्रमाणात आवश्यकता असते. ही टेंभुर्णीची झाडे गडचिरोली जिल्हयातील जंगलात फार मोठया प्रमाणात आढळते. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोक उन्हाळयात जवळपास दोन महिने तेंदूपत्ता (टेंभुर्णीची पाने) संकलनाचे काम करतात. या कामात कुटूंबातील सर्वच सदस्य कामी लागत असतात. लहान मुलांपासून ते घरातील वृध्दांपर्यंत लोक कामाला लागतात. तेंदूपत्ता तोडणीतून त्यांना फार मोठा आर्थिक लाभ होत असतो. ज्या आधारे त्यांना वर्षभरातील विविध कामे, आर्थिक गरजा पूर्ण करण्यास मदत होते.

**ब. वन्यफळे : मोहफुले —** आदिवासी समाजात मोहफुलापासून घरी बनविलेली दारू (मद्य) फार मोठया आवडीने सेवन केली जाते. आदिवासी समाजात मोहफुलाचे दारूचे सेवनाचे व्यसन मोठया प्रमाणात आढळते. प्रत्येक कार्यक्रम प्रसंगी मोहफुलाच्या दारूच्या सेवन केले जाते. आदिवासी समाजात लहान बालके, स्त्रिया तसेच सर्वच वयोगटातील पुरूष दारूचे सेवन करतात. ही दारू आदिवासी लोक घरीच काढतात. दारू काढण्याकरीता मोहफुलाची गरज असते. उन्हाळयात सकाळच्या वेळेस जंगलात जावून मोहफुले गोळा केली जातात. व त्याची विक्री सुध्दा केली जाते. यातून सुध्दा आर्थिक लाभ होत असतो.

**क. चारा, टेंभरे :** उन्हाळयाच्या दिवसात चारा टेंभरे जंगलातून गोळा करून आणली जातात व जवळच्या तालुक्याच्या ठिकाणी नेऊन विकण्याचे काम आदिवासी करतात.

**ड. आवळा, जांभूळ, आंबे :** मोहफुला प्रमाणेच जंगलातील आवळा व जांभूळाची फळे जंगलातून गोळा करून विकली. गडचिरोली जिल्हयातील कोरची तालुक्यात जंगलात जांभूळाची मोठया प्रमाणात झाडे असून कोरचीचा जांभूळ नागपूर येथे दररोज ट्रकव्दारे विकण्यास नेला जातो.

**इ. डिंक, बोर, बिबा :** आदिवासी जंगलातील धावडा, आजन, खैरच्या झाडांच्या डिंक गोळा करतात व विकण्याचे काम करतात. तसेच रानातील बोरांच्या झाडापासून पडलेली बोरे गोळा करून विकतात. ज्याचा उपयोग 'बोरकूट' बनविण्यासाठी केला जातो. तसेच बिबा नामक फळाचा औषधामध्ये उपयोग होत असतो.

**फ. मध संकलन :** गडचिरोलीतील आदिवासी लोकांचे वास्तव्य हे जंगली भागात असल्यामुळे त्यांना मधाच्या पोळाचे विविध प्रकार माहिती आहे. जंगलात आढळणाऱ्या विविध मधाच्या पोळापासून आपल्या कौशल्याने, कुशलतेने सहज मधाच्या पोळामधून मध गोळा करतात. या गोळा केलेल्या शुध्द, कोणतीही प्रक्रिया न केलेल्या ताजा मधाला बाजारात फार मोठया प्रमाणात मागणी आहे.

**ब. ताड, गोरगा, सिंधी विकणे :** मोहफुलाच्या दारूप्रमाणेच आदिवासी जंगली भागात आढळणाऱ्या ताडाचे झाड, गोरगाचे, सिंधीचे झाड यांपासून ताडी, गोरगा, सिंधी काढल्या जाते. आदिवासी भागात काडली जाणारी ताडी, गोरगा, सिंधी या पेयांना शहरी भागातील लोक मोठया आवडीने घेवून पित असतात.

**म. खाद्य संकलन :** आदिवासी लोक पावसाच्या सुरूवातीस जंगलातून मशरूम (भूछत्र) ज्याला ग्रामीण भागात ओळंबी म्हणतात ते खोदून आणतात. तसेच विविध रानभाज्या जंगलातून तोडून आणतात व शहरात विक्रीस नेत असतात. शहरात यांस मोठया प्रमाणात मागणी आहे.

**य. बांबू तोडणी :** कागद निर्मीती करिता कच्चा माल म्हणून बांबू चा उपयोग केला जातो. गडचिरोली जिल्हयातील जंगलात आढळणाऱ्या बांबूवर आष्टी येथील पेपर मील व बल्लारपूर येथील थापर पेपर मिल अवलंबून आहे. या दोन्ही कारखान्यांसाठी लागणाऱ्या बांबूच्या तोडणीकरीता आदिवासी लोक कामावर जातात. त्यातून काही प्रमाणात रोजगार मिळतो. बांबूची कोवळी कंदमुळे सुध्दा भाजी म्हणून आदिवासी लोक आहारात समावेश करतात.

**र. वनऔषधी :** आयुर्वेदातील विविध वनऔषधीकरीता लागणारी दुर्मिळ वनस्पती गडचिरोलीच्या जंगलात आढळतात. त्या जंगलातून मिळवून विकून आर्थिक लाभ प्राप्त होत असतो.

**२. शेती**

गडचिरोली जिल्हयातील आदिवासींच्या अन्न उत्पादनाच्या प्रक्रियेत शेतीची महत्वपूर्ण भूमिका आहे. सद्यस्थितीत जिल्हयातील बहुतांश आदिवासी हे शेतीच्या व्यवसायात गुंतलेले आढळतात. आदिवासीव्दारा केली जाणारी शेती ही पारंपारीक स्वरूपाची वरच्या पावसावर म्हणजेच निसर्गावर आधारलेली, अवलंबून आहे. त्यामुळे आदिवासींना शेतीतून मिळणारे उत्पादन अल्प प्रमाणात असते. त्यामुळे त्यांना शेतीतून फारसा आर्थिक लाभ होतांना दिसत नाही.

**३. शेतमजूरी**

बहुतांश आदिवासी हे अल्पभुधारक असल्यामुळे तसेच शेती परवडणारी नसल्यामुळे इतरांच्या शेतावर शेतीच्या हंगामात शेतमजूर म्हणून कामाला जात असतात. यांत सधन शेतकरी आदिवासी शेतमजूरांना कमी शेतमजूरी देवून त्यांची आर्थिक लूट करतांना दिसून येते.

**४. पशुपालनाचा व्यवसाय**

गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गाय, म्हैस, शेळी, बैल, रेडा, मेंढी, वराह यांचे पालन करतात. या पशुना जंगलातील चारा सहज उपलब्ध होतो. त्यामुळे पालन करीता असलेल्या पशूंची संख्या वाढवून विकतात यातून आर्थिक लाभ मिळतो.

**५. कुक्कुटपालन**

आदिवासींच्या वस्तीत मुबलक प्रमाणात जागा उपलब्ध असल्यामुळे सहज प्रत्येक आदिवासींच्या घरी कोंबडया पालन करतांना दिसतात. धार्मीक प्रसंगी बळी देण्याकरीता कोंबडयांचा मोठया प्रमाणात वापर केला जातो. खेडयातील कोंबडयांना व अंडयांना शहरात मोठया प्रमाणात मागणी असल्यामुळे आदिवासींना बरेचसे उत्पन्न कोंबडयापासून प्राप्त होते.

**६. शिकार व मासेमारी**

अन्न संकलन करित असतांना आदिवासी लोक शिकार व मासेमारी करतांना दिसून येतात. परंतू सद्य वनकायद्याच्या धाकामुळे जंगली प्राण्यांची शिकारीवर आळा बसलेला दिसतो. तरीपण काही प्रमाणात लपून छपून लावे, कबूतर, पक्षी विकतांना दिसतात.

**७. कामासाठी बाहेर राज्यात शहरात स्थलांतर**

गडचिरोली जिल्हयात औद्योगिक विकासाचा अभावामुळे आदिवासींना आपल्या स्थानिक भागात वर्षभर काम मिळत नाही. त्यामुळे काही आदिवासी लोक सद्य जवळच्या तेलंगणा, आंध्रप्रदेशात मिरची तोडणीकरीता जातांना दिसतात. तर काही लोक कामांसाठी काही काळ शहरात कामाला जात असतात. त्यातून त्यांना आर्थिक हातभार मिळतो.

**निष्कर्ष**

१. गडचिरोली जिल्हयातील आदिवासींचे उत्पन्नाचे साधन हे प्रामुख्याने जंगली वस्तू असून परंतू आदिवासींना जंगलातून मिळणाऱ्या उत्पन्नावरच जगणे अशक्य असल्यामुळे शेती व शेतमजूरीच्या कामाकडे वळलेले दिसतात.

२. आदिवासी लो पारंपारीक शेती करतात व शेतीसाठी अगदी कमी तंत्रज्ञानाचा उपयोग करतात. त्यामुळे शेतीतून मिळणारा लाभ कमी असतो.

३. आदिवासी समाजाच्या गरजा हया मर्यादित स्वरूपाच्या असून त्या पूर्ण करण्याकरिता ते निसर्गावर अवलंबून असल्याचे दिसून येते.

४. सद्य विज्ञानाने मोठया प्रमाणात प्रगती केली असली, जग फार झपाटयाने बदलत असले तरीपण आदिवासी समाजात होत असलेला विकास फार संथ गतीने होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे आदिवासी समाज विकासाच्या प्रक्रियेपासून दूर असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

१. गारे गोविंद ''नक्षलवादी आणि आदिवासी' पुणे, सुगावा प्रकाशन

२. कऱ्हाडे बी.एम, (२०१०) ''आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'' नागपूर, पिंपळापूरे अॅड कं. पब्लीशर्स

३. विखार रविंद्र, (२०२१) ''आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'' बीड, हर्षवर्धन पब्लीकेशन्स

४. विखार रविंद्र (२०२०) ''सामान्य संशोधन पध्दती भाग—१'' बीड, हर्षवर्धन पब्लीकेशन्स

५. विखार रविंद्र (२०२०) ''सामान्य संशोधन पध्दती भाग—२'' बीड, हर्षवर्धन पब्लीकेशन्स

६. दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, दैनिक देशोन्नती मधील लेख

७. www.gadchiroli.com

८. www.wikipedia.org

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# ८. स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून राजर्षी छत्रपती शाहू

**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)**
सहयोगी प्राध्यापक, विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.

**गोषवारा**

विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षात महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून काढणारी, सामाजिक स्त्री समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारी, स्त्रीच्या उद्धारासाठी तळमळणारी व मार्गदर्शन व स्त्रीचेतना करणारी लोकोत्तर व्यक्ती म्हणून राजर्षी शाहू महाराज होत. ते कोल्हापूर संस्थानाचे अधिपती जरी असले तरी त्यांचे मन स्त्रीहितवादी होते. वागणूक स्त्रीसमतेच्या पुरस्कर्त्याची होती. स्त्रीवर्गाची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांच्या सर्वांगीण उद्धाराचे कार्य त्यांनी सुरु केले व त्याद्वारा सर्वधर्म, जातीतील महिलांसाठी महाराष्ट्राच्या सामाजिक परिघात स्त्री समानता, स्वाभिमान, आत्मनिर्भरता, स्वजाणीव, उत्थान, विकास, आर्थिक स्वावलंबन, अनेक प्रचलित अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा विरुध्द प्रस्थापित समाज व्यवस्थेत कायदे, वटहुकूम करुन स्त्री उद्धार केला. त्याचा मागोवा म्हणून प्रस्तुत संशोधन लेख.

**शब्दांकन :** अनिष्ट प्रथा, पुरोगामी, समानता तत्व, पुरुष प्रधान व्यवस्था,

**प्रस्तावना**

भारतीय समाज विविधतेने नटलेला आहे. हा समाज पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रवर्तक, समर्थक आहे. जाती, वर्ण, धर्म, वंश, प्रांत अशा विविधतेतून समाजात विषमता निर्माण होत असते. समाजात स्त्री—पुरुष लिंगोत्तराचे प्रमाण सुध्दा विषम आहे. अनेक प्रतिगामी संस्थान कार्यरत आहेत. कधी आत्मसन्मानसाठी तर कधी साधन म्हणून तर कधी हुंडयासाठी, कधी अह्मभावनेसाठी, कधी धर्माच्या नावावर अशा विविध आयामाच्या परिघमय बाबींतून स्त्री उपेक्षित, वंचित, दुय्यम लेखली गेली. प्रतिगामी तत्वप्रणाली नुसार रजास्वला नंतर स्त्री तिचे कोणतेही वय असो स्त्रीला विवाह बंधनात अडकवलेच पाहिजे, या करीता बालविवाहाचे प्रयोजन त्यातून स्त्रीमृत्यू प्रमाण परिणामतः तिच्या स्वातंत्र्याची, अधिकाराची, समानतेची कतल होय. आंतरजातीय विवाहाचे परिघ उल्लंघन नंतर तर जातीव्यवस्था बहिष्कृत करुन टाकायची. जोडीदार निवडण्याचे तर स्वातंत्र्य दूरच. त्यातही एखादी स्त्री विजोड विवाहामुळे विधवा झाली तर पुर्नविवाह ला मज्जाव करण्यात येत असे. कुटुंबात तर त्या उपेक्षित होत्याच सोबतच समाजात ही त्यांची कुचंबना, शोषण अत्याचार असायचे. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी स्त्रीमुक्ती करीता जी युक्ती समाज व्यवस्थेच्या पाशातून स्त्रीला गुरफुटणारी होती. अशा विविध अनिष्ट प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा, सनातनी विचार सरणी धर्माचा पगडा यातून स्त्रीदासत्व संपविण्याकरीता उचललेले पाऊल म्हणजे समाजासाठी दिपस्तंभ होय.

**संशोधनाचे उद्देश्य**

अ) राजर्षी शाहू महाराजाने स्त्रीविषयक केलेल्या कायद्यांना ज्ञात करणे.

ब) स्त्रीविषयक कार्याची परिणामकारकता माहिती करणे.

**संशोधन पध्दती**

विश्लेषणात्मक पध्दतीचा तसेच स्त्रीवादी परिप्रेक्ष्य या पध्दतीचा वापर केला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधन लेखाकरीता दुय्यम स्त्रीचा वापर केला ज्यात प्रकाशित पुस्तक आणि ॅमइेपजम मधून जी माहिती मिळाली ती विषयानुरुप संकलीत केली गेली.

**संशोधनाचे महत्व**

आज स्त्रीयांना समाजात वावरतांना जे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे ते कर्ते समाजसुधारक राजर्षी शाहू महाराजांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेत जे परिवर्तन केले त्यामुळे झाले आहे. त्यामुळे त्यांनी केलेल्या कार्याचा मागोवा घेण्याकरीता प्रस्तुत संशोधनाचे महत्व वाढीस लागते. आज विविध क्षेत्रात स्त्रीयांना हक्क प्राप्त झाले ते यांच्या सुधारणामुळे प्राप्त झाले आहे.

**संशोधनाची मर्यादा**

शाहू महाराजांच्या कार्याचा परिघ व्यापक, विशालकाय आहे, त्या कार्याला नमन/त्यांचे शिक्षणविषयक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, मुस्लिम समाज, चळवळ, राष्ट्रनिर्माण, नाटयप्रेमी, मल्लविद्या तज्ञ, मुत्सद्दी, शेतीचा जाणकार अशा नानाविध कार्याची व्यापकता आहे.

मात्र या संशोधन लेखात फक्त महिलाविषयी त्यांनी जे कार्य केले त्याचाच आढावा घेण्यात आला आहे. शाहू महाराजांनी असे कोणतेच अपवाद म्हणून क्षेत्र दाखविता येणार नाही की ज्या क्षेत्रात महिलांसाठी, वंचितांसाठी कार्य केले नाही. मात्र येथे महिलांशी संबंधीत कार्याचा ऊहापोह करण्यात येत आहे.

पूर्वी पुर्नविवाहाला समाजमान्यता नव्हती. आदिवासी समाजात तर नायक, प्रमुख, भगत, जाती जमात पंचायती जो निर्णय देतील जो स्त्रीला मान्य करावा लागत असे. ग्रामीण भागात तर पंचायत, ग्रुपग्रामपंचायत जो निर्णय देत होते तो स्त्रीला मान्य करणे बंधनकारक होता. शहरात तर विचारुच नका धर्मसंस्था, पुरुषी कुटूंबव्यवस्था, सांस्कृतिक संस्थान या माध्यमाने स्त्रीवर जरी अत्याचार झाला असेल तर तीने वाचा फोडायची नाही, अन्यायाचा प्रतिकार करायचा नाही. कुठे ही 'ब्र' शब्द काढायचा नाही, व्यक्त व्हायचे नाही असे अनेक निर्बंध होती. अशी धर्मनिहाय वेगवेगळया धर्मात वेगवेगळे बंधने आढळून येतात. मुस्लिम भगिनी तर पुरुषांनी तीनदा तलाक संबोधिले तर तिचे इच्छा असो व नसो तिचा परित्याग होत असे. अशा सर्व परिस्थितीमध्ये जर का पुरुष नपुंसक, विजोड, अपंग, कुरुप असेल तरीही स्त्री त्याला त्याज्य करु शकत नव्हती, समाजांनी जे परिघात्मक रेषा आखून दिली होती ती, ओलांडू शकत नव्हती. पुरुष विकारी, विकृत, अवहेलना करणारा असेल तर आयुष्यभर खुटयाला बांधलेल्या गायी सारखी तिची अवस्था होती अशा अतिरिक्त व्यवस्थाचे बंध तोडण्याचा, परिघाला लांघण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला.

देवाच्या नावाने वाटेल ते आपल्या महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण सर्वत्र मुलींना देवाला अर्पण, वाहाण्याची व्यवस्था, परंपरा प्रतिगामी समाजाने करुन ठेवली आहे. देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले, ब्रिटींशांच्या पारतंत्र्यातून भारत स्वतंत्र झाला. मात्र आपल्या देशातल्या अनिष्ट रुढ़ी, प्रथा, अंधश्रध्दा देवाच्या नावाने वाटेल ते सुरुच आहे. अशा वाढलेल्या मुली, यांचा भोग्यावस्तूच्या पलीकडे काहीच बघितले जात नव्हते. तिची भावनात्मक कुचंबना व्हायची, धार्मिक अंधश्रध्दांनी बरबटलेले लोकमन संविधानात्मक तरतूदी, कायदे याकडे दुर्लक्ष करत होते. धर्माच्या, 'देवाच्या नावाने चांगभल' म्हणून समाज धार्मिक दंभाने बरबटलेला होता. देवाकरीता त्या स्त्रीला धार्मिक स्थळात सोडले जायचे तीची स्थिती अत्यंत हलाखीची, बिकट उल्लेखित न करण्यासारखी होती, तारुण्य अवस्थेत त्या देहव्यापार शूपजीवनज उवदमल पदअमेजउमदज वबबनचंजपवदश म्हणून करायच्या तर शरीर जर्जर होवू लागल्यावर समाजाला कलंक मात्र दलालांना पोषक असणारी, समाजाला श्राप असणारी कुप्रथा 'वेश्याव्यवसाय' सुरु होत असे. देवदासी, मुरळया द्वारा जी प्रजोत्पादन प्रक्रिया होत असे अश्या अनौरस संततीला नाव देण्याकरीता जन्मदात्याचे नाव मिळत नसे. त्यांच्या पालन पोषण, त्यांच्या व्यक्तिमत्वाची जळणघडण असे विविध प्रश्न उग्र स्वरुप धारण करुन होते. अशा मुली—स्त्रीयांना समाजात प्रतिष्ठा सम्मान नव्हता आयुष्यभर समाजात त्यांना उपेक्षा, निंदा, भर्त्सना, हेटाळणी होत असे. आजचा वारसा हक्क तर सोडा तो दूरच होता.

जातीव्यवस्थेच्या विषमतेवर आधारलेली, पुरुषी मानसिकतेनी बरबटलेली पुरुषप्रधान सुनियोजित पध्दती जी तैयार केली. महिलांना दुय्यम दर्जा देण्याकरीता अशा समाजात महिलांची प्रतिष्ठा नसतेच, ती छळ, उपेक्षा, भर्त्सना, टिंगल टवाळणीचा मुख्य विषय बनते. पूर्वी आदिवासी मध्ये एखादया मुखिया, नायकाचा अपमान करावयाचा असल्यास त्याची संपदा म्हणून स्त्री कडे बघितला जात होते. त्या नायकाला पराजीत करण्याकरीता, शरणागती पत्करण्याकरीता त्यांच्या बहिण, मुली, बायको यांचे अपहरण केले जायचे. कधी भोगण्याच्या लक्ष्यातून, कधी मनोरंजनातून कधी हेटाळणी, कधी विटंबना, कधी उपेक्षा कधी तीचा अहंकार धुळीस मिळवणे म्हणून तीला अप्रतीष्ठीत, शिव्या, बिभत्स वर्तन, अर्वाच्य शिव्या, अकारण शिव्या दिल्या जात होत्या.

कर्नाटकात ओकळी आटा (आपल्याकडे रंग पंचमी — रंगाचा खेळ) नावाचा जो सण असतो. या सणाच्या दिवशी तरुण देवदासींच्या अंगावर पारदर्शक कपडे घातले जातात. तिच्यावर रंग उडवला जातो. तिची विटंबना केली जाते. महिलेची अप्रतिष्ठा करणारा हा खेळ आजही काही खेडयात खेळला जातो.

शाहू महाराजांनी बालविवाहास प्रतिबंध केला होता. आंतरजातीय विवाह जातीव्यवस्था, अस्पृश्यता कमी करण्यास हातभार लावेल असे महाराजांना माहित होते तोच वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे चालविला. इतकेच नव्हे तर कायद्यांना कृतीत आणण्यासाठी स्वत: पुढाकारही घेतला होता. कायदा यशस्वी व्हावा अशी त्यांची मनोमन इच्छा होती. प्रबळ इच्छावर कायद्याचे भवितव्य अवलंबून असते, असे त्यांना माहित होते.

शिक्षण नसल्याने व्यक्ति आपले स्वत्व विसरु शकते. असे होऊ नये म्हणून ते लोकांना समजावून सांगत होते. या करीता कोल्हापूरात वसतीगृहांचे जाळे निर्माण केले. शिक्षण सक्तीचे केले. कृषी व तंत्र शिक्षणाला चालना दिली. पालकांना जे शिक्षणाची सक्ती मोडत होते त्यांना दंड केले. शिक्षणात यांनी स्त्री—पुरुष विषमता, भेदभाव नष्ट केला. महाराजांचा काळातील मुलींच्या शिक्षणाचा वेग चक्रावून टाकणारा होता. आपल्या संस्थानाच नव्हे तर इतर संस्थानात मुलींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी हजारो रुपयांच्या देणग्या दिल्या. संपूर्ण समाजातील मुली शहाण्या व्हाव्यात, शिकाव्यात, आणि व्यवस्थात्मक गुलामीतून मुक्त व्हाव्या ही त्यांची प्रांजळ भावना होती. मुलींची राजाराम कॉलेजातील फीस माफ केली. मात्र पालक त्याकाळात मुलींना शिकविण्यास तैयार होत नव्हते. याकरीता महाराजांनी मुलींसाठी शिक्षणात रुची निर्माण व्हावी याकरीता नव नवीन युक्त्या केल्या.

जनतेच्या सेवेसाठी वाहून घेतलेल्या महाराजांना आपला सर्वार्थाने उन्नत करायचा होता. स्त्रीला सबला बनविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्री, तीचे शिक्षण, तिचा विवाह, तिची प्रकृती, तिला पुनर्विवाहाचे आणि काडीमोड घेण्याचे स्वातंत्र्य अनिष्ट प्रथांपासून तिची सुटका, तिचे स्वावलंब इत्यादी पातळयांवर जाणीवपूर्वक प्रयत्न केले. स्त्रियांना क्रूरपणाने वागविणेच नाहीसे करावे किंवा त्यास प्रतिबंध करावा म्हणून १९९९ ला त्याने नियम केले.

तेव्हा आणि आजही महिलांमध्ये त्या प्रमाणात पाहिजे शिक्षणाचे प्रमाण आज ही कमी आहे. कारण केलेले सर्वच कायदे त्यांच्यापर्यंत पोहोचतात असे नाही, सध्या हुंडाबळीचा, बालविवाह प्रतिबंधक कायदा आहे. पण बालविवाह मोठया प्रमाणात होतांना दिसत आहे. कायद्याचा वचक नसल्याने, कायदा राबविणारी यंत्रणा बेजबाबदारीने वागत असल्याने कायदा निष्प्रभावी बनतो. तो कायद्याची परिणाम शून्य ठरते. वेगवेगळया धर्मात तर महिलांचे कार्यक्षेत्र कुटुंबापर्यंतच मर्यादित केले आहे. कुटूंबामध्ये बैलासारखे राबूनही अत्याचार सहनही करुनही स्त्रीला प्रतिष्ठा नसते. अनेक महिलांना विविध सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अत्याचाराला पुढे जावे लागते असे होतांना तिने कोणाकडे तक्रार करु नये, नाही तर कुटुंबाची प्रतिष्ठा चव्हाटयावर येते असे सामाजीकरणाच्या माध्यमातून तिच्या मानस पटलावर अनेक गोष्टी बिंबविल्या जातात. ज्या महिलांना अत्याचार सहन होत नाही त्या विविध प्रकारे आत्महत्या करतात. म्हणजे स्वत:च्या जीवनाचा शेवट करतात. चार भिंतीच्या परिघात चालवण्याचा घटना / प्रकार समाजाला दिसत नाही, दिसले तरी ती खाजगी बाब समजून दुर्लक्ष करतात. बऱ्याच महिला जीवंत असतांनाच मरण यातना सोसतात. महाराजांनी कुटूंब व्यवस्था / संस्था आणि त्यातून निर्माण होणारे ताण—तणाव यांची कल्पना होती, या ताण—तणावाला, छळाला प्रतिबंध म्हणून महाराजांनी पाऊल उचलले.

स्त्रीयांना पशुतुल्य समजले गेले, तिला ग्वार, पशुतुल्य, ढोर समजून वागविले जायचे. तिचा जन्मच सेवा करण्यासाठी आणि अपमानाचे सर्व द्रव्य प्राशन करण्यासाठी झाला आणि स्त्रीला शुद्रातीशुद्र समजले जायचे. तिला स्वत:चे काहीही आत्मसन्मान नाही. तिला स्वत:चे स्वातंत्र्य, स्वत:चे विचार, भावना नाही. तिचे जणू काही अस्तित्वच नाही. तिला फक्त 'चूल आणि मूल' सांभाळावे याकरीताच तिचा जन्म झाला आहे,

तीला तिचा स्वाभिमानच नाही. बालविवाह आणि विधवा, सती प्रथा याविषयी तिने आवाज 'ब्र' काढला नाही पाहिजे हे सर्व महाराजांनी बघितले आणि त्यावर पाऊल उचलले.

मुस्लिम महिला ज्या पडद्यात राहतात. त्यामुळे त्यांच्या शूरवीरतां गुणांचा नाश होतो. शूरवीरतांचे कार्य पडद्यात राहून शक्य नाही, असेही महाराजांना वाटले. स्त्रीला स्वातंत्र्य दिले तरच तीचे कर्तृत्व फुलते, पल्लवीत होते. कुटुंबापासून रणांगणापर्यंत ती शौर्य गाजवू शकते अशी धारणा त्या तिला देणाऱ्या स्वातंत्र्या मागची होती. शाहू महाराजांनी मुस्लिम पडदा पध्दती, घुंघट प्रथाचे निषेध तर केलेच शिवाय या पध्दतीचे तोटे ही सांगितले.

स्त्रियांबद्दल राजर्षी शाहू अधिक जागृत असत त्यांना शिक्षण, नोकरीस ते प्रोत्साहन देत होते. त्यांच्या संस्थानतर्फे चालविण्यात येणाऱ्या दवाखान्यात श्रीमती साईक्स या मेट्रनचे कार्य करीत होत्या. मिस लिटल तर शिक्षण खात्यात अधिक्षक पदावर कार्यरत होत्या. देशी स्त्रियांना हा पाठ शिकावा असे त्यांना नेहमीच वाटत असे, आपल्या सूनबाईला उदार मनाने परंपरा तोडून पुढे जाण्याचा पुढाकार महाराजांनी घेतला. १८९५ मध्ये केळवकर राधाबाईला अधीक्षक म्हणून नेमले त्यांना आपला पूर्ण सेवाकाळ पूर्ण करुन सेवानिवृत्त झाल्या. यावरुनही राजर्षी शाहू महाराजांची स्त्रियांकडे, त्यांच्या आर्थिक स्वावलंबन, विकासाकडे कसे व्यक्तिगत लक्ष असायचे हे दिसून येते.

त्यांना माणसांची ओढ होती. निरनिराळया स्तरावर माणसांशी त्यांचा संपर्क येत असे. अमेरिकिन मिशनरीच्या कार्यकर्त्यापासून तर नीलगिरीच्या पर्वतराजीत राहणाऱ्या आणि राजर्षीच्या संपर्कात आलेल्या तोडा आदिवासी स्त्रियांपर्यंत त्यांच्या स्नेहसंबंधाचा विस्तार होता. स्त्रीवादी दृष्टि ने बघता असे वाटते की राजर्षी जगले असते तर याही पेक्षा अधिक विस्तारलेली त्यांच्या कर्तृत्वाची क्षितिजे आपल्याला दिसली असती. स्त्रीच्या सामर्थ्याचे आणि गुणसंपदेचे एक विलोभनीय झळझळते रुप आपल्याला आणखी विशाल पार्श्वभूमीवर पाहायला मिळाले असते.

**निष्कर्ष**

- जातीव्यवस्थेवर आधारित शोषण, अनाचार, अत्याचार कमी करण्यासाठी महाराजांनी कौशल्यपूर्ण मार्गाचा अंगीकार केला. महाराजांनी जातीअंताची चळवळ मराठा धनगर विवाह मोठया प्रमाणात, प्रयत्नपूर्वक, जाणीवपूर्वक घडवून आणले.
- आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन म्हणून कृतीशील मार्गाचा अंगीकार केला. क्रांतीकारी गोष्टीचा प्रारंभ स्वत:पासून झाला की त्यास लवकर मान्यता मिळते आणि विचारांचा प्रसारही चांगला होतो. महाराजांनी आंतरजातीय विवाहासाठी केवळ प्रजेलाच प्रोत्साहन दिले नाही तर आपल्या चुलत बहिणीचा विवाह इंदूरच्या यशवंतराव होळकर सोबत जुळवून आणला.
- महाराजांना वाटले बालविवाहाचे प्रयोजनच मुळात स्त्रीचे स्वातंत्र्य मारण्यासाठी असते. जर स्त्री चाकोरीबध्द जीवनाच्या श्रृंखला तोडून स्वजाणीवेतून वावरु लागली तर प्रतिगामी व्यवस्था कोडमडेल की काय ? अशा भितीतून स्त्री शहाणी होण्या आधी प्रतिगामी व्यवस्था तीला 'चूल आणि मूल'

यात गुरफटून ठेवते. याकरीता महाराजांनी विवाहाचे, जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य हा निर्णय तात्कालीन परिस्थितीत क्रांतीकारी ठरला. ज्या काळात त्यांना निर्णय घेतला तो स्त्रीविरोधी तत्वप्रणालीचा समाज होता अशा स्थितीत महाराजांनी घेतलेला निर्णय महत्वपूर्ण ठरतो. बालविवाह प्रतिबंध करुनच न थांबता त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता देवून जी प्रतिष्ठा कुटुंबात आणि समाजात, बाहेर नव्हती ती मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पूर्वी तर विधवा स्त्री कोणत्याही कार्यक्रमात भाग घेऊ शकत नव्हती, पतीच्या निधनानंतर तिची अवस्था पशु सारखी व्हायची. कधी कधी तर पत्नीलाच पतीच्या मृत्यूचे जबाबदार घटक समजण्यात येई. पांढऱ्या पायाची, काळया नजरेची, चेटकीण, खाऊन टाकले असे संबोधित करुन तिला छडले जायचे तेव्हा या अंधकारमय परिघातून बाहेर काढण्याकरीता, तिचे आरोग्य व्यवस्थीत रहावे, तिला पूर्ण जीवन जगता यावे, या करती, विधवा पुर्नविवाह सारखे कायदे निर्णय अस्तित्वात आले.

विधवा विवाहास बंदी घातल्यामुळे होणारे सामाजिक दुष्परिणाम त्यांनी समाजाला सांगितले. विधवा विवाह कसा आवश्यक आहे हे हयांनी प्रस्थापित पुरोगामी तत्वप्रणालीच्या लोकांना प्रबोधन, सभा, समिती, संस्थानात ही सांगितले आणि संस्थानाबाहेर तिथे कुठे त्यांना संधी मिळाली तिथे या सर्व गोष्टींचा ऊहापोह केला.

- शाहू महाराजांनी देवदासीपासून जन्माला आलेल्या अनौरस संततीचा सखोल अभ्यास केला. ज्यांच्यापासून ती अनौरस संतती जन्माला येईल त्यांच्या संपतीचा वाटा त्या संतती मग ती मुलगी असो किंवा मुलगा त्यांना देण्याचा कायदा त्यांनी केला. देवदासी, जोगतिणी, मुरळी, मुलांसाठी जो कायदा पुर्नविवाहासाठीचा होता, तो यांना लागू केला. वर्षानुवर्ष अंधश्रध्दा धर्माचा जोखंड श्रृंखलेत बांधलेल्या, भरडल्या, दुर्लक्षित, उपेक्षित स्त्रीया पर्यत शाहू महाराज जाऊन पोहोचले.

  आता या कायदयाची परिणामकारकता म्हणजे ज्या महिलांचा उपभोग झाला, देवदासीच्या ज्या संतती होत्या, त्या संततीला या कायद्याचा लाभ झाला. कारण एक सुसंस्कृत समाज निर्माण होण्याचे स्वप्न या कायद्यामुळे निर्माण होणार होते. कायदा थोडा कठोरच केला होता त्यामुळे त्याचा या प्रथावर परिणाम होणे हे निश्चितच होते.

- एखादी अनिष्ट प्रथा उच्चाटण करण्यासाठी शाहू महाराज प्रबोधनाचा मार्ग स्विकारायचे. पण जर यांची परिणामकारकता त्यांना दृष्टिगोचर झाली नाही तर समाजासमोर कायदा करुन स्त्रीला सम्मान देण्याचे कार्य करायचे.

- शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील अलुता—बलुता प्रथा बंद करण्याचा विचार केला, तरीही लोक बलुतेदारी जबरण मागायचे ५ जूलै १९१९ ला महाराजांना एक हुकूम दिला, सरकारी कामगारांनी अगर इतरांनी कोणावर जुलूम केल्यास संबंधित व्यक्ति शिक्षेस पात्र होईल, असा तो हुकूम होता. अनौरस संतती व जोगतिणी करीता १७ जानेवारी, १९२० ला कायदा केला.

- शाहू महाराजांनी कर्नाटकातील रंगाचा खेळ ही प्रथा बंद व्हावी, समाजात महिलांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी या करीता, निकोप, निरोगी समाजासाठी अशा प्रथांविरुध्द कायद्याचे हत्यार उगारलेले होते.
- मुलींना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी अनेक समित्या स्थापन केल्या. त्यांच्या राहण्या—जेवणाची नि:शुल्क सोय करण्यात आली. होतकरु मुलींसाठी पुस्तक पेढी योजना सुरु करण्यात आली. मुलीने शिकावे म्हणून गर्भश्रीमंत लोकांवर कट बसविण्यात आले. त्याचे उदा. म्हणजे त्याची इंदूमती सून जी कमी वयात विधवा झाली होती, तिला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. प्रतिकूल परिस्थितीत आणि कुटुंबातूनच विरोध होत असतांना सुनेला शिक्षण दिले गेले.
- स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा बसावा म्हणून क्रूरपणाचा वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा करण्यात आला. त्या कायद्यातील शिक्षा समाजाला कडक वाटतील पण कायद्याची भिती बसविण्यासाठी, सुधारणा घडविण्यासाठी ते आवश्यक आहे. स्त्रियांबरोबर क्रूर वागण्याचे असे कितीतरी व्यवहार आहेत की ते इंडियन पिनल कोडखाली येऊ शकत नाहीत. छळ इतका वाईट असतो की स्त्रियांना स्वत:च्याच जन्माविषयी वाईट वाटू लागते. स्त्रीला क्रूरपणे वागविणाऱ्यांना सहा महिन्यांचा कारावास व २०० रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात केली.

**संदर्भ सूची**


- राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे, डॉ. जयसिंगराव पवार, मेहता पब्लिशींग हाऊस.
- राजर्षी शाहू गौरव ग्रंथ — संपादक डॉ. रमेश जाधव
- शाहू — श्री राम ग. पचिंद्रे
- राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे संपादक डॉ. जयसिंगराव पवार, मेहता पब्लिशींग हाऊस.
- राजर्षी शाहू छत्रपती — धनंजय कीर
- छत्रपती राजर्षी शाहू महाराज — तु. वा. नाईक
- समाजक्रांतीकारक — राजर्षी शाहू छत्रपती, डॉ. जयसिंगराव पवार, मेहता पब्लिशींग हाऊस.
- राजर्षी शाहू छत्रपती एक अभ्यास — वसुधा पवार, मेहता पब्लिशींग हाऊस.
- लोकराज शाहू महाराज व्यक्तित्व आणि विचार — धनंजय कीर
- राजर्षी शाहू एक दृष्टिक्षेप — डॉ. जयसिंगराव पवार
- छत्रपती श्री राजर्षी शाहू महाराज — डॉ. शशीकला कर्डिल, वैशाली प्रकाशन, पूणे
- छत्रपती शाहू महाराज — प्रा. रघुनाथ कडवे
- फूल, शाहू आंबेडकर मिशन और आजादी आंदोलन लेखक पी.आर. गौतम

- https://www.bookganga.com
- https://www.flipkart.com
- https://www.amazon.in
- https://www.mehtapublishinghouse.com
- https://www.akshardhara.com
- https://gatnacognition.com
- https://havayan.com

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# ९. फुले-शाहू-आंबेडकर यांचे समतावादी विचार : एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. मिथुन बाबुराव राऊत**
आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज, जि. गडचिरोली.

भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाच्या तसेच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन समाज क्रांतिकारकांना केंद्रस्थानी ठेवावे लागते. तब्बल दोन शतकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या समाजसुधारकांनी महाराष्ट्रात समग्र सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. समाज परिवर्तन आणि सामाजिक न्यायावर आधारित समाजाची पुनर्रचना या दोन घटकांना केंद्रस्थानी ठेवून महात्मा फुले, शाहु महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक समतेच्या व्यापक दृष्टीकोनाची मांडणी करून प्रस्तुतता अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय संविधान कलम ४६ अन्वये मार्गदर्शक तत्त्वानुसार दुर्बल घटकांसाठी विशेषतः अनुसूचित जाति—जमाती यांचा शैक्षणिक व आर्थिक या अनुषंगाने क्रमबंध्द विकासासाठी शासन वैधानिक दृष्टीने कटिबध्द व प्रयत्नशील असूनही प्रत्यक्षात मात्र  दुर्बल घटकांच्या वाटयाला समता, बंधूता व न्याय यांचा लवलेशही आल्याचे दृष्टीपथास पडत नाही.

भारतातील समतावादी दृष्टीकोनाची इतिहासात जाऊन मीमांसा करण्यासाठी आपणास १९ व्या व २० व्या शतकात उदयास आलेल्या काही प्रवाहांची चर्चा करावी लागते. भारतीय समाजव्यवस्थेचा पाया हा जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, वर्गव्यवस्था व पुरूषप्रधान संस्कृती हा आहे. पर्यायाने आपल्या समाजात जातिव्यवस्थेने निर्माण केलेली व्यवसायाबंदी, शुद्र—अतिशूद्रांवर लादलेल्या ज्ञानबंदीतून निर्माण झालेली सामाजिक आणि शैक्षणिक विषमता, भांडवलशाही अर्थव्यवस्थेने निर्माण केलेली प्रचंड आर्थिक विषमता आणि पुरूषप्रधान संस्कृतीचा अनाठायी अपरिहार्य परिणाम स्त्री—पुरूष विषमता या आधारावर या प्रवाहांची पुर्नमांडणी करावी लागते.

प्रामुख्याने पहिला हिंदू पुनर्जीवनवादी, दुसरा ब्राहमणेत्तर सत्यशोधक चळवळीतून आलेला बहुजन विचारप्रवाह, तिसरा आर्थिक आणि राजकीय समतेची तरफदारी करणारा समाजवादी विचार प्रवाह हा समतेच्या दृष्टीने १९ व्या शतकात जन्माला घातलेल्या अहितकारी पायंडा आहे. याच शतकात ब्राहमणेत्तर चळवळीच्या माध्यमातून समतेकडे जाणारा बहुजनवादी विचार प्रस्थापीत करण्यात आला. महात्मा फुले आणि शाहू महाराज या प्रभूतीने सत्यशोधकीय चळवळीच्या माध्यमातून समतेवर आधारित समाजाच्या जडणघडणेची धारणा प्रबळपणे मांडली. शोषित घटकांसाठी समता व सामाजिक न्यायावर आधारित मुलगामी समाज परिवर्तनाचा

सिध्दांत मांडला. 'अस्पृश्यता निवारण', 'जातीअंताची चळवळ', 'बहूजन समाजाला शिक्षण', 'स्त्री—दास्य विमोचन' आणि 'शेतकऱ्यांचे कल्याण' या मुद्यावर आधारित सामाजिक समतेची चळवळ उभी केली.

महात्मा फुलेंनी समतेसाठी मांडलेला समग्रक्रांतीचा विचार हे १९ व्या शतकातील समाजप्रबोधन चळवळीतील खास हितकारक प्रयोजन मानावे लागेल. धर्म, शिक्षण, स्त्रीदास्य, अस्पृश्यता, शेतीप्रश्न आणि इतिहास व संस्कृती या क्षेत्रातून ब्राम्हणी वर्चस्व नाकारून क्रांतीकारी परिवर्तन झाले पाहिजे. या सूत्रावर समतावादी वैचारिक प्रवाह निर्माण केला. महात्मा फुल्यांनी 'जातीव्यवस्था', 'वर्गव्यवस्था' आणि 'पुरूष प्रधान संस्कृती' यावर कठोर हल्ला चढवून सामाजिक समता निर्माण होण्यासाठी 'धर्मातील कर्मकांड', 'ब्राह्मणवाद, 'पोथीनिष्ठता' यावर कडाडून हल्ला केला. या देशातील सर्वांगीण विषमतेचे मूळ धर्म आहे. हिंदू धर्माने अगदी जाणीवपूर्वक बहूजन समाजावर धार्मिक व मानसिक गूलामगिरी लादून, सामाजिक समतेचा प्रवाह रोखून धरला आहे. तेव्हा या ब्राह्मणी धर्माची कठोर चिकित्सा केल्याशिवाय समतेवर आधारित समाजाची निर्मिती होऊ शकत नाही, असे परखडपणे प्रतिपादन केले. महात्मा फुलेंच्या समतावादी विचारांचे कल विषमतेचे व शोषणाचे मूळ शोधण्यात होते. व त्याच्यात निराकणासाठी पण पर्यायही सुचविलेले आहे. सार्वजनिक सत्य धर्माची स्थापना करून पर्यायाने वर्ण, जाती—धर्माला नकार देऊन समतेवर आधारित धर्माची संकल्पना मांडण्याची सर्वसमावेशक धर्मनिरपेक्ष अशी अधिकृत मांडणी केली.

आपला समतावादी दृष्टीकोन मानवतावादी तत्त्वज्ञानावर उभा करण्यासाठी महात्मा फुल्यांनी 'अस्पृश्यता निवारण', 'स्त्री—स्वातंत्र्य व स्त्री शिक्षण' आणि 'जातीव्यवस्थेचे उच्चाटन' या त्रिसूत्रीवर आधारित विचार व कृती कार्यक्रम दिला. स्त्रियांचे शोषण करणाऱ्या संस्थांच्या विरोधात प्रचंड आवाज उठवला. दैववाद, शब्दप्रामाण्यवाद, अवतारवादाचा पगडा स्त्रियांवर लादण्यासाठी धर्मग्रंथ पुराणके व त्यातून अनेक भाकडकथा रचण्यात आल्या. त्यातून निर्माण झालेल्या अंधश्राध्दाळू वृत्तीमुळे स्त्री आणि बहूजन समाजात विज्ञाननिष्ठा निर्माण झाली नाही. याला छेद देण्यासाठी समाजाच्या सर्वच अंगाने स्त्री—पुरूष समता यावी म्हणून पहिल्या प्रथम महात्मा फुल्यांनी कृति—कार्यक्रम हाती घेतला. 'पुरूषांनी स्त्रियांवर लादलेली अमानविय गुलामगिरी नष्ट करणे' हे त्यांच्या समताविषयक विचारांचे प्रमुख मुल्य होते. वास्तविक पाहता स्त्रियांचे सामाजिक स्थान, त्यांचा दर्जा व प्रतिष्ठा व तिला मिळणारे स्वातंत्र्य हे सामाजिक परिवर्तनाचे व प्रगतीचे निकष असले पाहिजे. हे गृहितकृत्य स्वीकारून महात्मा फुले यांनी हिंदू धर्मग्रंथांनी निर्माण केलेली पुरूषप्रधान कुटुंबांची पुर्नरचना करण्याचा आग्रह धरला. धार्मिक जातीव्यवस्थेचे अधिष्ठान असलेला हिंदू धर्म स्त्रियांचे कसे मानसिक शोषण करतो, यावर हल्ला चढवला. सामाजिक न्यायावर आधारित स्त्री—स्वातंत्र्यांचा प्रबळ पुरस्कार करताना महात्मा फुल्यांनी काही क्रांतिकारी उपक्रम राबवले. उदा. अस्पृश्यांच्या मुलींसाठी शाळा सुरू केली. केशवपन, बालविवाह या अनष्ठि प्रथांना ध्येयनिष्ठापूर्वक कडाडून विरोध केला. एवढेच नाही तर विधवांना आपले जीवन सुखरूपपणे जगता यावे यासाठी आपल्या घरात प्रसूतीगृह सुरू केले.

महात्मा फुलेंच्या समतावादी दृष्टीकोनाचे आणखी एक पाऊल म्हणजे शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजनांना शिक्षण देण्याची योजना हा आहे. १८८२ मध्ये ब्रिटिशांनी नियूक्त केलेल्या हंटर कमिशन समोर

साक्ष देताना फुल्यांनी प्रचलित असलेल्या झिरपण्याच्या सिध्दातांना विरोध करून 'शिक्षणाच्या बहुजन करणाचा आग्रह धरला'. महात्मा फुले म्हणतात, ब्राह्मणी समाजव्यवस्थेने अगदी जाणीवपूर्वक शूद्र—अतिशूद्रांना ज्ञानबंदी केली आहे आणि बहूजनांच्या या अज्ञानातून प्रचंड स्वरूपाची सामाजिक विषमता निर्माण झालेली आहे. तेव्हा सर्व बहूजन समाजांना शहाणे करून सोडल्याशिवाय ही विषमता कमी होणार नाही. हे सत्य विधान त्यांनी अधोरेखीत केले.

महात्मा फुल्यांचा हा समतावादी विचारप्रवाह व आजची वस्तूस्थिती पर्यायाने अपेक्षा आणि फलश्रुती याची तुलना केली तर त्यात प्रचंड दरी आहे. वस्तूत: प्रत्यक्ष परिणाम हीच समतेची कसोटी असली पाहिजे. हा महात्मा फुलेंच्या समताविषयक आशय आज लूप्त झाला आहे. अस्पृश्यता वरकरणी पाहता नष्ट झाली असली तरीही जातीअंताच्या लढ्यात आजही प्रचंड गतीरोध निर्माण करणारी ठरत आहे. महिलांचे सबलीकरण, सक्षमीकरण या घोषणा होत असल्या तरी महात्मा फुलेंना अभिप्रेत असलेली स्त्री—पुरूष समानता प्रत्यक्षात आली नाही. भारताने स्वीकारलेल्या खाजगीकरणाच्या धोरणामुळे बहुजनांचे शिक्षण, छोट्या शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह लागले आहे. शेती आणि शेतकरी या बाबत महात्मा फुलेंचे चिंतन त्यांनी शेतीव्यवसायासाठी सूचवलेले पर्याय स्वांतत्र्य प्राप्तीनंतरच्या अमृतमहोत्वाच्या पर्वावरही प्रत्यक्षात येऊ शकले नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

महात्मा फुलेंचा वारसा १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात राजर्षि शाहू महाराज यांनी प्रचंड समाजपरिवर्तनाची उर्मी घेऊन बहूजन—दीन दलित समाजाच्या उध्दारासाठी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यत कार्य केले. म्हणूनच तर या सदर्भात अभ्यासक धनंजय कीर यांनी 'नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत' असे वर्णन केलेले आहे. ज्या कालखंडात शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सत्तासूत्रे आपल्या हाती घेतली, तो महाराष्ट्राच्या सामाजिक—राजकीय इतिहासात ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व असणारा व बहूजन समाजाचे अस्तित्व नाकारणारा कालखंड होता. कोल्हापूर संस्थानाची सत्तासूत्रे हाती घेताच या सत्तेचा वापर सामाजिक न्यायावर आधारित राजकीय व्यवस्था कशी राबवता येईल यासाठीच करण्याचे त्यांनी ठरवले. मागासवर्गीय—बहूजन समाजाचा विकास साधण्यासाठी त्यांनी वंचितांना शिक्षण, शिक्षणासाठी काही सवलती व शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शासकीय सेवेत समावेशन या त्रिसूत्रीवर आधारित सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी महाराजांनी केली होती. त्यासाठी काही रितसर हूकूमनामे—जाहीरनामे काढले आणि राजेशाहीतसूध्दा 'सामाजिक लोकशाही' प्रस्थापित करता येते, असा एक नवा आदर्श विसाव्या शतकाच्या सूरूवातीला महाराष्ट्रासमोर उभा केला.

सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. मागासवर्गीय तसेच बहूजन समाजाला शासकीय सेवेत आरक्षण असले पाहिजे, गरीब विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे शिक्षण घेता येण्यासाठी शिष्यवृत्या दिल्या पाहिजेत, स्त्रियांना स्वतंत्रपणे जीवन जगता आले पाहिजे, हा स्वातंत्र्योत्तर संविधानात प्रतिबिंबित झालेला व राज्यकर्त्यांनी अमलात आणलेला विचार महाराजांनी अर्धशतकापूर्वी आपल्या संस्थानात रूजविला व अंमलबजावणीत आणला, यावरून भविष्याचा वेध घेऊन राज्यकारभार करण्याचे त्यांचे सामर्थ्य किती अफाट

होते, हे लक्षात येते. शिक्षण, आरक्षण व मागासवर्गीयांचे शिक्षण हे महाराजांचे जीवित कार्य होते. हा त्यांचा वसा कल्याणकारी राज्याची मुहूर्तमेढ रोवणारा ठरावा एवढा प्रज्वल होता.

प्रशासनात, शिक्षणात व खाजगी सेवेत ब्राह्मणांची अक्षरश: मक्तेदारी प्रस्थापित झाली होती. व आजही परिणामी ब्राह्मणेत्तर समाज व प्रामुख्याने मागासवर्गीय व मराठा बहुजन समाज प्रवाहाच्या बाहेर फेकला गेला. अशा विचित्र परिस्थितीत शाहू महाराज अधिकाररूढ झाले होते. ब्राह्मण वर्गाची ही मक्तेदारी कशी मोडून काढता येईल आणि प्रशासनात व राजकीय प्रक्रियेत मागासवर्गीय तसेच बहूजन समाज कसा केंद्रस्थानी येईल, हेच प्रधान उदिष्ट उराशी बाळगून महाराजांनी राज्यकारभार सुरू केला. विशेषत: बहुजनांचे शिक्षण आणि प्रशासकीय सेवेत त्यांचे आरक्षण यावर लक्ष केंद्रीत करून ब्राह्मण वर्गाची सर्व क्षेत्रातील मिरासदारी त्यांनी मोडून काढली.

या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांनी जे काही निर्णय घेतले, त्यातून ब्राह्मणशाहीच्या प्रशासकीय वर्चस्वाला फार मोठा हादरा बसला सर्वप्रथम महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट केली व त्याच्या जागी खेड्याचा कारभार पाहण्यासाठी तलाठी या पदाची निर्मिती केली. या तलाठी वर्गात देखील अस्पृश्य व मागासवर्गाला संधी मिळण्यासाठी तलाठी या वर्गातील अस्पृश्य विद्यार्थ्यासाठी दरमहा आठ रूपये अशी विशेष शिष्यवृत्ती जाहीर केली. त्याचबरोबर अस्पृश्य जातीतील गुणवत्ताप्राप्त लोकांना मोठमोठी पदे व अधिकाऱ्याच्या जागा बहाल केल्या. त्यासाठी १० ऑगष्ट १९१८ रोजी महाराजांनी एक आदेश काढला तो पुढील प्रमाणे होता. ''हल्ली तलाठ्याच्या नेमणुका केल्या जात आहेत. त्यात अस्पृश्य जातीतील लोकांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे. तसेच या जातीतील लोकांना योग्य ती पात्रता असल्यास दरबारातील कोणत्याही योग्य त्या जागेवर नियुक्ती द्यावी आणि विशेष म्हणजे त्यांची अस्पृश्यत्वाची सबब शासकीय नोकरीच्या बाबतीत घेतली जाणार नाही.''

तात्पर्य, केवळ जन्माने उच्च वा श्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या समाजातील विशिष्ट लोकांना जे सुखाचे व समृध्दीचे आयुष्य जगता येते तशाच प्रकारचे सुखसमृध्दी व प्रतिष्ठेचे जीवन बहुजन व मागास वर्गीयांच्या वाट्याला आले पाहिजे, यासाठी आपल्या संस्थानात ५० टक्के जागा राखीव करणारे हिंदुस्थानातील ६५० संस्थानकांपैकी शाहू महाराज एकमेव संस्थानिक होते.

आपल्या संविधानात आज वरील ज्या काही तरतुदी केलेल्या दिसतात, त्याची पायाभरणी ५० वर्षा अगोदरच महाराजांनी केली होती हे लक्षात घेतले पाहिजे. 'समाजक्रांतिकारक राजा' हे त्यांचे खास स्वभाव गुण वैशिष्ट्ये असल्यामूळे त्यांचे विचार व कार्य काळाच्या कसोटीला उतरले आहे.

आज स्वातंत्र्यप्राप्ती होऊन आपण अमृतमहोत्सवाचे पर्व साजरे करीत आहोत तरीसुध्दा शाहू महाराजांचा विचार व कार्याची प्रभावीपणे व यशस्वीपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही, ही शोकांतिका आहे. शाहू महाराजांच्या काळात सामाजिक न्यायाचे, सामाजिक स्वातंत्र्याचे जे प्रश्न होते ते आजही पूर्णार्थाने सूटले आहेत असे म्हणने धाडसाचे ठरेल ग्रामीण भागातील शेतकरी, स्त्रिया, भूमीहीन शेतमजूर आणि दलित समाज यांच्या प्रश्नांकडे पाहिल्यास शाहू महाराजांच्या विचाराची व कार्याची लढाई आणखी लढावी लागेल,

असे वाटू लागले आहे व तोपर्यंत महाराजांचे विचार आणि कार्य हे खऱ्या अर्थाने प्रेरक तत्व म्हणून सिध्द झाले असे म्हणता येईल.

महात्मा फुले आणि राजर्षि शाहू महाराज यांची सामाजिक समतेची चळवळ २० व्या शतकात समर्थपणे चालवण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे जाते. बाबासाहेबांनी सामाजिक न्यायावर आधारित सर्वांगिण सामाजिक परिवर्तनाचा सिध्दांत मांडला. त्यांचे सूत्रदेखील विषम समाजरचना आणि विषम समाजरचनेची तरफदारी करणाऱ्या हिंदू धर्माची चिकित्सा हेच होते. डॉ. आंबेडकरांनी जातीअंताची चळवळ, स्त्री मुक्ती आणि समतेच्या निकषावर हिंदू धर्म व धर्मग्रंथाची कठोर व तर्कसंगत चिकित्सा केली. ''जाती व्यवस्थेची विषम उतरंड'' या देशात समतेच्या मार्गातील प्रचंड गतीरोध आहे. या गृहितकृत्यावर डॉ. आंबेडकरांचे समताविषयक विचार अभ्यासने अगत्याचे आहे.

डॉ. आंबेडकर म्हणतात, ''या देशातील जातीव्यवस्था ही सर्व प्रकारच्या विषमतेचे मुळ आहे. एवढेच नाही तर जातीव्यवस्थेचा अंत ही राष्ट्रनिर्मितीची पर्यायाने समतेवर आधारित समाज रचनेच्या निर्मितीची पूर्वअट आहे.'' जाती व्यवस्था कशी विषमतामुलक आहे व समतेच्या मार्गावरील फार मोठा अडथळा कसा आहे. याची चिकित्सा करताना ते म्हणतात की, ''या देशातील जातीव्यवस्था जन्मानुसार व्यवसाय विभाजीत करते, वर्णव्यवस्थेचा अपरिहार्य पर्याय म्हणून इथे कनिष्ठ जातींना व्यवसायांचे स्वातंत्र्य नाही. हिंदू धर्मग्रंथानी शूद्र, अतिशूद्रांना ज्ञानबंदी केल्यामुळे या जातीव्यवस्थेने ज्ञानाचे विषम वाटप केले. ही व्यवसायाची जाणिवपूर्वक बंदिस्त व्यवस्था असल्याने संपत्तीचे विषम वाटप करते या सर्वांचा परिणाम म्हणून प्रचंड स्वरूपाची सामाजिक विषमता व अन्यायावर आधारित विषमता इथे निर्माण झाली आहे. तिला छेद देऊन इथे नवी पर्यायी व्यवस्था उभी करावी लागेल.'' व ती काळाची गरज आहे.

या व्यवस्थेच्या मुळाशी हिंदू धर्म व धर्मग्रंथातील विषमतामूलक प्रवृत्ती आहे. तेव्हा जोपर्यंत या धर्माची व धर्मग्रंथाची चिकित्सा होत नाही. आणि बुध्दिप्रामाण्यवादाच्या कसोटीवर ही धर्मतत्त्वे उतरत नाहीत, तोपर्यंत या देशात समतेचा प्रवाह निर्माणच होऊ शकत नाही. 'मनुस्मृती' ला विरोध व तिचे दहन करण्यामागे बाबासाहेबांचा हाच दृष्टीकोन होता. २७ सप्टेंबर १९२९ रोजी आपल्या 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्रात हिंदू धर्माचे सूक्ष्म अध्ययन केल्यानंतर त्यांचा हिंदू धर्माबाबतचा दृष्टीकोन किती परिपक्व व तात्त्विक अधिष्ठानावर विराजमान झालेला होता, हा दूरदृष्टीचा परिपाक ठरावा हे लक्षात येते.

जाती व्यवस्था, समतेचे विषम वाटपकर्ते हे देखील डॉ. आंबेडकरांच्या समतावादी विचारातील प्रमुख असे गृहितकृत्य होते. याला अनुसरून एके ठिकाणी ते लिहितात, राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक समतेचा उदय होणार नसेल, तर ते स्वातंत्र्य केवळ उच्च जातीपुरतेच मर्यादित ठरेल. तेव्हा जाती अंताची चळवळ जोपर्यंत यशस्वी होत नाही, तोपर्यंत कोणत्याही प्रकारची समता या समाजव्यवस्थेत अस्तित्वात येऊ शकत नाही. केवळ अस्पृश्यता निर्मूलन झाल्यामुळे समता प्रस्थापित होऊ शकेल, ही अपेक्षा त्यांना नव्हती. त्यांना सामाजिक न्यायावर आधारित आर्थिक समता अपेक्षीत होती. केवळ कायदे करून समताधिष्ठित समाजाची निर्मिती होऊ शकत नाही, हेही त्यांना माहित होते. त्यामुळे एक व्यक्ती एक मत हे तत्त्व स्वीकारताच त्यांनी

एक व्यक्ती एक मूल्य असा विचार मांडला. संविधानसभेत चर्चा करतांना ही त्यांनी समतेची आणि राजकीय लोकशाहीची सांगड कशी घालता येऊ शकेल, याबाबत कठोर चिंतन केले होते. सत्ता वंचितांना सत्ता प्राप्त झाली पाहिजे हा राजकीय समतेचा विचार व्यावहारिक पातळीवर कसा साकार होईल, याला पर्याय देताना त्यांनी समतेवर आधारित लोकशाहीचे समर्थन केले. मात्र आर्थिक व सामाजिक विषमता लोकशाही निर्माण करण्यातील एक अडसर आहे हे डॉ. आंबेडकरांच्या ध्यानात येताच त्यांनी त्यासाठी सामाजिक न्यायावर आधारित उत्पादन व वितरणाच्या व्यवस्थेची आग्रही भूमिका मांडली.

फुले—शाहु—आंबेडकरांचे विचार जात—धर्म या पलीकडे होते. त्यांना धर्म—जातीच्या बंधनातून मनुष्यप्राण्याला मुक्त करून त्याला माणूस बनवायचे होते. त्यांचे विचार व आचार तंतोतंत तसेच होते, त्यास तसूभरही असमतोल नव्हता. त्यांना विषमतेवर, शोषणमूल्यावर उभी असलेली धर्म—जाती व्यवस्था उद्ध्वस्त करायची होती, हेच त्यांच्या विचारांचे अंतिम ध्येय आहे. तेव्हा या सर्व पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे शोधून महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या समतावादी विचार प्रवाहाची पूर्नमांडणी करावी लागेल.

**सारांश**

महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वैचारिक वारसा लक्षात घेता स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या अमृतमहोत्सवाच्या पर्वावर या विचारांचा चिकित्सा करताना वस्तुस्थिती व फलश्रृती याबाबत मिमांसा करताना संविधानाने सांगितलेली समतेवर आधारित सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना होऊ शकलेली नाही वर्तमान काळातही नोकरी, व्यवसाय, उद्योग या प्रातांतही उच्चवर्णीयांचीच मक्तेदारी शाबूत आहे. एकीकडे स्वतंत्र भारत यशाची शिखरे गाठतांनाचे चित्र दिसत असले तरी प्रत्यक्षात मात्र ग्रामीण भागातील आर्थिक विषमता जागतिकीकरणाच्या युगात उत्तरोत्तर वाढतच आहे. हरितक्रांतीचे या लाभार्थीचे अत्यल्प प्रमाण तसेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या अमानवी दर्शन आज चिंताजनक बाब ठरली आहे. जमिनदारी कायम राखत हरित क्रांतीचा लाभ सर्वांगाने नवश्रीमंत बागायतदारांच्या पदरात पडलेला दिसतो. वास्तविकत: बहुजन, माळी, साळी, धनगर असे लहान शेतकरी हरितक्रांतीपासून कोसोदूर राहिले.

शेतमालाला रास्त भाव मिळावा म्हणून शहरी, व्यापारी, भांडवलदार यांच्याशी अकारण संघर्ष करावा लागल्याचे चित्र हे घृणास्पद आहे. शेतकरी शेतमजूर बनले जसे महाराष्ट्रात १ कोटी शेतमजूर आहेत. फुले—शाहु—आंबेडकर जिज्ञासेने सामाजिक न्याय व समता प्रस्थापनेसाठी जे अथक परिश्रम घेतले त्याची फलश्रृती आज आपल्या दृष्टिपथास पडत नाही हे सत्य नाकारता येत नाही. पुरूषांच्या बरोबरीचे स्त्रि—स्वातंत्र्य, स्त्रि—हक्क हे कागदोपत्रीच शिल्लक आहेत. शिक्षणाची समान संधी, सक्तीचे मोफत शिक्षण यासाठी संविधानातील मार्गदर्शक तत्वांच्या तरतूदी थंड बस्त्यातच आहे. इ.स. २००० च्या जागतिक सर्वेक्षणानूसार जगातील एकूण निरक्षरापैकी भारतात ५४ टक्के निरक्षर आहेत. यात प्रामुख्याने दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय आणि शेतकरी यांचाच अंतर्भाव असल्याने त्यांच्यासाठी प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समता व सामाजिक

न्याय हे मानवी मूल्य शोभेची वस्तूच ठरती आहे. जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक समता तर प्रस्थापित झालीच नाही तर व्यक्तिवाद फुफावला. तात्पर्य असे की शोषित, वंचित घटक यांच्याबाबत सर्वतोपरी अनास्था व उदासीन वृत्ती यातच भर पडत आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची**

1. डॉ. विघे प्रशांत, मॉडर्न इंडियन पॉलिटी भारतीय संविधान व भारतीय राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृती—२०२०.
2. श्री. पवार संतोष देवराव, फुले, शाहू, आंबेडकर आणि आदिवासी पारधी समाज, मिलींद प्रकाशन, भिमनगर, सावंगी (मेघे), वर्धा, प्रथमावृती, ९ जुन २००८.
3. डॉ. इंगोले के. एस., बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांचा मागोवा, गुरूदेव सोरदे संदेश प्रकाशन, ध्यानवैष्णवी अपार्टमेंट, गिरापेठ, नागपूर, १४ ऑक्टो. २००७.
4. प्रा. कांबळे राजेन्द्र जनार्दन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मातराचे परिणाम, सुधिर प्रकाशन बोरगांव (मेघे), वर्धा, प्रथमावृत्ती—२०१०.
5. https://www.aksharnama.com/client/article_detail/4731, 15/02/2022.
6. https://www.loksatta.com/vishesh/shau-phule-ambedkar-1136232/, 16/02/2022.

# १०. ग्रामीण समुदायाच्या विकासातील समस्या एक चिंतन

**मनोहर भी. येरकलवार**
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर-२६.

**सारांश**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय ग्रामीण समाजामध्ये अनेक प्रकारचे सामाजिक परिवर्तन घडून आले. औद्योगिकीकरण, नागरीकरण व खाजगीकरणाच्या माध्यमातून तसेच शिक्षणाचा प्रसार दळणवळणाच्या साधनांचा विकास शहरांमध्ये स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या वाढली. मानवाची भटकंती व शिकारी अवस्था संपल्यानंतर तो पशुपालन करू लागला व पशुपालनाच्या अवस्थेनंतर हळूहळू वस्तीस्थान करून स्थिर होऊ लागला. नंतर पाळीव पशूंचा उपयोग करून शेती व्यवसायाकडे वळला. शेती व्यवसायामुळे त्यांची भ्रमंती अवस्था संपून तो एकाच ठिकाणी स्थिर जीवन जगू लागला .अशा पद्धतीने तो एकाच ठिकाणी घरदार करून समूहामध्ये राहू लागला. अशा या स्थिर जीवनातून हळूहळू वाडी, वस्ती व खेडयांची उत्पत्ती झाली. त्यामुळे मानवी समाजाला स्थायी स्वरूपाचे सामाजिक संघटन निर्माण करण्याची गरज भासू लागली. अशा पद्धतीने मानवाची ही पहिली विकासाची अवस्था होय. मानव हा स्थिर जीवन जगत असते वेळेस शेती संबंधित इतर छोटे-मोठे कुटीर उद्योग करू लागला. अशा पद्धतीने त्यांनी एक स्वयंपूर्ण ग्रामजीवन निर्माण केले .अशा पद्धतीने शेतीशी संबंधित इतर व्यवसाय करणारे व्यवसायिक सुद्धा ग्रामीण भागात आनंदाने राहू लागले. त्यातूनच बारा बलुतेदार व अठरा आलूतेदार निर्माण झाले. त्यालाच ग्रामीण भागात कारू आणि नारू असे म्हटल्या जाऊ लागल. हे सर्व कारागीर एक दुसऱ्याशी वस्तू विनिमयाच्या पद्धतीने उदरनिर्वाह करू लागले. भारतामध्ये एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला हळूहळू औद्योगीकरणाला सुरुवात झाली. त्यामुळे ग्रामीण समुदायातील छोटे-मोठे कुटिर उद्योग बंद पडू लागले. वस्तू विनिमयाच्या पद्धतीच्या ठिकाणी पैसा हे विनिमयाचे साधन निर्माण झाले. अशा पद्धतीने संपत्तीच्या लालसेपोटी ग्रामीण जीवनामध्ये हळूहळू बदल व्हायला सुरुवात झाली. अठराव्या शतकापासून ग्रामीण समुदायामध्ये विकासाच्या प्रक्रियेने हळूहळू वेग घ्यायला सुरुवात केली. त्यातूनच अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ लागल्या.

**बीज शब्द -:** ग्रामीण विकास, जातिव्यवस्थेचा प्रभाव, विकासातील समस्या, रोजगाराचा अभाव.

**प्रस्तावना**

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे भारतातील जवळपास ७० टक्के लोक हे अजूनही शेती व शेती संबंधित इतर छोटे मोठे व्यवसाय करत ग्रामीण भागातच राहतात. प्राचीन काळी मानव हा भटकंती करत जीवन जगत होता. मानवाची भटकंती व शिकारी अवस्था संपल्यानंतर तो पशुपालन करू लागला व पशुपालनाच्या

अवस्थेनंतर हळूहळू वस्तीस्थान करून स्थिर होऊ लागला. नंतर पाळीव पशूंचा उपयोग करून शेती व्यवसायाकडे वळला. शेती व्यवसायामुळे त्यांची भ्रमंती अवस्था संपून तो एकाच ठिकाणी स्थिर जीवन जगू लागला. अशा पद्धतीने तो एकाच ठिकाणी घरदार करून समूहामध्ये राहू लागला. अशा या स्थिर जीवनातून हळूहळू वाडी, वस्ती व खेडयांची उत्पत्ती झाली. त्यामुळे मानवी समाजाला स्थायी स्वरूपाचे सामाजिक संघटन निर्माण करण्याची गरज भासू लागली. अशा पद्धतीने मानवाची ही पहिली विकासाची अवस्था होय. मानव हा स्थिर जीवन जगत असते वेळेस शेती संबंधित इतर छोटे-मोठे कुटीर उद्योग करू लागला. अशा पद्धतीने त्यांनी एक स्वयंपूर्ण ग्रामजीवन निर्माण केले .अशा पद्धतीने शेतीशी संबंधित इतर व्यवसाय करणारे व्यवसायिक सुद्धा ग्रामीण भागात आनंदाने राहू लागले. त्यातूनच बारा बलुतेदार व अठरा आलूतेदार निर्माण झाले. त्यालाच ग्रामीण भागात कारू आणि नारू असे म्हटल्या जाऊ लागल. हे सर्व कारागीर एक दुसऱ्याशी वस्तू विनिमयाच्या पद्धतीने उदरनिर्वाह करू लागले .भारतामध्ये एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला हळूहळू औद्योगीकरणाला सुरुवात झाली. त्यामुळे ग्रामीण समुदायातील छोटे-मोठे कुटिर उद्योग बंद पडू लागले. वस्तू विनिमयाच्या पद्धतीच्या ठिकाणी पैसा हे विनिमयाचे साधन निर्माण झाले. अशा पद्धतीने संपत्तीच्या लालसेपोटी ग्रामीण जीवनामध्ये हळूहळू बदल व्हायला सुरुवात झाली. अठराव्या शतकापासून ग्रामीण समुदायामध्ये विकासाच्या प्रक्रियेने हळूहळू वेग घ्यायला सुरुवात केली. त्यातूनच अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ लागल्या.

भारत हा खेड्यांचा देश असून 'भारतामध्ये 2011 च्या जनगणनेनुसार 645856 खेडी असून एकूण लोकसंखेच्या 68.8 टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भगत राहतात.'[1] ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय राष्ट्राचा विकास होणे शक्य नाही. आज आपल्या देशाला स्वतंत्र होऊन जवळपास पंच्याहत्तर वर्षे झाली आहेत. भारताच्या ग्रामीण विकासात पाहिजे त्या प्रमाणात विकास झाल्याचे दिसत नाही .ग्रामीण विकासाचा संबंध नेहमीच कृषी विकासाशी जोडला जातो. म्हणून कृषि उत्पादनात वाढ झाल्यास ग्रामीण भागाचा विकास होऊन ग्रामीण भाग समृद्ध होईल. ग्रामीण भागातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होईल. आज आपला देश हा अशा गंभीर आर्थिक संकटात अडकला आहे की, सरकारला नवीन आर्थिक धोरण जाहीर करणे आणि परदेशी कंपन्याना, पर्यटकांना आणि रहिवाशांसाठी आपल्या देशाचे दरवाजे खुले करणे भाग पडले. इतकेच नव्हे तर भारताची अर्थव्यवस्था इतकी ढासळली आहे की, गेल्या अनेक वर्षापासून आपले सरकार जगाच्या कानाकोपऱ्यातून कर्ज घेण्यात सुरुवात केलेली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय ग्रामीण समाजामध्ये अनेक प्रकारचे सामाजिक परिवर्तन घडून आले. औद्योगिकीकरण, नागरीकरण व खाजगीकरणाच्या माध्यमातून तसेच शिक्षणाचा प्रसार दळणवळणाच्या साधनांचा विकास शहरांमध्ये स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या वाढली. अशा अनेक कारणामुळे स्वातंत्र्योत्तर काळात बलुतेदारी पद्धतीमध्ये विघटन झाल्याचे दिसून येते. 'भारत सरकारच्या नियोजित विकासाच्या प्रयत्नातून पंचवार्षिक योजना व वीस कलमी कार्यक्रमातून ग्रामीण समाजात नवीन जागृती निर्माण झाली त्यामुळे परंपरागत व जाती व्यवस्थेवर आधारित व्यवसायाचा त्याग करून नवीन व्यवसाय उभारण्यास पूर्णतः स्वातंत्र्य असल्यामुळे

ग्रामीण भागातील अनेक व्यवसायिक हे नवीन व्यवसायाकडे वळले.'[2] त्यामुळे त्यांचे परंपरागत व्यवसाय बंद पडू लागले.

ग्रामीण विकास म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, पिण्याचे पाणी, औषधोपचार, शिक्षण, सिंचनाची साधने, पक्के रस्ते, विद्युत पुरवठा इत्यादी मूलभूत सुविधा देऊन त्यांचे जीवनमान सुधारणे होय .त्याचबरोबर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमी भाव देऊन तसेच ग्रामीण भागातील असंघटित क्षेत्रातील कामगारांनाही किमान वेतन देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. ग्रामीण विकास म्हणजे केवळ ग्रामीण भागात मानवी संसाधनांच्या इष्टतम वापरासाठी संधी उपलब्ध करून देणे नव्हे तर त्या चिरकाल कसे टिकून राहतील याची कायमची व्यवस्था करणे होय. प्राचीन भारतीय खेडी आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण होती दळणवळणाच्या साधनांच्या अभावाने इतर जगापासून पूर्णतः तुटलेली होती. त्यामुळे आर्थिक स्वयंपूर्णता ही त्या काळाची गरज होती म्हणूनच खेड्यातील लोकांच्या निर्वाह विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी खेड्यांनी स्वतंत्र अशी आर्थिक यंत्रणा उभी केली होती. शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने या आर्थिक यंत्रणेची केंद्र शेतीत होते. त्यामुळे शेती हा व्यवसाय व्यवस्थित पार पाडण्याकरिता ज्या ज्या लोकांच्या सेवा घेणे आवश्यक होते. त्या त्या लोकांच्या सेवेचा मोबदला पारंपरिक पद्धतीने दिल्या जात होते. या पद्धतीलाच बलुतेदारी किंवा जजमानी पद्धत असे म्हटल्या जात होते. अशाप्रकारे जातीत श्रम विभाजनाची व व्यवसाय विभाजनाची व्यवस्था निर्माण झाली होती. प्रत्येक जातीचा हा पारंपारिक व्यवसाय असल्याने परस्परावलंबनाची परिस्थिती आपोआपच निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सर्व जातीच्या लोकांना आपल्या निर्वाह विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी एकमेकांची मदत घेणे अपरिहार्य होते. या सेवांचा मोबदला परंपरागत रीतीनुसार दिला जात होता. त्यामुळे ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण दिसून येत होते.

**अध्ययनाचा उद्देश**

1. ग्रामीण समुदायाच्या संरचनेचा अभ्यास करणे.
2. ग्रामीण समुदायाच्या विकासातील समस्या जाणून घेणे.

**ग्रामीण समुदायाच्या विकासातील समस्या -**

**१. रोजगाराचा अभाव**

भारतातील 70 टक्के लोक हे शेती व शेती संबंधित व्यवसायावर आपली उपजीविका चालवत असतात . 'भारतातील शेतीचा सरासरी आकार हा फक्त पाच एकर आहे. याच्या उलट अमेरिकेत तो 145 एकर, डेन्मार्कमध्ये तो 80 एकर तर इंग्लंडमध्ये 62 एकर आहे. '[3] तसेच भारतातील ग्रामीण विकासातील दुसरा दोष म्हणजे भारतीय शेतकऱ्यांची शेतजमीन ही सलग एकाच ठिकाणी नसते. ती अनेक ठिकाणी विखुरलेली असल्यामुळे अशा शेतामध्ये आधुनिक तंत्राचा वापर करणे कठीण होते. व त्याला खर्चही जास्त लागतो. त्यामुळे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होतो. अशा परिस्थितीमुळे भारतातील शेतकरी हे वरचेवर आर्थिक समस्येमुळे ग्रस्त होत आहेत. 'स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच शेतीची मालकी सर्वाधिक प्रमाणात ज्यांच्याकडे होती त्या सवर्ण उच्च जातीने सीलिंग कायद्याने अल्पभूधारकांना मिळालेली जमीन खरेदी केली. व बदलत्या प्रवाहात आजही काळाशी जुळवून घेत हा वर्ग

शहर वा राष्ट्रीय महामार्गाजवळ जमिनी खरेदी करून नवे उद्योग, व्यवसाय सुरू करण्याचा प्रघात सुरू केला आहे' .[4] तसेच भारतातील शेतीही जवळपास निसर्गाच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतामध्ये वर्षातून फक्त चार ते सहा महिने शेतीमध्ये रोजगार मिळत असतो. निसर्ग हा लहरी असल्यामुळे वेळेवर पाऊस पडत नाही. तर कधीकधी पीक कापणीला आल्यावर पाऊस पडतो. त्यामुळे पिकाचे नुकसान होते. तसेच ग्रामीण भागातील लोकांना त्यामुळे वर्षभर रोजगार मिळत नाही. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह शेती व शेती संबंधित व्यवसाय यावर आधारित करणे कठीण जाते. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. अशाप्रकारे ग्रामीण समुदायामध्ये रोजगाराच्या आभावामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खालावत जाते.

**२. शैक्षणिक सोयीसुविधांचा अभाव**

ग्रामीण समुदायामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात सरकारी शाळा असल्यामुळे सरकारी शाळेमध्ये शैक्षणिक सोयी सुविधा पूरक प्रमाणात उपलब्ध नसतात. ग्रामीण भागातील सरकारी शाळेचे छत पावसाळ्यात गळत असते. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेतून सुद्धा शिक्षण दिल्या जात नाही. ग्रामीण भागातील शाळेमध्ये शैक्षणिक सोयी सुविधा पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नसतात. तिथे शिक्षकांची संख्या सुद्धा योग्य प्रमाणात उपलब्ध नसते. त्यामुळे ग्रामीण समुदायातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयीसुविधांच्या अभावामुळे चांगले शिक्षण मिळत नाही. मुलींसाठी वेगळ्या शाळा उपलब्ध नसतात. तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये शोचलयाची योग्य सोय नसते. अश्या अनेक प्रकारच्या कारणांमुळे ग्रामीण भागातील शाळेत गळती व नापासाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**३. मनोरंजनाच्या साधनांचा अभाव**

ग्रामीण समुदायामध्ये मनोरंजनाचा साधनांचा अभाव दिसून येतो. ग्रामीण भागातील लोक हे सकाळपासून ते सायंकाळपर्यंत शेतीवरच काम करीत असतात. त्यामुळे त्यांना सायंकाळी मनोरंजनासाठी थेटर, सिनेमागृह याची व्यवस्था नसते. तसेच ग्रामीण भागामध्ये लाईट ची पण सुविधा राहत नाही. त्यामुळे टीव्ही, रेडिओ, डीटीएच या माध्यमातून सुद्धा त्यांचे मनोरंजन होऊ शकत नाही. अशा अनेक प्रकारच्या समस्या ग्रामीण समुदायाच्या विकासामध्ये अडचणी निर्माण करत असतात. परंतु आजच्या या आधुनिकीकरणाच्या व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण जीवनामध्ये सुद्धा फार मोठ्या प्रमाणात बदल होत असल्याचे दिसून येते. त्यांच्यातील एक दुसऱ्यातील स्नेह संबंध यामध्ये दुरावा निर्माण होत असल्याचे दिसून येते.

**४. आरोग्याच्या सोयी सुविधांचा अभाव**

ग्रामीण भागातील लोक हे शेतीशी निगडित व्यवसाय करीत असल्यामुळे ते दिवसभर जंगलात शेतात अनेक वन्य पशु प्राण्यांसोबत काम करीत असतात. त्यामुळे त्यांना अनेक पशूपासून उपद्रव होतो जसे साप, विंचू, कुत्रा, मांजर, कोल्हा, वाघ यापासून उपद्रव होतो. अशा वेळेस त्यांना योग्य तो उपचार करण्यासाठी ग्रामीण भागामध्ये सरकारी दवाखाना उपलब्ध नसते. त्यांना दवाखान्यासाठी वीस ते पंचवीस किलोमीटर शहराकडे धाव

घ्यावी लागते. तिथेही सरकारी दवाखान्यात वेळेवर डॉक्टर नर्स उपलब्ध नसतात. सरकारी दवाखान्यांमध्ये इंजेक्शन व गोळ्या सुद्धा वेळेवर उपलब्ध नसतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

**५. जातिव्यवस्थेचा प्रभाव**

ग्रामीण भागामध्ये अजूनही काही प्रमाणात जातिव्यवस्थेचा प्रभाव असल्याचे दिसून येते. खेड्यात व्यक्तीची जागा जातिकडूनच ठरवली जाई. सर्व खेड्याची विभागणी जातीवरूनच निरनिराळ्या आळीत व बोळात होत असे. [5] काही विशिष्ट जातींना ग्रामीण समुदायांमध्ये रोजगारापासून वंचित ठेवल्या जाते. अस्पृश्य जातींना ग्रामीण भागामध्ये काही प्रमाणात अजूनही भेदभावाचा सामना करावा लागतो त्यांची वस्ती गावाच्या बाहेर हा पूर्व दिशेला असतो त्यांना गावातील वरिष्ठांकडे रोजगारासाठी विनवणी करावी लागते. ग्रामीण भागातील जातीव्यवस्थेला गतिशीलता मान्य नव्हती. जात बदलायची नाही व जातीनुसार चालत असलेला पारंपारिक व्यवसायात सुद्धा बदल करायचा नाही. जातीने ठरवून दिलेला व्यवसायच करायचा हा दंडक ग्रामीण भागात होता. मात्र आज काही प्रमाणात त्यामध्ये हळूहळू बदल होताना दिसतो. औद्योगीकरण व नागरीकरण या प्रक्रियेने ग्रामीण समाज जीवनामध्ये बऱ्याच प्रमाणात बदल घडून आल्याचे दिसून येते. अशाप्रकारे जातिव्यवस्थेच्या प्रभावामुळे अजूनही ग्रामीण समुदायाच्या विकासामध्ये अडचणी निर्माण होताना दिसून येतात.

आपला देश आजही अनेक समस्यांना तोंड देत आहे, देशातील एक तृतीयांश लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहे. सध्या देशात करोडो सुशिक्षित बेरोजगार रोजगाराच्या शोधत आहेत. आणि या कोरोनाने तर भारतीयांना आणखी दरिद्रयाच्या खाईत नेऊन टाकले आहे. आशा या खोल आर्थिक संकटामुळे, प्रचंड संसाधने आणि श्रमशक्ती असून सुद्धा भारताला विकसित देशांचा दर्जा मिळू शकलेला नाही. अशा स्थितीत भारताने जागतिक बाजारपेठेत आपला हस्तक्षेप प्रस्थापित करणे म्हणजे जागृत डोळ्यांत स्वप्न पाहण्यासारखे आहे. त्यामुळे प्रगतीच्या बाबतीत भारत सतत इतर देशांच्या मागे का पडतो हे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर एकेकाळी भारतात सोन्याचा धूर निघत होता असे म्हणटलेला भारत आज काचेची बाहुली का बनला आहे, हेही जाणून घेतेवेळेस आपल्याला असे दिसून येईल की भारतीय लोकांचे ग्रामीण भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. तसेच लोकसंख्या वाढ, महागाई, बेरोजगारी, गरिबी, निरक्षरता, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर न करणे आणि भ्रष्टाचार ही प्रमुख कारणे मानली जातात. तसेच ग्रामीण भागांमध्ये अजूनही रस्ते लाईट शुद्ध पाण्याचा अभाव असल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्येचा सामना करावा लागतो.

**निष्कर्ष**

अशा अनेक कारणामुळे ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर यांची आर्थिक परिस्थिती वरचेवर खालावत चालली असल्याचे दिसून येते. त्यांच्यामध्ये अंधश्रद्धा, निरक्षरता, अज्ञान, लोकसंख्या वाढ अशा अनेक प्रकारच्या समस्येमुळे त्यांचा सकारात्मक विकास होत नाही. तसेच ग्रामीण भागातील लोकांपर्यंत शासनाच्या विविध विकासात्मक योजना सुद्धा वेळेवर पोहोचत नाहीत. तसेच त्या योजनेचा फायदा घेण्यासाठी

अनेक प्रकारच्या भ्रष्टाचार व आमिषाला बळी पडावे लागते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक स्वतःचा विकास करण्यापासून वंचित असल्याचे दिसून येते. शहरी जीवनाचा ग्रामीण जीवनावर फार मोठ्या प्रमाणात वर प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक नागरी जीवनाचे अनुकरण करण्याकडे वळत असल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे स्वरूप बदलत असून ते पूर्णपणे नगरा कडे वाटचाल करत आहे. त्याच बरोबर जामीन जनता सुद्धा शहराच्या आकर्षणामुळे शहराकडे स्थलांतरित होत आहे त्यामुळे ग्रामीण रचनेमध्ये विविध स्थित्यंतरे येताना दिसली नागरी जीवनाचा भौतिकवाद हुशार जपान मनोरंजनाची साधने आरोग्याच्या सोयी सुविधा त्यांच्या प्रभावामुळे ग्रामीण जीवनातील लोक प्रभावित होत आहेत. ग्रामीण भागाचा विकास झाला तरच शहराचा विकास होईल पर्यायाने देशाचा विकास होईल हा विचार अलीकडच्या काळात तग धरू पाहत आहे ग्रामीण भागात मुळेच भारताची संस्कृती आणि परंपरा टिकून असल्याचे दिसून येते. ग्रामीण समुदायाच्या विकासाची समस्यांचा योग्य वेळी जर निर्मूलन झाले तर ग्रामीण समाजाचा सर्वांगीण विकास होण्यास वेळ लागणार नाही. कारण भारत हा खेड्यांचा देश असल्यामुळे भारताचा पोशिंदा हा शेतकरी राजा ग्रामीण भागातच राहून शेतीमध्ये मशागत करतो व भारतीयासाठी मुबलक प्रमाणात अन्नधान्य शिकवत असतो. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्याकडे भारतीय शासन व प्रशासनाद्वारा वेगवेगळ्या विकासात्मक योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करणे फार गरजेचे असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

1. जनगणना अहवाल.2011
2. कऱ्हाडे, बी.एम. 2011, ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर .पृष्ठ क्रमांक 185.
3. घाटोळे, रा.ना. (2007), ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर. पृष्ठ क्रमांक 129.
4. अहिरे, प्रतिभा (2003) ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रमांक 201.
5. नाडगोंडे, गुरुनाथ (2002) ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक 96.

# ११. दुर्बल घटकातील न्याय, स्वतंत्र, समतेची पेरणी करणारे फुले, शाहू, आंबेडकर

**प्रा. प्रियंका राजेंद्र आठे**
डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव.

**सारांश**

भारतीय समाजाचा विचार करता समाजातील अनेक समाजसुधारकांनी समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य केले पण त्या कार्यात फुले ,शाहू ,आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचा विशेष उल्लेख करावा लागेल.या समाजसुधारकान मुळे समाजातील दलित,तलागलातील लोकांना माणूस म्हणून जगण्याचे स्थान मिळाले .अस्पृश्यांचे जीवनमान सुधारले.जीवन जगण्याची नवीन दिशा मिळाली.अशाच या समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचा आढावा आपण घेणार आहोत.

**फुलेचे दुर्बल घटका विषयावर विचार**

मानवी हक्कावर इ.स.१७९१ मध्ये थॉमस पेन यांनी लिहिलेले पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्याचा प्रभाव त्यांच्या मनावर झाला. सामाजिक न्यायाबावत त्यांच्या मनात विचार येऊ लागले. त्यामुळेच विषमता दूर करण्यासाठी स्त्रीशिक्षण आणि मागासलेल्या जातीतील मुलामुलींच्या शिक्षण यावर त्यांनी भर देण्याचे ठरवले. सामाजिक भेदभाव त्यामुळे कमी होईल असे त्यांचे निश्चित मत आणि अनुमान होते.

'कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातिभेद ही निर्मिती मानवाचीच आहे' असे रोखठोकपणे बोलताना मात्र या विश्वाची निर्मिती करणारी कोणती तरी शक्ती आहे अशी त्यांची (अस्तिक्यवादी) विचारसरणी होती. मानवाने गुण्यागोविंदाने रहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या *शेतकऱ्याचा आसूड* या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचा क्रांतिकारक म्हणूनही जोतीरावांचे दर्शन होते. 'नीती हाच मानवी जीवनाचा आधार आहे' हा विचार मांडणारे जोतीराव एक तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्व होते. महात्मा फुलेंनी सामाजिक प्रबोधन करण्यासाठी शेतकऱ्यांचा आसूड इ. ग्रंथ लिहून सामाजिक प्रबोधन केले. मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावरून विश्वकुटुंब कसे निर्माण होईल व त्याकरिता कशा प्रकारचा वर्तनक्रम व वैचारिक भूमिका स्वीकारली पाहिजे हे ज्योतीराव फुलेंनी आपल्या ' सार्वजनिक सत्यधर्म ' संहितेत अनेक वचनांच्या आधारे मांडली आहे.त्यातील काही महत्त्वाची वचने लिहिली.संसाराविषयी फुले यांचा दृष्टिकोन अर्थातच आशावादी होता. कष्टपूर्वक चालणाऱ्या गृहस्थाश्रमाला ते फार मान देत. कौटुंबिक जीवनाची व समाजाची खरी प्रगती परिश्रमाची वाढ होऊनच होणार आहे. 'कष्टाने जगण्याची ज्यांना धमक नाही, असे लोक संन्यासी व भिक्षुक होतात व प्रपंच खरा नाही, व्यर्थ आहे असा भ्रम प्रपंचातील लोकांच्या बुध्दीत उत्पन्न करतात. असे करण्यात त्यांचा आळशी-धूर्तपणाच असतो', असे त्यांचे मत होते. सर्व गावाच्या, प्रांताच्या, देशाच्या, खंडाच्या संबंधात अथवा कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबंधात, स्त्री आणि पुरुष या उभयतांनी अथवा सर्व स्त्रियांनी एकमेकात कोणत्याही प्रकारची आवडनिवड (भेदभाव) न करता या भूखंडावर आपले एक कुटंब समजून एकमताने सत्यवर्तन करून राहावे.आपणां सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणिमात्रांना उत्पन्न करतेवेळी मनुष्यास जन्मतःच स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे आणि त्यास आपापसात साऱ्या हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ केले आहे.आपणा सर्वांच्या

निर्माणकर्त्याने सर्व मानवी स्त्री - पुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे. जो आपल्यापासून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेचे नुकसान देत नाही, अथवा जो कोणी आपल्यावरून दुसऱ्या मानवांचे हक्क समजून इतरांना पीडा देत नाही त्याला 'सत्यवर्तन करणारा' म्हणावे.आपल्या सर्वांच्या निर्मिकाने एकंदर सर्व स्त्री-पुरुषांस एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहे. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तिवर जबरी करू शकत नाही, त्याप्रमाणे जबरी न करणाऱ्या सत्यवर्तन करणारे म्हणावे.स्त्री अथवा पुरुष जे आपल्या कुटुंबासह, आपल्या भाऊबंदांस, आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस आणि आपल्या इष्टमित्र साथींना मोठ्या तोऱ्याने पिढीजात श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र मानीत नाहीत, आणि एकंदर सर्व मानवी प्राण्यास पिढीजात कपटाने अपवित्र मानून त्यास नीच मानीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे.स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यास श्रेष्ठ मानतात, परंतु शेतकरी वगैरे यांना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे.महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा जो बोध केला त्यातील ही काही वचने आपण वाचली की लक्षात येते , ज्योतीरावाचा आवाका किती मोठ्ठा होता . त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. त्यासाठी मानवी वर्तनात, म्हणजेच व्यवहारात काय आमूलाग्र बदल घडवून आणायला हवा यासाठी मानवी स्वभाव आणि मानसिकता यात काय बदल केले पाहिजेत, याबाबतही ज्योतीरावांनी विपुल लेखन केले आहे. 'अखंड' या काव्यप्रकारात त्यांनी 'मानवाचा धर्म', आत्मपरीक्षण, नीती, समाधान, सहिष्णुता, सदसदविवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकार्यदक्षता, इत्यादी गोष्टींवरही भाष्य केले आहे. ज्योतीरावांनी वेगवेगळया अखंडातून जे विचार मांडले, मानवी जीवनाला दिशा देणारा जो उपदेश केला, त्यामुळे व त्यांच्या समतावादी दृष्टिकोनामुळे समाजाला एक नवी दिशा मिळाली. पुढे हा वारसा त्यांच्या अनुयायांनी चालू ठेवला; त्यामुळे सामाजिक समतेचा जागर कायम राहिला.जोतीराव हे संशोधक नव्हते. ते पंडित नव्हते. ते भाषाशास्त्रज्ञही नव्हते. परंतु ते मूलग्राही विचारवंत होते. अवतारवादाची कल्पना त्यांना समूळ निर्मूलन करावयाची होती. महाभारताच्या काळापर्यंत ही अवतारवादाची कल्पना नव्हती. नंतर पुराणात ती घुसडली गेली असे दिसते. जोतीराव हे धर्मशास्त्राचे पंडितही नव्हते. तथापि चित्पावन ब्राह्मण हे आफ्रिकेतील पूर्व किना-यावरून किंवा इराण, इजिप्त किंवा पेलेस्टाईनमधून आले असावेत, हे त्याचे विधान कोणत्याही इतिहासकाराने खोदून काढलेले नाही. उलटपक्षी काही इतिहासकार आणि संशोधक यांना, जोतीरावांच्या विधानाला पाठिंबा मिळेल असे पुरावे आढळले आहेत. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही हिंदुस्थानात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत होते. वेदाने समाजात भेद पडले . म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. ब्राह्मणांच्या पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहुतून जन्मले, शूद्र त्याच्या पायातून निघाले हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्या वाटे. "मनुस्मृती" हि शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला आहे. बुद्धाविषयी जोतिरावांना नितांत आदर वाटे. महाराष्ट्रातील संत कवींचा जोतीरावांनी धिक्कार केला आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर, रामदास यांनी ब्राह्मणांच्या दुष्टाकर्मांचा उघड रीतीने त्याग करण्याचे धैर्य दाखविले नाही. समाजातील ब्राह्मणांचे वर्चस्व राहण्यासाठी ह्या महाराष्ट्र संत कवींनी साह्य केले, असा जोतीरावांनी निष्कर्ष काढला आहे.

**आंबेडकरांचे दुर्बल घटका विषयावर विचार**

भारतातील वर्गलढ्याला आणि जातीअंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. जगाच्या इतिहासात असे योगदान करणाऱ्या अत्युच्च पातळीवरच्या निवडक व्यक्तींमध्ये बाबासाहेबांचे स्थान आहे, असे डॉ. गेल ऑमवेट सांगतात. सामाजिक सुधारणा क्षेत्राच्या संदर्भात विशेषतः वर्ग, जात, धर्म, लिंग ह्यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी आंबेडकरांनी काम केले. त्यांनी वेगवेगळया जातीतल्या लोकांमधली दरी मिटण्यासाठी तीन महत्त्वाच्या मार्गांचा उल्लेख केला होता - लग्न, खानपान आणि सांस्कृतिक मिलाप. आंबेडकरांना बालपणापासून अस्पृश्येचा सामना करावा लागला. इ.स. १९३५-३६ या कालावधी दरम्यान लिहिलेल्या वेटिंग फॉर अ व्हिझा या आपल्या आत्मकथेत आंबेडकरांनी अस्पृश्यतेसंबंधी त्यांना आलेल्या कटु अनुभवांच्या आठवणींच्या नोंदी केलेल्या आहेत. हे आत्मचरित्रपर पुस्तक कोलंबिया विद्यापीठात 'पाठ्यपुस्तक' म्हणून वापरले जाते. राजकीय स्वातंत्र्य आधी की सामाजिक सुधारणा हा टिळक व आगरकर यांच्यातील वाद डॉ. आंबेडकरांच्याही मनात चालत होता. स्वातंत्र्योत्तर भारतात तत्कालीन अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याला काहीच किंमत नसेल, तर त्यातून अधिक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतील. तसे होऊ नये यासाठी बाबासाहेबांनी सामाजिक सुधारणा व अस्पृश्यता निर्मूलन ही कार्ये करण्याला अधिक प्राथमिकता दिली. बाबासाहेब आंबेडकर भारतातील ब्रिटिश सत्तेचे सुद्धा विरोधक होते

साऊथबरो मताधिकार समितीसमोर साक्ष-इंग्रज सरकारकडून भारतातील अस्पृश्य समाजाला राजकीय व सामाजिक स्वरुपाचे हक्क इ.स. १९१९ पर्यंत मिळालेले नव्हते. पण ज्यावेळी साउथबरो अध्यक्ष असलेली मताधिकार समिती जेव्हा मुंबई प्रांतात आली, तेव्हा सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापक असताना आंबेडकरांनी २७ जानेवारी, १९१९ रोजी अस्पृश्यांचा प्रतिनिधी म्हणून गव्हर्नमेंट ऑफ इंडिया □क्ट १९१९ बाबत साऊथबरो मताधिकार समितीसमोर साक्ष दिली व समितीला आपल्या मागण्यांचे पन्नास पृष्ठांचे छापील निवेदनही सादर केले. त्यात त्यांनी *अस्पृश्यांना मतदानाचा हक्क पाहिजे, त्यांना निवडणुकीस उभे राहता पाले पाहिजे, त्यांच्या मतदारांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजेत, अस्पृश्यांचे अस्पृश्य प्रतिनीधी अस्पृश्य मतदारांनीच निवडले पाहिजेत आणि अस्पृश्यांच्या मतदारसंघात अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा दिल्या पाहिजेच,* यासारख्या मागण्या केल्या होत्या.त्यांच्या प्रभावाखाली अस्पृश्यवर्गीय समाजसेवक व पुढारी सभा घेऊन आपल्या मागण्यांचा पाठपुरावा करणारे ठराव पास करून इंग्रज सरकारकडे पाठवू लागले. समाजप्रबोधनाची ही चळवळ नेटाने सुरू ठेवण्यासाठी चळवळीला मदत करणारे एखादे वृत्तपत्र सुरू करावे असे आंबेडकरांना वाटू लागले.

**'मूकनायक' पाक्षिकातून अस्पृश्यांच्या अन्यायाला वाचा**

आंबेडकरांचे समाजकार्य सुरू असताना मुंबईत कोल्हापुरचे राजे **शाहू महाराज** हे आपण होऊन आंबेडकरांना त्यांच्या घरी येऊन भेटले.त्यांनी आंबेडकरांना वृत्तपत्र काढण्यासाठी अडीच हजार रुपयांची मदत केली.आंबेडकरांनी **इ.स. १९२०** साली मुंबईत **मूकनायक** नावाचे पाक्षिक सुरू केले व पांडुरंग नंदराम भटकर यांना पाक्षिकाचे संपादक नेमले. मूकनायक पाक्षिकाचा पहिला अंक ३१ जानेवारी, १९२० रोजी प्रकाशित करण्यात आला. पहिल्या अंकातील *मनोगत* नावाचा अग्रलेख आंबेडकरांनी लिहिला होता. त्यांनी आपल्या लेखांतून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर

होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली व हा अन्याय कमी करण्यासाठी सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. अस्पृश्यांचा उद्धार होण्यासाठी त्यांनी सत्ता मिळवणे गरजेचे आहे असे आंबेडकरांना वाटत होते. आंबेडकर ५ जुलै, १९२० मध्ये आपले अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करण्यासाठी इंग्लंडमध्ये गेले असता तेथे त्यांनी भारतमंत्री **एडविन माँटेग्यू** यांची भेट घेतली आणि अस्पृश्यांच्या हितांविषयी चर्चा केली.

चवदार तळे आंदोलन-डॉ.आंबेडकर मुंबई प्रांतिक विधानपरिषदेचे सदस्य असताना इ.स. १९२७ च्या सुमारास त्यांनी पिण्याच्या पाण्यासाठी व हिंदू देवळांमध्ये प्रवेशासाठी चळवळी व मोर्चे काढण्यास सुरूवात केली. संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. ४ ऑगस्ट इ.स. १९२३ रोजी ब्राह्मणेतर पक्षाचे नेते व मुंबई कायदेमंडळाचे सभासद असलेले समाजसुधारक रावबहादुर सीताराम केशव बोले यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळात "सार्वजनिक निधीतून बांधलेली किंवा शासकिय नियमांनुसार बनविलेल्या संस्थांनी प्रशासित केली सार्वजनिक शाळा, न्यायालये, कार्यालये आणि दवाखाने व सर्व सार्वजनिक पाण्याची ठिकाणे, विहिरी व धर्मशाळाचा वापर करण्यास परिषदेने अस्पृश्य वर्गांना परवानगी असावी." असा ठराव मंजूर करून घेतला. रावबहादुर बोले यांनी ५ ऑगस्ट १९२३ रोजी मुंबई विधिमंडळात "ज्या नगरपालिका आणि जिल्हामंडळे पहिल्या ठरावाची अंमलबजावणी करणार नाहीत, त्यांना सरकारतर्फे दिले जाणारे वार्षिक अनुदान बंद करण्यात यावे." असा दुसरा ठराव मांडला या ठरावानुसार महाडच्या नगरपालिकेने आपल्या ताब्यातील चवदार तळे अस्पृश्यांना खुले केल्याचे जाहीर केले. परंतु सनातनी स्पृश्यांनी अस्पृश्यांना तळयातून पाणी भरू दिले नाही. अस्पृश्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी आंबेडकरांनी १९ मार्च व २० मार्च १९२७ रोजी येथे स्वतःच्या अध्यक्षतेखाली *कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, अधिवेशन पहिले* अशा नावाखाली परिषद भरवली आणि २० मार्च १९२७ रोजी महाड येथे आंदोलन सुरू करण्याचे निश्चित केले. या कुलाबा परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधरपंत सहस्त्रबुद्धे आणि बापूराव जोशी हे दलितेतर सवर्ण व ब्राह्मण नेते सुद्धा उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करून पुढील ठराव पास झाले. आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून माणुसकीचे व सन्मानाचे जीवन जगण्याचा संदेश दिला.२० मार्च १९२७ रोजी आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली परिषदेतील सर्वांनी चवदार तळयाकडे कूच केली. बाबासाहेबांनी सर्वप्रथम चवदार तळयातील पाणी आपल्या हातांच्या ओंजळीत घेतले व तो पाणी प्राशन केले. त्यानंतर सर्व आंदोलनकर्त्यांनी आंबेडकरांचे अनुसरण करत तळयातील पाणी प्राशन केले. ही घटना महाडमधील रूढीवादी स्पृश्य हिंदुंना सहन झाली नाही. त्यांनी दलितांसाठींच्या भोजनामध्ये माती मिसळली व नंतर झुंडीने येत दलितांवर लाठया-काठ्यांनी हल्ले केले. आंबेडकरांनी आंदोलनकारी अस्पृश्यांना प्रतिहल्ला करु नका असे अवाहन केले. अस्पृश्यांना जबर मारहाण करण्यात आली, खूप लोक जखमी झाले होते. *अस्पृश्यांनी तळे बाटवले* असे म्हणून चवदार चळयात गोमूत्र टाकून तळयाचे ब्राह्मणांकडून शुद्धीकरण केले. सरकारच्या प्रतिनिधींनी हल्लेखोर स्पृश्यांना अटक करून त्यांच्यावर खटला चालू केला.या आंदोलनाद्वारे आंबेडकरांनी आपला कायदेशीर, नागरी व मानवी हक्क अमलात अस्पृश्यांबरोबर सामुदायिक रीतीने चवदार तळयाचे पाणी पिण्याचे आंदोलन यशस्वी केले. स्पृश्यास्पृश्य भेद संपवून सामाजिक समता प्रस्तावित करणे, हे आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीच्या आंदोलनाचे प्रमुख ध्येय होते.

शिवजयंती व गणेशोत्सवात सहभाग-३ मे १९२७ रोजी मुंबईजवळ बदलापूर येथे शिवजयंती उत्सव आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली साजरा केला गेला. बदलापूरच्या गावकऱ्यांनी जातिभेद न ठेवता आंबेडकरांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले होते. बहिष्कृत भारत च्या २० मे १९२७ च्या अंकात छापलेल्या माहितीनुसार आंबेडकरांनी शिवाजी महाराजांच्या लोकहितकारी राज्यपद्धतीवर भाषण केले. कीर्तनाच्या वेळी स्पृश्य व अस्पृश्यांनी एकत्र बसून कीर्तन ऐकले. रात्री शिवाजी महाराजांची पालखी आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सुमारे पंधरा हजार लोकांसह नगरप्रदक्षिणा करून आली आणि उत्सवाची समाप्ती झाली.दादर बी.बी.सी.आय. रेल्वे स्थानकाजवळच्या गणेशोत्सवाच्या उत्सवाच्या व्यवस्थापक मंडळाने इ.स. १९२७ च्या गणेशोत्सवात आंबेडकरांचे भाषण आयोजित केले. आंबेडकरांनी आपल्या भाषणात विविध देशांच्या व भारताच्या इतिहासाचे दाखले देत सांगितले की, "*हिंदू समाज तेव्हाच सामर्थ्यवान होऊ शकेल, जेव्हा तो आपल्या अनिष्ठ रूढी नष्ट करु शकेल आणि स्पृश्यास्पृश्यभेद संपवून समानतेचे व माणुसकीचे वर्तन करू लागेल.*"

**समाज समता संघ**

४ सप्टेंबर, १९२७ रोजी आंबेडकरांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली *समाज समता संघ* नावाच्या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांत अस्पृश्यांसह स्पृश्यही होते. या संस्थेतर्फे त्यांनी रोटीबंदी व बेटीबंदी तोडण्याकरिता काम करण्याचे ठरविले. या संघात भिन्न जातींचे पदाधिकारी व सभासद होते, त्या प्रत्येकांनी आळीपाळीने एकामेकांची घरी सहभोजनाचे कार्यक्रम केले. पहिला सहभोजनाचा कार्यक्रम आंबेडकरांच्या घरी १५ ऑगस्ट १९२८ रोजी झाला. मात्र बेटीबंदी तोडण्याच्या दृष्टीने समाज समता संघाकडून एकही आंतरजातीय विवाह होऊ शकला नाही.आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी पासून समाज समता संघासाठी **समता** नावाचे पाक्षिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे इ.स. १९२९ मध्ये ते बंद पडले.या काळात आंबेडकरांचे बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून अस्पृश्योद्धाराचे कार्य व इतर समाजकार्य व्यापक सुरू होते. सभेचे 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुद्धा चालू होते, जे इ.स. १९२७ च्या नोव्हेंबर पासून 'बुद्ध भूषण प्रिटिंग प्रेस' मधून छापण्यात येई

अंबादेवी मंदिर सत्याग्रह-अमरावती येथील प्राचीन अंबादेवी मंदिरात प्रवेशासाठी अस्पृश्यांनी इ.स. १९२५ मध्ये माधोराव गोविंदराव मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनास आंबेडकर, दादासाहेब पाटील, पंजाबराव देशमुख या ब्राह्मणेतर आंदोलनाच्या नेत्यांनी पाठिंबा दिला होता. २६ जुलै, इ.स. १९२७ रोजी अमरावती येथे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत *पंधरा दिवसाच्या आत अंबादेवीच्या पंचसमितीने अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशास संमती दिली नाही, तर अस्पृश्य लोक मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह सुरू करतील* अशा आशयाचा ठराव समंत करण्यात आला. या ठरावाचा पंचकमिटीवर काहीही परिणाम झाला नाही. अस्पृश्यांच्या या सत्याग्रहाच्या निर्धाराचे अभिनंदन करताना आंबेडकरांनी बहिष्कृत भारताच्या २ सप्टेंबर १९२७ रोजी अस्पृश्यांना वीरवृत्ती धारण करून अंबादेवी मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी यशस्वी सत्याग्रह करीत राहण्याचा संदेश दिला. १३ नोव्हेंबर, १९२७ रोजी अमरावतीच्या इंद्रभुवन थिएटरमध्ये आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली *वऱ्हाड प्रांतिक अस्पृश्य परिषदे*चे दुसरे अधिवेशन सुरू झाले. या सुमारास आंबेडकरांचे बंधू बाळाराम यांचे १२ नोव्हेंबर १९२७ रोजी निधन झाल्याची तार त्यांना मिळाली. १५ फेब्रुवारी, १९२८ पासून अंबादेवी मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय अधिवेशनात घेण्यात आला. आंबेडकरांनी या सत्याग्रहाच्या संदर्भात सत्याग्रहासंबंधीचे आपले विचार *बहिष्कृत भारत*च्या २१ नोव्हेंबर, १८२७ च्या अंकात व्यक्त केले. '...सत्कार्यासाठी केलेला आग्रह म्हणजे सत्याग्रह...' अशी सत्याग्रह व्याख्या

करत, ही विचारसरणी भगवद्गीतेवर आधारित असल्याचे मत आंबेडकरांनी मांडले.[1] केवळ देवाच्या दर्शनासाठी हा मंदिर सत्याग्रह नव्हता तर हिंदू असूनही हिंदूच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे तो समानतेचा अधिकार मिळवण्यासाठी हा मंदिर प्रवेशाचा संघर्ष होता. हिंदू दलितांच्या मंदिर प्रवेशामुळे मंदिर व मंदिरातील मुर्ती अपवित्र वा अशुद्ध होत नाही, हे ही सिद्ध करण्याचा हेतू या चळवळीमागे होता. या मंदिरात प्रवेश देण्यात यावा यासाठी अस्पृश्यांनी देवस्थान कमिटीकडे दोन वेळा अर्ज केला. सुरूवातीला अर्ज फेटाळले गेले नंतर मात्र देवस्थानचे एक विश्वस्त दादासाहेब खापर्डे यांनी अस्पृश्यांना हे मंदिर खुले करून देण्याचे आश्वासन दिले.

पर्वती मंदिर सत्याग्रह-पुण्यातील पर्वती टेकडीवरील मंदिर अस्पृश्यांना खुले नव्हते. हे मंदिर दलितांसाठी खुले करावे म्हणून पुण्यातील एम.एम. जोशी, ना.ग. गोरे, र.के. खाडिलकर व शिरूभाऊ लिमये यांनी मंदिराच्या ट्रस्टला अर्ज केला. परंतु मंदिर खाजगी मालमत्ता असल्याचे सांगून त्यांना प्रवेश देण्याचा किंवा न देण्याचा अधिकार आहे या कारणास्तव हा अर्ज फेटाळला गेला. यानंतर सत्याग्रह मंडळ स्थापन केले गेले. त्यात शिवराम काबंळे (अध्यक्ष), पां.ना. राजभोज (उपाध्यक्ष) व इतर सभासदांचा सहभाग होता. यांनी १३ ऑक्टोबर इ.स. १९२९ रोजी पर्वती सत्याग्रह सुरू केला. हा सत्याग्रह आंबेडकरांच्या प्रेरणेने करण्यात आला. या दरम्यान पर्वती मंदिराचे दरवाजे कायम बंद ठेवण्यात आले होते, त्यामुळे पर्वती मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळू शकला नाही. अखेर २० जानेवारी १९३० रोजी सत्याग्रह बंद करण्यात आला.

**काळाराम मंदिर सत्याग्रह**

आंबेडकरांनी **अस्पृश्यता** निवारणासाठी जे लढे दिले त्यात **काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाचे** महत्त्वाचे स्थान आहे. फक्त हिंदूंनाच नव्हे तर सत्ताधारी इंग्रजांनाही जाग यावी आणि त्यावेळच्या दलितांना, शोषितांना सर्व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी हा लढा उभारला होता. हा लढा २ मार्च १९३० ला सुरू झाला आणि पुढील पाच वर्षे चालला. त्यावेळी सत्ताधारी इंग्रजांच्या दडपशाहीविरोधात **काँग्रेस** लढत होती तर हिंदू धर्ममार्तंडशाहीविरोधात आंबेडकरांचा संघर्ष सुरू होता. नाशिकामधील काळाराम मंदिरात हजारो अस्पृश्यांसह प्रवेश करण्याचा निर्धार डॉ. आंबेडकर यांनी केला होता.

**शाहू महाराजांचे दुर्बल घटका विषयावरील विचार**

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेले वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाले.त्यांचे शिक्षण ब्रिटिश अधिकारी फ्रेजर यांच्या हाताखाली झाले. पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये व धारवाड येथे झाले. अभ्यास व् शैक्षणिक सहलीद्वारे मिळालेले व्यवहारज्ञान यामुळे शाहूराजे यांचे व्यक्तिमत्व विकसित झाले होते. १८९६ चा दुष्काळ व नंतर आलेली प्लेगची साथ या काळात त्यांची कसोटी लागली आणि त्याला ते पूर्णपणे उतरले. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य

पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते.'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल', शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले.त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली.

स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहेमहाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली.अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उध्दार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रिडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले.मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करुन संबंधत अधिकाऱ्याकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच

त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली.त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करुन ही पद्धत बंद पाडली. जातिभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठा-धनगर विवाह घडवून आणले. अशा अनेक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला.

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करुन समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे ही महत्त्वाची जबाबदारी राजर्षी शाहू महाराजांनी पार पडली त्यांच्या नेतृत्वाखालीच संपूर्ण कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळ उभी राहिली आणि ती नेटाने पुढे नेण्याची कामगिरी देखील पार पाडली गेली. पुढे या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली यासाठी त्यांनी शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारले. दलित पीडित उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला यामागे खरी प्रेरणा ही राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होते. बाबासाहेब आंबेडकरांना माणगावच्या परिषदेमध्ये "दलितांचा नेता" व "भारतीय अग्रणी नेता" म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावं असे आवाहनही महाराजांनी केले. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले.शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले.महाराजानी कोल्हापूर, बेळगाव या

भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध चांगले होते. डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक ३१ जानेवारी १९२० ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ आर्थिक मदत केली.

**टिपा**

1. फुले ,शाहू,आंबेडकर यांच्या कार्यामुळे समाजात न्याय,स्वतंत्रता,समतेची पेरणी झाली.
2. समाजातील दुर्बल घटकाला समाजात समाजिक ,धार्मिक,राजकीय अधिकार मिळाले .
3. समाजातील वरीष्ठ, कनिष्ठ विषमता नष्ट झाली.

**संदर्भग्रंथ**

१. शाहूमहाराज
https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%B6%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A5%82_%E0%A4%AE%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%9C
https://mahiti.mpscstudy.in/rajarshi-shahu-maharaj-information-in-marathi/

२. आंबेडकर
https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%A1%E0%A5%89._%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%AC%E0%A4%BE%E0%A4%B8%E0%A4%BE%E0%A4%B9%E0%A5%87%E0%A4%AC_%E0%A4%86%E0%A4%82%E0%A4%AC%E0%A5%87%E0%A4%A1%E0%A4%95%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%82%E0%A4%9A%E0%A5%87_%E0%A4%B5%E0%A4%BF%E0%A4%9A%E0%A4%BE%E0%A4%B0
https://www.shaleyshikshan.in/2021/11/The-sculptor-of-the-Indian-Constitution-Dr-Babasaheb-Ambedkar.html

३. महात्मा फुले
https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AE%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%A4%E0%A5%8D%E0%A4%AE%E0%A4%BE_%E0%A4%AB%E0%A5%81%E0%A4%B2%E0%A5%87
https://missionmpsc.com/mahatma-jyotiba-phule/
https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner/92a94d93093893f92794d926-93594d92f91594d924940/92e93993e92494d92e93e-92b941932947-92f93e90291a947-93693f91594d93792393593f93792f915-93593f91a93e930

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर,धनंजय कीर.

५. डॉ . आंबेडकर सामजिक विचार एवं दर्शन.

६. फुले, शाहू, आंबेडकरी विचारांची विश्व व्यापकता, डॉ. रोहिदास जाधव, डॉ. संदीप रतन कांबळे .

# १२. ग्रामीण समाजातील असंघटित कष्टकरी महिलांच्या समस्या : एक दृष्टिक्षेप आणि वास्तविकता

**डॉ. राहुल एम. स्वानकर**
डॉ. अरविंद ब. तेलंग कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, निगडी, पुणे-४४.

**सारांश**

भारत हा खेडयांचा देश म्हणून ओळखला जातो ७० टक्के पेक्षा अधिक लोक संख्या खेडयात किंवा ग्रामीन भागात राहाते. आजच्या औद्योगिकीकरणामुळे रोजीरोटीसाठी शहराकडे स्थलांतर करण्याची प्रवृती वाढली असली तरी ग्रामीण भागातील लोकांचे लोंकाचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती आहे. आज ही ४० टक्के पेक्षा अधिक लोक संख्या शेतीवर अवलंबून आहे. ६० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात या क्षेत्रापासून लोकांना रोजगार मिळतो असे संशोधनातून सिध्द झालेले असले तरी शेती क्षेत्र पूर्णत: निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाच्या अनुकलतेमुळे अधिक अत्पादन होऊन शेती संबंधित कामांना सुरूवात होऊन रोजगार उपलब्ध होते पण पाऊस पडला नाही तर म्हणजे प्रतिकुलता निर्माण झाली तर शेती उत्पादन वाढणार नाही आणि शती संबंधित कामे बंद होऊन रोजगार निर्माण होणार नाही म्हणजे ग्रामीण भागातील लोकांना रोजगारा अभावी बेकार राहावे लागते. ग्रामीण भागात शेत जमिनीच्या उपनब्धतेच्या बाबतीत खुप मोठया प्रमाणात तफावत दिसून येते बहुसंख्येने असणाऱ्या लोकांकडे एक हेक्टरपेक्षा कमी तर संख्येने कमी असणाऱ्या लोकांकडे १० हेक्टरपेक्षा अधिक शेत जमिन तर काही लोकांकडे स्वत:च्या मालकीची उदरनिर्वाहापुरते ही शेत जमिन नाही असे सीमांतत शेतकरी कुटुंबे मोठया प्रमाणात आहे.

जास्त जमीन असणारे सावकार किंवा जमिनदार वर्ग ग्रामीण भागात मोठया प्रमाणात आहेत. आजही बदललेल्या समाजव्यवस्थेत या वर्गाचे प्राबल्य टिकुन आहे. शेती क्षेत्राावर होणाऱ्य पावसाचा अनुकुल किंवा प्रतिकुल परिणाम होण्याची शक्यता नाही परंतु जे अल्पभुधारक किंवा सीमांत शेतकरी किंवा सामान्य उपजिविका करणारा वर्ग यांच्यावर मात्र परिणाम होतो त्यांच्यापुढे रोजीरोटीचा मोठा प्रश्न निर्माण होतो. अशा स्थितीत नाईलाजाने त्यांना गावातील जमिनदार किंवा सावकाराच्या शेतजमिनीवर शेती संबंधित काम करावे लागते. करावे कामाचे स्वरूप निश्चित नाही, कामाचा प्रकार निश्चित नाही, कामानानुसार दिले जाणारे मोबदले किवां मजुरी निश्चित नाही, कामासाठी स्त्री कामगार किंवा पुरूष कामगारीची आवश्यकता निश्चित नाही. स्त्री कामगार किंवा पुरूष कामगारांना देण्यात येणाऱ्या मजुरी बाबत निश्चितता नाही. ग्रामीण भागतील कामगार संघटित नाही त्यांची संघटना नाही कामगार कायदे लागु नाहीत सरकारने ग्रामीण श्रम मजुरी बाबत कायदे केलेले असले तरी ग्रामीण भागातील सावकार किंवा जमीनदार वर्ग लागु करत नाही आपल्या मनाला वाटेल ती मजुरी देतात आणि काम करून घेतात कामा प्रमाणे दाम मिळएयाची आवश्यकता असताना मात्र ते दिले

जात नाही हि एक मोठी समस्या ग्रामीण भागात मोठया प्रमाणात दिसून येते. याच प्रमाणे सर्व ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांच्या बाबतीत तर ही समस्या मोठया प्रमाणात दिसून येते. कष्टकरी महिलातर विखुरलेल्या अवस्थेत असतात म्हणजे असंघटित असतात अशा असंघटित कष्टकरी महिलांच्या बाबतीत मोठया प्रमाणात सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

**प्रस्तावना**

पंचवार्षिक योजनेच्या काळापासूनच ग्रामीण व शहरी भागाच्या विकासासाठी अनेक योजनात्मक कार्यक्रमांची अमंलबजावणी देशपातळीवर करण्यात आली. देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी औद्योगिकीकरणाचा स्वीकार करण्यात आला. विविध उद्योंगाची उभारणी मात्र मोठया प्रमाणात शहरात झाली ग्रामीण भाग मात्र औद्योगिकीकरणापासून वंचित राहिला साहजिकच विकासापासून ही वंचित राहिला असे म्हणायला हरकत नाही. बदलत्या काळानुसार काही बदल झाले विशेषता देशाने स्वीकारलेल्या नव्या आर्थिक धोरणाचा म्हणजे जागतिकीकरण स्वीकारामुळे थाोडया फार प्रमाणात विकास घडून येत आहे. शहरी भागात सर्व उद्योग एकवटल्यामुळे कामगार कायदयाचा उपयोग शहरी भागातील कामगारांना झाला आहे आणि होत आहे. याची जाणीव व जागृती या कामगारांना झाली आहे. मजुरी किंवा वेतन कामाचे तास अतिरिक्त कामाचा मोबदला महागाई भत्ता व इतर अनुषंगिक लाभ मिळविण्यात सहज यशस्वी होतात कारण शहरी भागातील कामगार संघटित असतात. स्त्री कामगारांच्या बाबतीत ही जाणीव व जागृती झालेली आहे कोणत्याही प्रकारची आर्थिक व सामाजिक पिळवणूक होणार नाही याकडे दक्ष असतात आजच्या संघटित कामगार स्त्री फक्त शहरी भागातच पहावयास मिळतात ग्रामीण मात्र पहावयास मिळत नाही. विशेषत: ग्रमीण कष्टकरी महिलांच्या बाबतीत हि स्थिती प्रकर्षाने जाणवते.

**उद्दिष्टये**

१. ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांच्या विविध रोजगारासंबंधी कामांचा आढावा घेणे.

२. ग्रामीण समाजातील असंघटित कष्टकरी महिलांच्या समस्यांच्या कारणांचा अभ्यास करणे

३. ग्रामीण समाजातील असंघटित कष्टकरी महिलांच्या समस्या व त्यावर उपाय सुचविणे

**अभ्यास पध्दती**

प्रस्तुत लेख लिहीण्यासाठी द्वितीय माहितीचा वापर करण्यात आलेला आहे. ही माहिती विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, पुस्तके, भारताची व महाराष्ट्राची आर्थिक सर्वेक्षणे, इत्यादी स्त्रोतांमधून संकलित करण्यात आली आहे. संकलित माहिती वर्णनात्मक स्वरूपात मांडण्यात आली आहे.

ग्रामीण समाज म्हणजे गरीब, अशिक्षित, अडाणी, अंधश्रध्दाळू, दैववादी या स्वरूपात ओळखली जाते हे बरोबरच आहे. आजही ग्रामीण समाजात निरक्षरतेचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. त्यात ही स्त्री निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. कुटुंबातील एक स्त्री साक्षर असेल तर संपुर्ण कुटुंब साक्षर असते. सरकारने शिक्षणाचा प्रचार व प्रसार मोठया प्रमाणात करून ही साक्षरतेचे प्रमाण वाढले नाही साहजिकच त्याचा परिणाम ग्रामीण भागातील स्त्रीयावर झाला. नवीन बदल व जागृती पासून ग्रामीण भागातील स्त्रीया आजही वंचित आहेत.

म्हणून तर आजच्या काळात ही ग्रामीण समाजातील असंघटीत कष्टकरी महिलांच्या बाबतीत पुढील प्रकारच्या समस्या दिसून येतात.

ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देण्यासंबंधी अनेक प्रकारची कामे काढली जातात किंवा सुरू केली जातात. पुरूषांना ज्याप्रमाणे कामे दिली जातात त्या प्रमाणे स्त्रीयांनाही कामे दिली जातात. ग्रामीण भागात पुढील प्रकारची कामे हाती घेतली जातात. या कामात स्त्री कामगारांचा सहभाग जास्तीचा असतो. नांगरणी, पेरणी, कुळपणी, शेतीमधील दगडगोठे वेचणे, तण किंवा गवत काढणे, पालापाचोळा काढणे, साफसपाई करणे, लाकडे तोडणे, लहान झाडे तोडणे, पिकांना पाणी देणे, पाणी वाहून आणणे, देखरेख करणे, जनावरे पालन व देखरेख करणे, या व्यतिरिक्त कुटुंबाचे उदरभरनाचे काम करणे. भाजीपाला विक्री करणे, फुले वेचने हार बनविणे, रानावनात फिरून औषधी वनस्पती गोळा करणे, टपेपली मठकी बनविणे वेळप्रसंगी लोकांची कपडे धुणे, भांडी घासणे, साहित्य वस्तू किंवा साधन असेल तर मालक सांगेल त्या ठिकाणी पोहचविणे ते ही डोक्यावर ओझे ठेऊन; या प्रकारची इतर ही कामे त्यांना करावी लागतात. या प्रकारची कामे वैयक्तिक किंवा दुसऱ्यांकडे मजुरीवर करतात. संबंधित कामे शेतीक्षेत्राशी व बांधकाम क्षेत्राशी संबंधित असतात. कारण ग्रामीण भागात शेती व शेतीसंबंधित कामे उपलब्ध असतात व त्याच प्रमाणे घरे, रस्ते, तळे, विहिर, नाला इ. स्वरूपाची कामे चालू असतात. या सर्व कामात स्त्री कामगारांचा अधिक समावेश असतो. या स्वरूपाची कामे शारिरीक कष्टाची किंवा अंगमेहनतीची आहेत. सकाळपासून ते संध्याकाळ पर्यंत म्हणजे सूर्य मावळतेपर्यंत काम करावी लागतात. कोणतीही वेळ निश्चित नाही. काम हलके होईल इसे साधनही उपलब्ध नाही. जेवणाच्या वेळे व्यतिरिक्त कोणती ही वेळ विसावा मिळत नाही. म्हणून काम करावे लागते. या प्रकारची सर्व कामे शारिरीक कष्टाची आहेत आणि ती कामे मात्र परिस्थितीमूळे व गरजेनुसार नाईलाजस्तव स्त्रीयांना करावे लागतात.

**ग्रामीण समाजातील असंघटित कष्टकरी महिलांच्या समस्या**

**१. कौटुंबिक समस्या**

ग्रामीण भागातील स्त्रीयांना आपल्या कौटुंबिक समस्येमुळे कष्टाची कामे करावी लागतात.या प्रकारची कामे करण्यात त्यांची मानसिक नसुन ही करावे लागते घरात काम करणारा कर्ता पुरूष नसेल किंवा असेल किंवा तो व्यसनाधिन असेल, कामच करत नसेल तर अशा प्रसंगी कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी म्हणून स्त्रीयांना कामावर जावे लागते. ग्रामीण भागात कष्टाच्या कामावतिरिक्त दुसरे काम उपलब्ध नसल्याने महिलांना कष्टाची कामे करावी लागतात.

**२. सामाजिक समस्या**

ग्रामीण भागातील महिलांना आपल्या परिस्थितीमूळे व जबाबदारीमुळे विविध प्रकारची शारिरीक कष्टाची कामे करावी लागतात. समाजातील लोकांचा पहाण्याचा द्रष्टिकोन मात्र वेगळा आहे. समाजातील गरीब अशिक्षित वर्गातील स्त्रीया म्हणून समजल्याने समाजात असून ही समाजापासून अलिप्त आणि वंचित असलेल्या गटातील स्त्रीया म्हणून ओळख झाली आहे. समाज त्यांना कोणत्याही स्वरूपाची मदत करत नाही.

**३. आर्थिक समस्या**

ग्रामीण भागातील महिलांना आपल्या परिस्थितीमूळे व जबाबदारीमुळे विविध प्रकारची शारिरीक कष्टाची कामे करावी लागतात. ग्रामीण भागात कामे उपलब्ध करून देण्याचे काम गावातील ग्राम पंचायत, सावकार किंवा जमिनदार वर्गाकडून केली जाते, कामगार कायदयानुसार किमान वेतन किंव मजुरी देण्याची हमी शासनाने दिली आहे हा कायदा ग्रामीण भाग व शहरी भागांना ही लागुआहे. सत्य परिस्थित मात्र ग्रामीण भागात या कायदयाची योग्य अमंलबजावणी होताना दिसून येत नाही. शासनाने तर स्त्री कामगारांच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारून शारिरीक कष्टाची कामे करणाऱ्या स्त्री मजुरांना देण्यात येणारी मजुरी व इतर अनुषंगिक लाभ निश्चित केली आहेत ते देणे कायदयाने बंधनकारक केले आहे. वाढती महागाई आणि महिलांना देण्यात येणारी मजुरी यात फार मोठया प्रमाणात तफावत दिसून येते. त्यामुळे कौटुंबिक जबाबदारी पेलने शक्य होत नाही. समाजाजील इतर लोकांचीही आर्थिक मदत होत नाही.

**आरोग्य विषयक समस्या**

कष्टकरी महिलांच्या बाबतीत आरोग्यविषयक समस्या उदभवलेल्या दिसून येतात याचे कारण म्हणजे ग्रामीण भागात आरोग्य विषयक उपलब्ध नसतात. जरी असले तरी त्याचे प्रमाण अतिशय कमी असतात. त्यातच त्यांना कामानुसार मिळणारे वेतन अतिशय कमी किंवा तुटपुंज्या मजुरीवर आपल्या आरोग्य विषयक गरजा भागविणे शक्य होत नाही. कष्टाची कामे करावी लागत असल्याने त्यानां अनेक प्रकाराच्या आजारांना सामोरे जावे लागते. साध्या आजारापासून ते मोठया स्वरूपातील आजार उदा. सर्दी, ताप, डोके, दुखी या पासून ते संधीवात अंगदुखी या सारखे आजार नित्य नियमाचे झाले आहे. या सारख्या समस्या असूनही त्यांना कौटुंबिक जबाबदारी पारपाडावी लागते यासाठी कष्टाची कामे करावी लागतात.

**संघटनात्मक व एकजुठीचा अभाव**

ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांची कोणत्याही प्रकारची संघटना नाही किंवा या महिला एकजुट नाहीत त्यामुळे मजुरीबाबतची वाढीव मागणी व्यक्तिकरित्या ते करू शकत नाहीत केल्या तरी सावकार किंवा जमिनदार किंवा मालक मान्य करतीलच असे नाही. एकटयाचा आवाज हया लोकांपर्यंत पोहचू शकत नाही. आपल्याला कामानुसार दिली जाणारी मजुरी योग्य आहे, आहे त्यात समाधानी आहोत अशा प्रकारची भावना ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांची झालेली आहे. मजुरीच्या बाबतीत असो कामाच्या तासाच्या बाबतीत असो, कामातील थोडासा विसावा असो, कामातील सुटटी बाबत असो व इतर सोय सुविधांया बाबतीत असो त्यांच्यावर अन्याय होत असला तरी निमुटपणे सहन करण्याची वृत्ती त्यांच्या अंगी निर्माण झाली आहे. स्त्री मजुर म्हणून कोणत्याही प्रकारचा दबाव मालक वर्गावर पडत नाही.

**इतर समस्या**

कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, आरोग्य विषयक समस्या व्यतिरिक्त इतर ही समस्यांना तोंड दयावे लागते. यामध्ये मुलांच्या शिक्षणाविषयक समस्या होय ग्रामीण भागातील कष्टकरी स्त्रीयांच्या बाबतीत ही समस्या महत्वाची ठरते कारण कौटुंबिक परिस्थितीमुळे त्यांना शारिरीक कष्टाची कामे करावी लागतात काम

करून कुटुंबाला आर्थिक आधार देण्याबरोबरच कौटुंबिक पालनपोषणाची जबाबदारी पार पाडावी लागते. **'आम्ही नाही शिकलो ,आमची मुले शिकून मोठी झाली पाहीजे, त्यांनी शिक्षण घेतले पाहीजे, शिक्षणापासून वंचित राहाता कामा नये** अशा प्रकारची जाणीव व जिद्द त्यांच्यात निर्माण झाली आहे. परंतु कामानुसार मिळणाऱ्या तुटपुंजा मजुरीवर कौटुंबिक जबाबदारी पार पाडणे आणि मुलांचे शिक्षण पुर्ण करणे किंवा मुलांच्या शिक्षणाकडे पुरेपुर लक्ष देता येत नाही. वाढते शैक्षणिक खर्च करणे यामध्ये मुलांचे शालेय फि, मुलांचे कपडे, शैक्षणिक साहित्य इत्यादी वरील खर्च **वाढत्या माहागाईच्या परिणामामुळे** यावर खर्च करणे शक्य होत नाही. **शैक्षणिक समस्येमुळे** ग्रामीण कष्टकरी महिलांची बरीच मुले शिक्षणापासून वंचित आहेत. परंतु बहुतेक ग्रामीण कष्टकरी महिलांची बरीच मुले प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक तर काही कष्टकरी महिलांची मुले पदवीधरही झाले आहेत परंतु याचे प्रमाण १० टक्केच्या आत आहे. याचे कारण म्हणजे बहुतेक महिलांची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी आहे व घरातील कमवत्या व्यक्तिची संख्या जास्त आहे. तसेच या कुटुबातील स्त्रीयांना व व्यक्तिंना शिक्षणाचे महत्व समजले आहे व त्यांच्या शिक्षणाविषयी जाणीव जागृती निर्माण झाली आहे याचा परिणाम सकारात्मक झालेला दिसेन येतो.

**कुटुंब टिकऊन ठेवण्याची समस्या**

ग्रामीण कष्टकरी महिला हया एकतर एकत्र कुटुंबामध्ये राहातात नाहीतर आपल्या पती व मुलांसमवेत एकत्र कुटुंबातून बाहेर पडून वेगळे राहातात. काही महिलांच्या बाबतीत असे दिसून येते कि पतिच्या निधनानंतर आपल्या मुलासमवेत वेगळे राहातात. अशा प्रकारच्या कष्टकरी महिलांच्या बाबतीत कौटुंबिक जबाबदारी पूर्ण करणे हे एक तारेवरची कसरत असते आणि ते त्यांना करावीच लागते. **समाजिक बांधीलकी जपणे, समाजात राहाणे, समाजात समायोजन साधून व्यवहार करणे, नातेवाईक आप्तसंबंध टिकऊन ठेवणे हे एक मोठे आव्हान ही आहे आणि समस्या ही आहे.**

या व्यतिरिक्त ग्रामीण भागातील महिलांना आपल्या कुटुंबासाठी रानावनात जाऊन स्वयपाकासाठी लाकडे वेचून व तोडून डोक्यावर ओझे ठेऊन आणावी लागतात ना कुणाचा आधार ना मदत आपले काम आपनच करावे या प्रकारची मानसिकता त्यांच्यात निर्माण झाली आहे या कामात ही शारिरक कष्टाची आहे दररोज या प्रकारची कामे त्यांना करावी लागतात. वृध्द निराधार महिलांच्या बाबतीत तर या प्रकारची कामामुळे शारिरीक व मानसिक यातना जीवंतपणीच भागावे लागण्याची वेळ येते याच्या पेक्षा मोठे दु:ख काय? कष्टाच्या कामाची कदर होत नाही किंव योग्य प्रकारे मूल्यांकन होत नाही असे म्हणावे लागते.

भर उन्हात, पावसात, थंडीत काम करावे लागते म्हणजे वर्षातील बाराही महिने कष्टाची कामे करावी लागतात. उन्हाळयात डोक्यावर छत नको, पावसाळया ना छत्री, थंडीच्या काळात ना उबदार स्वेटर किंवा त्यासंबंधित वस्त्र जे आहे; जे काही उपलब्ध साधन आहे त्याचा उपयोग करतात. काही नाही मिळाले तरी तसेच काम करतात; सहनकरतात, शारिरीक, मानसिक कष्ट करण्याची वृत्ती त्यांच्या अंगी दिसून येते.

**निष्कर्ष**

१. शारिरीक कष्ट करणाऱ्या महिलांचे प्रमाण ग्रामीण भागात मोठया प्रमाणात आहे.

२. शेतीसंबंधित व बांधकाम आणि इतर कामात ग्रामीण कष्टकरी मलिांचा समावेश आहे त्यामध्ये शेती क्षेत्रातील विविध प्रकारची कामे करणाऱ्या महिलांचा सहभाग जास्तीचा आहे.

३. ग्रामीण भागात बहुतेक जमिनदार व सावकार किंवा मालक वर्गाकडून कामगार कायदयाची योग्य प्रकारे अमंलबजावणी होत नाही विशेषत: कामाचे तास, कामाचा कालावधी, आठवडयाची सुटटी, वेळप्रसंगी अत्यावश्यक सुटटी व इतर लाभ सुविधा मिळत नाही.

४. समाजातील लोकांची सहकार्याची किंवा मदतीची भावना दिसून येत नाही.

५. स्त्री महिला कामगार ही एक पुरूषा प्रमाणे किंवा पुरूषा पेक्ष अधिक कष्ट करणारे आहेत याची जाणीव आजच्या समाजव्यवस्थेला झालेली दिसून येत नाही.

६. सामाजिक व कौटुंबिक स्थरावर कष्टप्राय काम करणाऱ्या महिलांचा आदर केला जात नाही केला तरी पुरूष कामगारांच्या तुलनेत कमीच असलेला दिसून येतो.

७. आज ही ग्रामीण भागात गरीब व श्रीमंत असा भेद दिसून येतो त्या प्रमाणे शारिरीक व बौध्दिक कष्टकरणाऱ्या महिलांच्या बाबतीत वर्गवारी झाल्याचे दिसून येते.

८. समाजातील इतर काम करणाऱ्या महिलांप्रमाणे शारिरीक कष्ट करून आपल्या कुटुंबाचे पालनपोष करणे व कौटुंबिक जबाबदारी संभाळण्याचे महत्वाचे काम करीत असून ही या महिला समाजापासून खुपच अलिप्त असलेल्या दिसून येतात.

९. ग्रामीण भागातील कष्टकरी महिला अशिक्षित व अडाणी असल्याचे दिसून येते.

१०. बदलेल्या समाजव्यवस्थेतनुसार आापल्या स्वता: मध्ये बदल करावी ही मानसिकता या महिलांच्या बाबतीत दिसून येत नाही.

११. एकजुट एकसंघ राहाण्याची बांधिलकी त्यांच्यात दिसून येत नाही.

१२. ग्रामीण कष्टकरी महिलांच्या बाबतीत सामाजिक व आर्थिक समस्या मोठया प्रमाणात दिसून येते.

१३. शासकीयस्थरावरील योजनांच्या कामासंबंधी माहितीचा अभाव मोठया प्रमाणात दिसून येतो.

१४. आजही ग्रामीण भागात सावकार जमिनदार वर्गाचे प्राबल्य असल्याचे दिसून येते.

१५. कष्टकरी मलिंच्या बाबतीत शिक्षणाबाबत खुप मोठया प्रमाणात उदासिनता दिसून येते. आपल्या मुलांच्या बाबतीत शिकुन काय उपयोग नोकरी काय मिळणार आहे का? शिकून बेकार राहाण्यापेक्षा अंगमेहनतीचे काम करून उदरनिर्वाह केलेले बरे अशा प्रकारची धारणा झालेली आहे.

१६. शहरी भागातही शारिरीक कष्टाची कामे करणाऱ्या महिला आहेत त्यांना कायदा नियमांची जाण आहे किंवा या बाबतीत ते साक्षर आहेत मात्र ग्रामीण भागातील महिलांच्या बाबतीत साक्षरतेचा अभाव दिसून येतो.

**उपाय**

१. ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांचा संघ निर्माण केल्यास कामानुसार मजुरी व इतर सोयी सुविधा व लाभ प्राप्त करून घेता येतात.

२. कष्टकरी महिलांची नोंद त्या त्या ग्रामीण भागातील ग्रामपंचायती नोंद करून शासकिय पातळीवर त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यात यावे यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा.

३. ग्रमीण भागातील महिलांसाठी सरकारच्या अनुदानानुसार बचत गटाची स्थापना करण्यात यावी. या बचत गटात शारिरीक कष्ट करणाऱ्या महिलाचा सभासद म्हणून नोंद करण्यात यावी.

४. कामाचे नियम व अटि एकुणच कामगार कायदयाची जाणीव जागृती व्हावी म्हणून ग्रामीण महिलांना कायदयाचे ज्ञान देऊन साक्षर बनवावे

५. ग्रामीण भागातील स्त्रीया आजही आढाणी व अशिक्षित आहेत लिहिता वाचता येत नाही त्याना लिहिता वाचता येण्यासाठी प्रौढ साक्षरतेचे वर्ग गावपातळीवर पुन्हा सुरू करण्यात यावे.

६. कौटुंबिक पातळीवर व व्यक्तिगत पातळीवर स्वता:चा विकास करण्यासाठी बॅकेमार्फत त्याना उद्योग निर्मितसाठी किंवा स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहन करण्यात यावे व बॅके मार्फत विना अट विना तारण कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे.

७. सरकारी पातळीवर प्रत्येक गावात राबविण्यात येत असलेल्या मनरेगासारख्या योजनांची माहिती त्या त्या गावातील महिलांना होईल जेणेकरून ज्या महिलांना कामाची गरज आहे अशा महिलांना या योजनेमार्फत रोजगार मिळेल आणि त्यांच्या कष्टानुसार मोबदला मिळेल व रोजगारासाठी होणारी दररोजची भटकंती थांबेल.

८. समाजातील एक महत्वपूर्ण घटक समजुन कष्टकरी महिलांना कोणत्या प्रसंगी आर्थिक मदत करण्याची तयारी वाढीस लागावी यासंबंधी गावा, गावात प्रबोधन कार्य हाती घेण्यात यावे.

९. ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांसाठी बचत गट स्थापन करण्याची परवानगी देण्यात यावी. किंवा संघटित महिलांनी बचत गट स्थापन करण्यास पुढाकार घ्यावा.

१०. कष्टातून केलेल्या कामाला महत्व दिले पाहिजे त्यांनी ज्या वस्तू उत्पादित केल्या असतील किंवा विक्रीसाठी आणल्या असतील त्या वस्तूला योग्य भाव मिळाला पाहिजे. याची हमी सरकारने घेतली पाहिजे.

११. कष्टकरी महिलांच्या मुलांनासाठी मोफत शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात यावा. व आर्थिक मदत ही करावी.

१२. स्वधार योजने मार्फत गरीब कष्टकरी विधवा महिलांसाठी राहाण्याची सोय, आरोग्य सुविधा, शिक्षण, सामाजिक आर्थिक पुर्नवसन, कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देणे

वरील निष्कर्षावरून स्पष्ट होते कि महिलांना समानता, योग्य वागणूक, शैक्षणिक, आरोग्य यांच्या सुविधांचा लाभ देणे व आर्थिक व सामाजिक स्वावलंबन मिळवून दिल्यास निश्चितच ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांच्या समस्या सुटु शकतील असा विश्वास वाटतो.

**संदर्भ सूची**

१. कर्णी सुधा निलम, बिजिंगचा जाहिरनामा, आणि कृति, स्त्री आधार पुणे १९९५.

२. अहलुवलिया हरजित, स्त्रियांचे सबलीकरण, आर्थिक सूची २०००.

३. गारे अशोक, भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स, औरंगाबाद २०००.

४. रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९१

५. तोरडमल विश्वास, देशातील सामाजिक समस्या: एक दृष्टिक्षेप, योजना २०००.

६. काणे सुनिती, कष्टकरी महिलांची यशोगाथा, मेहता पब्लिकेशन हाऊस.

७. महिला विकास योजना कार्यक्रम, ऑक्टोंबर २०१५

८. काचोळे दा. धो. ग्रामीण नागरी प्रश्न आणि समस्या, विद्या बुक्स, औरंगाबाद २०००.

# १३. गडचिरोली जिल्ह्यातील सीमेलगतच्या तालुक्यांवर छत्तीसगड राज्याचा सांस्कृतिक प्रभाव - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**श्री रमेश मोहनलाल काळबांडे**
संशोधक विद्यार्थी, श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा, जि. गडचिरोली.
**प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा, जि. गडचिरोली.

**सारांश**

भारतातील सामाजिक संस्कृतींचा विविध अंगांनी अभ्यास करण्याचा प्रयत्न अनेक समाजशास्त्रज्ञांनी केलेला आहे. गडचिरोली जिल्ह्यात अतिशय दुर्गम सीमावर्ती भागात विविध आदिवासी जमातींचे वास्तव्य आढळून येते. संशोधक हा गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात अनेक वर्षापासून वास्तव्यास आहे. त्यामुळे या सीमावर्ती भागातील छत्तीसगड संस्कृतीच्या अगदी जवळून संपर्क आला. छत्तीसगड राज्याच्या संस्कृतीमुळे गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती भागात शैक्षणिक, सामाजिक ,धार्मिक, आर्थिक व राजनीतिक इत्यादी बाबीवर फार मोठा प्रभाव झाला असल्याचे दिसून येते. या शोधनिबंधाचे अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील सीमेलगतच्या तालुक्यावर छत्तीसगड राज्याच्या सांस्कृतीक प्रभाव अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीज शब्द :** गडचिरोली, सीमा, छत्तीसगड, सांस्कृतीक

**प्रस्तावना**

भारतीय समाजाचे अध्ययन करताना असे आढळून येते की भारतात अनेक वर्षे शेकडो भाषा आणि बोली भाषांच्या सहकार्याने विकसित झालेला भारत भूमीच्या सांस्कृतिक बहुविध वारसा विश्वाला आकर्षित करीत आहे. आपल्या बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक समाजाच्या अंग प्रत्यांगात मुरलेल्या आणि वैयक्तिक क्षेत्रीय व राष्ट्रीय अस्मितेचा अविभाज्य भाग बनलेल्या अगणित भाषा व संस्कृतीचा अभ्यास आपणास सतत करावा लागणार आहे.

महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा नक्षलग्रस्त व अप्रगत व मागासलेला जिल्हा म्हणून नावाजलेला आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये विविध आदिवासी कला, परंपरा, नृत्य,प्रथा जोपासलेले दिसून येतात. गडचिरोली जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर पूर्व दिशेला वसलेला असून छत्तीसगड राज्याची सीमा लागून आहेत गडचिरोली जिल्ह्याची स्थापना 26 ऑगस्ट 1982 रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून झाली. गडचिरोली जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ 14414 चौ. कि.मी. आहे. गडचिरोली जिल्हा जवळपास 70 टक्के जंगलाने व्यापलेला असल्याने घनदाट जंगलात नक्षल व नक्षल समर्थित लोक आश्रय घेतात.

छत्तीसगड राज्यात घनदाट जंगल असून हे राज्य भारताच्या मध्यभागी आहे. राज्याला मंदिरांचे राज्य वा धबधब्यांचे राज्य म्हटले जाते. छत्तीसगड हे नैसर्गिक विविधता आणि संपन्न वारश्याची देणगी लाभलेले राज्य आहे. प्राचीन स्मारके, दुर्मीळ वन्य जीवन, मंदिरे, बौध्द स्थळे, खडकांवरील रंगचित्रे, गुहांनी समृध्द क्षेत्र यापैकी बहुतांश अप्रसिध्द असल्यामुळे पर्यटकांना आगळ्या अनुभवाची पर्वणी मिळते. भारताच्या एकूण वनक्षेत्रापैकी 12 टक्के वनक्षेत्र या राज्यात असून 3 राष्ट्रीय उद्याने आणि 11 वन्य जीव संरक्षिका येथे आहेत. हा प्रदेश प्राचीन काळी दक्षिण कोशल म्हणून ओळखला जात असे. या प्रदेशाचा रामायण आणि महाभारत काळामध्ये सुध्दा उल्लेख सापडतो. सहाव्या ते बाराव्या शतकात या प्रदेशावर साराभपुरिया, पांडुवंशी, सोमवंशी, कलचुरी आणि नागवंशी राज्याचे साम्राज्य होते. इसवीसन 980 ते 1791 पर्यंत कलचुरीचे अधिपत्य होते . रायपुरचा ब्रिटीश सामाज्यामध्ये महत्त्वाचे शहर म्हणून नावलौकीक होता. हे राज्य उदयास येण्यापूर्वी सुध्दा रायपूर एक महत्त्वाचे व्यापारी शहर म्हणून प्रसिध्द होते. इथली सार्वजनिक सुरक्षा, दक्षता आणि न्याय व्यवस्था सुदृढ आहे. अभिनव भारताची कार्यशक्ती म्हणून ओळखले जाणारे असे छत्तीसगड हे राज्य आहे.

गडचिरोली जिल्ह्याच्या पुर्व उत्तर भागात कोरची, धानोरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी, सिरोंचा तालुके सीमावर्ती असून त्यांना छत्तीसगड राज्याची सीमा लागलेली आहे. सीमावर्ती तालुक्यावर छत्तीसगड राज्याच्या भाषांचा, लोकजीवनाचा व संस्कृतीच्या विशेष प्रभाव पडलेला दिसून येतो. छत्तीसगड राज्यातील बाजारपेठा, व्यवहार, धार्मिक चालीरीती, विवाह पद्धति, शेती, राजकारण, शिक्षण इत्यादीचा प्रभाव गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील समाजावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे झालेला दिसून येते. त्यामुळे सदर संशोधनातून सविस्तर अभ्यास करण्यात येईल.

**संशोधनाची उद्दिष्टे**

गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील समाजाचा अभ्यास करणे व मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे समाजाचा नियोजनपूर्वक विकास घडवून आणण्यासाठी व पुढील अभ्यासाला उत्तेजन देण्याच्या हेतूने सीमावर्ती भागातील लोकांचे जीवन, इतिहास व संस्कृती यासंबंधी अधिक माहिती मिळवणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता संशोधकाने पुढील उद्दिष्टे मांडलेली आहेत.

1. गडचिरोली जिल्ह्याच्या सीमालगतच्या छत्तीसगड राज्याच्या तालुक्यांचे अध्ययन करणे.
2. गडचिरोली जिल्ह्याच्या सीमालगतच्या भागावर छत्तीसगड राज्यातील सांस्कृतिक प्रभावाचे अध्ययन करणे.
3. गडचिरोली जिल्ह्याच्या सिमालगतच्या भागावर छत्तीसगड राज्यातील सांस्कृतिक परिणामांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितके**

गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती तालुक्यांवर छत्तीसगड राज्याच्या सांस्कृतिक प्रभाव एक समाजशास्त्रीय अध्ययन या विषयावर संशोधनासाठी पुढीलप्रमाणे गृहितके नियत करण्यात आलेली आहे.

1. गडचिरोली जिल्ह्यातील लोकांचा सीमावर्ती भागालगतच्या छत्तीसगड राज्यातील समाजाशी संपर्क आल्याने सांस्कृतीक आदान प्रदानाचा आधुनिकतेवर प्रभाव पडलेला आहे.
2. गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती भागात छत्तीसगड राज्याच्या सांस्कृतीक प्रभावामुळे अनेक नवनविन समस्या निर्माण झाल्या आहेत.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात गडचिरोली जिल्ह्यातील सीमेलगतच्या तालुक्यांवर छत्तीसगड राज्यांच्या सांस्कृतीक प्रभावाचे अध्ययन करावयाचे असल्याने **'वर्णनात्मक संशोधन पद्धती'** वापरली आहे.

**संशोधनाची साधने/ तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधनाकरिता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा निरीक्षण तंत्राचा वापर केला गेला आहे. प्रत्यक्ष माहितीचे संकलन करता मुलाखत अनुसूची ,प्रश्नावली, निरीक्षण तंत्राचा उपयोग करण्यात आला. दुय्यम स्त्रोतांमध्ये वर्तमानपत्रे, मासिक, इंटरनेट, टीव्ही या स्रोतांचा उपयोग केला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सीमेलगतच्या तालुक्यांवर छत्तीसगड राज्याच्या सांस्कृतीक प्रभाव अध्ययन करताना विविध सांस्कृतिक घटकांवर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा अभ्यास केला गेला आहे.

**गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील समाजावर सांस्कृतिक प्रभाव**

गडचिरोली जिल्ह्यातील कोरची, धानोरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी, सिरोंचा या तालुक्यांच्या छत्तीसगड राज्यातील संस्कृतीच्या विशेष प्रभाव या भागावर दिसून येतो.महाराष्ट्रातील सण उत्सव ,गाणी ,नृत्यकला, धार्मिक रीतिरिवाज या सीमावर्ती भागात फार कमी आढळून येते. छत्तीसगड राज्यातील सांस्कृतिक घटकांचा विशेष प्रभाव या सांस्कृतिक भागात आढळून येतो.

| तालुके | बोलीभाषा | संगीत | नृत्य | धार्मिक प्रथा |
|---|---|---|---|---|
| कोरची | छत्तीसगढी | छत्तीसगढी | छत्तीसगढी | छत्तीसगढी |
| धानोरा | छत्तीसगढी,गोंडी | छत्तीसगढी, गोंडी | छत्तीसगढी गोंडी | छत्तीसगढी,गोंडी |
| एटापल्ली | छत्तीसगढी,गोंडी | छत्तीसगढी, गोंडी | छत्तीसगढी गोंडी | छत्तीसगढी,गोंडी |
| भामरागड | तेलगू,छत्तीसगढी | छत्तीसगढी | छत्तीसगढी | छत्तीसगढी,तेलगू |

| | | | |
|---|---|---|---|
| अहेरी | छत्तीसगढी,गोंडी<br>छत्तीसगढी, गोंडी | छत्तीसगढी, गोंडी | छत्तीसगढी, गोंडी |
| सिरोंचा | छत्तीसगढी,गोंडी<br>छत्तीसगढी,गोंडी | छत्तीसगढी, गोंडी | छत्तीसगढी गोंडी |

एकंदरीत गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती ब तालुक्यांवर महाराष्ट्रातील संस्कृतीचा प्रभाव आढळून येत नाही तर लगतच्या राज्यातील सांस्कृतीक प्रभाव विशेष दिसून येतो.

**गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील छत्तीसगड राज्यातील समाजाचा प्रभाव**

छत्तीसगड राज्यात अनेक आदिवासी लोक निवास करतात. आगरीया, आंध, बैगा, भैना, भारीया, भुमिया, भातरा, भील, बरेला, पतेलिया, भूंजिया, बियर, बिंझवार, बिरहूल, दामोर, दमारीया, धनवार, गडबा, गोंड, हलबा, हलबी, कमार, कोरकू, कनवार, राठीया, कोल, खोंड, कोलाम, मुंडा, नागेसिया, धानका, परधान, पारधी, आदी आदिवासी बांधव या राज्यात निवास करतात आणि हिंदी भाषेसोबत त्यांच्या स्वत:च्या काही बोलीभाषा बोलतात. गडचिरोली जिल्ह्याच्या सीमालगतच्या भागात वरील समुदायाचे लोक राहतात .त्याचे रोटी बेटी व्यवहार होत असतात. सांस्कृतिक देवाण घेवाण होत असल्यामुळे गडचिरोली जिल्ह्याच्या सीमालगतच्या भागावर सांस्कृतिक प्रभाव दिसून येतो .

**गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील छत्तीसगड राज्याचा संगीत, नृत्य, कलांचा प्रभाव**

छत्तीसगड संस्कृति मध्ये गीत व नृत्याला खूप महत्व आहे . येथील लोकगीतामध्ये विविधता आढळून येते. गीत आकारामध्ये लहान असतात . छत्तीसगड मधील प्रमुख लोकप्रिय गीत : भोजली, पंडवानी, जस गीत, भरथरी लोकगाथा, बॉंस गीत, गऊरा गऊरी गीत, सुआ गीत, देवार गीत, करमा, ददरिया, डण्डा, फाग, चनौनी, राउत गीत और पंथी गीत आहेत .यामधील सुआ, करमा, डण्डा व पंथी गीत नृत्य करतांना गायले जाते .

महाराष्ट्रामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती तालुके कोरची, धानोरा, एटापल्ली ,भामरागड, सिरोंचा या भागात छत्तीसगड मधील लोकगीत ,नृत्य कला पाहायला मिळते. महाराष्ट्रातील अनेक लोकगीत ,नृत्य कला गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात माहिती नाही. त्यामुळे छत्तीसगड राज्याच्या सांस्कृतीक प्रभाव पडलेला आपणास दिसून येतो.

**गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील छत्तीसगड राज्याचा धार्मिक प्रभाव**

छत्तीसगडमध्ये विविध सण उत्सव साजरे करतात.

- **होळी** : छत्तीसगड मध्ये होळी हा सण खूप महत्वाचा आहे .होळी हा सण देवळात पूजा करून उत्साहात साजरा केला जातो . या दिवशी मांदर, ढोल मंजीरा वाजवून गीत गायले जातात . वृद्ध ,युवक, युवती मद्यपान करतात.

- **सकट** : छत्तीसगड मध्ये सकट हा अत्यधिक महत्वपूर्ण सण आहे. सकट सणामध्ये महिला आपल्या माता-पिताच्या घरी येतात. उपवास ठेवला जातो. सामूहिक भोजनाने उपवास सोडला जातो. परिजन वस्त्र, श्रृंगार सामग्री आपल्या मुलीला भेट देतात.
- **तिजा** : महिला या सणामध्ये गौरी पूजन करून नऊ पोरी जेवण देतात व उपास करतात.
- **नवई** : या सणामध्ये भाचीला घरी आणणे आणि जेवण देणे ,दुसऱ्या दिवशी उपास करणे
- **माग पूनिया** : या दिवशी क्षेत्रातील लोक टिपागड ला जाऊन पूजा-अर्चना करतात व बळी देऊन प्रसाद वाटतात.
- **पूस पूनिया** : या ठिकाणी दहा ते पंधरा महिला एकत्र येऊन नाचतात तसेच दंडार नृत्य करतात.त्या दरम्यान त्या भिक्षा मागून जमा झालेले धान्य एकत्र करून स्वयंपाक करून जेवण करतात.
- **मंडई** : मंडईमध्ये कुलदेवतेची पूजा करतात. बाजार ,दुकाने लागतात नृत्य, कला दाखवितात. आदिवासी प्रथा परंपरेनुसार बळी देण्यात येते. प्रसाद वाटण्यात येतो.
- **माता येणे** : ज्या व्यक्तींना माता निघाली असेल त्यांना पांढरे कपडे लावतात कडूलिंबाचे पाणी शिंपडतात व देवाकडे जाऊन पूजा करतात.

महाराष्ट्रामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती तालुके कोरची, धानोरा, एटापल्ली ,भामरागड, सिरोंचा या भागात छत्तीसगड मधील धार्मिक सण उत्सव साजरे केले जातात. महाराष्ट्रातील अनेक धार्मिक सण-उत्सव गडचिरोली जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात माहिती नाही. त्यामुळे छत्तीसगड राज्याच्या सांस्कृतीक प्रभाव पडलेला आपणास दिसून येतो.

**निकर्ष**

- गडचिरोली जिल्ह्यातील लोकांचा सीमावर्ती भागाचा राज्यातील समाजाची प्रत्यक्ष संपर्क आल्याने सांस्कृतिक आदानप्रदानाचा आधुनिकते वर परिणाम पडलेल्या दिसून येत आहे.
- गडचिरोली जिल्ह्यातील सीमावर्ती भागात छत्तीसगड राज्याच्या सांस्कृतिक प्रभावामुळे अनेक समस्या उद्भवलेल्या आहेत.

**संदर्भग्रंथ सूची**


- आगलावे प्रदीप., **(2000),** *संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे,*नागपूर : विद्या प्रकाशन.
- क-हाडे बाबू., **(2004),** *आदिवासी जमातींचे समाजशास्त्र,* चामोर्शी जिल्हा गडचिरोली: मानवता सांस्कृतिक विकास व शोधकेंद्र.
- क-हाडे बी. एम., **(2011),***शास्त्रीय संशोधन पद्धती,* नागपूर : पिंपळापुरे प्रकाशन
- क-हाडे बी. एम., **(2012),** *गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण समाज परिवर्तन एक समाजशास्त्रीय अध्ययन,* नागपुरः पिंपळापुरे डिस्ट्रीब्युटर्स.

- क-हाडे बी. एम., **(2015),** *गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल चळवळीतील शहिद कुटुंबांच्या समस्या,* नागपुरः पिंपळापुरे डिस्ट्रीब्युटर्स.
- खडसे भा.की., **(1999),***सामाजिक मानवशास्त्र,* नागपूरः श्री मंगेश प्रकाशन
- गोरे गोविंद.,**(2002),** *महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे.
- घाटोळे रा. ना., **(1992),***समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती,* नागपूर : मंगेश प्रकाशन
- जरारे विजय एल., (2004), *सामाजिक शास्त्र चे संशोधन प्रणाली,* अकोला : अद्वेत प्रकाशन
- जोशी अनंत, महाले संजीवनी., **(1999),** *संशोधन अहवालाची पद्धती,* नाशिक : य.च.म.मू. विद्यापीठ
- थोटे पुरुषोत्तम., समाजकार्य समाजकार्य संशोधन आणि प्रबंध लेखन, नागपूर : विद्या प्रकाशन
- देवगावकर शैलजा., **(1993),** *विदर्भीय आदिवासी जीवन आणि संस्कृती,* नागपूरः श्री मंगेश प्रकाशन.
- पारसनिस हेमलता देशपांडे लिना,. **(1995),** *शैक्षणिक कृती संशोधन* , पुणे : नुतन प्रकाशन.
- बापट भा.गो., **(1977),***शैक्षणिक संशोधन,* पुणे : नूतन प्रकाशन
- बोधनकर सुधीर, अलोनी विवेक., **(2007),***सामाजिक संशोधन पद्धती,* नागपूरः श्री साईनाथ प्रकाशन
- *भारत सरकार भारत का संविधान भारत संविधान विधि और न्याय मंत्रालय*
- भांडारकर पु.ल., **(1987),** *सामाजिक संशोधन पद्धती,* नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.
- भितांडे वि.रा., मे (2005), *शैक्षणिक संशोधन पद्धती,* पुणे : नूतन प्रकाशन
- महाराष्ट्र शासन.,(1988), *लोकराज्य आदिवासी विशेषांक,*मुंबईः शासकीय मुद्रणालय.
- मराठे एम.जी., (संपादक),(2005), *कृती संशोधन हस्तपुस्तिका,* पुणे : म.रा.शै.सं. व प्र. परिषद
- मुळे रा.श. आणि उमाठे वि.तू., **(1987),***शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,*नागपूरः महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ
- विखार रविंद्र., **(2020),** *सामान्य संशोधन पध्दती भाग १,* बिड : हर्षवर्धन पब्लिकेशन.
- विखार रविंद्र., **(2020),** *सामान्य संशोधन पध्दती भाग २,* बिड : हर्षवर्धन पब्लिकेशन.
- विखार रविंद्र., **(2021),** *आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,* बिड : हर्षवर्धन पब्लिकेशन.
- संत दु.का., **(1988),** *संशोधन पध्दती, प्रक्रीया व अंतरंग,* पुणे : विद्यागृह प्रकाशन.
- www.https://hi.m.wikipedia.org.chattisgad

# १४. असंघटित क्षेत्रातील स्त्रियांच्या समस्या

**प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा, जि. गडचिरोली.

**असंघटित क्षेत्रात शासनाचा किमान वेतन अधिनियमाचे पालन होत नाही असे दिसून येते. या क्षेत्रातील स्त्री - पुरूष कामगारांना एकाच किंवा समान कामासाठी समान वेतन मिळत नाही. असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांना कच्चा माल, बाजार, कर्ज, परवाने, ओळखपत्रे, शिधापत्रिका यासारख्या सुविधा त्यांना सहजा सहजी उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. असंघटित क्षेत्रात कामकरी स्त्रियांच्या संघटना नगन्य आहेत. यामुळे असंघटित क्षेत्रातील कामकरी स्त्रियांवर सतत अन्याय होत असतांना दिसून येते.**

**असंघटित क्षेत्राला कामगार कायद्याचे संरक्षणाचा लाभ मिळत नाही. त्यांच्यासाठी कोणतीही सुरक्षा योजना नाही. त्यांना वीमा प्रोव्हिडंट फंड, ग्रॅज्युएटी,पैसा, रजा, बोनस सुविधा मिळत नाही. या क्षेत्रात 80 टक्के स्त्रिया शेतीवर आणि 20 टक्के स्त्रिया शेतीव्यतिरिक्त मजुरी, शेतमजूर, बांधकाम मजूर, मोलकरीन, कारखान्यातील मजूर, दुकानामध्ये काम करणाऱ्या स्त्रिया, खाणकामगार, सफाई कामगार इत्यादी ठिकाणी काम करावे लागते. अन्य क्षेत्रात काम करतात. या असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांना पुरूष कामगारांच्या तुलनेत कमी मजूरी मिळते. त्यांना पुरूषांपेक्षा जादा तास काम करावे लागते.**

**रोजगार, बेकारी व अर्धबेकारी याबाबतचे बिनचूक अंदाज करणे जरी कठीण असले तरी बेकारी समितीला असे आढळून आले की, बेकारी व अर्धवट बेकारी यांची झळ स्त्रियांनाच अधिक प्रमाणात सोसावे लागते. 2001 मध्ये ग्रामीण भागातील पुरूष व स्त्री बेकारांचे प्रमाण अनुक्रमे 32 व 42 होते. ग्रामीण भागातील बेकारांपैकी 60 टक्के स्त्रिया असून देशातील एकूण बेकारांमध्ये त्यांचे प्रमाण 56 टक्के आहे. हा अंदाज सुद्धा काम शोधणाऱ्या माणसाच्या झालेल्या नोंदणीवरून बांधलेला असल्याने बेकार महिलांची प्रत्यक्षात संख्या बरीज जास्त आहे. कारण बऱ्याच महिलांना रोजगार हवा असतो. परंतु रोजगार विषयक संधी, माहिती व प्रशिक्षण यांच्या अभावामुळे त्या आपले नाव नोंदवित नाहीत. पुरेशा रोजगाराचा अभाव, स्त्रियांकडे असलेले मर्यादित स्वरूपाचे नैपुण्य, त्यांची निरक्षरता आणि त्यांच्या गतिशीलतेवर असलेले निर्बंध यामुळे स्त्रिया असहाय्य व परावलंबी बनतात व अशा परावलंबनातून त्यांच्या भूमिका व रोजगारविषयक संधी यांना अबाधित करणारे मुख्य प्रश्न निर्माण होतात.**

**भारतात अनेक असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रिया असून यात शेतमजूर, बांधकाम मजूर, मोलकरीन, कारखान्यातील मजूर, दुकानामध्ये काम करणाऱ्या स्त्रिया, खाणकामगार, सफाई कामगार इत्यादी आहेत.**

**शेतमजूर**

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो मात्र भारतात अनेक लोकांकडे शेतजमीन नाही म्हणून ते दुसऱ्याच्या शेतावर मोल-मजूरी करून आपले पोट भरतात. या ठिकाणीही मजूरीत स्त्री-पुरूष असा भेदभाव केला जातो. पुरूषांना अधिक मजूरी तर स्त्रीयांना त्यामागे कमी मजूरी दिली जाते.

**सफाई कामगार**

राज्यात साधारणत: 35 लक्ष सफाई कामगार असून त्यात महिलांचे प्रमाण जास्त आहे. त्यापैकी केवळ मुंबईत 15 लाखापेक्षा जास्त सफाई कामगार असंघटित क्षेत्रात आहेत. नगर परिषद, महानगरपालिका इ. ठिकाणी सफाई कामगार म्हणून अधिकाधिक स्त्रीया असतात. त्या रस्त्यांची साफसफाई करतात. ठेकेदार साफसफाईचा ठेका घेतो. ठेकेदार स्त्रीयांना कमी मजूरी देऊन साफ सफाई करून घेतो. परंपरेने सफाईचे काम स्त्रियांचे आहे असे मानले जाते. त्यात प्रॉव्हिडंट फंड, रजा, स्त्रियांना प्रसूतिकाळातील रजा, वैद्यकीय खर्च इतकेच नव्हे तर ठरवून दिलेल्या सार्वजनिक सुट्टया, बोनस, नियमित पगारवाढ इत्यादी सुविधा मिळत नाही. स्त्रिया प्रसूतिकाळात रजेवर गेल्यास नोकरी राहिलच हे सांगता येत नाही.

**खाण कामगार (Miner)**

दुष्काळी भागातून किंवा शेतमजूरी करीत असलेल्या व्यक्ती कामाच्या शोधात शहराच्या आसपास काम मिळेल त्या ठिकाणी येतात व तिथेच राहतात. पुरूषांच्या बरोबरीनेच स्त्रियांसुध्दा काम करतात. दगडखाणीत काम करणाऱ्या अथवा इतर खाणीत काम करणाऱ्या व्यक्ती खाणीच्या आसपास राहतात. ती जागा अतिक्रमण केलेली असते. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने कच्ची मातीची घरे, मूलभूत सुविधांचा अभाव, ऊन, वारा, पाऊस यांचा प्रभाव. त्यामुळे आजारांचा प्रादुर्भाव जाणवतो. दगडखाणीत काम करणाऱ्या स्त्रियांनाही जड दगड उचलणे, घण मारणे इत्यादी कठीण कामे करावी लागतात. त्यामुळे त्यांना कायमचे विकार जडतात. वाळूंचे कण सतत उडत असल्याने श्वसनाचे विकार, घश्याचे विकार यासारखे आजार होतात. खाण कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर आहे. तसेच लहान मुलांची आबाळ होते. कामाच्या ठिकाणी शिक्षण सुविधांचा अभाव असल्यामुळे मुला-मुलींचे शिक्षण अपूर्ण राहते. खाणीच्या कामगारांच्या तो एक असंघटीत क्षेत्र असल्यामुळे बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते.

**बांधकाम मजूर (Construction Labour)**

बांधकाम करण्यासाठी मजूर म्हणून पुरूष व स्त्रीया काम करतात. मात्र त्यांना मजूरी सारखी मिळत नाही. निवृत्ती वेतन, प्रोव्हिडंट फंड, विमा संरक्षण यांची सोय नाही. स्त्रीला प्रसुतिनंतर पुरेसा कालावधी विश्रांती न मिळता कामावर जावे लागते. सतत कामाच्या शोधात भटकत राहावे लागत असल्यामुळे आयुष्याला स्थैर्य नसते. या

**मजुरांना बरेच वेळा बांधकामावर राहावे लागत असल्यामुळे निवाराही व्यवस्थित नसतो. त्याचा परिणाम त्याच्या वैवाहिक संबंधावर व आरोग्यावर होतो. काही ठिकाणी कामाच्या गरजेपोटी मालकांच्या कंत्राटदारांना मर्जी साभाळाव्या लागतात. त्यांच्या वासनांची शिकार बनावे लागते, अन्यथा काम जाण्याची शक्यता असते. कामाच्या गरजेपोटी मालकांच्या कंत्राटदारांना मर्जी सांभाळाव्या लागतात. कधी कधी त्यांना वासनांची शिकार बनावे लागते, अन्यथा काम जाण्याची शक्यता असते.**

**शेतमजूर (Farm Labourer)**

**अल्पभूधारक शेतकरी ज्यांना शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही, त्यांना शेतमजूरीशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही हा एक वर्ग होय; ज्यांची शेती फक्त पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे, त्यांनाही पूर्ण वर्षभर शेती करता येत नाही. तेव्हा त्यांना मजूरी करणे भाग पडते हा दुसरा वर्ग होय व जे कायम फक्त शेतमजूरीच करतात, त्यांच्या मालकीची शेती नाही असा तिसरा वर्ग होय.**

**आजही असंख्य लोक शेतीवरच अवलंबून आहेत व त्यांच्यासाठी शेती सुधारणेचे ठोस धोरण नाहीत. शेतमजूरांना कमी मजूरी मिळत असल्यामुळे सर्व कुटुंबसदस्यांना काम करावे लागते. त्यातही कामाच्या विभागणीनुसार स्त्री-पुरूष भेद केला जातो. मजूरी सुद्धा पुरुषांपेक्षा स्त्रियांची कमीच असते. शेतीचा हंगाम आला की त्यांना भरपूर मागणी असते, परंतु हंगाम संपला की त्यातही विशेषत: उन्हाळ्याच्या दिवसात वेगळ्या कामाच्या शोधार्थ लांब जावे लागते. या काळात मिळेल ते काम करावे लागते. या त्यांच्या अस्थिरतेचा व असहाय्यतेचा फायदा घेवून समाजातील अनेक घटक त्यांचे लैगिक शोषण करीतच असतात.**

**तसेच स्त्रियांना सतत उन्हात काम करावे लागते. मालकांची मर्जी सांभाळावी लागते. हंगामाचा काळ ओसरला की इतरत्र दुसरे काम शोधावे लागते. कामाचे तास निश्चित नसल्यामुळे सूर्यास्त होईपर्यंत काम करावे लागते. त्य सर्वांमुळे स्त्रियांचे आरोग्य बिघडते. अतिवृष्टी, कुपोषण यांचा प्रकृतीवर ताण पडतो आणि पिळवणूक, शोषण तर सुरूच राहते. कामावर वेळेवर पोहचले नाही तर आर्थिक नुकसान होते. हे सर्व कामाचे असंघटित क्षेत्र म्हणून सहन करावेच लागते.**

**इतर असंघटित कामगार**

**कुटुंबात घरकाम करणाऱ्या स्त्रियांची संख्याही फार आहे. काही नागरी भागात मोलकरणीची संघटना स्थापन होवून त्यांच्या हक्कासाठी मोर्चे काढले जात आहेत. संघटनेचे सभासद असलेल्या स्त्रियांना त्याचा थोडाफार फायदा मिळतो. अंगणवाडी सेवीकाही असंघटित क्षेत्रात येतात. त्यामुळे त्यांना सवलती मिळत नाही.**

**2001 च्या जनगणनेनुसार काम करणाऱ्या एकूण स्त्रियांपैकी 96 टक्के स्त्रिया असंघटित काम करतात, ही परिस्थिती अतिशय दुर्दैवी आहे.**

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. तोष्णीवाल, बुटे, (1997), भारतीय सामाजिक समस्या, नागपूर : विश्व पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स.
2. कन्हाडे बी.एम. (2009), भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, नागपूर : पिंपळापूर अँड कं. पब्लिशर्स.
3. लोटे, (1999), भारतातील सामाजिक समस्या, नागपूर : पिंपळापूर अँड कं. पब्लिशर्स.
4. माळी सुनिल, (1998), भारतीय सामाजिक समस्या, नागपूर : अंशूल पब्लिकेशन्स
5. पाटे सुमन, (1991), भारतीय समाजिक समस्या, नागपूर : विद्या प्रकाशन.
6. आगलावे प्रदिप, (2003), भारतीय समाज संरचना आणि समस्या , श्री. साईनाथ प्रकाशन
7. कुलकर्णी पी. के. (1998), भारतातील सामाजिक समस्या, नागपूर : विद्या प्रकाशन
8. काळदाते सुधा, (1988), भारतीय सामाजिक समस्या, नागपूर : पिंपळापूर अँड कं. पब्लिशर्स.
9. भांडारकर, शब्बीर, पालकर ,भारतीय सामाजिक समस्या, नागपूर : एस.चन्द आणि कं.
10. विखार रविंद्र (2020), सामान्य संशोधन पद्धती भाग-1, बीड : हर्षवर्धन पब्लिकेशन्स.

# १५. ग्रामीण भागातील असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिलांच्या समस्या

**डॉ. दयानंद उत्तमराव राऊत**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, सरकारमहर्षी भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय खामगांव.

प्रस्तुत शोध निबंधात वाडी येथील २० कष्टकरी महिलांची निवड करुन डाटा संकलित करण्यात आला आहे. भारतात असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांची संख्या खूप आहे.

संघटीत आणि असंघटीत कामगाराचे अध्ययन करण्यासाठी सर्वप्रथम संघटीत आणि असंघटीत कामगार समजून घेणे आवश्यक आहे. संगठीत कामगार म्हणजे सरकारकडे नोंदणीकृत असलेल्या क्षेत्राला संघटीत क्षेत्र असे म्हणतात. या क्षेत्रातील कामगारांना रोजगारासंबंधित निश्चित आणि नियमित केले जाते. याउलट असंघटीत क्षेत्रात ज्या कामगाराची सरकारकडे नोंदणी नाही, रोजगाराच्या अटी निश्चित आणि नियमित नाहीत अशांना असंघटीत कामगार म्हटले जाते. या क्षेत्रात कोणतेही सरकारी नियम कायदे पाळले जात नाहीत. अशा क्षेत्रात काम मिळविणे अतिशय सोपे आहे. कारण यासाठी कोणतीही शैक्षणिक पात्रता, कार्यकुशलतेची नोंदणीची गरज नसते. असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक असंघटीत कामगाराची उदाहरणे देता येतील जसे की, शेतमजूर काही सिमांत शेतकरी, बिडी रोलींग, लेबलिंग आणि पॅकींग, इमारत बांधकाम कामगार, विट भटयांवरील कामगार, घरगुती कामगार, रस्त्यावरील लहान विक्रेते इत्यादी.

असंघटीत क्षेत्रातील महिला कामगारांना कोणत्याच प्रकारे नोकरीची, कामाचे तास, आरोग्य विषयक सोई, पगारवाढ, भविष्य निर्वाह निधी किंवा इतर कोणत्यच प्रकारचे फायदे दिले जात नाहीत. आज रोजी भारतामध्ये असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगाराची संख्या ४३.७ कोटी एवढी आहे. अशा प्रकारच्या कामगारांची कोणत्याच रजिस्टरमध्ये नोंदी झालेली नसते, तसेच अशा कामगारांचा डाटा सरकारकडे उपलब्ध नसतो. असंघटीत क्षेत्रात मोठया संख्येने काम करणारा कामगार म्हणजे शेतमजूर होय. इतर सर्व असंघटीत कामगारापेक्षा शेतमजुर कामगाराची संख्या खूप आहे. शेतमजूर दोन प्रकारचे आहेत. एक पुरुष शेतमजूर आणि दुसरे महिला शेतमजूर होय. महिला शेतमजूर हे शैक्षणिकदृष्टया निरक्षर असतात. त्यामुळे त्यांना रोजंदारीच्या संदर्भातले कोणतेच नियम, अटी, शर्ती माहित नसतात. कामाच्या वेळाच्या संदर्भातले नियम देखील त्यांना माहित नसतात. यामुळे शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या महिलांच्या अनेक समस्या असतात. जसे की, घर सांभाळणे कठीण जाणे, मुलांचे संगोपन करणे अवघड जाते, मुलांचे योग्य सामानिकरण होत नाही. एकापेक्षा अनेक भूमिका पार पाडतांना ओढाताण होणे, कामाच्या ठिकाणी अन्याय—अत्याचार, शोषण, बलात्कार, छेडछाड, अर्वाच्य भाषेचा उपयोग, जास्त वेळ काम करवून घेणे, श्रमाचा अल्प मोबदला देणे, लैंगिक उपभोग इत्यादी. ग्रामिण भागातील असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिलांना कायदा, नियम इत्यादी संदर्भात कोणतीच माहिती नसते. साधारणतः शेतमजूरांचे वर्गीकरण चार भागात करण्यात येते. एक म्हणजे मोठया जमिनदाराकडे कायमस्वरुपी असणार भूमिहिन मजूर. दुसरा म्हणजे हा भूमिहिन असतो. मात्र तो मिळेल त्या शेतकऱ्याकडे

मिळेल ते शेतीची कामे करतो. तिसरा म्हणजे, अल्पभूधारक मजूर घरची थोडी शेती हंगामी पिके पेरुन करतो. आणि बाहेरही काम करतो. चौथ्या प्रकारचा मजूर हा शेतकरीच असतो पण स्वत:ची कामे संपल्यावर तो दुसऱ्याच्या शेतात थोडया वेळासाठी काम करतो.

शेतीमध्ये शेतमजूर म्हणून पुरुषापेक्षा महिला जास्त काम करतात. ग्रामिण भागातील कष्टकरी महिला दुहेरी कष्टाची भूमिका पार पाडतात. एक म्हणजे घरगुती कामे आणि दुसरे म्हणजे शेतीतील कामे होय.

**शेतमजुरांची समस्या esakal.com 10/02/22**

**अध्ययनाचा उद्‌देश**

१. ग्रामिण भागातील कष्टकरी महिलांचे अध्ययन करणे.

२. ग्रामिण भागातील कष्टकरी महिलांच्या समस्यांचे अध्ययन करणे.

**गृहितकृत्ये**

१. ग्रामिण भागाती कष्टकरी महिला निरक्षर आहेत.

२. कष्टकरी महिलांना संघटीत क्षेत्राविषयी माहिती नाही.

३. कष्टकरी महिला कामाच्या तासाच्या संदर्भात अनभिज्ञ आहेत.

४. ग्रामिण भागातील कष्टकरी महिलांवर अन्याय अत्याचार, शोषण होते.

५. ग्रामिण भागातील कष्टकरी महिलांना लैगिक अत्याचार आणि छेडखानीला सामोरे जावे लागते.

शेतीच्या उत्पादनामध्ये महिला कष्टकरी कामगाराचा सहभाग हा सर्वात जास्त आहे. शेतात शेतमजूर म्हणून खुरपणी, कापणी, मळणी, कापूस वेचणे, पेरणी, खत देणे आदी कामे कष्टकरी महिला पुरुषांपेक्षा अधिक प्रामाणिकपणे करतात. आर्थिक व सामाजिकदृष्टया कष्टकरी महिला हया अनुसूचित जाती जमातीच्या आढळून येत असल्याचे दिसून येते. असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिला हा एक दुर्बल घटक म्हणून सुध्दा ओळखल्या जातो.

ग्रामिण भागातीत कष्टकरी महिलांचे शोषण करण्याचे कारण म्हणजे निरक्षरता आणि कला कौशल्याचा अभाव होय. यामुळेच खरे तर ग्रामिण भागातील असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिला अन्याय, अत्याचार, लैंगिक छळ, शोषण आणि बलात्काराच्या शिकार होतात. हे सर्व घडून येण्यामध्ये आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे त्यांची हलाखीची परिस्थिती होय. शेतीतील काम हे हंगामी स्वरुपाचे असल्यामुळे ते मिळविण्यासाठी कष्टकरी स्त्रियांना कामात सातत्य ठेवावे लागते. आणि याचाच फायदा कधी कधी शेत मालक घेतात व त्यांच्यावर अन्याय अत्याचार करतात. वास्तविक पाहता ग्रामिण भागांत इतर पर्यायी बिगरशेती रोजगार अभावानेच मिळत असल्याने त्यांना सक्तीची बेरोजगारी स्विकारणे भाग पडते. असे साधारणत: दिसून येते. अशा रोजंदारीने फक्त दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न मिटतो. बाकी प्रश्न जन्मभर तसेच राहतात. थोडक्यात म्हणजे ग्रामिण भागातील कष्टकरी महिला दारिद्रियातच जन्म घेतात आणि शेवटी दारिद्रियातच मरतात.

**ग्रामिण भागातील कष्टकरी महिलांच्या समस्या**

**कौटुंबिक आणि वैयक्तिक समस्या**

ग्रामिण भागात असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिलांना दुहेरी भूमिका वठवावी लागते. ती कामावरुन लवकर किंवा उशिरा आली तर तिला संशयाचा सामना करावा लागतो. यातून कधी कधी वादविवाद भांडणे होत असल्याचे दिसून येते.

**आरोग्यविषयक समस्या**

शेतीतील कामे कष्टाची असल्यामुळे ग्रामिण भागातील महिला दिवसभर काम करुन थकून जातात. याच वेळी घरची कामे देखील करावी लागत असल्यामुळे त्यांना आराम करायला वेळ मिळत नाही. पर्यायाने त्यांना चक्कर येणे, डोकेदुखी, हातपाय दुखणे, कंबर दुखणे इत्यादी आजार जडतात.

**सामाजिक समस्या**

ग्रामिण भागात कष्टकरी महिलांना शेतात शेतमजूर म्हणून काम करीत असतांना दुहेरी भूमिका पार पाडावी लागते. जीवनभर शेतमजूर म्हणून काम करावे लागत असल्यामुळे त्यांना समाजात कोणताच मान सन्मान नसतो. पुरुषांपेक्षा जास्त काम करुनही स्त्रीयांचा सामाजिक दर्जा हा कनिष्ठ असतो.

**आर्थिक समस्या**

कुटुंबाच्या गरजाच्या परिपूर्तीसाठी करण्यासाठी ग्रामिण भागातील असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिलांना शेतात शेतमजूर म्हणून काम करावे लागते. मिळणाऱ्या थोडया रोजंदारीमुळे त्या मुलांचे योग्य पालन पोषण करु शकत नाही. महिलांच्या कष्टाने फक्त दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था होते बाकी इतर आर्थिक समस्यांना सतत तोंड दयावे लागते.

**श्रमाचा मोबदला अत्यंत कमी**

ग्रामिण भागात बेरोजगारीची खूप मोठी समस्या आहे. पुरुषाच्या तुलनेत महिला जास्त काम करतात. पण पुरुषापेक्षा कष्टकरी महिलांना श्रमाचा मोबदला कमी दिल्या जातो. शेतमजूर म्हणून कामाची निश्चितता नसून देखील महिला प्रमाणिकपणे काम करतात परंतू त्यांना कमी रोजंदारी दिल्या जाते.

**लैंगिक अत्याचार**

ग्रामिण भागातील असंघटीत क्षेत्र पूर्णपणे असुरक्षित असल्यामुळे शेतमजूर महिलांना कोणत्यच प्रकारची सुरक्षा नसते. कष्टकरी महिलांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन बऱ्याच वेळा कष्टकरी महिलांचे लैंगिक शोषण होत असल्याचे दिसून येते.

**सारांश**

भारतातील असंघटीत क्षेत्रातील काम करणाऱ्या असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी महिला कामगारांची संख्या खूप मोठी आहे. त्या अजूनही संघटित होऊ शकल्या नाहीत. निरक्षरता आणि कायदयाची माहिती नसलेल्या कष्टकरी महिलांचे सतत शोषण होत असल्याचे दिसून येते. त्यांना मिळणारी रोजंदारीदेखील अपुरी असते. त्यामुळे त्या जास्त दिवस एकाच शेत मालकाकडे काम करीत नाहीत. आर्थिक स्थिती हलाकीची

असल्यामुळे मिळेल ते काम कमी पैशात त्या करायला तयार असतात. कष्टकरी महिला कामाचे तास, आरोग्यविषयक सोई, कामगाराच्या संदर्भातील नियम याविषयी पूर्णपणे अनभिज्ञ असतात. शेतात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या अध्ययनावरुन असे लक्षात आले की, मी जर शेतमालकाला कायदा किंवा वेळेच्या संदर्भात नियम सांगितला तर तात्काळ कामावरुन काढले जाते यामुळेच खरे तर कष्टकरी महिला संघटित होत नाहीत. आणि मुकाटयाने अन्याय अत्याचार, शोषण, छेडछाड सहन करतात. कामात अनिश्चितता असल्यामुळे असंघटित क्षेत्रातील महिला कधीच संघटित होऊ शकत नाही असे संशोधन अध्ययनावरुन दिसून येते.

बऱ्याच वेळा कष्टकरी काही महिला सतत काम मिळावे म्हणून शेतमालकाशी लगट करण्याचा देखील प्रयत्न करतात असे संशोधनात दिसून आले आहे. वास्तविक पाहता कष्टकरी महिलांच्या कार्यप्रणालीचा विचार केला तर असे दिसून येते की शेतमालकाकडे आपल्यालाच काम मिळावे यासाठी त्या अन्याय, अत्याचार व शोषण सहन करतात. कारण मिळणारे काम हे हंगामी स्वरुपाचे असल्यामुळे काही दिवस खाली रहावे लागते म्हणून कष्टकरी महिला शेतमालकाचा अन्याय सहन करत असल्याचेही दिसून आले. थोडक्यात असंघटित क्षेत्रातील ग्रामिण भागातील कष्टकरी महिलांची सरकारकडे नोंदणी करण्याची कार्यप्रणाली अवलंब करणे आवश्यक आहे. त्यांनाही संघटित क्षेत्रात सामावून घेणे गरजेचे आहे. तरच कष्टकरी महिलांचे शोषण कमी होऊन, त्यांच्यावरी अन्याय—अत्याचाराची मात्रा कमी होईल.

**संदर्भ ग्रंथ**


- लांजेवार ज्योती — फुले आंबेडकर स्त्रीमुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर
- कुळकर्णी डॉ. रुपा— महिलांचे कैवारी डॉ. आंबेडकर लोकराज्य, महाराष्ट्र शासन, १ ऑक्टोबर २००६
- शिरसाठ डॉ. सतीश — असंघति कामगार, प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग, पुणे विद्यापीठ प्रकाश पुणे विद्यापीठ, (२०१०)
- गायकवाड एम.जे. — रोजगार हमी योजना आणि शेतमजूर स्त्रियांचे आर्थिक सबलीकरण, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव (२०१४)
- दैनिक सकाळ — शेतमजूरांच्या समस्या, esakal.com 10/02/2020

# १६. माडीया महिलांच्या सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास

**मेश्राम रोशन दादाजी**
संशोधक विद्यार्थी, फुले, आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, गडचिरोली.

**प्रस्तावना**

गोंड ही भारतातील संख्येने सर्वात मोठी असलेली आदिवासी जमात होय. ही जमात सर्व मोठया राज्यांमध्ये विखुरलेली आहे. .भारतातील जंगलात राहणाऱ्या जमातींमध्ये ती अग्रगण्य समजली जाते. गोंडाची वस्ती प्रामुख्याने गोदावरी व विंध्य पर्वत यांमध्ये आढळते. अशा विस्तीर्ण प्रदेशावर पसरलेल्या जमातीमध्ये वांशिक व भाषीक समानता आढळणे कठिनच. अर्धेअधिक गोंड हे गोंडी बोली बोलतात. सर जॉज ग्रीअर्सनच्या मते, गोंडी बोली तेलगुपेक्षा तमिळशी व कन्नडशी जास्त मिळती जुळती आहे. तथापी सोळाव्या शतकातील राजगोंड राजाच्या सुवर्ण मोहरांवरु काही तेलगू भाषीक आख्यायीकांविषयी माहिती मिळते. गोंडांनी स्वतंत्र राज्ये प्रस्थापीत केल्यामुळे या जमातीच्या इतिहासास आगळे महत्व प्राप्त झाले आहे. मध्यप्रदेशातील बस्तर, छिंदवाडा, मंडला जिल्हे महाराष्ट्रातील चंद्रपूर आणि आंध्रप्रदेशातील आदिलाबाद व वरंगळ जिल्हयांच्या प्रदेशास गोंडवन म्हणतात. गोंडवनावर मराठयांची सत्ता प्रस्थापीत होईपर्यंत गोंडांचे राज्य होते गोंडांचे वंशज स्वत:स राजगोंड म्हणवितात. ते स्वत:स गोंड संस्कृती व भाषेचे खरे प्रतिनिधी समजतात.

माडीया गोंड किंवा माडीया किंवा मारीया हे चंद्रपूर जिल्यामध्ये वास्तव्य करणारी गोंड जमात आहे. महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्हा हा छत्तीसगड राज्याच्या बस्तर विभागात आहे. त्यांना त्यांच्या सकारात्मक कृती किंवा आरक्षण कार्यक्रमांतर्गत भारत सरकार व्दारे एक आदिवासी गटाचा दर्जा देण्यात आला आहे. माडीया गोंड जमात गडचिरोली जिल्हयात एटापल्ली तालुक्यातील भामरागडच्या पूर्वेला दाट जुगलामध्ये विखुरलेली आहे. ही जमात प्राचीन वन्य जमातीमध्ये मोडते. हे लोक डोंगराळ व दुर्गम वनप्रदेशामध्ये राहतात. त्यांनी त्यांच्या प्राचीन परंपरा आचार विचार अदयाप टिकवुन ठेवलेले आहेत. डोंगराळ व दाट वनप्रदेशातील माडीया गोंडाचा सखल प्रदेशातील अन्य लोकांशी संबंध येतो.

माडीया गोंड जमातीत वस्तीच्या ठिकाणावरुन त्यांचे प्रमुख दोन गट दिसुन येतात. त्यापैकी जे लोक उंच पहाडावर राहतात त्यांना बडा माडीया असे म्हणतात. तर जे सखल प्रदेशात किंवा पहाडाच्या पायथ्याला राहतात त्यांना छोटा माडीया असे म्हणतात. बडा माडीया भामरागडच्या पूर्वेला कुवाकुडीच्या डोंगराळ भागात प्रामुख्याने आढळतात. येथे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणजे शिकार करणे, फळे, कंदमुळे गोळा करणे तसेच थोडीफार शेती हे आहे. डोंगर किंवा पहाडामध्ये राहणाऱ्या माडीया गोंडांना हिल माडीया किंवा डोंगरी माडीया असेही म्हणतात. मैदानी भागात राहणारे व नृत्यांमध्ये जनावरांचे शिंगे वापरणाऱ्या माडीया गोंडांना बायसनकार्य माडीया या नावाने लोक ओळखतात.

माडीया महिलांच्या समस्या या सर्व जगातील लोकांच्या समस्या निर्माण झााल्या आहेत. प्रत्येक माडीया महिलांच्या समस्या विविध प्रकारच्या आहेत. त्यामध्ये सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक, शिक्षणविषयक अशा निरनिराळया समस्यांना माडीया महिलांना तोंड दयावे लागते.

**शोधनिबंधाचे उददेश**

१. माडीया महिलांच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

२. माडीया महिलांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३. माडीया महिलांच्या आरोग्याचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितके**

१. माडीया महिलांची सामाजिक स्थिती खालावलेली आहे.

२. माडीया महिलांची आर्थिक स्थिती खालावलेली दिसून येते.

३. माडीया महिलांचे आरोग्य निकृष्ट आहे.

**संशोधन पदधती**

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक संशोधन पदधतीचा अवलंब करण्यात आला आहे. या शोध निबंधामध्ये दुय्यम स्त्रोतांचा आढावा घेतलेला आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने शासकीय अहवाल, मासिके, शोधनिबंध, शोधप्रबंध आणि दैनिक वर्तमान पत्रे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

**सामाजिक जीवन**

सामाजिक समस्यांमध्ये निरनिराळया समस्या माडीया महिलांपुढे उभ्या असतात. उदा. एकाकीपणा, सर्व ऋतुंमध्ये खुले असणाऱ्या रस्त्यांचा अभाव, आदीवासी बोली भाषा आणि संसूचन, अंधश्रद्धा, शंतीविषयक समस्या, कर्जबाजारीपणा, बेरोजगारी, शोषण, व्यसनाधीनता, शुद्ध व पाचक पेयजलाचा अभाव, आदीवासींचे विस्थापन आणि पुनर्वसन, आतंकवाद, नक्षलवाद इत्यादी.

माडीया गोंड समाजामध्ये उच्च निचता आणि जातीभेद नाहीत. स्पृश्य—अस्पृश्यता तर अजिबात नाही. सामाजिकदृष्टया सर्वजन समान असतात. परंतु रक्तसंबंधाच्या बाबतीत माडीया महिलांमध्ये भेद आढळून येतात. एकाच गोत्रामधील लोक विवाहबद्ध होत नाहीत. माडीया गोंडाच्या गावांत पंचायत असते. पंचायतीचा एक प्रमुख असतो. त्याला गावातील अडिअडचणी सोडविण्याचे अधिकार असतात. परंतु धार्मिक अधिकार नसतात. गावाच्या पारावर बसुन गावातील जाणत्या मंडळींबरोबर चर्चा करुन गावाचे प्रश्न हे लोक गावातच सोडवितात. प्रत्येक गावामध्ये एक पुजारी असतो. त्याला भुमका म्हणतात. त्याला बरेच अधिकार असतात. कोणताही प्रमुख विधी त्याच्या उपस्थितीशिवाय होत नाहीत्र गावामध्ये त्याला खूप मानाचे स्थान असते.

**माडीया महलिांची आर्थिक व व्यावसायीक स्थिती**

आर्थिक समस्या ही तर माडीया महिलांची एक गंभीर समस्या झाली आहे. भारतातील सर्वच आदिवासी जमातीमधील लोक हे अत्यल्प संचयामागे नसतात. निसर्गाच्या सर्व उपलब्धींचा गरजेप्रमाणे व गरजेपुरताच उपयोग करणारे असतात. त्यांचे समुहजीवन हे प्रमुख असुन दुर्मिळ वस्तुंही सर्वांना वाटुन घेउन सहभाग करुन सर्व व्यक्तींना वाटण्याची पद्धत आहे. इतकेच नव्हे तर गर्भवती स्त्रीला तिच्या पोटातल्या बाळाच्या नावे जास्तीचा वाटा देण्याची प्रथा आहे. या जमातीमध्ये वस्तुविनिमयाची परंपरागत पद्धत होती.

त्यांच्यामधील आपापसातील व्यवहार याच पद्धतीने बिनतक्रार सुरु होते. या सर्व आर्थिक परिस्थितीचे विघटन आणि विकृतीकरण हे बाहय संस्कृतीतील व्यापारी, दुकानदार, सावकार यांच्या प्रवेशानंतर झााले. जमीनदार, सावकार, मालगुजार यांनी आदीवासींच्या शेतजमीनी बळकावल्या. जंगलतोड करुन त्यांच्या अर्थव्यवस्थेवर अतिक्रमण झााले यातुन माडीया महिलांची आर्थिक परिस्थिती खालावत जाउन हे लोक भुमिहीन झााले.

आदिवासी अर्थव्यवस्थेमध्ये पैशाचे चलन नसते. तर वस्तुची देवानघेवान होत असते. एका जर्मन अर्थशास्त्रज्ञाच्या मते, आदिवासी प्राक आर्थिक स्थितीमध्ये आहेत. व्यक्तीने स्वत: पुरतेच अन्न तयार करावयाचे, हाच एक आर्थिक व्यवसाय आदीवासी समाजामध्ये आहे, हं म्हणने बरोबर नाही. अन्नाचा प्रश्न आदिवासी समाजामध्ये सामाजिक प्रश्न समजला जातो. व त्याचप्रमाणे तो हाताळला जातो. कौटुंबिक जबाबदाऱ्या, नातेसंबंध, शंजारधर्म, वडीलांचा व मुख्यांचा मान, कुळीचे आचार धर्म, विशेष नियम, धर्म पुर्वज व देवता या सर्वाचा विचार आर्थिक व्यवसायामध्ये केला जातो. कामाकरीता काम किंवा पैशाकरीता काम असा व्यवहार माडीया महिलांमध्ये नसतो. ज्या व्यक्तीचे काम असेल त्यास कामामध्ये मदत करणे इतरांचे कर्तव्य असते. किती वेळ काम केले यावरुन मोबदला ठरविता येत नाही. कारण सर्वसाधारणपणे आदिवासी समाजामध्ये वेळेला विशेष महत्व नसते. माडीया महिला या आळशी असतात, असे नाही तर त्या गरजेनुसार काम करतात एवढेच. अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजांच्या पूर्तीसाठी त्यांचा आर्थिक व्यवहार होत असतो.

माडीया लोक जगण्यासाठी व अन्न मिळविण्यासाठी सतत धडपडत असतात. व निर्सगामधून जे मिळेल ते खाउन आपला उदरनिर्वाह करतात. शिकार, फळे, मोहफुले गोळा करणे. कंदमुळे, मासेमारी, पशुपालन हे त्यांचे लहानसहान व्यवसाय असुन माडीया महिला राणातुन मोहफुले कंदमुळे गोळा करतात. माडीया गोंडांना जंगलामध्ये राहणाऱ्या प्राण्यांच्या हालचालींची, सवयीची चांगलीच माहिती असते. प्राण्यांच्या शिकारी करुन प्राण्यांच्या शिकारीपासुन कातडी, मांस, शिंगे इत्यादी वस्तु मिळवितात. उदरनिर्वाहाचे आणखी एक प्रमुख साधन म्हणजे मासेमारी हे होय. हे लोक पावसामधील पाणी सांचून तयार झालेली डबकी, तळी व नदयांमध्ये मासे पकडतात. माडीया लोक गुरे पाळतात.गाय, बैल, बकऱ्या, कोंबडया, कुत्रे, डुकरे इत्यादी पाळीव प्राण्यांचा त्यात समावेश असतो. शेती हे सुद्धा माडीया महिलांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. त्याला कुटा असे म्हणतात.

शेती अदयापही मागासलेल्याच पद्धतीने केली जाते. शेतीपासुन त्यांना अतिशय कमी उत्पन्न मिळते. त्यांच्या शेतीमधील उत्पादन त्यांच्या स्वत:च्या कुटुंबाला वर्षभर पुरत नाही. शेवटी काही दिवसांमध्ये त्यांना राणामधुन फळे, कंदमुळे व जंगली वनस्पती खाउन दिवस काढावे लागतात. कधीकधी शिकार व जंगली वनस्पती न मिळाल्यास त्यांची उपासमार होत असते. माडीयांची शेती ही परंपरागत आहे. शेतीसाठी बी—बीयाणे, खते, जंतुनाशके यांचा वापर करण्याची माडीयांना माहिती नाही. शेतीच्या मशागतीसाठी नवीन अवजारे देखील वापरण्याची माहिती त्यांना नाही. अज्ञानामुळे व दैववादी वृत्तीमुळे शेतीतील सुधारणासंबंधी माहिती देणाऱ्या लोकांवर त्यांचा विश्वास बसत नाही. शेती उत्पादनातील लोकांचे अज्ञान व शेती उत्पादनातील बाजार भावासंबंधीचे अज्ञान यामुळे अधिक उत्पादन काढण्याचा विचार लोकांमध्ये अदयाप रुजलेला नाही. देवावर त्यांचा प्रचंड विश्वास आहे. देवच शेतीतील उत्पादन कमी जास्त करतो असा त्यांचा

विश्वास आहे. त्यामुळे त्याला खुश ठेवण्यासाठी पेरणीपासुन धान्य घरामध्ये येईपर्यंत अनेक प्रसंगी कोंबडया बकऱ्यांचे बळी देउन देवदेवतांना खुष करण्यासाठी त्यांची पुजा ते करतात. शेतीतील कष्टावर अदयापही त्यांची निष्ठा बसलेली नाही.

**आरोग्यविषयक**

माडीया महिलांच्या आरोग्याच्या बाबतीत सर्वसाधारण समजुत अशी असते की, त्यांच्या आजारावर उपचार करण्याची पद्धत ही पारंपारीक असते, ज्यामध्ये प्रामुख्याने जडीबुट्टीचा वापर केला जातो. सर्वसाधारणपणे माडीया स्त्रीयांचे जीवन, त्यांचा पूर्वेतिहास व संस्कृती यांच्या अभ्यासाची क्षेत्रे अत्यंत व्यापक आहेत. जास्तीत जास्त माडीया गोंड हा समाज पूर्वीपासूनच दुर्गम भागामध्ये वास्तव्याला आहे. या समाजामध्ये स्त्रीयांच्या आरोग्याला धोका असतो. व त्यांच्या आरोग्यविषयक समस्या खूप जास्त प्रमाणामध्ये बघायला मिळतात. कारण हा समुदाय जंगलामध्ये घरे बांधून वास्तव्याला असतो, त्यामुळे त्यांचे अस्वच्छ राहणीमान, दुषित पाणी, निकृष्ट दर्जाचे अन्न यामुळे यांची प्रकृती बिघडत असते. व त्या विभागामध्ये वैदयकीय सेवांचा पुरवठा अतिशय मंदगतीने केला जातो. माडीया समुदायाच्या धार्मिक परंपरेमुळे स्त्रीयांचे आरोग्य धोक्यात आहेत. व त्या समाजातील स्त्रीया शिक्षणापासून वंचित असल्याने त्यांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण मोठया प्रमाणामध्ये पहावयास मिळते. दुर्गम भागातील निवास स्थानामुळे शाळा, शिक्षक, शिक्षणासाठी योग्य वातावरण उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे शासनाच्या शैक्षणिक व आरोग्य सेवांचा लाभ त्यांना होत नाही.

माडीया हा समाज दुर्गम भागामध्ये राहत असल्यामुळे या ठिकाणी नोकर वर्ग राहायला तयार नसतो. अशा ठिकाणी जर प्राथमिक आरोग्य केंद्र उपलब्ध असेल तर त्या ठिकाणी नोकरवर्गाची कमतरता भासत असते. कधी कधी तर शासनाच्या सोई—सुविधांचा अभाव जानवतो. गरोदरपणामध्ये महिलांना तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेणे शक्य होत नसते. माडीया महीलांची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांना गरोदरपणामध्ये सकस संतुलित आहार मिळत नसल्यामुळे त्यांच्या शरीरामध्ये लोह आणि हिमोग्लोबीनचा अभाव जानवत असतो. त्यामुळे बऱ्याच महिलांना रक्ताशयाचा आजार होत असतो. शिक्षणातील अज्ञानामुळे माडीया महीलांचा बुवाबाजी, देव, देवी, यांच्यावर खूप जास्त विश्वास असल्यामुळे आजारी पडल्यास दवाखाण्यामध्ये न जाता एखादया देव, देवीकडे जाउन ती व्यक्ती बरी व्हावी म्हणून नवस बोलल्या जाते. एवढेच नव्हे तर पावसाळयामध्ये मलेरिया, टाईफाईड, हगवण या सारख्या साथीच्या रोगांची लागण होत असते अशावेळी या महिलांना साथीच्या रोगांवर उपचार करुन नियंत्रण कसे मिळवायचे याची त्यांना कल्पना नसते. साथीच्या रोगांवर जंगलातील जडीबुटटीच्या आणि देव देवतांवरील विश्वास यावरच विश्वास ठेवुन माडीया महीला जिवन जगत आहेत.

**निष्कर्ष**

थोडक्यामध्ये उपरोक्त विश्लेषनावरुन खलील प्रमाणे निष्कर्ष निघतात

१. माडीया महिला अंधश्रद्धाळू आहेत. त्यांचा देव—देवतांवर, जादुटोण्यावर खूप विश्वास आहे.

२. या समाजामध्ये उच्च—निचता, जातीभेद असा भेदभाव पहायला मिळत नाही.

३. माडीया महीलांना पुरुषांच्या तुलनेमध्ये कमी अधिकार देण्यात आले आहेत.

४. या समाजामध्ये पैशाचे चलन कमी असुन वस्तुविनिमयाची पद्धत वापरली जाते.

५. शेती अदयापही पारंपारीक पद्धतीनेच केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अजुनही माडीया जमातीमध्ये शेतीसाठी केल्या जात नाही.

६. शेतीसाठी बी—बीयाने, खते, जंतुनाशके यांचा वापर करण्याचा माडीयांना माहीत नाहीत.

७. या समाजातील महिला शिक्षणापासुन वंचित असुन त्यांच्यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण मोठया प्रमाणामध्ये पहावयास मिळते

८. शासनाच्या शैक्षणिक व आरोग्य सेवांचा लाभ या महिलांपर्यत लवकर पोहचत नाही.

९. शासनाच्या सोई—सुविधांचा अभाव जाणवतो.

१०. माडीया महिलांची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे सकस व संतुलित आहार मिळत नाही. त्यामुळे आजारांचे प्रमाण वाढते.

११. गरोदरपणामध्ये माडीया महीलांना रक्ताशयाचा आजार उद्भवतो.

**सारांश**

माडीया ही जमात मुख्यत्वेकरुन विदर्भातील गडचिरोली जिल्हयामधील भामरागड, एटापल्ली, लाहेरी, कुवाकोडी, बीनीगुंडा आणि अबुजमाड या भागामध्ये वास्तव्य करीत असते. ही माडीया जमात गोंड जमातीमधील अतिमागास जमात म्हणून ओळखल्या जाते. माडीया महिलांची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट आहे. निसर्गामधील वस्तुंवरच जीवन जगत असतात आधुनिक जिवन पद्धतींविषयी माडीया महीलांना फारशी जाणीव नसते. शासनाकडून मिळणाऱ्या सोई—सुविधा यांना फारशा मिळत नाही. माडीया महीलांना विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनाकडून विशेष सोई—सुविधांचा पुरवठा करण्यात यायला पाहिजे. एवढेच नव्हे तर स्वयंसेवी संस्थांनी पुढे येउन माडीया महीलांना विकासाच्या प्रवाहामध्ये आणावेत. आरोग्याच्या बाबतीत सुद्धा माडीया महीला खूप मागे आहेत. शासनाच्या आरोग्याच्या सोई माडीया महिलांना वेळेवर पोहचाव्यात यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात यायला हवेत.

**संदर्भग्रंथ सूची**

१. खरात शंकरराव., (२००३), *भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न,* प्रथम आवृत्ती, पुणे : सुगावा प्रकाशन.

२. गारे गोविंद., (२०००), *महाराष्ट्रातील आदिवासी जमाती,* प्रथम आवृत्ती, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

३. गोटे शुभांगी—गव्हाने., (२००३), *स्त्री परिवर्तनाची आव्हाने,* प्रथमआवृत्ती, औरंगाबाद, साउथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन.

४. गारे गोविंद., (१९७६), *आदिवासींच्या समस्या, विचार आणि विश्लेषण,* प्रथम आवृत्ती, नाशिक : आदिवासी समाज विज्ञान संस्था.

५. मोरे कल्याण विठठलराव., (२०१३), *कोकणी आदिवासी,* प्रथम आवृत्ती, धुळे : सम्यकता प्रकाशन.

६. गारे गोविंद., (२०००), *आदिवासी प्रश्न,* प्रथम आवृत्ती, पुणे : आदिम प्रकाशन.

७. गारे गोविंद., (२०००), *आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ,* पुणे : सुगावा प्रकाशन.

८. गारे गोविंद., (१९९९), *आदिवासी विकास योजना,* व्दितीय आवृत्ती, पुणे, आदिवासी विकास प्रतिष्ठान.

९. गारे गोविंद., (१९९७), *आदिवासींचे शिक्षण,* प्रथम आवृत्ती, औरंगाबाद : साकेत प्रकाशन.

१०. आत्राम व्यंकटेश., (२०१६), *गोंडी संस्कृतीचे संदर्भ,* चतुर्थ आवृत्ती, वर्धा : सुधीर प्रकाशन.

११. गारे गोविंद, सोनवने उत्तमराव., (१९९३), *आदिवासी कला,* प्रथम आवृत्ती, पुणे : गमभन प्रकाशन.

१२. कडू महादेव गोपाळ आणि गारे गोविंद.,(१९८६), *आदिवासींची गोड गाणी,* प्रथम आवृत्ती, पुणे : श्रीविदया प्रकाशन.

१३. बोरकर अशोक ता., (२००८), *आदिवासी किकासातील समस्या,* प्रथम आवृत्ती, नागपुर : युगसाक्षी प्रकाशन.

१४. गारे गोविंद., (१९७६), *भारतीय आदिवासी : समाज आणि संस्कृती,* प्रथम आवृत्ती, पुणे : आदिम प्रकाशन.

१५. गावित माहेश्वरी., (२००८), *महाराष्ट्रातील आदिवासी मराठी साहित्य एक शोध,* प्रथम आवृत्ती, पुणे: दास्ताने रामचंद्र आणि कं.

१६. तुमराम विनायक.,(१९९४), *आदिवासी साहित्य : स्वरुप आणि समस्या,* प्रथम आवृत्ती, नागपूर सिताबर्डी : विजय प्रकाशन.

१७. देवगावकर शैलजा., (१९९०), *माडिया गोंडाची बोली,* प्रथम आवृत्ती, मुंबई, महाराष्ट्रराज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

१८. नाडगोंडे गुरुनाथ., (१९७९), *भारतीय आदिवासी,* प्रथम आवृती, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

१९. फडके सुधीर., (१९६३), *महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न,* प्रथम आवृती, पुणे : जोशी आणि लोखंडे प्रकाशन.

२०. Sachi S. S., (1978), *The Tribal Women of India*, New Delhi : Sundeep Prakashan.

२१. Mehta B. H., (1984), *Gonds of the Central Indian Highlands*, New Delhi : Concept Publishing Company Vol.I.

२२. Indra M. A., (1955), *States of Women in Ancient India,* Banaras : Motilal Banarasidas.

२३. Grigson W. V., (1938), *The Maria Gonds of Bastar,* London : Macmillan & Co.

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# १७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची दृष्टी

**डॉ. सोमा पी. गोंडाणे**
राजीव गांधी कला महाविद्यालय पाटण तालुका जीवती, जिल्हा चंद्रपूर.

**सारांश**

डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, बुद्धिमान , मानवतावादी, 'दलितांचे मसिहा आणि सामाजिक न्यायाचे लढाऊ योद्धे होते. त्यांना भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार म्हणूनही ओळखले जाते.आयुष्यभर त्यांनी ज्या संकटांना तोंड दिले त्याचा त्यांच्या विचारसरणीवर खोलवर परिणाम झाला. या परिस्थितीने त्यांना भारतातील न्यायाची कल्पना ज्या तत्त्वांवर आधारित होती ती तत्वे पूर्णपणे बदलण्याचा विचार करण्यास भाग पाडले. भारतीय राजकीय व्यवस्था ही न्यायावर आधारित असावी हा विचार बाबासाहेबांनी मांडला. त्यांनी जाती व्यवस्थेमध्ये उच्च आणि नीचता नसावी यासाठी भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविका लिहिताना सर्व नागरिकांना सामाजिक आर्थिक राजकीय न्याय मिळवून देण्याचे वचन दिले. म्हणजेच सर्वांसाठी सामाजिक आर्थिक आणि राजकीय न्याय हा डॉ. आंबेडकरांच्या न्यायिक कल्पनेचा मुख्य आधार आहे. त्यांनी हिंदूंमधील अस्पृश्य जातींना संघटित केले आणि त्यांना सामाजिक आणि राजकीय न्यायासाठी लढण्यासाठी प्रेरित केले. जातिवाद आणि अस्पृश्यतेमुळे त्यांना लहानपणापासूनच अपमान आणि अत्याचाराला सामोरे जावे लागले, ज्याचा परिणाम त्यांच्या विचारांवर होणे स्वाभाविक होते. कबीराची भक्ती, फुले यांची समाजसुधारणा आणि शाहू महाराजांचा ब्राह्मणवादाविरुद्धचा संघर्ष यांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेत असताना त्यांनी न्याय स्वातंत्र समता तिथे अनुभवली परंतु भारतात मात्र त्यांना कुठेही न्याय स्वातंत्र समता दिसली नाही. यातूनच भारतातील दलितांच्या मुक्तीसाठी लढलं पाहिजे याची प्रेरणा मिळाली. मनुने बनवलेले नियम हे दलितांच्या मुक्तीसाठी नव्हे तर दलितांना स्वतंत्र जीवन जगण्यासाठी घटनात्मक सुरक्षेचे उपाय त्यांच्याकरिता उपयुक्त ठरतील या दृष्टिकोनातून दलितांना न्याय मिळवून देण्याकरिता घटनात्मक सुरक्षेचे कवच निर्माण केले. याबरोबरच जाती प्रथा निर्मूलन, शूद्र पूर्वी कोण होते, बुद्ध आणि त्याचा धम्म, अनटचेबल, राईज अंड फॉल ऑफ द हिंदू वूमन या ग्रंथाच्या माध्यमातून सामाजिक न्यायासाठी झटण्याची जिद्द निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांवर होणारे अन्याय अत्याचार यांनाच विरोध केला नाही तर त्यांना त्यांच्यात आत्मगौरव, स्वावलंबन, आत्मविश्वास, आत्म सुधार आणि आत्मविश्वास लेशन करण्याची शक्ती दिली. दलितांना न्याय मिळावा यासाठी बाबासाहेबांनी जे प्रयत्न केले ते आधुनिक भारताच्या निर्मितीकरिता महत्त्वाची आहे म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू म्हणत होते डॉक्टर आंबेडकर म्हणजे हिंदू समाजातील अत्याचारी प्रवृत्तीच्या विरुद्ध बंडाचे प्रतीक आहे.

**न्याया ची संकल्पना**

सामाजिक न्यायाचा पाया सर्व मानवांना समान वागणूक देण्याच्या आधारावर आधारित आहे. यानुसार सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पूर्व ग्रहाच्या आधारे कोणताही भेदभाव केला जाऊ नये, प्रत्येकाकडे किमान साधने असली पाहिजे की ते चांगले जीवन जगू शकतील. विकासाच्या समान संधी सर्वांना उपलब्ध झाल्या पाहिजेत. मागासलेल्या व मागासलेल्यांना त्यांच्या लोकसंख्येनुसार विकासाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत जेणेकरून सामाजिक विकासाचा समतोल साधता येईल. समाजातील दुर्बल घटक, ज्याला स्वतःची काळजी घेणे देखील शक्य नाही. विकासात त्यांचा सहभाग निश्चित केला पाहिजे. सामाजिक न्यायाचे अंतिम उद्दिष्ट हे देखील आहे. डॉ.आंबेडकरांची न्यायाची कल्पना समाजातील विषमता लक्षात घेऊन न्याय आणि न्याय्य समाजाची स्थापना करणे.

**मुख्य शब्द :** - व्यवसाय, धर्मग्रंथ ,आरक्षण ,सायमन कमिशन, तिसऱ्या गोलमेज परिषदेत, सामाजिक क्रांती

**उद्देश**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाच्या संबंधित भूमिका समजून घेणे.
२. दलित, वंचित, दुर्बल घटकाच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे
३. दलित वंचित दुर्बल घटकांना सामाजिक न्याय किती आत्मसात केला हे जाणून घेणे

**गृहितके**

१. दलित, वंचित, दुर्बल घटकात कोणता बदल झाला
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधानिक अधिकार दिले त्याचा पुरेपूर लाभ दलितांनी घेतला का.
३. दलितांना सामाजीक न्याय मिळाला का

**अध्ययन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध साठी निरीक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक न्यायाची दृष्टी या लघुशोध निबंधासाठी काही दस्तावेज ही साधने वापरण्यात आली काहसंपादकीय लेखाचा हि या संशोधनासाठी उपयोग करण्यात आला. प्रस्तुत अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर केला असून प्रस्तुत अध्ययनात निरीक्षण व चर्चात्मक माहिती तसेच विविध जनसंवाद माध्यमातून वाचकांनी मांडलेली मते विचारात घेऊन विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रस्तावना**

कोट्यावधी लोकांना माणूस म्हणून जीवन जगण्यास लायक बनविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. आज समाजामध्ये विविध घटना कायदे पारीत होताना दिसून येतात त्यामध्ये शोषित वंचित समाज दुर्बल समाजघटक ज्यांना दिव्यांग म्हटले जाते ते शारीरिक अपंगत्व असलेले किंवा मानसिक

शिथिलता असलेले तृतीयपंथीय तसेच महिला या सर्वांच्या हिताची चिंता जर कोणी केली असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत.

**न्यायाच्या संदर्भात जातीव्यवस्था**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातिव्यवस्थेला कडाडून विरोध करतात त्यांच्या मते प्रत्येक जातीचा स्वतःचा वंशपरंपरागत व्यवसाय असतो विशिष्ट जातीतील सदस्याला दुसऱ्या जातीचा व्यवसाय स्वीकारण्याची परवानगी नाही. एका जातीचे दुसऱ्या जातीतील व्यक्तीशी लग्न आणि खाण्यापिण्यावर बंदी आहे. ब्राह्मणांना शिक्षण घेण्याचा शिकविण्याचा आणि मंदिरातील विधी करण्याचा अधिकार आहे वर्णव्यवस्थेला धर्मग्रंथाचे समर्थन आहे त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ज्या धार्मिक विचारावर जातीव्यवस्था आधारलेली आहे ती नष्ट केल्याशिवाय जातीव्यवस्था तोडणे शक्य नाही. जातीव्यवस्था स्वातंत्र्य समता आणि बंधुता या तत्त्वाचे स्पष्टपणे उल्लंघन करणे हे एखाद्या व्यक्तीकडून स्वतःसाठी स्वतःचा व्यवसाय निवडण्याचा अधिकार काढून घेणे. व्यक्ती ज्या जातीत जन्माला आली आहे त्या जातीवर त्याची निष्ठा असते. जातीव्यवस्थेत सहानुभूती आणि प्रेमाला स्थान नाही. जातिव्यवस्थेत न्याय्य वागणुकीला वाव नाही. या कारणास्तव, आंबेडकरांनी आरक्षणाचे वर्णन सामाजिक सक्षमीकरणाचे उपाय म्हणून केले आहे.

**हिंदू धर्म भेदभावावर आधारित असल्याने न्यायाला अडथळा ठरतो**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्माच्या विरोधात नव्हते तर त्यांनी धर्माच्या बाजूने असलेले एक मंड बर्फ चा उल्लेख केलेला आहे एडमंड बर्क च्या मते खरा धर्म हा समाजावर आधारित असतो आणि संस्कृती ही त्यावर अवलंबून असते. परंतु डॉ. बाबासाहेबांनी हिंदू धर्माला धर्म मानला नाही कारण तो धर्म जाती व्यवस्थेवर आधारित आहे आणि जातीव्यवस्था न्याय स्वातंत्र्य समता आणि बंधुता या तिन्ही घटकांना नाकारतो. डॉ. बाबासाहेबांचा असा विश्वास होता की हिंदू धर्म केवळ आदेश आणि प्रतिबंधाचीच सहिंता आहे की, आपल्या अनुयायांवर लादली जात असते. हिंदू समाज हा त्यांच्यातील असलेल्या भेट भावावरच आधारलेला आहे ते इतर धर्मियांना सहन करू शकत नाही. तसेच ते कोणत्याही जातीतील हिंदूंना सहन करू शकत नाही. डॉ. आंबेडकरांना अल्पसंख्यांकाच्या हक्काची खूप काळजी होती सायमन कमिशन आणि तिसऱ्या गोलमेज परिषदेत त्यांनी मांडलेल्या निवेदनात अल्पसंख्यांकांना ज्या समस्या भेडसावणाऱ्या होत्या त्या समस्या विषयी आपले मत व्यक्त केलेले आहे. बहुसंख्य समाजाचे वर्चस्व असलेल्या अल्पसंख्यकांना भेडसावणाऱ्या समस्यांची जाणीव असल्याकारणाने त्यांनी विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, आणि नोकरशाही मध्ये अल्पसंख्यांकांना न्याय प्रतीनिधित्वाची मागणी केलेली होती.

**महिलांना समानतेचा अधिकार**

भारतातील जातिव्यवस्थेवर आक्षेप घेताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात हिंदू समाजव्यवस्थेनी महिलांचे नाकारलेले अधिकार हे सत्य कधीही लपवले जाऊ शकत नाही. त्यांनी भारतात

असलेल्या सती प्रथेचा आणि बाल विवाहाचा निषेध केलेला होता. तसेच हिंदू कुटुंब व्यवस्थेची पुनर्रचना करण्याच्या दृष्टिकोनातून विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाजूने आपले मत मांडले होते. भारतीय स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळावे, पुरुषांच्या संपत्तीमध्ये स्त्रियांना अधिकार मिळावा यासाठी हिंदू कोड बिलाची व्यवस्था बाबासाहेबांनी केली होती. 18 जुलै 1927 मध्ये ज्या स्त्रियांवर अन्याय अत्याचार झाला अशा वर्गातील सुमारे तीन हजार महिलांच्या मेळाव्याला संबोधित करताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात समाजाची प्रगती मोजायची असेल तर आधी त्या समाजातील स्त्रियांची प्रगती मोजावी लागेल त्यांनी मुलींचे शिक्षण मासिक पाळी घटस्पोट भत्ता डिलीवरी च्या काळातील सुट्ट्या इत्यादी बाबतीत महिलांच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्याचे दृष्टिकोनाने आवाज उठविला होता आंबेडकरांना पितृसत्ताक समाजात स्त्रियांना होणारा भेदभाव त्यांना जाणवत होता आणि या जाणिवेतूनच त्यांनी स्त्री-पुरुष समानतेच्या न्यायाची मागणी केली होती.

**कामगारा करिता कायदे**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांचे जीवन सुधारण्यासाठी त्यांच्यात आमूलाग्र परिवर्तन करण्यासाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही. हा मंत्र देऊन स्वतःला त्यांच्या उत्थानासाठी करिता वाहून घेतले. कामगाराच्या हिताचे रक्षण करण्यासाठी त्यांनी 1936 मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. कामगारांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांनी 1944 मध्ये सुधारणा विधेयक बिल आणले. या विधेयकाने कारखान्यात ठराविक कालावधीसाठी सतत काम करणाऱ्या कामगाराला वेतनासह रजा देण्याचा अधिकार दिला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांना त्यांच्या मालकाकडून किमान वेतन, कामाच्या ठिकाणची चांगली परिस्थिती, कामाचे कमी तास इत्यादी च्या बाबतीत न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार जाती व्यवस्था केवळ श्रमाचे विभाजणच करत नाही तर कामगारांमध्ये ही फूट पाडते. जातीव्यवस्था एखाद्या व्यक्तीच्या व्यवसायाच्या निवडीवर मर्यादा आणते आणि खालच्या वर्गातील कामगारांनी केलेल्या कामाला नीच काम संबोधून बदनाम करते. भांडवल शाही कामगाराच्या शोषणाची व्यवस्था मानतात. तसेच ब्राह्मणवाद आणि भांडवलशाही यांना त्यांच्या चळवळीचे दुहेरी शत्रू मानले आहे. डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्था हा भारतीय समाजातील न्यायाच्या संदर्भात भेदभाव करण्याचा मुख्य घटक मानला आहे. समाजात निर्माण होणारी कोणत्याही प्रकारची विषमता न्याय देण्याच्या प्रक्रियेत भेदभाव निर्माण करू शकते. त्यांनी न्याय या संकल्पनेचे मुख्य घटक म्हणून स्वातंत्र्य समता आणि बंधुता यांची ओळख करून दिली. जातीव्यवस्थेत दलित, महिला, अल्पसंख्यांक आणि कामगारांच्या हक्काचे उल्लंघन केले जाते. डॉ. आंबेडकरांची न्याय ही संकल्पना अधिकार यावर आधारित आहे. आणि देशाची राज्यघटना त्यांच्या अधिकाराचे रक्षण करते. तसेच त्यांचा न्यायाचा सिद्धांत हा जाती विहीन समाजावर आधारित होता. त्यांची न्यायाची संकल्पना ही समाजवादी होती म्हणजेच सर्व व्यक्तींना समान वागणूक मिळावी अशी त्यांची इच्छा होती.

**समतावादी न्याय**

डॉ. आंबेडकरांनी एका अशा समाजाचे स्वप्न पाहिले, ज्या मध्ये सर्व व्यक्तींना महत्व आणि सामाजिक दर्जाच्या दृष्टीने समान वागणूक दिली जाईल. सामाजिक विषमता आणि शोषण ज्या घटकांमुळे निर्माण होते असे घटक त्यांनी पूर्णपणे नाकारले. भारतीय समाजव्यवस्थेत समतावादी न्याय सुनिश्चित करण्यासाठी स्वातंत्र्य समता आणि बंधुता प्रस्थापित करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. जातिव्यवस्था या तीन मूलभूत घटकांचा उल्लंघन करत असल्याने भारतीय समाजात न्यायाची कल्पना रुजविण्यात मुख्य अडसर ठरत आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या मते वंचितांच्या हक्काची हमी देणारी गोष्ट म्हणजे कायदा आहे आणि म्हणून संसदेत मांडलेले हिंदू कोड बिल मनुवादी कायद्याचे आणि हिंदू कौटुंबिक संहितेचे खंडन करते या विधेयकामुळे मुलगा आणि मुलगी दोघांनाही वडिलांच्या संपत्तीत समान अधिकार देण्यात आले आहेत या विधेयकाने एकपत्नीत्व आणि घटस्पोटाच्या संदर्भात महिलांच्या बाजूने क्रांतिकारी तरतुदी केल्या आहेत.

डॉ. आंबेडकर यांच्या मते उपेक्षित समुदायांना लाभ मिळण्याकरिता किंवा त्यांना समान पातळीवर आणण्याकरिता असमानतेचे  तत्व स्वीकारावे लागेल. या कारणामुळेच त्यांनी राखीव मतदार संघाचे ही समर्थन केले होते. परंतु महात्मा गांधीच्या विरोधामुळे त्यांना राखीव मतदारसंघ सोडावे लागले. राखीव मतदार संघ आमचा त्यांचा उद्देश असा होता की वंचितांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत हळूवार सुधारणा घडवून आणणे. सामाजिक क्रांती शिवाय समाजात मूलभूत बदल घडून येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीत रक्तपात आला स्थान नव्हते त्यांची क्रांती बंडखोरी पासून मुक्त होती. त्यांनी राजकीय क्रांती पेक्षा सामाजिक क्रांतीला अधिक प्राधान्य दिल्याचे दिसून येते त्यांचा लोकशाहीवर विश्वास होता आणि उच्च नीच ही समाजव्यवस्था हा समाजाला शाप आहे असेही ते मानत होते. डॉ. आंबेडकरांनी हिंदू समाजाच्या पुनर्रचनेचा विचार मांडला त्यांनी हिंदू समाजव्यवस्थेची पुनर्बांधणी करण्यासाठी काही घटकांचा उल्लेख केलेला आहे जसे पुरोहित शाही संपुष्टात आणणे मनुस्मृती सारख्या धार्मिक ग्रंथांचा नाश करणे.

डॉ. आंबेडकर यांनी हक्क आणि कायदे हे  न्यायाच्या किल्ल्या असल्याचे सांगितले आहे. त्यांच्यासाठी जातीव्यवस्था, जातीयवाद, पितृसत्ताक आणि कामगाराचे शोषण हे सामाजिक न्यायाच्या स्थापनेतील सर्वात मोठे अडथळे होत. राजकीय आणि आर्थिक पुनर्रचना पूर्वी समाजाची सामाजिक पुनर्रचना आवश्यक आहे कारण त्यांचा असा विश्वास होता की सामाजिक न्याया शिवाय राजकीय आणि आर्थिक न्याय शक्य नाही.

**वर्णव्यवस्थेचा विरोध**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांतीकारक होते. ब्राह्मण वादा कडून अपमानित झालेल्या दलित वर्गाचे ते तारण हार होते. धर्मांध आणि धर्माच्या ठेकेदारांनी ज्या दलित समाजाला अंधश्रद्धेच्या

विषमतेच्या दलदलीत अडकवले होते त्या दलित समाजाला बाहेर काढण्याचे काम त्यांनी केले प्रत्येकाला आपला हक्क लढूनच घ्यावे लागेल अधिकार हे दानातून मिळत नाही तर ते हिसकावून घ्यावे लागतात अशी त्यांची विचारसरणी होती. प्रस्थापित वर्गांच्या चालीरीती श्रद्धा वर्तन आणि समाज रचना यांच्याविरुद्ध लढल्याशिवाय न्याय मिळणे शक्य नाही. मनुस्मृतीमध्ये वर्णव्यवस्था सांगितलेली आहे ती नाकारून वेदांमध्ये वर्णन केलेल्या चार वर्ण व्यवस्थेचे त्यांनी खंडन केलेले आहे. चार वर्ण समानतेवर आधारीत असल्याचे सांगितले. त्यांच्या मते वर्णव्यवस्थेवर आधारित हिंदू समाज शोषण आणि विषमतेला प्रोत्साहन देतो. वर्णव्यवस्थेत ब्राह्मणांना उच्च स्थान आणि अस्पृश्यांना शोषण आणि अत्याचाराला सामोरे जावे लागते त्यामुळे अस्पृश्यता नष्ट करण्याचा आणि भारतीय समाज सुधारण्याचा एकमेव मार्ग म्हणजे वर्णव्यवस्था संपवणे होय. वर्णव्यवस्था संपल्या शिवाय दलितांना सामाजिक न्याय मिळू शकणार नाही.

**पुरेसे प्रतिनिधित्व देण्याची मागणी**

ज्या वर्गाला शेकडो वर्षापासून न्याय मिळाला नाही. त्या वर्गाला आपले हक्काचे कायदे बनविता यावे यासाठी मंत्रिमंडळात पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले. भारतातील राजकीय व्यवस्थेत वंचित वर्गाच्या हक्का कडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे हे ओळखून वंचित वर्गाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळाल्याशिवाय ते त्यांच्या हक्काचे त्यांच्या अधिकाराचे कायदे करू शकणार नाही. आणि ते त्यांच्या समाजाचा विकासही करू शकणार नाही. हिंदू समाज या मानसिकतेतून अस्पृश्यांना वागणूक देत होता त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अत्यंत दुःखी होते आणि शेवटी या निष्कर्षापर्यंत पोहोचले की दलितांनी त्यांचा मान-सन्मान आणि न्याय मिळविण्याकरिता हिंदू धर्माचा त्याग करून जो धर्म न्याय स्वातंत्र्य समता बंधुता यावर आधारलेला आहे तो धम्म स्वीकारल्याशिवाय त्यांचा उद्धार होऊ शकणार नाही.

**दलितांचे शिक्षण, संघटन आणि संघर्षावर भर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा असा विश्वास होता की दलितांना आपला उद्धार करायचा असेल विषमतेच्या व्यवस्थेतून बाहेर निघायचं असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही म्हणून त्यांनी दलितांना शिका, संघटितव्हा आणि संघर्ष करा हा मंत्र दिला. दलितांनी शिकल्याशिवाय त्यांच्यावर होत असलेला अन्याय त्यांच्यावर होत असलेला अत्याचार हात दूर होणार नाही. शिक्षण घेतल्याशिवाय त्यांना कधीही करणार नाही की विकसित विश्व आणि मागासलेले विश्व यामधला फरक त्यांना कळणार नाही आणि आपल्याला कोणत्या विश्वात आपला विकास होईल हे सुद्धा त्यांना शिक्षण घेतल्याशिवाय करणार नाही. बाबासाहेब असे म्हणायचे की दलित ना ओपचारीक शिक्षणाबरोबरच अनोपचारिक शिक्षणही दिले गेले पाहिजे आणि यासाठी त्यांनी तसे प्रयत्नही केले कारण शिक्षणाशिवाय त्यांना कोणीही न्याय देऊ शकणार नाही ही वस्तुस्थिती बाबासाहेबांना माहीत होती

**निष्कर्ष**

समाजातल्या तळागाळातल्या वर्ग शिकून-सवरून पुढे जावा उच्चवर्णीयांच्या बरोबरीने त्याला वागता यावे सामाजिक समता निर्माण व्हावी यासाठीच सामाजिक न्यायाचा पुरस्कार करण्यात आला संघर्ष बलिदान त्याग आणि इच्छाशक्तीच्या जोरावर मिळालेले अधिकार आजही उच्चवर्णीयांच्या डोळ्यात सलत आन्ना दिसतात आणि म्हणूनच आजही स्वातंत्र्याच्या एवढ्या वर्षानंतर वंचित दलित समाजाला प्राप्त झालेल्या अधिकाराच्या विरोधात बोलण्याचा येते आरक्षण असो किंवा शिष्यवृत्ती असो तर कधी शालेय फी माफी असो सामाजिक न्याय प्राप्त करण्याच्या दृष्टीने लोकशाही समर्थीत मार्ग दलित वंचित समाज अंगीकारत आहे. आंबेडकरांच्या न्याय संकल्पनेचा आपल्या समाजाने अद्याप स्वीकार केलेला नाही, कारण त्याने जात आणि पितृसत्ता यांच्या श्रेणीतून मुक्त होण्यास नकार दिला आहे.

**संदर्भसूची**

१. डॉ. बी आर आंबेडकर - एनिहिलेसन ऑफ दि कास्ट - नयना पब्लिकेशन हाऊस न्यू दिल्ली.

२. हिंदू धर्म की रिडल डॉक्टर भीमराव आंबेडकर अनुवाद डॉक्टर भदंत आनंद कौसल्यायन समता प्रकाशन लष्करीबाग नागपूर

३. जातिभेद व त्यांचे निर्मूलन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नेहा प्रकाशन नागपूर 17

४. डॉ. आंबेडकर ने क्या किया एल आर बाली भिम पत्रिका पब्लिकेशन डॉक्टर आंबेडकर मार्ग जालंधर 144003

५. हिंदू संस्कृती आणि स्त्री आ ह साळुंखे लोकवांगमय गृह भूपेश गुप्ता भवण प्रभादेवी मुंबई 400025

# १८. दुर्बल घटकांना न्याय, स्वातंत्र, समतेची पेरणी करणारे फुले, शाहू, डॉ. आंबेडकर

**डॉ. स्वाती विकासराव कुरमे**
अर्थशास्त्र विभाग, बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट.

समाजातील दुर्बल घटकासाठी लढा देणारे अनेक क्रांतीकारी समाज सुधारक होऊन गेले त्यांच्या लढयामूळे आज दुर्बल घटक शिक्षीत आहे. त्यांना प्रत्येक ठिकाणी प्रवेश दिला जातो.त्यात महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेखनिय असा वाटा आहे. समाजात त्यांना मानाचे स्थान मिळण्यासाठी शिक्षणाचे कास महत्वाची आहे शिक्षणाच्या माध्यमातून झालेल्या समाजाला जागृत करता येते असे या समाजसुधारकाचे मत होते. महात्मा फुलेनीशिक्षणाचे महत्व पटवून देतांना सांगितले की,

"विद्येविना मती गेली |मतीविना नीती गेली |

नीतीविना गती गेली | गती विना वित्त गेले||

वित्तविना शुद्र खचले | इतके अनर्थ एका अविद्येने केले

यातून समाजातील दुःखाचे मूळ कारण अविद्या आहे असे सांगितले समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वांतत्र मिळूण देण्यासाठी या समाजसुधारकांचा मोठा वाटा आहे . त्यांचा अभ्यास प्रस्तूत लेखात करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत संशोधानासाठी द्वितीयक स्त्रोताद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे.विविध लेखकांची पुस्तके, शोधनिबंध, चरित्र, संकलित करण्यात आले आहे. तसेच विविध वेबसाईटसवरून माहीती संकलित केली. या संशोधनासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये**

१. महात्मा जोतिबा फुलेचे दुर्बल घटकासाठीचे योगदान अभ्यासणे.

२. राजर्षी शाहू महाराजाचे दुर्बल घटकासाठीचे योगदान अभ्यासणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दुर्बल घटकासाठीचे योगदान अभ्यासणे.

**गृहीतकृत्ये**

दुर्बल घटकांना न्याय, स्वतंत्र्य, समता , मिळवून देणारे महात्मा फुले , राजर्षी शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर ,यांच्या मूळे आज दुर्बल घटक सक्षम आहे.

**विषय विश्लेषण**

समजातील दुर्बल घटक न्याय , स्वांतत्र, समता मिळवून देण्यासाठी या तिन्ही समाज सुधारकाचा महत्वाचा वाटा आहे. त्यांचा अभ्यास पुढील प्रमाणे आहे.

**माहात्मा ज्योतिबा फुले**

ज्योतिराव फुले यांनी विविध लेखनकृतीमधून मांडलेला विचार हा दुर्बल घटकांना,न्याय, स्वातंत्र्य व समतेकडे घेऊन जाणारा विचार होता. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्याद्वारे सामाजिक आंदोलन चालवण्याचा जो प्रयत्न केला त्यामागे एकच हेतू होता की समाजातील दुर्बल घटकांचे सामाजिक शोषण बंद करून सर्व मानवांना मुक्त करणारा मानवी हक्काचा विचार होय .

गुलामगिरी आणि सार्वनिक सत्यधर्म या ग्रंथातून त्यांनी विशद केलेल्या न्याय, स्वांतत्र्य , समता आणि विश्व बंधुत्व ही तत्वे लक्षात घेतल्यानंतर त्यांच्या वैचारिक मुल्यांची जाणीव होते.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी जो गुलामगिरी हा ग्रंथ लिहीला त्यामध्ये मानवाला मानवासारखे जगू दिले पाहिजे . मानवाला गुलामामाप्रमाणे शुद्र जीवन जगण्यास प्रवृत्त करणे हा माणुसकीला लागलेला कलंक होय. सर्व माणसे समान आहेत. हे जातीसंस्थेला मान्य नाही म्हणूनच फुले जातीसंस्थेचा व तिचे समर्थन करणाऱ्या धर्माचा धिक्कार करतात. ज्या वरिष्ठ वर्णीयांनी तथा कथीत पवित्र धर्मग्रंथ लिहून जाती संस्थेला धार्मिक समर्थन असल्याचा आभास निर्माण करून ती समजात रुजविली. या वरीष्ठ वर्णीयांना या व्यवस्थेचा फायदा मिळाला . दुर्बल घटकांची अवस्था गुलामाहूनही वाईट करून टाकली. याविषयीचा विचारातून सामाजिक गुलामगिरीची जननी जाती संस्था होती हे फुल्यांनी निदर्शनास आणून दिले. एकंदरीत मानव या नात्याने शुद्रातीशुद्राणा( दुर्बल वंचित) घटकांना सर्व सामान्य आधिकार प्राप्त व्हावे व त्यांची या सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठीच विसाव्या वर्षापासून ते शेवटपर्यंत कुटपांनी आपली काया झिजिविली.दुर्बल घटकांना गुलामगिरी नष्ट करण्याचे हत्यार म्हणजे शिक्षण होय.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे, मुल्य परिवर्तनाचे प्रभावी साधन त्यांनी मानले होते. त्यांच्या माध्यमातून दुर्बल घटकांना ग्रंथ वाचता येतील त्यातील एक सत्य असत्यता त्यांना समजेल अंधश्रध्दा व तत्सम अन्य समजुती समजतील स्त्रीयांना सुध्दा खुप कमी लेखले जात होते. संपूर्ण समाज रचनेत क्रांतीकारी परिवर्तन केल्यापासून उपलब्ध गुलामगिरीतून स्त्रीची खऱ्या अर्थाने मुक्तता शक्य नाही.त्यासाठी फुलेंनी विशेष प्रयत्न केले . 1851 मध्ये मुलीसाठी शाळा काढली. विधवा स्त्रीयांसाठी आश्रम काढले. बालविवाहास विरोध केला. गर्भवती कुमारीका, गर्भवती विधवा स्त्रीयांनाही आश्रय दिला. ग्रामीण भागात राहणाऱ्या शेतकऱ्याविषयी तसेच गोरगरीब कष्ट करणाऱ्या दुर्बल घटकाविषयी दुष्टीकोन होता .या विचारामधून त्यांनी गुलामगिरीच्या जीवनपध्दतीचा त्याग करून मानव मुक्तीची विश्व बंधुत्वाची जीवन पध्दती सार्वजनिक सत्य धर्मातून आचरणात आणावी असेही त्यांनी सुचविली.

**राजर्षी शाहू महाराज**

राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे अधिपती होते.त्यांचा जन्म कागलच्या घाटगे घराण्यात 25 जुलै 1874 रोजी झाला त्यांची कारकीर्द अतिशय यशस्वी आणि उल्लेखनिय स्वरूपाची राहिलेली आहे. कोल्हापूर संस्थानचे 4 थे शिवाजी यांचा अहमतनगर येथे इंग्रजाच्या कैदेत असतांना मृत्यू झाला . त्यांना औरसपुत्र नसल्याने पत्नी आनंदीबाई साहेब यांनी कागलच्या घाटगे घराण्यातील जयसिंगराव घाटगे यांचा थोरला मुलगा यशवंतराव यास 17 मार्च 1884 रोजी दत्तक घेतले . दत्तक विधानानंतर यशवंतरावाचे नाव शाहू असे ठेवण्यात आले. 2 एप्रिल 1894 रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यांची अधिकार सुत्रे आपल्या हाती घेतली. आपल्या सत्तेचा वापर त्यांनी लोक कल्याणासाठी केला त्यामूळे त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर संस्थानात अनेक सुधारणा घडून आल्या त्यात सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे महात्मा फुले यांच्यानंतर निष्प्राण होत चाललेल्या ब्राम्हणेतर चळवळीला त्यांनी त्यांची संजवनी देवून तिच्यात नव चैतन्य निर्माण केले महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीचे ते मार्गदर्शक नेते ,

स्फुतीदाते बनले . सामाजिक विषमता दुर करून येथील बहूजन समाजाला न्याय मिळवून देणे ब्राम्हणेत्तर चळवळीचे उद्दीष्ट होय. शाहू महाराज हे सामाजिक चळवळच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार होते. त्यांच्याच प्रेरणेने 1911 मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली . त्याचबरोबर शाहू महाराजाचे शिक्षण विषयक कार्य देखील अत्यंत यशस्वी ठरले आहे.बहूजन समजात शिक्षण् विषयक कार्यदेखील अंत्यत यशस्वी ठरले आहे.बहूजन समाजात शिक्षण प्रसार घडून आणण्याच्या दृष्टीने शाहू महाराजांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे . त्यांनी कोल्हापूरात निरनिराळया जातीच्या विद्यार्थ्यासांठी वसतीगृहे सुरु केली आणि त्यांचा शिक्षणाची व्यवस्था केली. त्याच बरोबर बहूजन समाजातील गरजूवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्याचे धोरण आखले राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा कायदा केला व शाहू महाराजांनी समाजिक विषमता जातीभेद अस्पृशता भेद नष्ट करण्यासाठी अस्पृश्य व विद्यार्थ्यांच्या शिक्षणास या विरुध्द सतत संघर्ष केला . समाजातील जातीभेद , आस्पृश्यता भेद नष्ट करण्यासाठी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणास उत्तेजन दिले आणि आपल्या राज्यात पूनर्विवाहाचा कायदा बहूजन समाजाला नौकऱ्यात 50 टक्के जागा राखीव ठेवण्यासंबंधीचा कायदा सारखे पुरोगामी कायदे केले. दुर्बल घटाकांना न्याय स्वांतत्र् समता यांच्याकडे घेऊन जाणारा त्यांचा चिचार होता .

राजर्षी शाहूंच्या समग्र कार्याचे विवेचन करतांना चित्रकार धनंजय कीय यांनी योग्यच म्हटले आहे की "सत्तेचा उपयोग लोकाद्वारासाठी करावयाचा असतो हे तत्व कृतीत आणून दाखवणारा हा आदर्श राजपूरुष होता . बोले तैसा चाले या वचनानी सत्यता पटविणारा वृंदनीय राजा होता. "

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दुर्बल घटकांत अस्पृश लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांची अर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी " बहिस्कृत हितकारणी" सभा काढली होती. अस्पृश्यांन त्यांच्या संस्थेच्या प्रमाणात विधी मंडळात आणि सरकारी नोकऱ्यात जागा मिळवून देण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न सुरू केले.

अश्पृशाना सार्व जनिक ठिकाणी प्रवेश नाकारण्यात आल्याने त्यांच्या जीवाची तगमग होत होती.सार्वजनिक प्रवेशमिळावा म्हणून त्यांनी महाडचा सत्याग्रह घडवून आणला आंबेडकर इथेच थांबले नाही . तर त्यांचे कार्य चालूच होते.25 डिसेंबर1927रोजी 'अस्पृश्यांच्या गुलामगिरीची सनद' असलेल्या मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन केले. ते काम तसे सोपे नव्हते . त्याच्यापूढे त्यांनी एक तडाखा दिला 1930 ला नाशिकला काळाराम मंदीराचा सत्याग्रह दोन्ही माध्यमातून त्यांनी लक्षावधी दलित बांधवाचा आत्मविश्वास वाढवायचा होता. त्यांना हिंदू धर्मापेक्षा यांचा मनाचा बौध्द धर्माकडे असलेला कल फार पूर्वीपासून होता असे जाणवते.म्हणून त्यांनी 1956 च्या 14 ऑक्टोबरला हिंदू धर्माचा त्याग करून आपल्या लक्षावधी अनुयायासह नागपूरच्या दिक्षाभूमीवर बौध्द धर्माची दीक्षा घेतली. दोन महिन्याच्या आसपास म्हणजे 6 डिसेंबर1956 रोजी महापुरषाचे महानिर्वाण झाले.

समाजातील निरनिराळया वर्गाना शरीराच्या निरनिराळया अवयवांची नावे देणे ही आपोआप घडून आलेली गोष्ट नाही ती जाणीव पूर्वक करण्यात आली होती शरीराचा अवयव त्या वर्गाची श्रेणी निश्चीत करतो आणि त्यांचा बदल्यात मिळाल्या वर्गाचे त्या वर्गाचे कार्य निश्चीत करत असते ब्राम्हण हे ज्ञानाचे आणिविध्दत्तेचे रक्षक, क्षत्रिय, लढाऊ पेशाचे उद्योग व्यापार आणि शेती करणे हे वैश्याचे काम आणि समाजिक शिडीच्या शेवटच्या पायरीवर शुद्राला जखडून आले होते. शेवटच्या पायरीवर असलेल्या शुद्राला कमालीचे घाणेरडे आणि सेवक म्हणून काम करण्यात

देण्यात आले हे . तीनही वर्गांना जो अधिकार आणि हक्क देण्यात आले होते. त्यापासून शुद्राना वंचित ठेवण्यात आले होते. वेंदाचे पठण करायचे असेल तर तर शुद्रांना त्यापासून वंचित ठेवण्यात आले होते. शुद्रांना अतिशय हिनतेची वागणूक देण्यात आली होती त्यासाठी खूप मोठया प्रमाणात लढा दिला आहे.

**निष्कर्ष**

थोडक्यात आपल्याला असे म्हणता येईल की थोर असे समाजसुधारक जन्माला आले नसते तर दुर्बल अशा घटकांना न्याय मिळाला नसता महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्या लढयाच्या माध्यमातून दुर्बल घटकाला न्याय मिळाला .

**संदर्भसूची**

१. समाजशास्त्रीय विचारांचा मुलाधार -प्राचार्य डॉ.दा. धो. काचोळे

२. मुलभुत समाजशास्त्रीयविचाराचे आधार- सुशीला फुले

३. पाचात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञ - प्रदीप आगलावे

४. समाजशास्त्रीय सिध्दांत – राज वाघ

५. वृत्तपत्र, इंटरनेट

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# १९. दुर्बल घटकात स्वातंत्र्य, समता व न्यायाची पेरणी करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. कोल्हे तुकाराम त्रिंबकराव**
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख, वि.पा.शि.प्र.मं.सं. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद.

**गोषवारा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वातंत्र्य, न्याय व समते विषयक विचारांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून विचार केला असता असे दिसून येते की, इतर समाजसुधारक व आंबेडकर यांच्या विचारात खूप तफावत दिसून येते. बाबासाहेबांच्या काळातील पार्श्वभूमी भयानक स्वरूपाची होती. स्पृश्य, अस्पृश्य, जातीभेद, वर्णभेद व वर्गभेद, यानुसार समाजाची सामाजिक विषमता होती. बाबासाहेब आंबेडकर यानंतर समाजात असलेली विषमता मान्य नव्हती.

शिक्षणाच्या बाबतीत स्पृश्य पुढारलेले व अस्पृश्य मागासलेले, संपत्तिच्या बाबतीत स्पृश्य श्रीमंत व अस्पृश्य गरीब व दुर्बल लोकसंख्येच्या बाबतीत स्पृश्य बलवान व अस्पृश्य दुर्बल असा प्रकार आहे. म्हणजे अस्पृश्य समाजाचे पारडे स्पृश्य समाजाच्या पारड्यापेक्षा सर्वच दृष्टीनी हलके आहे. अशा असमान वर्गांना समानतेने वागवावयाचे ठरले तर त्यांच्या परस्पर वागणूकीत कोणताही बदल होण्याची अशा करावयास नको हे उघड आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका ठिकाणी हे म्हणतात "माझ्या मतप्रणालीत बंधुतेचे दुसरे नाव कायदा हा निधर्मी असतो. तो एखाद्याला मोडता येतो. परंतू बंधूता म्हणजे मानवता. हा पवित्र धर्म होय.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार राजकीय लोकशाही ही सामाजिक लोकशाही वर अवलंबून आहे. तसेच समाजातील सामाजिक लोकशाही ही त्या देशातील सामाजिक समतेवर अवलंबून आहे. म्हणजेच सामाजिक लोकशाहीची यशस्वीता सामाजिक समतेवर अवलंबून असलेले दिसून येते.

जर बंधुभाव व न्याय नसेल तर स्वातंत्र्य आणि समता यांची वाढ सहजिकपणे होणार नाही. ज्या जातिभेदामुळे सामाजिक जीवनात तर पडलेत आणि जाती–जातीत मत्सर आणि शत्रुत्त्व निर्माण झालेत त्या जातिभेदाचा त्याग करून भारतीयांनी सामाजिक आणि भावनिक अर्थाने एक राष्ट्र बनावे."

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समते विषयक विचारांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून विचार केला असता असे दिसून येते की, इतर समाजसुधारक व आंबेडकर यांच्या विचारात खूप तफावत दिसून येते. बाबासाहेबांच्या काळातील पार्श्वभूमी भयानक स्वरूपाची होती. स्पृश्य, अस्पृश्य, जातीभेद, वर्णभेद व वर्गभेद, यानुसार समाजाची सामाजिक विषमता होती. बाबासाहेब आंबेडकर यानंतर समाजात असलेली विषमता मान्य नव्हती. अस्पृश्यांच्या बाबतीत समाजात हीन स्वरूपाची गुलामगिरी पद्धतीनी दिलेली वागणूक मान्य नव्हती. एका ठिकाणी तर आंबेडकरांनी म्हटले आहे की, गुलामगिरी पद्धतीत गुलांमाना दिलेली वागणूक ही अस्पृश्यांच्या कमी स्वरूपाची असलेली दिसून

येते. यावरून अस्पृश्यतेचे स्वरूप स्पष्ट झालेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या समाज सुधारणेच्या काळात स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांना खूप महत्त्व दिले. सर्व दुर्बल घटकांतील समाजाची योग्य प्रकारे प्रगती व विकास करावयाचा असेल तर समाजात वरील प्रकारच्या त्रिरत्न तत्त्वाची अंमलबजावणी योग्य प्रकारची होणे आवश्यक आहे.

**समतेसाठी विषमता**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सायमन कमिशनपुढे दिलेल्या साक्षितील मुद्यावर अनेक प्रकारचे आक्षेप आजवर घेण्यात आले होते. यापैकी बरेच आक्षेप व हे स्पृश्यांनी घेतले होते तर फार थोडे आक्षेप हे अस्पृश्यांनी घेतले होते. सर्व प्रकारच्या आक्षेपांचे खंडन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून करण्यात आले आहे. आक्षेपामुळे अस्पृश्य समाजाची दिशाभूल करण्यासाठी प्रयत्न केले जात होते म्हणून त्यांनी आक्षेपांचे खंडन केलेले आहे.

डॉ. बाबासाहेबांवर असा आक्षेप घेतला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाज समता संघाचे अध्वर्यु व अध्यक्ष असता त्यांनी अस्पृश्य समामजासाठी जातवार प्रतिनिधित्व मागणी कशी काय केली? एखाद्या समाजासाठी जातवार प्रतिनिधीत्त्वाची मागणी ही विषमता नव्हे काय? हा आक्षेप प्रथमतः पुण्याच्या चित्रमय जगतच्या संपादकाडकडून घेण्यात आला व पाठी मागून त्याचे प्रतिध्वनी पुष्कळ लुंग्यासुंग्या पत्रातून उमटले. अजूनही ते उमटत आहेत हे वृत्तपत्राच्या वाचकांना माहित आहेच.

प्रस्तुत आक्षेप अगदी बिनतोड, मोठ्याा वकिली पंचाचा व प्रतिपक्षाचे तोंड एक ध्यानात येईल. या आक्षेपकांना समतावाद्यांचे ध्येय काय आहे हेच मुळी कळलेले नाहीं. ते जर त्यांनी जाणून घेतले असते तर असल्या आक्षेप धेण्याचा मूर्खपणा त्यांनी केलाच नसता. त्यांना असे वाटत असावे की सर्वांना समानतेने वागविणे हे समतावाद्यांचे ध्येय आहे. पण हीच त्यांनी चूक केली आहे हे त्यांना कळविण्याची आम्ही परवानगी घेतो.

समतावाद्यांचे ध्येय सर्वांना समतेने वागविणे हे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे. हे ध्येय साधतांना सर्वांना समतेने वागणूक देणे शक्य नाही. जेथे सर्व व्यक्ती समान आहेत तेथे काही व्यक्तिंना असमानतेने वागविण्यास विषमता उत्पन्न होईल. पण जेथे व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना सारख्या लेखून चालणे म्हणजे समताप्रतिस्थापनेच्या ध्येयाला विरोध करणे होय. या बाबतीत रोगी माणसाचे उदाहरण बरोबर लागू पडते. "सदृढ माणसाला जाडे भरडे अन्न चालते, पण सुदृढ माणूस व रोगी माणूस हे दोघेही सारखे मानून जर एखादा वेडगळ" समतावादी ते जोडेभरडे अन्न रोग्याला देईल तर तो रोग्याचा प्राणदाता होण्याऐवजी प्राण हर्त्ता होईल. त्याचप्रमाणे श्रीमंतावर जितका कर असतो तितकाच गरिबांवर ठेवावा कारण तसे न केल्यास असमानता होईल असे जर कोणी म्हणेल तर लोक त्याला वेड्याात काढतील. सारखा कर देण्याची ऐपत असलेल्यास श्रीमंतापैकी काहीवर कमी व काहीवर जास्त उदाहरणावरून तात्पर्य घ्यावयेचे ते हे की, समानांना असमानतेने व असमानांना समानतेने न वागविणे हा समतावाद्यांचा दस्तुर आहे. या दस्तुरान्वये पाहिले असता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मागणी त्यांच्या समतावादाला पूर्णपणे धरून हे कळून येणे सोपे आहे. स्पृश्य व अस्पृश्य हे दोन्हीं वर्ग सारख्या भूमिकेवर असते व मग अस्पृश्यांना जातवार प्रतिनिधी पाहिजे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मागणी केली असती तर त्यांच्या समातावादावर आक्षेप घेणे योग्य ठरले असते. एकाच दर्जाच्या लोकांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भेदभाव माजवू इच्छितात असे मग म्हणता आले असते. पण स्पृश्य व अस्पृश्य तसेच दुर्बल या दोन वर्गात कोणत्याही प्रकारची

समानता नाही हे उघड दिसते आहे. शिक्षण, संपत्ती व लोकसंख्या ह्या तिन्ही बाबतीत या दोन्ही वर्गात जमीन असमानचे अंतर आहे. शिक्षणाच्या बाबतीत स्पृश्य पुढारलेले व अस्पृश्य मागासलेले, संपत्तिच्या बाबतीत स्पृश्य श्रीमंत व अस्पृश्य गरीब व दुर्बल लोकसंख्येच्या बाबतीत स्पृश्य बलवान व अस्पृश्य दुर्बल असा प्रकार आहे. म्हणजे अस्पृश्य समाजाचे पारडे स्पृश्य समाजाच्या पारड्यापेक्षा सर्वच दृष्टीनी हलके आहे. अशा असमान वर्गांना समानतेने वागवावयाचे ठरले तर त्यांच्या परस्पर वागणूकीत कोणताही बदल होण्याची अशा करावयास नको हे उघड आहे.

**मानवतावादाचा पुरस्कार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचाराचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करतांना असे दिसून येते की, त्यांनी प्रामुख्याने मानवतावादाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. समरूपता सामाजिक एकमेसाठी स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची सांगड, दारिद्र्याचे उच्चाटन या चार तत्त्व–विचारांचा मधुर मेळ व सुरेख संगम साधला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठनककीं ंदक ीपे थ्नबजनतं व ीपे त्मसस ळसवद आणि ठनककीं ंदक ीपे वीउउं ग्रंथात मानवतावादाचे विस्तृत विवेचन व विश्लेषण केले आहे. या ग्रंथातील मौलिक विचार भारतातील जनतेचेच काय पण जगातलील मानवांचे हितकल्याण साधु शकलात यात संदेह नाही. म्हणजेच भारताच्या समाज–जीवनाचा विचार केला तर भारतीय समाजासाठी अतिशय योग्य व उपयुक्त असे मौलिक विचार मानवतावादी दष्टीकोणातून असेलले दिसून येतात. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका ठिकाणी हे म्हणतात “माझ्या मतप्रणालीत बंधुतेचे दुसरे नाव कायदा हा निधर्मी असतो. तो एखाद्याला मोडता येतो. परंतू बंधूता म्हणजे मानवता. हा पवित्र धर्म होय.''

वरील प्रकारच्या उद्‌गारावरून मानवाची समानता व धर्मातील विचारांची एकता याला त्यांनी लोकशाहीचा प्राण म्हटले आहे. डॉ. बाबासाहेबा आंबेडकर यांनी समाजाच्या बाबतीत त्यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केला होता. न्यायाच्या बाबतीत तसेच हक्क व अधिकारापच्या बाबतीत समान नितीचा अवलंबन करणे आवश्यक आहे. समतेबरोबर बंधुभावाची भावना आवश्यक आहे. तसेच समाजात सामाजिक समतेसाठी उच्च–नीच, श्रेष्ठ–कनिष्ठ, जातीभेद, धार्मिक भेदभाव, अधिकाराच्या बाबतीत असमानता, हक्काच्या बाबतीत भेद इत्याद गोष्टींना तीव्र स्वरूपाचा विरोध करून समाजात मानवतावादाचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेला दिसून येतो. तसेच त्यांनी मानरवतावादाला लोकशाहीचा प्राण म्हटले आहे.

**सामाजिक समतेवर सामाजिक लोकशाही आधारित**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. तसेच त्यांच्या मतानुसार सामाजिक लोकशाहीची यशस्वीता समाजातील सामाजिक समतेवर आधारलेली आहे. त्यासाठी एका ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ”भारतीयांना राजकीय लोकशाही सामाजिक लोकशाहीवर अधिष्ठीत केली नाही तर ती टिकूच शकणार नाही. कारण सामाजिक लोकशाही ही स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही जीवनाची तत्त्व म्हणून ओळखले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही एक अखंड आणि अभंग अशी त्रिमूर्ती आहे. जर सामाजिक समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांचे, जनतेचे राज्य असणे असा होईल. जर ही समता स्वातंत्र्यशून्य असेल तर ती व्यक्तिंच्या जीवनातील स्वयं प्रेरणा नष्ट करील. जर बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य आणि समता यांची वाढ सहजिकपणे होणार नाही. ज्या जातिभेदामुळे सामाजिक जीवनात तर पडलेत आणि जाती–जातीत मत्सर आणि शत्रुत्त्व निर्माण झालेत त्या जातिभेदाचा त्याग करून भारतीयांनी सामाजिक आणि भावनिक अर्थाने एक राष्ट्र बनावे.”

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार राजकीय लोकशाही ही सामाजिक लोकशाही वर अवलंबून आहे. तसेच समाजातील सामाजिक लोकशाही ही त्या देशातील सामाजिक समतेवर अवलंबून आहे. म्हणजेच सामाजिक लोकशाहीची यशस्वीता सामाजिक समतेवर अवलंबून असलेले दिसून येते.

बाबासाहेबांनी बौद्धर्माचा स्विकार फक्त तो धर्म समानतेवर आधारलेला असल्यामुळे केला आहे. म्हणून त्यांच्या मनाचा कल बौद्ध धर्माकडे असलेला दिसून येतो. त्यांनी हिंदू धर्माचा त्याग केला. त्यांनी "मूकनायक" नावाच्या पक्षिकात एका ठिकाणी ते लिहितात, "हिंदुस्थान म्हणजे विषमतेचे माहेर घर आहे". त्यामुळे त्यांनी भारतातील सामाजिक विषमतेवर कठोर स्वरूपाची टीका व हल्ले केले होते. त्यांनी प्रामुख्याने हिंदू धर्माला सामाजिक विषमतेसाठी कारणीभूत धरले होते. म्हणून समाजाच्या समतेसाठी हिंदू धर्माचा त्याग केला होता.

**समता व स्वातंत्र्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, समतेशिवाय स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही. त्यांनी गोलमेज परिषदेत हा सिद्धांत प्रतिपादन करतांनास ते म्हणतात "समतेविना स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य बेईमानी आहे. इतिहासाच्या गोष्टीकडे पाहतांना भारतीयांनी बुद्धिवादी दृष्टिकोणातून या बाबींचा विचार केलेला नाही. बुद्धिपेक्षा भक्तीला जास्त महत्त्व दिले आहे. समाजात वावरतांना संसाराच्या सर्व पैलूत असे दिसते की, समतेशिवाय स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही. तसेच स्वातंत्र्याशिवाय समतेच्या अधिकाराला काहीच अर्थ नाही. स्वातंत्र्य हे समतेशिवाय पांगळे होईल, त्याला काही व्यवहारिक अर्थ व उपयोगिता राहणार नाही.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजात समता व स्वातंत्र्य हे परस्परपूरक आहेत. दोन्हीही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. समतेशिवाय स्वातंत्र्याला काही अर्थ नाही व स्वातंत्र्याशिवाय समतेचा उपयोग नाही. म्हणून समाजात सर्व व्यक्तींना कोणत्याच प्रकारचा भेदाभेद न करता समता व स्वातंत्र्य याचा अधिकार देण्यास यावा. त्याबाबत जातीयता व अस्पृश्यता या बाबतीत भेदाभेद न करणे आवश्यक आहे.

**सामाजिक विषमतेचे देश उध्वस्त होईल**

भारतातील सामाजिक परिस्थितीत दोन्ही तत्त्वांचा अभाव आहे. हे मान्य करून आपण सामाजिक निर्माण करण्यास सुरूवात केली पाहिजे. या दोन गोष्टीपैकी एक गोष्ट म्हणजे समता. सामाजिक बाबतीत पाहावयाचे तर आपल्या भारतातील समाजरचना पद्धती चढती व उतरती मागणीच्या तत्त्वावर आधारित असल्यामुळे काही जातींना उच्च दर्जा देण्यात आला आहे. आर्थिक बाबाती पाहावयोच तर भारतातील काही लोकांच्या घर गंजात लक्ष्मी वावरत आहे, तर बहुसंख्य लोकांच्या घरात अठरा विश्व दारिद्रय नांदत आहे. अशा परस्पर विरूद्ध स्वरूपाच्या घटनांनी भरगंच्च भरलेल्या आपल्या नव्या राष्ट्रीय जीवनात आपण 1950 ला सूरूवात करणार आहोत. या दिवसापासून राजकीय बाबतीत आपणाला समता मिळणार आहे. पण सामाजिक आणि आर्थिक बाबतीत आपणामध्ये असमता राहणार आहे. "एका माणसाला एका मताचा अधिकार आणि एका मताची किंमत या तत्त्वाची जाणीव आपल्याला राजकीय बाबतीत होणार आहे. सामाजिक आणि आर्थिक बाबतीत आपल्या विशिष्ट सामाजिक रचनेमुळे आपण उपरनिदिष्ट तत्त्वाला 26 जानेवारी 1950 पासून प्रस्थापित करण्याची टाळाटाळ आपण आणखी किती काळ करणार आहोत? ही टाळाटाळ पाहिजे. नाहीतर या परिस्थितीबाबत मनात धुसफूसत असलेले लोक या घटना समितीने प्रचंड परिश्रमाने जी ही भारतीय शासकीय लोकशाही निर्माण केली आहे, तिचे तळपट आकाशत भिरकावून देतील. तसेच

बंधुभावाचे आचरण पाळीत नसेणे ही दुसरी उणीव होय. म्हणून सामाजिक विषमतेने देश उध्वस्त होईल असे त्यांचे मत होते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. बहिष्कृत भारतातील अग्रलेख – रत्नाकर गणवीर पृ. 10, 11, 12, 68, 69, 70, 266, 308.
2. ज्ञानयोगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर – अरंविद ताटके पृ. 49, 50, 51.
3. राष्ट्रोद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर – रघु चि. पेंडसे पृ. 54, 55, 66, 67.
4. अम्बेडकर और सामाजिक न्याय – बी. एल. मेहरदा पृ. 72
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड – 4 मा. प. गांजरे पृ. 101, 111

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# २०. ग्रामीण समुदाय : दुर्बल घटक आणि आव्हाने

**प्रा. डॉ. विलास के. घाटुर्ले**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, शि.म.श्री. कृ. झोटींग पाटील महाविद्यालय, समुद्रपूर.

**प्रस्तावना**

भारत देशात ग्रामीण समुदाय महत्वाचा समुदाय आहे. भारतातील ग्रामीण समुदायाचा अभ्यास करतांना आपल्याला वेगवेगळया पैलुवर लक्ष केंद्रीत करावे लागते. अशा पैलुमध्ये 'जाती' या घटकाचा प्राधान्याने समावेश करावा लागतो. कारण 'जाती' हे अखिल भारतातील ग्रामीण समुदायायचे अविभाज्य अंग आहे. 'ग्रामीण' ही संज्ञा आपल्या डोळयासमोर खेडयातील जीवन दर्शविते म्हणून इथे जातीच्या अभ्यासाला महत्वाचे स्थान आहे. प्राचीन काळापासून ग्रामीण समुदायाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. ग्रामीण समुदायासमोर अनेक प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांची सोडवणूक करणे गरजेचे असते. त्यात शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक हा प्रश्नांचा विचार प्रामुख्याने करण्यात येतो.

आधुनिक काळात जाती मंडळाव्दारे झालेली जागृती, शिक्षणाचा प्रसार, व्यावसायिक गतिशीलता, आर्थिक व्यवहाराला असलेले प्राधान्यता घटनेने प्रदान केलेले अधिकार तरतुदी कायदे लोकांमध्ये निर्माण झालेली आत्माभान जाणीव यासारख्या घटकांचा प्रभाव जाणवतो. प्रत्येक जातीचे सदस्य इतरापेक्षा आपण उच्च असल्याचा दावा करतात. आपले खानपान, वस्त्र प्रावरणे, संस्कार, धार्मिक विधी विधानाच्या अभ्यासमातून वरच्या जातीच अनुकरण करतात. शासनाने खुले मागासलेले अनुसुचितजाती, अनुसूची जमाती, भटक्या व विमृक्त जाती इत्यादी प्रवर्ग तयार आहे. सामाजिक स्तर उंचावण्याच्या व त्यातील उपेक्षितवर्गाला विशेष संरक्षण देण्याच्या उदेशाने असे विभाजन करण्यात आले आहे.

आज जन्माने प्राप्त होणाऱ्या जाती स्तरापेक्षा खालच्या वर्ग स्तरासाठी सदस्यता अर्ज करण्यासाठी लोक प्रयत्नशील राहतील असे असले तरी ग्रामीण समाजापेक्षा शहरी समाजरतील जातीची ओळख अशा प्रकारच्या विभानातुन होते.

'खेडी' ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत आजही उत्पादन व रोजगार निर्मितीच्याबाबतीत कृषिक्षेत्र आघाडीवर आहे. मनुष्य व निसर्ग यांचे नाते लक्षात घेता मानवाच्या मुळ गरजा पूर्ण करण्याच्या प्रयत्नातून शेतीचा शोध लागला 'जगा व जगू द्या' तत्वानुसार शेतीचा प्रारंभ झाला आहे. सर्वच समाज हा शेतीवर अवलंबून आहे.''

महात्मा गांधीजीनी गांवाच्या आर्थिक आणि राजकीय विकासावर भर दिला तेव्हा ते म्हणाले होते ''जर गावे नष्ट झाली तर भारतही नष्ट होईल'' कृषी विषयक नियोजनामध्ये कृषिउत्पादनात वाढ करणे, आधुनिक अवजारे वापरणे शेतीच्या आधुनिक पध्दतीचा वापर करणे उत्तम बि—बियाने निर्माण करणे शास्त्रीय

पध्दतीने शेती करणे, जल सिंचन सुविधामध्ये सुधारणा आणि वाढ करणे याव्दारे ग्रामीण समुदायाचा विकास घडून येऊ शकतो.

अनुसुचीत जाती जमातीतील दुर्बल घटकाचा विकास होण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक इत्यादी प्रश्नांची सोडवणूक करणे गरजेचे आहे. त्यातून दुर्बल घटकांचा विकास होण्यास मदत होऊ शकते. आर्थिक विकासातून दुर्बल घटकांपुढील दारिद्रिय, बेकारी, बेरोजगारीचे प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते त्यांच्या ज्या काही गरजा असतात त्या पूर्ण होण्यास मदत होऊ शकते. आर्थिक विकास झाला तर त्यापुढील प्रश्नांची सोडवणूक करता येते. रोजगाराचा अभाव आरोग्याच्या सुखसोयी नाहीत, शिक्षणाच्या संधी नाही. यामुळे दुर्बल घटकापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. अज्ञान, अंधश्रध्दा व अत्याचारचे प्रकार मोठया प्रमाणात वाढू लागले वैश्विकरणाचा नारा आता जोरा धरत असल्याने नव्या जागतिक अर्थव्यवस्थे दुर्बल घटकांचे नियोजन करण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारणे लोकप्रतिनिधीसंबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीची निवड करून त्याचे प्रश्न सोडविले पाहिजेत.

घटनेच्या ३४० व्या कलमात मागास जमाती करिता विशेष सवलतीचा उल्लेख केला आहे. या व अशा कलमांतर्गत दुर्बल घटकांसाठी आवश्यक त्या तरतूदी केल्या जातात. त्यामुळे त्यांचा स्तर उंचावण्याच्या दृष्टीने मदत होते.

मात्र मागास वर्गाची कोणतीही स्पष्ट व्याख्या आजपर्यंत केलेली दिसून येत नाही. ज्याच्या आधारावरून आपल्याला हा वर्ग निश्चित करण्यासाठी मदत होऊ शकते.

१. जाती स्तरीकणात खालचा स्तर आहे.

२. शिक्षणाच्या प्रगतीचा अभाव दिसून येत नाही.

३. राजकीय सेवामध्ये पर्याप्त प्रतिनिधत्व दिसून येत नाही.

या करिता आयोगाने खालील वर्गाच्या व्यक्तीना मागासलेल्या वर्गात समाविष्ट केले आहे.

१. अस्पृश्यतेचा कारणांनी ज्या जाती पीडित आहेत.

२. ज्या जनजाती आजच्या सामाजिक संघटनांशी स्वत:चे समन्वय करू शकत नाही.

३. समाजामध्ये ज्यांची कोणतीच सामाजिक प्रतिष्ठा राहू शकत नाही.

४. जे समुदाय भूमिहीन आहे.

५. जे शिक्षणापासून दूर राहिले आहे.

६. ज्यांना राजकीय सेवामध्ये काहीच प्रतिनिधीत्व मिळू शकत नाही.

आयोगाने मागासवर्गीयाबाबत ही माहिती आपल्या अहवालात दिली आहे.

भारतीय संविधानानूसार जाती—जमातीतील खालच्या वर्ग जो शैक्षणिक व सामाजीक दृष्टया मागासलेला आहे त्यांचा समावेश प्रामुख्याने अनुसूचित जाती व जमातीमध्ये करण्यात येतो.

इतर मागास वर्गात खालील वर्गाचा समावेश होतो.

१. काही जमाती मोठया प्रमाणांत शेती व शेतमजुरी किंवा भूमिहीन श्रमीक म्हणून काम करतात.

२. अल्पभूधारक शेतकरी

३. काही जाती जमाती शेती पशु पालन, मासेमारी करतात

४. कारागीर व वंशपरंपरेनुसार धंदा करणारे लोक उदा: चांभार, मांग इत्यादी.

५. जे लोक शिक्षण घेऊ शकले नाहीत त्व ज्यांना सरकारी नोकरीत प्राधान्य मिळू शकले नाही.

६. मुस्लीम समाज, ख्रिश्चन यांच्यामधून जे सामाजिक, शैक्षणिक दृष्टया मागासले आहे.

**मागासवर्गीयांचे निकर्ष पुढील प्रमाणे आहे.**

सर्व साधारपणे मागासलेल्या जाती जमातीचे निकर्ष काढता येत नाही १८५३ मध्ये मागास जाती जमातीसाठी जे आयोग नेमण्यात आले होते त्यानुसार निकष काढला जातो.

१. हिंदु समाजात परंपरागत चालत आलेल्या.

२. समुदायातील मोठया प्रमाणात शैक्षणिक कमतरता असलेले.

३. सरकारी नोकरीत

४. ज्या जाती जमातीचा समावेश अपृश्यता कलंक लावला जातो.

५. समाजातील उपेक्षित घटकांना अनेक वर्षापासून अपराधी नेमले जातात.

**सदंर्भ**

१. ग्रामीण समाजशास्त्र स्वरूप व व्यक्ती — लेखक डॉ. नारायण चौधरी

२. जाती व्यवस्था व अर्थव्यवस्था — डॉ. भा. कि. खडसे

३. योजना ऑगस्ट १९९९ — लेखक श्रीनिवास कुलकर्णी

४. योजना जानेवारी १९९६ — लेखक एस. सी. गांगल

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# २१. असंघटित क्षेत्रातील कामकरी महिलांवरील अत्याचार

**डॉ. माया बी. मसराम**
शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय गडचांदूर, जि. चंद्रपूर.

**सारांश**

ग्रामीण भागातील स्त्री रोजंदारीवर काम करीत असतो. रोजंदारीवर काम करणे ही त्या स्त्रीची एक प्रकारची नोकरीच असते. अशा ठिकाणी काम करताना तिला अनेक समस्या निर्माण होतात. एखाद्या कामगार महिलांचे लैंगिक शोषण झाले, तरी तिला न्याय मिळत नाही. आर्थिक दुर्बलता अशिक्षितपणा आणि अज्ञान यामुळे ग्रामीण स्त्रीला न्याय मिळू शकत नाही. तिच्यापर्यंत न्याय देवता पोहोचत नाही. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या समित्या आहेत. या समित्या मार्फत त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी त्या आपली तक्रार करतात पण ग्रामीण स्त्रियांसाठी कोणताच फायदा नसतो. या असंघटित क्षेत्रातील महिला कार्यालयात काम करीत नाही. पण त्यांचेही काम करण्याचे ठराविक अथवा फिरते क्षेत्र असतात. कामातून अर्थार्जन करून आपले व कुटुंबाचे पालन पोषण करण्याचा त्यांचा हक्क हा कायद्यात संरक्षित केला आहे. भारतात काम करणाऱ्या महिलांची संख्या फार मोठी आहे. शेतमजूर, मोलकरीन, मालाची विक्री करणाऱ्या अश्या विविध प्रकारचे काम महिला करीत असतात. या महिलांच्या विविध समस्या आहेत बाहेरच्या ठिकाणी काम करीत असताना त्यांना सतत स्वतःच्या चारित्र्याची काळजी घ्यावी लागते. अश्या भीतीच्या वातावरणात तिला काम करावे लागत असेल तर त्याचा विपरीत परिणाम तिच्या आरोग्यावर होत असतो.

एखाद्या स्त्रीला आकर्षित करण्यासाठी कामाच्या ठिकाणी अवाजवी महत्त्व देणे. किंवा तिच्याकडे दुर्लक्ष करणे काम करत असताना तिच्या कामाच्या खात्री बद्दल भितीदायक वातावरण तयार करणे. तिच्या कामांमध्ये लुडबुड करणे, विरोध करणे व अमानवी व्यवहार करणे, अपमानजनक वागणूक देणे, त्यामुळे स्त्रियांच्या आरोग्यावर आणि सुरक्षिततेवर परिणाम होईल अशा प्रकारचा तिचा लैंगिक छळ केला जातो. तिने ह्या सर्व गोष्टीचा सामना करण्याची हिंमत दाखविली तर तिला बदनाम करून कामावरून काढून टाकले जाते. या स्त्रिया कमी शिक्षित असल्याने आपल्या कुटुंबाची बदनामी होईल या भीतीने कुणाकडेही तक्रार करीत नाही. हणूनच गुन्हा करणाऱ्या व्यक्तीचे धाडस आणखी वाढत जाते. म्हणून असंघटित क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांना मनाविरुद्ध किंवा एखाद्या सुरक्षित स्थळी जावे लागत असेल, काही कृती करावी लागत असेल अशा वेळी ठामपणे नकार द्यावा, नाही म्हणावा, त्यावेळी समोरच्या व्यक्तीला आवडेल का याचा विचार करीत बसू नये, स्वतःची काळजी आपण घेतली पाहिजे कोणत्या प्रकारच्या व्यक्तीपासून तुम्हाला धोका वाटत असेल तर त्या विषयी सतर्क राहा. गाफील राहू नका. तुम्हाला कोणी सावध करीत

असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. समजा कोणत्या महिलांचे शील भंग झाले असेल तर त्या महिलांची तक्रार पहिल्यांदा नोंदविली जावी. त्यासाठी विलंब होता कामा नये. आणि वास्तविक परिस्थिती लक्षात घेऊन या महिलेला लवकरात लवकर न्याय मिळवून दिला पाहिजे. गुन्हा करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

**मुख्य शब्द** – महिला, अत्याचार, असंघटित, कामगार ठिकाण, समस्या, शेतमजूर, लैंगिक छळ

**उद्देश**

१. असंघटित क्षेत्रातील महिलांच्या समस्येचा आढावा घेणे

२. लैंगिक अत्याचारा विषयी माहिती करून देणे

३. लैंगिक छळाचा महिलांच्या आरोग्यावर कोणता परिणाम होते ते जाणून घेणे

**अध्ययन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, नेट, इंटरनेट, या सारख्या साधनांचा वापर करण्यात आला

**प्रस्तावना**

प्राचीन कुटुंब संस्था ही आदर्श स्वरूपाची तसेच नैतिक व संघटित स्वरूपाची म्हणून अस्तित्वात होती. परंतु परिवर्तनाच्या ओघांमध्ये प्रत्येक समाज रचनेतील व प्रत्येक संस्थेमध्ये कोणते ना कोणते परिवर्तन घडून येते. काळानुसार माणसाच्या गरजा बदलतात वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी मानव आपल्या बळाचा सातत्याने उपयोग करीत असतो आणि नवीन गोष्टीचा शोध लावतो. त्यामुळे सामाजिक संरचनेत परिवर्तन घडून येते. भारतीय समाजात कुटुंब संस्थेमध्ये पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव, जागतिकीकरणाचा प्रभाव, नागरीकरणाचा प्रभाव, कार्य व दर्जा मधील बदल, व्यक्तिवादी दृष्टीकोण, विवाह व लैंगिक संस्थांमधील बदल, जीवन शैलीतील बदल, नवीन तंत्रज्ञान अशा अनेक कारणामुळे कुटुंब व्यवस्थेत परिवर्तन होत आहे. त्या परिवर्तनाचा प्रभाव मानवावर होतो भारतीय पितृसत्ताक कुटुंब पद्धतीने स्त्रियांवर अनेक आघात केले. धार्मिक ग्रंथ आणि मनुस्मृतीने स्त्रियांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीवर अनेक बंधने लादून तिला पूर्णपणे बंदिस्त करून टाकले. त्यातून तिला बाहेर पडण्याचा मार्गच मिळत नव्हता. कारण ईश्वराच्या भीतीपोटी स्त्री देखील सर्व अन्याय अत्याचार सहन करीत होतीच. तिला तिच्यावर होत असलेल्या अन्याय व अत्याचाराची जाणीवच होत नव्हती. अज्ञानामुळे हे सर्व अत्याचार ती सहन करीत होती. पशु पेक्षाही हिनं दर्जाची वागणूक भारतीय स्त्रियांच्या वाट्याला आली होती. ती केवळ अपत्यांना जन्म देणारी खान समजल्या जात होती. कुटुंबात तिचा विचार मानव म्हणून केल्या जात नव्हता. ती केवळ उपभोगाची वस्तू म्हणून तिचा वापर होत होता. कुटुंबामध्ये स्त्रीला आई म्हणुनच मान मिळत होता. कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेत नव्हते अनेक प्रकारची बंधने तिच्यावर लादून तिचे आर्थिक सामाजिक मानसिक व शारीरिक शोषण होत होते. देशाला स्वातंत्र्य मिळून बरीच वर्षे झाली तरीही

भारतीय समाजात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा बदललेला दिसत नाही. स्त्रिया शिक्षणाने पुढे येत आहे. परंतु अजूनही तिच्यावर धार्मिक परंपरेचा प्रभाव असल्यामुळे त्यांच्या समस्या संपलेल्या नाही. स्त्री अत्याचाराविषयी कितीही कायदे असले तरी तिथे प्रश्न सुटले असे म्हणता येत नाही. एकोणिसाव्या शतकामध्ये समाजवादी विचारसरणीचा व मूल्याचा प्रभाव पडून त्यामध्ये स्त्रियांना अनेक अधिकार व हक्क देण्यात आले. राजा राम मोहन रॉय यांनी 1929 मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना करून सती प्रथा बंद केली. आर्य समाजाने बाल विवाह प्रथा पद्धती बंद केली. 1856 मध्ये विधवा पुनर्विवाह अधिनियम, 1872 स्त्री संपत्ती नियम, 1955 चा हिंदू विवाह कायदा 1956 चा वारसा हक्क कायदा, आणि 1961 चा हुंडा प्रतिबंधक कायदा अशा कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या दर्जा व अधिकारामध्ये सुधारणा घडून आणण्याचा प्रयत्न केला.

स्त्री ही एक मानव आहे, ती सृष्टीची जननी आहे. मानवाच्या उत्पत्तीची जननी आहे. स्त्री शिवाय कोणत्याही समाजाची आपण कल्पनाच करू शकत नाही. स्त्री शिवाय पुरुष व पुरुषाशिवाय स्त्री राहणे शक्य नाही. हे दोन्ही घटक कुटुंबाचा आधार स्तंभ आहे. निसर्गाने दोघांनाही सारखेच बळ दिले आहे. पण दोघांची घडण मात्र वेगळ्या पद्धतीने केली आहे हा भेद सोडला तर स्त्री आणि पुरुष समान आहे. ते दोघेही संसार रुपी एका गाड्याची दोन चाके आहेत. म्हणूनच स्त्री ही पुरुषांच्या संसार रुपी जीवनात त्याला सातत्याने सहकार्य करून आपले घर सांभाळते. प्राचीन काळात पुरुषाने शिकार केली तर त्या शिकारीला साफ करण्याचे काम स्त्रियांनी केले. शेतीमध्ये पुरुषांच्या बरोबरीने तिनेही सहभाग घेतला आहे. पुरुषांच्या प्रत्येक आर्थिक क्रियांमध्ये स्त्रियांचा सहभाग होता. त्यांच्या सहकार्य, समायोजनावरच कुटुंबाचे अस्तित्व आणि विकास निर्भर आहे. वर्तमान परिस्थितीमध्ये स्त्रियांवरील अत्याचाराला हा उधान आलेले दिसून येते. अलीकडच्या काळात सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांच्या कार्याला यश येऊन स्त्रीला शिक्षण मिळाले. शिक्षणामध्ये स्त्रिया पुढे येत आहे. अनेक क्षेत्रात काम करताना आढळून येते. शिक्षण घेऊन ती आत्मनिर्भर बनली स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. समाज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी मारली. हे जरी खरे असले तरी तिच्यासमोर अनेक समस्या आहेत. किमान गरजा पूर्ण करण्यासाठी असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कामगारांना समान वेतन कायदा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केला. तशी तरतूद संविधानामध्ये ही करून ठेवली आहे. पण तरीही महिला कामगारांची या विवंचनेतून सुटका झालेली नाही. शिक्षणामुळे मोठ्या संख्येने स्त्रिया घराबाहेर काम करण्यासाठी जात आहेत. किमान वेतन निश्चिती, कामाची हमी, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, लिंगभेद, आर्थिक पिळवणूक, व्यसनाधीनता, आरोग्य, मुलाचे शिक्षण, यासारखे अनेक प्रश्न या महिला समोर आहेत. पण तरीही या बाबतीत कोणते ठोस धोरण दिसत नाही.

बांधकाम किंवा शेतमजुरी या क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करतात दोघांच्याही कामाचे स्वरूप आणि वेळ सारखीच असते पण तरीही स्त्री पुरुषापेक्षा कमी काम करते, अशा धारणेने लिंगभेद

करून स्त्रियांना पुरुषाच्या तुलनेत कमी मजुरी दिली जाते. शहरी कामगार महिलांचा विचार केला असता असे चित्र दिसून येते की या महिलांना सकाळी मोक्याच्या ठिकाणी काम शोधण्यासाठी तासन्तास उभे राहावे लागते, अशा वेळी या महिलांना अनेक समस्यांना समोरे जावे, लागते बिल्डिंग बांधकामासाठी, ज्या महिला रोजगार म्हणून काम करतात त्यांचे मनोगत विचारल्यावर त्या बोलून दाखवितात त्या ठिकाणी त्यांना आपल्या अपत्यांना हि सोबत घेऊन जावे लागते. त्यांना मिळणारी मजुरी पुरुषांच्या तुलनेत बरीच कमी असते. काही वेळेला बिल्डिंग ठेकेदाराच्या हाताखाली काम करताना, त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो, काही वेळेला त्यांची मर्जी सांभाळावी लागते, अशा वेळी कुटुंबात ह्या गोष्टी सांगितल्या त्या कुटुंबाची बदनामी होते, इतकेच नव्हे तर तिच्या चारित्र्यावर संशय व्यक्त केला जातो. मग तिने न्याय कोणाला मागावा हा गंभीर प्रश्न तिच्यासमोर असतो. अशावेळी कामगार महिला ह्या सर्व अत्याचार सहन करीत असते. स्वतःच्या हिमतीवर घर चालवणाऱ्या महिला कामगार या महत्त्वाच्या वर्किंग फोर्स घरगुती काम करणाऱ्या, कंपनी कामगार, मातीकाम व शेतमजूर या असंघटित क्षेत्रातील महिलांच्या कार्य क्षेत्राला कोणतेही वलय नसते. कामावर असताना या महिला कडे वाईट नजरेने पाहिले जाते काही वेळेला तिला कोणाच्या तरी लैंगिक छळाचा बळी पडावे लागते. पोटापाण्याचा प्रश्न असल्यामुळे या अत्याचाराची वाच्यता कुठेही केली जात नाही. आणि तिने लैंगिक अत्याचारा विषयी सांगितले तर कुटुंबाकडून तिला कोणतेच पाठबळ मिळत नाही. उलट तिची बदनामी होते. कामावरून काढून देईल या भीतीमुळे तिला नाईलाजाने तिथेच काम करावे लागते.

स्त्रियांवर अत्याचार करणे किंवा छेळखानी करणे हा प्रश्न फार प्राचीन आहे. अगदी पौराणिक साहित्याकडे लक्ष टाकल्यास असे लक्षात येते. की स्त्रिया वरील अत्याचार हे प्राचीन हिंदू धर्मात धर्म सहमत मारल्याचे दिसून येते. जसे गौतम ऋषीची पत्नी अहिल्या हे दिसायला फार सुंदर होती. इंद्राला तिचा मोह उत्पन्न झाला. आणि त्याने कपटाने तिचे शील भ्रष्ट केले. गौतम ऋषि ला हे समजल्यावर त्याने इंद्राला शिक्षा न देता पत्नीचाच दोष आहे असे मान्य करून तिला शिक्षा दिली. म्हणजे चूक करायची पुरुषांनी आणि भोग मात्र स्त्रीने भोगायचे. स्त्री जेव्हा घुंगट मध्ये होती तेव्हा ती आपल्या व्यथा लोकगीत, लोककला मधून मांडत होती. समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. अशी मनो भावना व्यक्त करीत होती. जात्यावर दळण दळताना लोकगीत म्हणायच्या ते म्हणजे ' पिडा तो मैंने सही सैयां का लाल कैसा हुआ ' मुलांना नऊ महिने स्त्रीने गर्भात वाढवायचे त्याला दूध दूध पाजणे त्याच्या सर्व गरजा पूर्ण करायच्या पण नाव मात्र वडीलाचे कसे, असा आवाज त्याही काळात काढल्या जात होता. पण अलीकडे मात्र स्त्रियांना माता म्हणून नाव मुलांच्या दाखल खारीज मध्ये टाकले जाते. शेतमजूर असणाऱ्या महिला पहाटे उठून रात्री उशिरापर्यंत काम करतात, पाणी आणणे, स्वयंपाक करणे, तसेच घरातील इतर कामे तिलाच करावी लागते. आठवड्याची एकही सुट्टी तिला मिळत नाही. सलग तिन ते चार महिने ह्या महिला काम करतात. त्यामुळे त्या आपल्या आरोग्याकडे फारसे लक्ष देत नाही. काही स्त्रियांचे पती मद्यपान करणारे असल्यामुळे

या स्त्रिया कडून त्यांनी मेहनतीने कमावलेला पैसा हिसकावून घेऊन दारूमध्ये खर्च केला जातो. त्यामुळे अशा महिलांना शारीरिक व मानसिक तणावाला सामोरे जावे लागते. त्यांच्यासमोर मुलाबाळांच्या पालनपोषणाचा प्रश्न निर्माण होतो. ग्रामीण भागातील या शेतमजुरी करणाऱ्या महिलांचे लवकर लग्न होते. लग्न झाल्यामुळे लवकर गर्भधारणा, गर्भपात या परिस्थितीतून अनेक कमी वयाच्या मुलींना जावे लागते. प्रसुतीनंतर सतत त्यांना परिश्रमाची कामे करावी लागतात. पुरेशी विश्रांती न मिळाल्याने त्यांना अनेक आजारांचा सामना करावा लागतो. गरोदर महिलांनाही काम करावे लागते. अशा वेळी काही महिलांचा गर्भपातही होऊ शकतो पुरुषांच्या बरोबरीने काम केला तरी त्यांना मिळणारी मजुरी मात्र पुरुषांच्या तुलनेत फार कमी मिळते. म्हणून अश्या असंघटित क्षेत्रातील महिलांच्या विकासाच्या दृष्टीने शासनाने ठोस पावले उचलली पाहिजे.

**निष्कर्ष**

कामाच्या ठिकाणी होणारा अत्याचार ही नवीन गोष्ट नाही देशाला स्वातंत्र्य मिळून बरीच वर्षे झाली पण स्त्रियांच्या विविध समस्या संपलेल्या नाही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्री शिक्षणाने स्त्रियांमध्ये आत्मिक बळ निर्माण होऊन बऱ्याच स्त्रिया घराच्या बाहेर काम करण्यासाठी जातात. तसे पाहिले असता प्राचीन काळापासूनच स्त्रिया पुरुषांच्या आर्थिक कार्यात सहकार्य करीत आल्या आहेत. पुरुषांचे पीठ तर स्त्रियांचे तेल मीठ अशा प्रकारे स्त्रिया पुरुषांच्या कार्यात सातत्याने योगदान देत आल्या आहेत. पण आमच्या धर्मग्रंथाने स्त्रीला केवळ उपभोगाची वस्तू मानून तिला समाजात दुय्यम स्थान दिले आहे. परंपरेने चालत आलेल्या व्यवस्थेत पाहिजे तो बदल झालेला नाही. म्हणून स्त्रियांना लैंगिक अत्याचाराच्या बळी ठराव्या लागतात. लैंगिक अत्याचारा विषयी कायदा असूनही त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याने स्त्रियांना न्याय मिळत नाही पीडित स्त्रियांच्या पाठीशी उभे राहण्याकरिता कोणी फारसा पुढाकार घेत नाही आणि घेतला तरी तिला न्याय मिळण्यासाठी बराच विलंब लागतो आज शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने स्त्रिया कामाला जातात तिच्या सुरक्षेचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात भेडसावतो

असंघटित क्षेत्रातील स्त्रियांचे शिक्षण अल्प काही स्त्रिया निरक्षर, आर्थिक दुर्बल आणि आत्मविश्वासाची कमतरता यामुळे अनेक ग्रामीण स्त्रिया आपल्यावरचा अन्याय मांडू शकत नाही. न्याय मागायला कुठे जावे हे त्यांना माहीत नाही त्यामुळे ग्रामीण असंघटित क्षेत्रातील महिला साठी तक्रार समिती असावी. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या शेतमजूर, मोकरीन विटाभट्टी मजूर, बांधकाम मजूर, काही महिलांचे पती मद्यपान करतात त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो. कारण मध्य पानामध्ये त्यांना मानसिक शारीरिक त्रास देऊन अपमान जनक वागणूक दिली जाते. त्यामुळे या स्त्रिया रोजच्या कटकटीला त्रास होऊन जातात. मुलांचा पालनपोषणाचा प्रश्न असल्याने त्या तो अत्याचार सहन करीत दिवस काढतात. अशा महिलांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो 21 शतकात भारतात 2001 हे वर्ष महिला स-शक्तिकरणाचे वर्ष म्हणून घोषित केले या वर्षात महिलांवर होणाऱ्या अत्याचारा

विषयी ठोस पावले उचलण्यात आली. महिला साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. बचत गटाच्या माध्यमातून काही स्त्रियांना स्वतःचा रोजगार निर्माण करून आपल्या कुटुंबाचा सांभाळ करताना आढळून येत आहे. याही स्त्रियांचा आदर करायला पाहिजे. तिला कुटुंबात, कामावर सन्मानाने वागविले जावे तर स्त्रियांमध्ये असणाऱ्या भितीचा नायनाट होऊन ती सन्मानाने काम करेल.

**संदर्भ सूची**

१. भारतीय महिला - नही दिशाये - संपादन - रोमी शर्मा - प्रकाशन विभाग सूचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार
२. आधुनिक समाज मे स्त्री - आशाराणी व्होरा - श्री नटराज प्रकाशन साऊथ नई दिल्ली 110053
३. महात्मा ज्योतिराव फुले - धनंजय कीर - पाप्युलर प्रकाशन मुंबई
४. रोजगार हमी योजना आणि शेतमजूर स्त्रियांचे आर्थिक सबलीकरण - ए. गायकवाड एम जे प्रशांत पब्लिकेशन जळगाव

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# २२. ग्रामीण महिलांच्या समस्या - एक अध्ययन

**प्रा. डॉ. जयमाला पुं. लाडे**
मिलिंद महाविद्यालय, मुळावा.

**प्रस्तावना**

प्रस्तुत शोधनिबंध विदर्भ मराठी समाजशास्त्र अधिवेश दि.२ मार्च २०२२ ला होत असलेल्या अधिवेशनाकरीता सादर करीत आहे. भारतीय समाज हा कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे भारत देश ग्रामिण विभागातच अधिक व्यापलेला आहे. परंतु आजच्या आधुनिक काळात औद्योगिकरण व शहरीकरणाच्या प्रक्रियेमुळे शहरी लोकसंख्या वाढत जरी असली तरी भारतीय समाजाचा अभ्यास करीत असतांना ग्रामिण समाजाचा अभ्यास हा करावाच लागतो. प्रस्तुत निबंधात ग्रामीण समाजातील महिलांच्या विविध सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. औद्योगिकरण, तांत्रिक साधने, सरकारची विविध धोरणे (कृषिविषयक, आर्थिक, आंतरराष्ट्रीय) शैक्षणिक धोरण, घटनात्मक तरतुदी, महिलांविषयक असलेली विविध कायदे या सर्वांचा परिणाम ग्रामिण समाजावर झालेला आहे. ग्रामिण समुदायातील जीवन पध्दती, शेती, संस्कृती, भाषा, शिक्षण या अनेक घटकांत बदल झालेला आहे. या सर्वांचा महिलांच्या जिवनावर चांगला—वाईट परिणाम झालेला आहे. प्रस्तुत निबंधात ग्रामिण महिलांना भेडसावित असलेल्या प्रश्नांचा इथे उहापोह केलेला आहे. हे पाहत असतांना ग्रामिण समाज म्हणजे काय, भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान व ग्रामिण महिलांच्या समस्या यावर प्रकाश टाकणार आहे. तसेच स्त्रियांच्या विविध समस्यांवरील उपायोजना सुचविणे हा सुध्दा शोधनिबंधाचा उद्‌देश आहे.

कोणत्याही समाजाची वास्तविक परिस्थिती जाणून घ्यावयाची ठरल्यास एक महत्वाचे माध्यम म्हणजे त्या समाजातील महिला व विशेष करून ग्रामिण महिलांची परिस्थिती काय आहे ते जाणुन घेणे त्यांना काय अधिकार आहेत? त्यांच्या जीवनामधील अनेक मुलभुत समस्यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. त्याचबरोबर समाजाच्या व शासनाच्या वतीने त्यांना दिली जाणारी वागणूक व त्यांच्या विकासाकरीता केले जाणारे प्रयत्न इत्यादी निकषांच्या आधारे समाजाचे स्थान निश्चित करता येवु शकते. भारतीय इतिहासाचा आढावा घेतला असता वरवर पाहता स्त्रियांचा गौरव करण्यात आलेला आहे. परंतु प्राचीन काळापासुन ते आजपर्यंत महिलांच्या वाट्याला दुय्यम स्थान आले आहे. त्यातल्या त्यात भारतीय ग्रामिण महिलांची स्थिती संतोषजनक नाही. ग्रामिण महिलांचे सामाजिक, शारिरिक, मानसिक व बौध्दिक दृष्टिकोनातुन पुरूषांच्या तुलनेत अधिक शोषण झालेले दिसते. यामुळे समाज व राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेपासुन ग्रामिण महिलांचा एक मोठा वर्ग उपेक्षित राहिला आहे. त्यामुळे विकास प्रक्रीयेत बाधा येते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने २००७ मध्ये दरवर्षी १५ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय ग्रामिण महिला दिवस म्हणून साजरा करण्यासंबंधी ठराव संमत केला. ही कल्पना सर्वप्रथम सन १९९५ च्या बिजींग येथील जागतीक महिला परिषदेमध्ये मांडली होती. दरवर्षी १६ ऑक्टोबर हा जागतिक अन्न दिवस म्हणून साजरा करण्यात येतो व त्याचे औचित्य साधून १५ ऑक्टोबरला ग्रामिण महिला ज्या खऱ्या अर्थाने अन्नदात्या आहेत

त्यांच्या नावाने साजरा करावा असे आव्हान आंतरराष्ट्रीय महिला संघटनांनी केले होते. त्यामुळे काही देशांमध्ये १९९७ पासुन हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने २००७ साली एका महत्वाच्या ठरवाव्दारे औपचारीक मान्यता दिली व २००८ पासुन तो अनेक देशांनी अंमलात आणण्यास सुरूवात केली. या ठरावामध्ये ग्रामीण विकास अन्नसुरक्षा आणि गरिबीचे निवारण यांमधील ग्रामिण महिलांचे योगदान असल्याचे नमुद केले आहे. तसेच ग्रामिण महिलांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण करणे लिंगभाव, जात—धर्म—वर्ग सारख्या विषमतेमुळे निर्माण झाालेले अडथळे दूर करून त्यांचा संपूर्ण सहभाग घडवणे, कायदे व धोरणे यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून ग्रामीण लोकांच्या जीवनामध्ये वर्षानुवर्षे चालत आलेल्या समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर उपाय योजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

**ग्रामिण समाजाचा अर्थ**

२०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण लोकसंख्या ६८.८४ टक्के आहे. भारतातील ग्रामीण लोकसंख्या कमी होत आहे तर नागरी लोकसंख्या वाढत आहे. भारत हा कृषीप्रधान व खेड्यांचा देश आहे. भारतातील ग्रामीण समुदाय हा शेती व शेतीशी संबंधित पुरक व्यवसाय करणारा समाज आहे. भारतातील शेती ही निसर्गाच्या लहरींवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीसोबत जोडधंदा नसेल तर ग्रामीण समुदायात अनेक आर्थिक व सामजिक समस्या निर्माण होतात. मानवी समाजाच्या उत्क्रांतीच्या इतिहासात कृषी क्रांती ही मानवाच्या स्थिर जीवनाला विशेष कारणीभुत ठरली. शेती व्यवसायाचे प्राथमिक ज्ञान मानवास जेंव्हा प्राप्त झाले तेंव्हापासुन भटक्या अवस्थेतील मानवी जिवनाला स्थिरत्व प्राप्त झाले. शेती हा फक्त मूलभूत व्यवसाय म्हणूनच ओळखला जात नसून ती एक जिवन कंठण्याची विशिष्ट पध्दती आहे. 'ग्राम' या शब्दाचा मूळ अर्थ 'घराचा समुह' असा आहे. सर्व ग्रामाचे मिळून भारत हे राष्ट्र बनले आहे. भारताचा आत्मा खेड्यात राहतो असे म. गांधीनी म्हटले होते. श्री. ना. अत्रे ह्यांनी खंडणे म्हणजे जमीन कसणे व खेडूत म्हणजे जमीन कसणारा तेंव्हा खडुतांची जी वस्ती ते खेडे ज्यामध्ये प्रधान व्यवसाय शेती व ज्यामध्ये प्रमुख वस्ती शेतकऱ्यांनी असते त्या गावाला लोक खेडे किंवा ग्राम म्हणतात अशी व्याख्या केली आहे. परंपरागत स्वरूपात ग्रामिण समाजाचे वर्णन व विवेचन करतांना समाजशास्त्रज्ञांनी एक स्थिर स्वरूपाची व मंदगतीने परिवर्तीत होणारी समाजरंचना म्हणून ग्रामिण समाजाचा उल्लेख आहे. याच अर्थाने ग्रामीण समाज हा नागरी समाजाहून वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रामीण भूभागातील लोकांवर नैसर्गिक पर्यावरणाचा बराच प्रभाव असतो. या पर्यावरणाचा सामाजिक जिवनावर प्रभाव असतो. त्यातूनच रूढी, प्रथा, परंपरा निर्माण झालेल्या आहेत.

**समाजिक समस्येचा अर्थ**

समाजिक समस्यांचे अध्ययन करीत असतांना सर्वप्रथम सामाजिक समस्या म्हणजे काय, हे समजून घेणे आवश्यक असते. सामाजिक समस्या म्हणजे एखाद्या समाजातील लक्षणीय संख्येच्या व्यक्तीच्या सामाजिक वर्तनातील बिघाड किंवा पथभ्रष्टता जी त्या समाजातील इतर अनेक सदस्यांना गंभीर परिणाम भोगावयास लागते. एखाद्या समाजातील बहुसंख्य सदस्य जेंव्हा व्यवहाराच्या पध्दतीला किंवा परिस्थितीला आपत्तीकारक अथवा अयोग्य मानतात तेंव्हा त्या सामाजिक समस्या होत. तसेच त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि त्यांची व्याप्ती कमी करण्यासाठी सुधारात्मक धोरणे योजना व प्रत्यक्ष सेवाकार्याची आवश्यकता आहे.

**उद्दिष्टे**

१. स्त्रियांची सामाजिक स्थिती अभ्यासणे

२. ग्रामीण स्त्रियांच्या मुलभूत समस्या अभ्यासणे

३. स्त्रियांच्या विविध समस्यांवरील उपाययोजना सूचविणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी 'ग्रामिण महिलांच्या समस्या'—एक अध्ययन या शिर्षकाअंतर्गत अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये संशोधन निबंध, पुस्तके, जर्नल्स, संकेतस्थळ यांच्या माध्यमातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

जगातील सर्व समाजात स्त्रिचे अस्तित्व महत्वाचे आहे. तिच्याशिवाय पर्याय नाही असे उर्दुतील प्रसिध्द कवी अलामा इकबाल यांनी म्हटले आहे. परंतु तरीही जगभरात आपल्याला स्त्री—पुरूष समानता आढळत नाही. त्यामुळे स्त्रियांच्या जिवनात अनेक समस्या निर्माण झाल्यात.

**भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान**

भारतीय समाजव्यवस्था बहुविध स्वरूपाची आहे. समाज वा राष्ट्राची निर्मिती अनेक कुटुंब, समूह, समिती, संस्था, समुदाय व विभिन्न भूखंडांनी मिळुन बनलेली असते. प्राचीन काळापासून स्त्री आणि पुरूष असे दोन स्तर मानले जातात. भारतात सैध्दांतिक रूपात आजही स्त्रियाला मर्यादा आहे आणि तिचा आदर केल्या जातो. मुखर्जी म्हणतात की, समाजात स्त्रिचा दर्जा आणि मर्यादा तीच आहे. जी पुरूषाची आहे. ''समाज में नारी का स्थान और मर्यादा वही है जो पुरूष की है, न कम और न अधिक'' स्त्री ही शक्ती, धन आणि ज्ञानाचे प्रतिक मानली जाते. तीच नारी राष्ट्रीयतेचे सुध्दा प्रतीक आहे. आपल्या देशाला 'भारत माता' मानून तिच्याप्रती आपली श्रध्दा आपण प्रगट करतो परंतु हे सर्व असून सुध्दा व्यावहारिक रूपात भारतात स्त्रियांची स्थिती विभिन्न काळात कधी उच्च तर कधी निम्म अशी दृष्टीस पडते.

स्त्रीच्या दर्जाकडे दृष्टिक्षेप टाकता असे दिसते की, वैदिक काळा स्त्रियांसाठी सुवर्णकाळ होता. स्त्रियांना कुटुंब व समाजात महत्वाचे स्थान होते, व्यतिमत्व विकासाला भरपूर वाव होता. धर्म, अर्थ, काम व मोक्ष प्राप्तीचा मार्ग पुरूषांप्रमाणेच स्त्रियांनाही खुला असे.

मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांच्या स्वातंत्र्यांचा व अधिकारांचा संकोच होण्याची प्रक्रिया सुरू झाली. समाजात जसजसे नव व्यवसाय सुरू झाले. जाती प्रथा रूढ होत गेली. तसतसे पुरूषांचे बाहेरचे कार्यक्षेत्र विस्तारात गेले आणि स्त्रियांना गौण स्थान दिले. विविध आक्रमणामुळे व लुटमारीमुळे जनजीवन अस्थिर व असुरक्षित झाल्यामुळे स्त्रियांच्या सुरक्षिततेची समस्या निर्माण झाली. पडदा पध्दती सुरू झाली. स्त्रियांच्या सामाजिक जिवनावर मर्यादा पडल्या. अनिष्ठ प्रथा रूढ झाल्या. ती सामाजिक अन्यायाचे भक्ष्य बनली व तिचा समाजातील दर्जा संकीर्ण झाला.

भारतीय स्त्रि जीवनाच्या घसरणीच्या परिस्थितीत अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी अंमल सुरू झाला. त्यांच्या आधुनिक संस्कृतीची जीवनमुल्ये भारतात प्रचलित झाली. त्यांच्या मूल्यांना बुध्दिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, समानता ह्यांचा तात्वीक आधार होता. अनेक महापुरूषांच्या सहभागाने महिला उत्थानाची लाट आली. त्याचबरोबरच भारतीय राज्यघटनेत स्त्री पुरूषांना समान अधिकार दिले गेलेत. ज्या कायद्यामुळे बऱ्याच

प्रमाणात स्त्रियांवर झालेले अन्याय दूर होण्यास मदत झाली. १९५५ च्या विवाहविषयक कायद्याने स्त्रिला संरक्षण दिले. या कायद्याने मुलींकरीता विवाहाचे वय १८ ठरविले. आता ते २१ वर्षे करण्याच्या विचाराधीन आहे. ह्या कायद्यामुळे बालविवाहाच्या प्रथेला कायदेशीर आळा बसला व बहुपत्नीत्व कायद्यान्वये गुन्हा ठरला. १९५६ च्या वारसा हक्क कायद्याने वडिलांच्या संपत्तीत मुलीला देखील समान वाटा मिळाला आहे. Hindu Guardianship Act 1956 नुसार पित्याच्या मृत्युनंतर अज्ञान मुलांच्या संपत्तीची संरक्षक म्हणून आईला प्रथमाधिकार मिळाला. दत्तक ग्रहण अधिनियमानुसार आता मुलीला सुध्दा दत्तक घेता येते. तसेच विधवा विवाह, आंतरजातीय विवाहात सुध्दा मुलीला कोणत्याच कायदेशीर अडचणी राहिलेल्या नाहीत. तसेच १९६१ च्या हुंडा प्रतिबंध कायद्याने हुंडा प्रथेला शह दिला. स्त्रिचा समाजिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टिने हे एक महत्वाचे पाऊल आहे.

म्हणजे आज असे म्हणता येईल की, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात भारतीय स्त्री आज पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा उपभोगत आहे. वैधानिक व्यवस्था, शिक्षणाचा प्रसार ही स्त्रियांच्या सामाजिक उन्नतीमागची कारणे असले तरी पाश्चात्य संस्कृतीचा संपर्क त्या संस्कृतीतून आलेल्या समानता व स्वातंत्र्याची कल्पना, तसेच भारतात मोठ्या प्रमाणात झालेले नागरीकरण व औद्योगिकरण व त्याचा परिणाम संयुक्त कुटुंबाचे विभाजन, नविन अर्थव्यवस्था ही कारणे देखील स्त्रियांच्या परिवर्तनाच्या संदर्भात विशेष महत्वाची आहेत. या नविन अर्थव्यवस्थेने स्त्रियांकरीता नविन—नविन व्यवसाय निर्माण केलेत की, ज्यामुळे त्या या क्षेत्रात काम करून आर्थिकदृष्टया बऱ्याच प्रमाणात स्वयंपूर्ण झाल्या आहेत.

आता पहिल्यापेक्षा स्त्रियांची स्थिती काही बाबतीत बदलत आणि सुधारत आहे हे खरे असले तरी पण एक फार मोठ्या संख्येचा इवलासा भाग आहे. यासाठी जे वास्तव आहे ते पाहणे गरजेचे आहे. कारण आजही स्त्रियांचे स्थान तिच्या वैवाहिक दर्जावरून ठरविले जाते. पुरूषांचे स्थान त्याच्या कर्तुत्वावर ठरते तर स्त्रियांचे स्थान तिच्या वैवाहिक स्थानावरून ठरते. ग्रामिण भागातील महिलांचा विचार केला तर ग्रामीण समाजात विवाह हे अनिवार्य आहे असे समाजमान्य आहे. आजही एखादी मुलगी विवाह न करण्याचा निर्णय घेतला तर तिला कुटुंबाला, समाजाला तोंड द्यावे लागते. मात्र इथे शोधनिबंधात ग्रामीण महिलांच्या समस्यांचे अध्ययन करायचे आहे ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**ग्रामीण स्त्रियांच्या समस्या**

समाज, कुटुंब आणि व्यक्तिचे अस्तित्व हे स्त्री—पुरूषांच्या परस्पर सहकार्य, उत्कटप्रेम, सद्‌भावना त्याग यासारख्या बाबींवर अलवंबून असते. स्त्री शिवाय पुरूष नि समाज असणे शक्य नाही. समाजाचे सातत्य नि अस्तित्व स्त्री च्या उत्कट त्यागावर आधारलेले असल्यामुळे मोठे—मोठे पुरूष असामान्य कर्तव्य करून गेले आहेत. स्त्री स्वत:ला दुय्यम समजून पुरूषाचा अधिकार नी वर्चस्व सहन करण्याची परंपरा हजारो वर्षापासुन आजतागायत चालु आहे. माता, भगिनी, पत्नी नि प्रेयसी म्हणून उत्कृष्ठ भूमिका बजावण्यात वाकबगार असलेल्या स्त्रीला कधीही पुरूषाने मानाने जगु दिले नाही. भारतीय समाजाचा त्यातल्या त्यात ग्रामिण समाजाचा विचार करता, स्त्रियांच्या नशिबात दु:ख, निराशां, वैताग नि कष्टच वाट्याला आले आहेत.

प्रामुख्याने एक स्त्री म्हणुन तिच्याकडे बघण्याचा पुरूषांचा दृष्टिकोन, पितृसत्ताक कुटुंब असल्यामुळे तिला मिळालेले दुय्यम स्थान, कुटुंबाचा वारसदार म्हणुन मुला बद्‌दल सहानुभुती आणि मुलीचा तिरस्कार,

सती पध्दतीमुळे निर्माण झालेली स्त्रीच्या पतिनिष्ठतेची झालेली अव्हेलना, बाल वयातच विवाह झाल्यामुळे लवकरच अंगावर पडलेली मातृत्वाची जबाबदारी, सासरचे वर्चस्व पतीचे अकाली निधन, पती—पत्नीच्या वयात असलेला फरक हुंडा यासारख्या बाबींमुळे स्त्रियांच्या समस्यांची संख्या मोजता येणार नाही एवढी आहे. ग्रामीण समाजात प्रत्येक स्त्रिचे दु:ख दुसऱ्या स्त्रीपेक्षा वेगवेगळे आहे. स्त्रियांच्या समस्या सर्वच जात, धर्म, पंथ, प्रांत, गरीब, श्रीमंत, मध्यम, श्रेष्ठ सर्वच वर्गात दिसून येतात.

**स्त्रीयांच्या समस्यांची व्याप्ती**

शैक्षणिक क्रांतीमुळे, औद्योगिकरणामुळे महिलांच्या काम करण्याच्या क्षेत्रात दिवसेंदिवस वाढ होत आहे. हे खरे आहे. मात्र स्त्रियांच्या समस्यांची व्याप्ती सुध्दा कमी न होता ती सतत वाढतच आहे. आधुनिक जीवनाच्या परिवर्तनशील ग्रामीण समाजात अनेक घटकांची गुंतागुंत निर्माण झाल्यामुळे स्त्रियांच्या समस्यात गुंतागुंतीची व्यापकता आढळुन येत आहे. स्त्रीचा वाढता व्याप सुरू झाल्याने समस्या सुध्दा त्या प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. चूल आणि मूल यापलीकडे काहीही माहित नसलेल्या स्त्रियांची समस्या जवळपास एकसमान स्वरूपात असते. समाजाच्या व्याप बदलामुळे तिला चौफेर संधी उपलब्ध झाल्यामुळे तेथे कधीही न येणाऱ्या प्रसंगांना तिला सामोरे जावे लागत आहे. कौटुंबिक छळवादा बरोबरच समाजातील विविध क्षेत्रात सुध्दा तिला अनेक प्रकारच्या धोक्यांना समोरे जावे लागत आहे.

**शैक्षणिक क्षेत्रातील समस्या**

समाज सुधारकांचे अथक परिश्रम, इंग्रजांचा शैक्षणिक दृष्टीकोन, स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या कायद्यांचे संरक्षण आणि मिळालेली शिक्षण विषयक चालना स्त्री शिक्षणाला वरदान ठरली आहे. खेड्यातुन किमान पस्तीस टक्यापेक्षा अधिक स्त्रियांना अक्षर ओळख झाली आहे. प्रौढ शिक्षणाच्या व शिक्षण विषयक अधिनियमाचा बराच प्रभाव मुलींच्या व स्त्रियांच्या शिक्षणावर झालेला आहे.

परंतु शाळेत शिकत असणाऱ्या मुली वयात येताच त्यांना विवाह बंधनात अडकवून टाकले जाते. थोड्याफार मुली जेमतेम महाविद्यालयीन आणि त्यातून शिल्लक राहिलेल्या मूली पदव्युत्तर शिक्षण घेतात आणि प्रमुख म्हणजे प्रत्येक गावात शाळा किंवा महाविद्यालय असतेच असे नाही. प्रामुख्याने मुली राहतात एकतर त्यांना शाळेत किंवा महाविद्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागते, सायकलनी जावे लागते किंवा बसनी जावे लागते. परंतु ह्यासाठी पक्के रस्ते असतातच असे नाही. तसेच मुली शेतकरी कुटुंबातील असतील एकतर आई—वडिलांसोबत शेतात जावे लागते. मोल—मजुर म्हणुनपण शेतात काम करावे लागते किंवा लहान भावंडे असतील त्यांना सांभाळण्यासाठी व घरकामासाठी घरी राहावे लागते. त्यामुळे मुलींना शिक्षणापासुन वंचीत राहावे लागते. त्याचप्रमाणे पालकांची मानसिकता/उदासिनता मुलींची सुरक्षितता ह्यामुळे सुध्दा मुली शिक्षणापासुन कोसो दूर राहतात अशी परिस्थिती फारच चिंतनीय आहे. कित्येक मुलींना अर्धवट शिक्षण सोडावे लागते.

**कौटूंबिक समस्या**

संयुक्त कुटुंब असो किंवा विभक्त कुटुंब केंद्रस्थानी पुरूष असतो. कुटुंबातील जवळपास सर्व महत्वपूर्ण निर्णय पुरूषच घेतो. त्यामुळे स्त्रियांमध्ये निर्णयक्षमता कमी दिसून येते. कुटुंबातील मुलीला लग्न झाल्यानंतर पतीच्या घरी जावे लागते. पुरूषप्रधान संस्कृतीमुळे वंशाला मुलगाच हवा हा दृष्टीकोन असल्यामुळे

स्त्रीयांवरती सतत कुटुंबामध्ये अन्याय झालेला असतो. सतत स्त्री—पुरूष मधील भेदभावामुळे आज मुलींचे घटते प्रमाण ही देशापुढची एक महत्वाची समस्या आहे. अनेक कुटुंबात नवरा व्यसनी असतो अशा कुटुंबात तर स्त्रीला अनेक प्रकारचे म्हणजे शारिरीक, मानसिक हिंसाचार होतात त्याची तक्रार करता येत नाही किंवा ते माहित नसते किंवा स्त्रियांनी नवऱ्याचा त्रास सहनच करायचा असतो अशी विचारसरणी असल्यामुहे मानसिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**ग्रामीण महिलांच्या आर्थिक समस्या**

ग्रामीण समाजात प्रामुख्याने मुख्य व्यवसाय हा शेती व शेतीशी संबंधित पर्यायात्मक/दुय्यम व्यवसाय असतात. शेतात काम करून किंवा छोटे—मोठे हस्त व्यवसाय करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावीत असते. मात्र स्त्री अर्थार्जन करीत असतांना ती सर्व कौटुंबिक जबाबदारी देखील पार पाडीत असते. तिच्या कमाईवर तिची मालकी असतेच असे नाही अनेकवेळा तिची कमाई नवरा किंवा बाप दारूडा असेल तर तिच्याकडे असलेल्या पैसे जबरदस्तीने घेतो. घरावर तसेच शेतीवर मालकी हक्क असतोच असे नाही. शेती व्यवसायावर आधारीत व्यवसाय हे बारमाही नसतात. त्यातच भडकत्या महागाईचा भस्मासुर स्त्री—पुरूषांना भोगावे लागत आहे. त्यासाठी ग्रामिण विभागातील कुटुंबे शहराकडे स्थलांतरीत होत आहेत. काम मिळावे व मिळालेले काम टिकून रहावे यासाठी स्त्रियांना त्यांच्या मनाविरूध्द लैंगिक अत्याचाराला बळी पडावे लागते. ऊस तोडणी महिला कामगारांच्या समस्या तर खुप भयानक आहेत. वाचनात आले की, बीड जिल्हयातील ऊस तोडणी महिला कामगार स्वत:चे गर्भाशय काढुन टाकतात कारण मासिक पाळीमुळे व गर्भधारणेमुळे (गरोदरपणामुळे) कामावर जाता येत नाही. त्यामुळे तेवढ्या मजुरीचे नुकसान होते अशी माहिती प्रकाशात आली आहे. म्हणजे स्त्रियांना नैसर्गिक पध्दतीने जिवन सुध्दा जगणे कठिण आहे. गर्भाशय काढल्यामुळे उलट महिलांचे आरोग्यविषयक प्रश्न निर्माण झाले आहेत. शाळेत, संस्थेत, कारखान्यात काम करीत असतील तरी महिलांना संस्थाचालक, अधिकारी, सहकारी या सगळयांमध्ये रहत असतांना स्वत:चे शिलाचे संरक्षण करणे ह्या सारखे प्रश्नांना स्त्रीला सामोरे जावे लागते.

अशा तऱ्हेने ग्रामीण भागात पुरूषापेक्षा स्त्रियां जास्त काम करतात पण वेतनामध्ये/मजुरीमध्ये तफावत असते. बांधकाम क्षेत्र, ऊस तोडणी क्षेत्र, शेतीकामात ह्यामध्ये मजुरीत खुप तफावत असते. वडिलांच्या मालमत्तेत मुलींचा अधिकार, पोटगीचा अधिकार, पतीच्या मालमत्तेत समान वाटा असुन देखील ग्रामीण महिलांना याचा लाभ घेता येत नाही. स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत मिळालेल्या कर्जाचा देखील स्वत:पेक्षा घरावर खर्च करावा लागतो.

**ग्रामीण महिलांच्या आरोग्यविषयक समस्या**

आधुनिक भारतात परिवर्तनाचे वारे जोमाने वाहत असले तरीही ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आरोग्य विषयक प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते. स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न फक्त तिच्या स्वत:शीच नाही तर जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुला—मुलींशी आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांचा आरोग्याचा प्रश्न म्हणजे कुपोषण व अशक्तपणा होय. ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न निर्माण होतात ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे ग्रामीण समाजात आज ही मोठया प्रमाणात अंधश्रध्दा आहे ते आपल्याला जत्रा, भंडारे, उपवास ह्याच माध्यमातून दिसून येते. स्त्री आठवड्यातील वेगवेगळे वार (दिवस) व देवी देवतांच्या श्रध्देपोटी उपवास करते. तसेच घरातील स्त्री घरातील

सदस्यांना ताजे व स्वत: शिळे जेवण करीत असते म्हणजे पोषक आहाराच्या अभावातून ती कुपोषित होते. तसेच स्वच्छतेचा अभाव स्वत: हा मासिक पाळीत करावयाची स्वच्छता याबाबत ती जागरूक नसते. म्हणुन ग्रामीण विभागात गर्भाशयाचे कॅन्सर होण्याचे प्रमाण अधिक आहे. वारंवार गर्भारपण ह्यातुन सुध्दा आरोग्याची हेटाळणी होते. ग्रामीण समुदायात प्रसाधनगृह किंवा शौचालये असतातच असे नाही. ह्यामुळे नैसर्गिक क्रियांना स्त्रियांना बाहेर जावे लागते. त्यामुळे स्त्रियांची फारच कुचंबना होते. स्वच्छतेच्या अपुऱ्या सोयीमुळे स्त्रियांचे आरोग्यविषयक प्रश्न निर्माण झाले. तसेच ग्रामीण समाजात डॉक्टर व वैद्यकीय सोयींचा अभाव असतो आणि ह्या सुविधा असल्या तरी पैश्याच्या अभावामुळे वैद्यकीय सोयी प्राप्त करू शकत नाही. म्हणुन आजही गरोदर माता मृत्युचे प्रमाण ग्रामीण विभागात आहे आणि महत्वाचे म्हणजे कमी वयात विवाह झाले असेल तर सुध्दा अनेक प्रकाचे वैद्यकीय/आरोग्यविषयक प्रश्न निर्माण होतात. ग्रामीण महिला ह्या लाजाळु स्वभावाच्या असतात त्यामुळे आपले अंतर्गत आरोग्याचे प्रश्न इतरांना सांगत नाहीत. अशा तऱ्हेने ग्रामीण स्त्री कुपोषण, अस्वच्छता, शिक्षणाचा अभाव, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव व मानसिक ताणतणाव ह्यामधुन अनेक आजाराला बळी पडतात.

**ग्रामीण महिलांच्या राजकीय समस्या**

बदलती राजकीय स्थिती स्त्रीला अनुकुल होऊ लागली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५० टक्के आरक्षण असल्यामुळे स्त्रियांना राजकीय क्षेत्रात महत्वाच्या पदावर कार्य करीत आहेत. उदा. सरपंच, सभापती, नगराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष इत्यादी व अनेक यामुळे हजारो वर्षापासुन सामाजिक आणि राजकीय जीवनाला वंचीत असलेल्या स्त्रीला हे क्षेत्र तिच्या कर्तृत्वाला वा मिळण्यासाठी उपलब्ध झाले आहेत. राजकारणात सहभागी होवुन स्त्रिला स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. स्त्रिचे दु:ख स्त्रीच समजु शकते म्हणुन तिला आग्रहाने राजकारणात संधी दिल्या जात आहे. प्रपंच सांभाळुन समाजसेवा करण्यासाठी तिला राजकारण हे माध्यम मिळाले आहे.

परंतु अशा मनाला उभार देणाऱ्या राजकारणात सुध्दा स्त्रीचा श्वास गुदमरून जावू लागला आहे. ती पदावर असली तरी रिमोट कंट्रोल मात्र पुरूषाच्या हातात असलेली दिसून येते. स्त्रि. ही नामधारी (फक्त सही करणारी) पदाधिकारी राहिलेली दिसुन येते. ग्रामीण विभागात पदावर असलेल्या स्त्रियांचे वडिल किंवा नवराच फाईल्स घेवून काम करतो. सभेला सुध्दा तोच उपस्थित राहतो. सरपंच म्हणुन निवड झालेल्या व्यक्ति (महिला) मिरवणुक काढण्यात आली त्यात त्या महिलेच्या नवऱ्याचेच हार—तुरे देवुन स्वागत करण्यात आले ती स्त्री मात्र मिरवणुकीच्या मागेच राहीली असे वाचण्यात आले. म्हणजेच फक्त आणि फक्त आरक्षणामुळे स्त्री ही राजकारणात येवु शकली. परंतु एखादी महत्वाकांक्षी स्त्री राजकारणात आली तर तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले जातात. अनेक स्त्रियांचे संसार या राजकारणामुळे उद्‌ध्वस्त होतांना दिसून येतात. कर्तृत्वाला वाव असणाऱ्या स्त्रीला मानसिक आणि शारिरीक त्रास सहन करून राजकारण करावे लागत आहे. राजकीय क्षेत्रातून निर्माण झालेल्या समस्यांची भर जुन्या समस्यात पडू लागल्याने स्त्रीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. तिच्या शीलाला राजकारणाने आव्हान द्यायला सुरूवात केली आहे.

**ग्रामीण महिलांच्या इतर समस्या**

तथागत गौतम बुध्द सांगतात की, जन्म हेच दु:खाचे मुळ कारण आहे. त्याच विचाराप्रमाणे स्त्रियांना तर काही कुटुंबात जन्माला येण्याच्या अगोदर दु:खाची सुरूवात होते. कारण हिंदु धर्मानुसार मुलाच्या जन्मामुळे अग्निसंस्कार, वंश, मोक्ष प्राप्ती या धारणामुळे महत्व आहे. त्यामुळे मुलींच्या जन्माला परकीय धन म्हणुन पाहिल्या जाते. त्यामुळे मुलगी जन्माला येण्याच्या अगोदरच तिला गर्भातच मारले जाते. स्त्रिभ्रुण हत्या सारखे प्रश्न आहेत. ग्रामिण समाजात बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे. खुप कमी वयात मुलींना कुटुंब विशेषत: ग्रामीण कुटुंब संयुक्त कुटुंब असते. त्यामुळे अधिक सदस्य या कुटुंबात असतात पती जर वयानी मोठा असेल तर त्या कोवळ्या मुलीला धाकात ठेवले जाते. सासू—सासरे, दिर—नणंद व इतर नातेवाईक ह्यांच्याकडून कौटूंबिक हिंसाचार असतो. तसेच ग्रामीण विभागात असलेल्या 'हुंडा' ह्या समस्येचा गंभीर परिणाम स्त्रियांनाच भोगाव लागतो. 'हुंडाबळी' सारखे प्रश्न ग्रामिण विभागात आहेत. लग्न झाल्यानंतर एक—दोन वर्षात अपत्य झाले नाही तर तिला मानसिक त्रास सहन करावा लागतो. 'वांझोटी' म्हणुन तिचा उपहास केला जातो. तिच्यावर मांत्रिक, वैदू कडुन धागेदोरे केले जाते. तिला उपवास, पुजा—अर्चना करायला लावतात ह्यामध्ये सुध्दा अपत्य प्राप्तीसाठी खुप अघोरी प्रथेला स्त्रियांनाच बळी पडावे लागते. आंतरजातीय विवाहाला कायद्याची मान्यता असली तरी समाजमान्यता दिसून येत नाही. प्रेम विवाह झाला तर जातीच्या बाहेर काढुन टाकल्या जाते किंवा मुलींना मारून/हत्या टाकल्या जाते. ह्याबाबत अनेक Honour Killing चे उदाहरणे आहेत. पुरूष व्यसनाधिन म्हणजे दारूच्या आहारी गेला असेल किंवा विवाहबाह्य संबंध असतील तर घरातील स्त्रीचा फार छळ केला जातो. आज ग्रामीण स्त्रियां सुध्दा घर सांभाळुन बाहेर काम करीत आहेत. परंतु संशयी स्वभावाचा नवरा असेल तर त्याला बळी पडावे लागते आहे. ग्रामिण स्त्रियांमध्ये उच्च किंवा व्यावसायिक शिक्षणाचा अभाव तसेच आर्थिक स्वावलंबनाचा अभावामुळे निर्णय क्षमतेचा अभाव दिसून येतो. ज्यामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण होण्यास अडथळा निर्माण होतो. परंतु 'स्वयंसहायता बचत गट' च्या माध्यमातून मात्र ग्रामिण स्त्रियां आर्थिक स्वावलंबी होत आहेत व निर्णय क्षमता सुध्दा वाढत आहे. उदा. मुलींना शिक्षण देण्याबाबतचा निर्णय, इतर छोटे—मोठे दुकान, पार्लर, गृहउद्योग व्यवसाय करण्याचा निर्धार ग्रामीण समाज हा आजसुध्दा तेवढाच परंपरावादी व रूढीवादी आहे. त्यामुळे स्त्रियांच्या बाबतीत उदारविचारसरणी चा अभाव आहे. आजही ग्रामीण स्त्रिया पारंपारिक पोषाख पध्दतीलाच मान्यता व आग्रह धरतात त्यामुळे क्रिडा क्षेत्रात मुलींचे प्रमाण कमी आहे. ह्या व इतर अनेक समस्या ग्रामीण स्त्रियांना आहेत.

**ग्रामीण स्त्रियांच्या समस्येवरील उपाययोजना**

१. कौटुंबिक हिंसाचारातून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ हा कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासुन लागू करण्यात आला आहे. या कायद्यान्वये एक वर्षाची कैद आणि २०,००० रूपये दंड होवु शकतो.
२. भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८(अ) नुसार हुंडा किंवा अन्य हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई केली जाते.
३. महिला संघटनाची स्थापना करून स्त्री शक्ती व्दारे पिडीत महिलांना मदत करता येते.

४. जनजागृती—सरकार अशासकीय संघटना, समाजसेवक, कार्यकर्ते आदि महिला हिंसाचाराच्या विरोधात लोकांमध्ये प्रसारमाध्यमाव्दारे जाणीव आणि जागृती निर्माण केली जावू शकते. या संदर्भात (बेल वाजवा) अशा प्रकारची योजना तसेच Helpline नंबरवर फोन करणे असे उपक्रम हाती घेतले जातात. उस्मानाबाद शहरात डॉ. स्मिता शहापुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची प्रगती व अत्याचार, बेटी बचाओ असे कार्यक्रम SUNDAY CALTURAL या संघटनेव्दारे दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी आयोजीत करण्यात येतात. चांगल्या कामगिरी करणाऱ्या महिलांचा सत्कार तर पिडीत महिलांचे प्रश्न हाताळयाचे काम हे मंडळ करते. उमरखेड शहरात सुध्दा 'जिव्हाळा' ही संस्था मुलींच्या अस्तित्वाची ओळख ह्याकरीता जाणीव जागृती करिता 'मुलींच्या जन्माचे' स्वागत ही संस्था करते. अशाच अनेक ठिकाणी विविध संस्था कार्य करीत असतात.

५. सरकारनी हुंडा प्रतिबंधक कायदा संमत केलेला आहे. हुंडा देण्या—घेण्यास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तिंना ५ वर्ष कैद व १५००० रूप्ये ची शिक्षा होवु शकते.

६. हुंडा प्रथेबाबत समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

७. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे तसेच शाळेत महाविद्यालयात जाणे—येणे करिता वाहनांची व्यवस्था करून देणे.

८. स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरीता त्यांना उच्च शिक्षणात संधी उपलब्ध करून देणे.

९. ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य प्रश्नाबाबत जाणीवजागृती कार्यशाळा, मेळावे घेणे तसेच गावात Health Center निर्माण करणे.

१०. साक्षरतेचे प्रमाणाबरोबरच संरक्षणाचे व तिच्या अधिकाराचे संरक्षण होण्याकरीता मार्गदर्शन करणे.

११. आजही व्यसनांमुळे कुटुंब अधिक प्रमाणात उद्ध्वस्त झाले आहेत. त्यासाठी दारूबंदीचे कडक कायदे असायला पाहिजे. परंतु आता तर किराणा दुकानात दारू/वाईन उपलब्ध होणार आहे.

१२. ॲक्ट १९५६ नुसार स्त्रिला कुटुंबाच्या मालमत्तेत वाटा देण्यात आला.

१३. ॲक्ट १९५५—५६ नुसार बालविवाह बंदी.

१४. कलम ४५ नुसार १४ वर्षापर्यंतच्या सर्व मुला—मुलींना मोफत शिक्षण दिले जाते.

१५. कलम १४ ते १८ नुसार सर्वांना समतेचा हक्क आहे.

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोध निबंधात ग्रामीण महिलांच्या समस्या अभ्यासत असतांना असे दिसून येते की, ग्रामीण क्षेत्रात महिलांचे शिक्षणाबाबत जागरूकता वाढत आहे. परंतु महिलांच्या सामाजिक सुरक्षेची काळजी व शैक्षणिक सुविधांचा अभाव ह्या कारणाने ग्रामीण समाजात शिक्षणाचे (महाविद्यालयीन) प्रमाण नगण्य आहे. आर्थिक क्षेत्रात सुध्दा बदल झाले आहेत. विशिष करून स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातुन महिला व्यवसाय (गृहउद्योग, मसाले, लोणचे, पापड तयार करणे) व इतर अनेक व्यवसाय किराणा दुकान, कापड दुकान, जनरल स्टोअर्स, आटा चक्की ह्यासारखे व्यवसाय महिला वैयक्तिक किंवा समूहांनी करू लागल्या आहेत. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांमध्ये नेतृत्व क्षमता निर्माण होत आहे. महिलांना बॅंकेचे व्यवहार समजु लागले आहेत. त्याचबरोबर महिलांमध्ये महत्वाकांक्षा निर्माण होत आहे. त्यामुळे राजकारणात सहभागी

होत आहे मग ते महिलांकरीता राखीव आरक्षणामुळे कां असेना मात्र ग्रामीण महिलांत आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय बदल होत आहेत हे मात्र सत्य आहे. मात्र हे बदल संविधानात्मक तरतुदींमध्ये व मुलभुत अधिकारांमुळेच प्राप्त होत आहेत हे सत्य नाकारता येत नाही. हे सगळे बदल घडवुन येण्याकरीता घरात/कुटुंबात योग्य वागणुक मिळणे गरजेचे आहे. म्हणजे तिचा आत्मविश्वास वाढेल व आत्मनिर्भर होईल. कारण महिलांना समानता, घरामध्ये योग्य वागणुक, शैक्षणिक आरोग्य यांच्या सुविधांचा लाभ देणे, आर्थिक स्वावलंबन मिळवुन दिल्यास स्त्री—पुरूषाच्या म्हणजेच समाजाच्या सहकार्याने अनेक समस्या सुटु शकतात.

**संदर्भ**

१. काचोळे, दा. धो. 'ग्रामीण व नागरी प्रश्न आणि समस्या' कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१४
२. लांजेवार, साधना वि. 'विवीध धर्मातील नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा दर्जा व भूमिका' सर साहित्य केंद्र, नागपूर.
३. आगलावे, सरोज, प्रदिप, 'भारतातील सामाजिक समस्या' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर — २०१८.
४. कऱ्हाडे बी.एम. 'ग्रामीण व नागरी समाजशास्त्र' पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर. २००५
५. सलामपूरे फुलचंद, 'ग्रामीण महिला समस्या व उपाययोजना' www.jetir.org.
६. पोकळे, एस.एम. 'ग्रामीण स्त्रियांच्या मुलभुत समस्या आणि उपाययोजना' www.jetir.org.

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** **AP - 6**

# २२. मानवजीवनाला संजीवन देण्यास आणि समाज परिवर्तनात शिक्षणाचे महत्त्व

**प्रा. नामदेव भिवाजी वरभे**
संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
**डॉ. बी. एम. कऱ्हाडे**
महात्मा फुले-डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, मिंडाळा, ता. नागभिड, जि. चंद्रपूर.

**सारांश (Abstract)**

शिक्षणामुळे बौध्दिक पातळीत वाढ होण्यासोबत विविध प्रवृत्ती भावना यांना योग्य असे सुसंस्कृत वळण लावणे, साक्षरता निर्माण करणे आणि सुंदर, सर्वगुणसंपन्न व प्रतिभावान स्त्री पुरुष निर्माण करणे हा प्रामुख्याने हेतु आहे. शिक्षणामुळे सर्व मानसिक शक्तीचा विकास होतो. शिक्षण हे नोकरीचे साधन नाही, शिक्षण हे विलास व विनाशासाठीही नाही, तर ते स्त्री—पुरुषांना उत्तमातला उत्तम नागरिक बनविण्याचे महत्वाचे असे साधन आहे.

गांधीजी शिक्षणबद्दल आपले मत व्यक्त करतांना म्हणतात 'माणसातील राक्षसी वृत्ती नष्ट करुन त्यांच्यातील दैवी गुण जागृत करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे'. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात, 'शिक्षणामुळे विश्वास, शांतता निर्माण होऊ शकते' तर स्वामी विवेकानंद म्हणतात, 'मानवातील मनुष्यत्व जागृत होते, त्यांच्या व्यक्तिमत्वास नेमका आकार प्राप्त होतो' तसेच आपल्या कर्तव्याप्रती दक्ष होतो, जीवनाचा खरा अर्थ समजण्यास सक्षम होतो'.

वरील विचारवंतांच्या विचारातुन सहजपणे लक्षात येते, शिक्षणामुळे माणुसपण प्राप्त होऊन इतर माणसाशी माणुसकीच्या दृष्टीने सहृदयानी वागण्यास मोलाची मदत होते. शिक्षण ही प्रक्रिया सातत्याने जिवनभर सुरु राहते. 'मनुष्याची बुध्दी, हृदय व आत्मा यांचा विकास म्हणजे शिक्षण. जिवनाला गती, मती आणि शक्ती देते ते खरे शिक्षण आहे. शिक्षणातुन आत्मसात केलेले ज्ञान हे मस्तकस्पर्शी नसावे ते जीवनस्पर्शी असावे. शिक्षणामुळे व्यक्तीगत विकास होतो. सोबतच राष्ट्रहित आणि समाजहित जोपासणसाठी उपयोग होतो. शिक्षण हे सत्य, समता, स्वातंत्र्य याचा मिलाप आचार, उच्चार व विचार याचे उगमस्थान आहे.

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे. शिक्षणामुळे मानवातील सुप्त गुण विकसित होऊन त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो. शिक्षण हे ज्ञानार्जनाचे प्रभावी साधन व माध्यम आहे. व्यापक अर्थाने आपण आयुष्यभर औपचारिक, अनौपचारिक शिक्षणचक्रातुन शिकत असतो. औपचारीक शिक्षणाचे केंन्द्र शाळा, कॉलेजपर्यत मर्यादित आहे तर अनौपचारीक शिक्षणाचे केंन्द्र घर, परिसर, समाज, राष्ट्र, जग एवढे विस्तृ आहे.

विद्यार्थ्यांची व समाजाची सद्सदविवेकबुध्दी जागृत करुन ती कार्यप्रवण करणे हे शिक्षकाचे व्यवसायदत्त कर्तव्य आहे याची अगत्याने जाणीव ठेवणे जरुरी आहे. समाज जीवनाला आकार देणे आणि समाजपरिवर्तनाचे मुख्य स्त्रोत आहे.

- शिक्षणाचे समाजजिवनात व समाजपरिवर्तनात महत्व.
- शिक्षणाने समाजजिवनात साध्य होणाऱ्या महत्वाच्या बाबी.
- शिक्षण प्रक्रियेत समाज, शिक्षक व शासनाची जबाबदारी.
- शिक्षणामुळे माणसात वैज्ञानिक अभिवृत्तीचा विकास

**प्रस्तावना**

'ज्योतीबांनी जातीव्यवस्था, परंपरागत रुढी, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक विषमता या विरुध्द कार्य केले असे नाही, तर शिक्षणक्षेत्रातही त्यांनी मोलाचे कार्य केले. हंटर शिक्षण आयोगाला त्यांनी जे निवेदन सादर केले त्यात त्यांची शैक्षणिक मते स्पष्ट झालेली आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे, ही मागणी करणारे ज्योतिराव हे पहिले भारतीय होते'

भारतात कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणासाठी प्रथम जर कोणी प्रयत्नांची पराकाष्ठा केली असेल ती फुल्यांनीच. स्त्री—शुद्रांच्या शिक्षणासाठी सर्वप्रथम कोणी जर जिवाचे रान केले असेल तर ते फुल्यांनीच. इंग्रजी राज्यात स्त्री—शुद्रांच्या शिक्षणाची कशी परवड होते आहे ते त्यांनीच प्रथम दाखवुन दिले. स्त्री शिक्षणाच्या संदर्भात फुल्यांचे कार्य युगपवर्तक आहे, शिक्षण हे समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील असे साधन आहे, ज्यामुळे माणुस ज्ञानी होतो, स्वयंसंपन्न होतो. शिक्षणामुळे त्याला नवीन नवीन विचार करण्याचे सामर्थ्य निर्माण होते. जीवनातील विविध संकटांना अतिउत्तमपणे सामना करण्यास सक्षम होतो. शिक्षणामुळे निश्चितपणे शील उत्तम बनेल, स्त्री—पुरुषांना जीवनात स्वत:च्या पायावर उभे राहता येईल, वैचारिक दृष्ट्या संपन्न झाल्यामुळे चांगले आणि वाईट या मधील फरक उत्तमपणे जाणता येईल. एक सुसंस्कृत समाज निर्माण होईल. यातुनच देशाची आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक वाटचाल होऊन आदर्श राष्ट्राची निर्मिती होईल. शिक्षणामुळे देशाच्या विकासासाठी, स्वत:च्या समाजाच्या व देशासाठी उपयोगी बनेल अशी माणसे निर्माण करणारी, माणसाला माणसाच्या जवळ नेणारी समृध्द प्रक्रिया शिक्षणामुळेच साध्य होईल. समाजाला योग्य दिशा, मार्गदर्शन आणि मुख्यत्वे समाजपरिवर्तनामुळे एक समृध्द समाज देशात निर्माण होईल.

**१. शिक्षणाचे समाजजिवनात व समाजपरिवर्तनात महत्व**

शिक्षणाला जीवनात आज अनन्य साधारण असे महत्व आहे. कारण मानवाच्या जीवनाश्यक गरजा अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण ह्या शिक्षणाशिवाय दुर्लभ आहेत. पृथ्वीच्या निर्मितीपासुनच शिक्षण ही प्रक्रीया सातत्याने चालत आलेली आहे. यामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. समाजजागृत होऊन शिक्षणाचे फायदे आणि तोटे समाजापुढे येत गेले. महत्वा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाचे महत्व स्पष्ट करतांना म्हटले आहे,

'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली
नितीविना गती गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शुद्र खचले, इतके सगळे अनर्थ
एका अविद्येने केले.

माणसाकडे विद्या नसेल तर जीवनात अनेक अनर्थ निर्माण होतो. शिक्षणाशिवाय समाजाचे, राष्ट्राचे आणि व्यक्तिगत किती नुकसान होते याची जाणीव फुले यांच्या वरील पंक्तीवरुन होते, पण त्यांनी याचबरोबर विद्येने अविद्येवन मात करता येते आणि आपली व राष्ट्राची प्रगती साधता येते याची जगाला जाणीव करुन दिली आहे. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्व स्पष्ट करतांना म्हटले आहे.

शुद्रांना सांगण्यासारख शिक्षण मार्ग आहे ।

शिक्षणाने मनुष्यत्व येते, पशुत्व हाटते पहा ।।

अशाप्रकारचे शिक्षणाचे महत्व प्राचीन काळापासुन संत, महंत, विचारवंतांनी, शिक्षकांनी समाजापुढे आणण्याचे आणि रुजविण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. शिक्षण हे जीवन घडविणारे, माणुस निर्माण करणारे, चरित्र घडविणारे, चांगले विचार आत्मसात करायला लावणारे दैवत आहे, त्याची पुजा हेच मानवाचे खरे जीवन आहे.

**२. शिक्षणामुळे समाजजिवनात साध्य होणाऱ्या महत्वाच्या बाबी**

शिक्षणामुळे स्त्री—पुरुषांचे जीवन क्रियाशील प्रगत व विधायक बनते. जीवनाला एक आशावादी दृष्टी प्राप्त होते. शिक्षणामुळे जीवनात स्वयंशिस्त, संयम व्यवहारज्ञान जबाबदार नागरिक बनुन माणुस आशावादी, महत्वांकाक्षी, श्रध्दाळु, कर्तव्यदक्ष व सत्यनिष्ठ बनतो. शिक्षणाची महती विशद करतांन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे, 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे ते प्यायल्यानंर कोणताही मनुष्य गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' शिक्षणानी अन्यायाविरुध्द, अत्याचाराविरुध्द लढण्याची शक्ती येते. वर्तमानस्थितीत परिस्थिती पाहुन जगण्याची दिशा मिळते. व्यक्तिमधील आंतरशक्तीचा विकास होवुन व्यावसायिक कौशल्य, कलात्मक संवेदना, अभिरुची जागृत होते. दृष्टीकोणात झालेल्या बदलामुळे राष्ट्रहित व समाजहिताच्या भावना जागृत होतात. इतरांचे दु:ख जाणुन घेऊन परोपकारी वृत्ती वृध्दिंगत होते. शिक्षणामुळे आत्मविश्वास, सुसंस्कार, ज्ञानोपासना सदगुणांचा मार्ग, शाश्वत गुणांचे संक्रमण होते. समाजजिवनाला एक विशाल दृष्टीकोण मिळतो. त्यामुळे समाजपरिवर्तन होऊन समाजात एकमेकांबद्दल विश्वास, श्रध्दा व आनंदमयवृत्ती जोपासुन समाजातील प्रत्येक घटकांना लाभ मिळतात.

**३. शिक्षण प्रक्रियेत समाज, शिक्षक व शासनाची मुख्य भुमिका**

जीवन हे सुखदु:खाचे मिश्रण आहे असे म्हणतात सुख कणभर व दु:ख मणभर आहे. याचे खरे कारण माणसाची उपजत स्वार्थी प्रवृत्ती. या प्रवृत्तीने मानवाने पैशाला जास्त महत्व दिले आहे. त्यामुळे ज्ञानाची वाढलेली आहे, परिणामी दोन पायाच्या पशुची संख्या भरमसाठ वाढु लागली आहे. खरे सुख ज्ञानात आहे. समाजाने चुकलेली दिशा सुधारुन शिक्षण महत्व लक्षात घ्यावे. कर्मवीर भाऊराव पाटील, साने गुरुजी, डॉ. राधाकृष्णन यांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवुन लक्षात घ्यावे की शिक्षण हे समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेतील असे साधन आहे, ज्यामुळे स्त्रीपुरुष ज्ञानी बनतात, उन्नत होतो, शिक्षणातुन अंगी प्रेरणा मिळते आणि विचार करण्याचे सामर्थ्य अवगत होते. विविध निर्माण होणारे प्रश्न सोडविण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. शिक्षणामुळे शील उत्तम बनेल, बुध्दीचा विकास होईल, संस्कृतीचे व संस्काराचे उत्तम जतन व वृध्दी होण्यास मदत होईल. संकटकाळात मनुष्य शिक्षणामुळेच स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभा राहु शकतो. विद्यार्थी, व्यक्तीच्या ठिकाणी नवे अनुभव, प्रसंग निर्माण करुन ते रुजविण्याचे काम शिक्षणातुन शिक्षकांनी करावे. शिक्षकांनी कोणत्याही दबावाविना शिक्षणाची उद्दिष्टे, ध्येय आणि पावित्र्य लक्षात घेऊन आपले काम चोखपणे करावे. विद्यार्थ्यांना उत्तमातले उत्तम शिक्षणे देवुन उत्तम नागरिक बनविण्याचे काम करावे. शासनानी शिक्षण हे सर्व स्तरावर सर्वस्पर्शी व जीवनस्पर्शी कसे होईल यासाठी नेहमी कटिबध्द असावे. कारण कोणत्याही राष्ट्राची शिक्षणपध्दती ही त्या राष्ट्राच्या प्रगतीची दिशा ठरविते. शिक्षक हा त्या राष्ट्राचा शिल्पकार असतो, त्यातुनच एक सुसंस्कृत समाज निर्माण होतो व देशाची आर्थिक, सामाजिक, राजकिय, धार्मिक वाटचाल होवुन आदर्श राष्ट्राची निर्मिती

होण्यास मदत होते. ज्या देशात मानव घडविण्याचा विचार केला जातो, त्या देशाचा वर्तमान नेहमीच क्रियाशील, प्रगत व विधायक असतो, म्हणुन शासनानी प्रगती शिक्षणप्रणाली निर्माण करावी व शिक्षकांनी ती रुजवावी, विद्यार्थी आणि समाजानी स्विकारुन देशाच्या प्रगतीकरिता याचा योग्यरितीने वापर करावा.

राष्ट्रीय शिक्षणातुन विद्यार्थ्यामध्ये लोकशाही मुल्यांचे रक्षण, नितीमत्ता, सामाजिक, राजकिय, आर्थिक, धार्मिक समतेचे संवर्धन सर्व धर्माच्या सांस्कृतिक परंपरातुन आलेल्या योग्य मुल्याचा स्विकार, प्रत्येक धर्मातील अनिष्ट प्रथांचा प्रतिकार करण्यास समाजातील प्रत्येक घटकांनी देशाहितास्तव मान्य करावे. या तत्वाचे पालन समाजानी केल्यास शिक्षणामुळे प्राप्त झालेली शक्ती देशाच्या विकासासाठी शिक्षणामुळे समाजाच्या आणि देशाच्या हितासाठी अत्यंत उपयोगी ठरेल. उत्तम माणसे निर्माण करणारी शिक्षण प्रक्रिया आज सर्वांना अभिप्रेत आहे.

**४. शिक्षणामुळे माणसात वैज्ञानिक अभिवृत्तीचा विकास**

आपल्या देशात शिक्षणाचा अभाव असतांनी अनेक रुढी, परंपरा आणि अंधश्रध्दा जोपासल्या जात असत. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार समाजातील अनेक घटकांपर्यंत पोहचल्यामुळे निश्चितपणे विज्ञाननिष्ठ दृष्टीकोण स्त्री—पुरुषांमध्ये रुजलेला आहे. अंधश्रध्दामुळे समाजातील अनेक घटक वाईट गोष्टीच्या आहारी जाऊन आपल्या जीवनाचे अतोनपात नुकसान करुन घेत होते. वेळेनुसार शिक्षणामुळे माणसांत वस्तुनिष्ठ व वैज्ञानिक दृष्टीकोण रुजण्यात मदत झाली. आजच्या आधुनिक काळात समाजाने अनेक चांगल्या प्रथेचा स्विकार केल्यामुळे अनिष्ट परंपरापासुन समाज दुर गेलेला दिसत आहे. समाजात आदर्श विचार रुजण्ण्यास मदत झाली, या समाजपरिवर्तनामुळे सद्यस्थितीत बालविवाह सारख्या घटना अत्यंत अल्प प्रमाणात दिसुन येत आहे. मुलामुलींना आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य कमी—अधिक प्रमाणात दिसुन येत आहे. समाजातील दृष्टीकोणात बदल झाल्यामुळे आंतरजातीय विवाह सारख्या घटनांचा विरोध होतांना दिसत नाही, हे सर्व परिणाम शिक्षणामुळे दिसुन येत आहे.

अशाप्रकारे शिक्षण प्रक्रियेत सर्व समाजातील घटकांचा समावेश झाल्यामुळे शिक्षण हे समाजाला संजिवनी देणारी व समाज परिवर्तन घडवुन आणण्यास मोलाची मदत झालेली आहे. या शिक्षणवृक्षाला परिश्रमाचे, जिद्दीचे, चिकाटीचे, आत्मविश्वासाचे उदकसिंचन करुन सदगुणांची शाश्वत, आनंद देणारी जीवनाच्या शेवटपर्यंत उत्कर्ष आणि यशाचा सन्मान बहाल करणारी, जिवनाला आदर्श बनविणारी आणि समाजपरिवर्तन करुन जीवन अमृतमय करुन स्वत:चा, समाजाचा आणि राष्ट्राचा गौरव वाढवावा हेच अभिप्रेत आहे.

**संदर्भग्रंथ**

१. पाटील, मनोहर : फुले आंबेडकर चळवळीचे क्रांतीशास्त्र, सुगाव प्रकाशन, पुणे
२. उत्तम बी. भोईटे : २००९, भारतातील उच्च शिक्षण, Vol. 58, No. 2, May-Aug
३. निंबार्ते डॉ. गोपीचंद : भारतीय ग्रामीण समाज आणि समस्या
४. डॉ. मा. गो. माळी : भारतातील शिक्षणाचे आधुनिकीकरण

# २३. जनसंवाद माध्यमांचा स्त्रीजीवनांवरील परिणाम

**प्रा. डॉ. विजय शंकरराव दिघोरे**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर.

**सार**

माहिती सर्वदूर पसरवण्याच्या कामात प्रसार माध्यमांची महत्त्वपूर्ण भुमिका आहे. पारंपारिक स्त्री प्रतिमा व कल्पना बदलण्यासाठी, स्त्रियांची मानहानी थांबवण्यासाठी, स्त्री–पुरुष संबंध अधिक माणुसकीचे होण्यासाठी, आणि समानतेचा व स्त्रीत्वाचा लढा पुढे नेण्यासाठी स्त्रियांनी हया माध्यमांमध्यें प्रवेश करणे आवश्यक आहे. परंतू आजच्या काळात ही प्रसार माध्यमे ग्रामीण ग्राहकाच्या कमकुवतपणाचा फायदा घेतात आणि ग्रामीण स्त्री या चंगळवादी संस्कृतीतील साधनांना लगेच बळी पडते. ग्रामीण भागातील 60% स्त्रीया शेतीमध्ये सहभागी असून देखील आकाशवाणीवरचे ग्रामीण कार्यक्रम फक्त पुरुषांसाठीच असतात. आधुनिक काळातील तंत्रविद्येमुळे जाहिरात, दूरदर्शन आज घरोघर पोहचल्यामुळे स्त्रीजीवनावर त्याचे चांगले–वाईट परिणाम होवू लागले आहेत. याचे विवेचन या लेखातून केले आहे.

**मुख्य संज्ञा :–** जनसंवाद माध्यम, स्त्रीजीवन इत्यादी.

**प्रस्तावना**

कोणत्या देशाच्या आर्थिक विकासांत पुरुषांच्या बरोबर स्त्रीयांचे योगदान महत्त्वपूर्ण असते. स्त्री ही समाजाची एक विभाज्य घटक आहे. त्यामुळे सामाजिक आर्थिक विकासाची संकल्पना ही महिलांचा विकास व तिचे सक्षमीकरणाच्या शिवाय अपूर्ण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात माहात्मा गांधीच्या प्रेरणेने स्त्रीयांचा राजकारणात प्रवेश झाला. सर्व प्रकारच्या चळवळी स्त्रीया भाग घेवू लागल्या. स्वातंत्र्यानंतर औद्योगीकरणाचा वेग वाढला. खेडयांचे शहरीकरण झाले. त्याचा एकुणच परिणाम भारतीय समाजजीवनावर झाला. स्त्रीयांच्या जीवनातील वैयक्तीक आणि सामाजिक परिवर्तन होण्यास त्यांना मिळालेले आर्थिक स्वातंत्र्य कारणीभूत आहे

**प्रसार व प्रचार माध्यमे**

आज प्रचार माध्यमांची झेप दुरवर पोचली आहे. हयामुळे प्रचारमाध्यमे सत्तेची व नफ्याची साधने झाली आहेत. पारंपारिक स्त्री प्रतिमा व कल्पना बदलण्यासाठी, स्त्रियांची मानहानी थांबवण्यासाठी, स्त्री–पुरुष संबंध अधिक माणुसकीचे होण्यासाठी, आणि समानतेचा व स्त्रीत्वाचा लढा पुढे नेण्यासाठी स्त्रियांनी हया माध्यमांमध्यें प्रवेश करणे आवश्यक आहे.

माहिती सर्वदूर पसरवण्याच्या कामात ही माध्यमे महत्वाची कामगिरी करु शकतात. वृत्तपत्रे व मासिके ही व्यापारी प्रकाशने आहेत. विविध क्षेत्रातील वेगवेगळया अभिरुचीच्या वाचकांसाठी त्यांना मजकूर द्यायचा असतो. जाणीवजागृती व वैचारिक सखोल लिखाण हयांचे ती वाहक होऊ शकत नाहीत. क्रियाशील कार्यकर्ते व वार्ताहर

यांच्यातील परस्परांबद्दल संशयाची जळमटे दूर करण्यास परस्परांमध्ये समज व सहकार्यासाठी एक आचारसंहिता निर्माण होण्यास त्यांच्यात एक संवाद होणे आवश्यक आहे.

वर्तमानपत्रे जाहिरातीपेक्षा वेगळया प्रांतात मोडतात. बातम्यांद्वारे, विचारी व विनोदी लेखांद्वारे, फोटोद्वारे वर्तमानपत्रांमधून प्रभावीपणे स्त्रियांची परिस्थिती मांडली गेली आहे. स्त्रियांच्या वेदना, त्यांचे संघर्ष व त्याचा राग वर्तमानपत्रांसारख्या माध्यमांनी हजारो वाचकांपर्यंत पोहचवला. स्त्रियांच्या प्रश्नांना त्यांच्या विचारांत स्थान दिले व सहानुभूतीपूर्वक त्यांच्या प्रकाशनांत प्रसिद्धी दिली पाक्षिके, मासिके व दैनिकांमधून स्त्रियांवर स्तंभालेखन झाले. 'एकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल विकली' हया अभ्यासपूर्ण साप्ताहिकाने स्त्रियांचे लेख व वृत्तांत देण्यात सुरुवात केली.

ग्रामीण भागात बऱ्याच स्त्रियांना ज्ञानापासून दूर ठेवले जाते आणि त्यामुळे, त्यांच्या विकासाला खीळ बसलेली दिसते. दूरदर्शनवरील सौंदर्यस्पर्धा पाहून लहान–लहान गावातही अशा स्पर्धा भरविल्या जात आहेत. त्याचा मोठा प्रभाव ग्रामीण तरुणींवर पडलेला जाणवतो. म्हणून विज्ञान व तंत्रविद्येने सर्व सुविधा, साधने आणि सुखसोयी निर्माण करुन दिल्या तरी त्यांचा वापर, उपयोगीता इ. चा विचार स्त्रीने तारतम्य बुद्धी वापरुन करावयास हवा.

आज दूरदर्शनच्या जाळयामुळे खेडयापर्यंत नवीन कल्पना जाऊन पोहचल्या आहेत. त्यामुळे जाहिरातीचा परिणाम शहरी तसेच ग्रामीण भागातील महिलांवर झालेला आहे. आज जाहिरातीतील स्त्री पाहिली तर बालसंगोपन, स्वयंपाकघर, स्वच्छता, आरोग्य ही त्या घरच्या स्त्रीचीच जबाबदारी अशी स्त्रीची प्रतिमा निर्माण केली आहे.

जाहिरातीतून प्रतीत होणारी स्त्री ही शहरी तसेच ग्रामीण भागातील महिलांना आदर्श वाटते. हिच्याशी त्या मिळते जुळते घेतात. नी आपणही तसेच बनण्याचा प्रयत्न करतात. कारण ग्रामीण स्त्री ही अशिक्षित अडाणी असते. त्यामुळे तिची विचार करण्याची शक्ती कमी असते.

गरीब ग्रामीण स्त्रीच्या मनास ज्या वस्तू दिसणार नाहीत त्यांची अभिलाषा जाहिरात निर्माण करतो. आणि त्या वस्तू घेण्यास ग्रामीण स्त्रिया उत्सुक होतात.

जाहिराती पाहून आजची स्त्री ठरवते की नोकरी मिळते ते पांढऱ्या स्वच्छ साडीमुळे, पावडरीच्या सुगंधामुळे नी लिपस्टीक व गोड गोड बोलण्यामुळे, तिचे शिक्षण, आत्मविश्वास नि कौशल्य या सर्व गोष्टीचा नोकरीशी काहीच संबंध नसतो अशी त्या ग्रामीण स्त्रीची भाबडी समजूत असते.

जाहिरातदार विक्रीकला आणि विक्रीशास्त्र याचा अभ्यास करुन ग्रामीण ग्राहकाच्या कमकुवतपणाचा फायदा घेतात आणि ग्रामीण स्त्री या चंगळवादी संस्कृतीतील साधनाना लगेच बळी पडते.

आधुनिक काळातील तंत्रविद्येमुळे जाहिरात आज घरोघर पोहचल्यामुळे स्त्रीजीवनावर त्याचे चांगले–वाईट परिणाम होवू लागले आहेत.

**सिनेमा, इंटरनेट, फेसबुक, व्हॉटस्अप, टेलीव्हीजन, युटयुब जाहिरात**

सिनेमा उद्योगाद्वारे सिनेमाचा प्रसार–प्रचार करण्याकरीता ज्या प्रकारे जाहिरात तयार केली जो व ती सिनेमागृहात दाखविली जाते त्याचप्रमाणे ती सडकांवर पोस्टर लावले जातात त्यावरुन एक नजर फिरवल्यास त्या जाहिराती अतिशय भडक व उत्तेजक असल्याचे दिसून येतात.

आज साहित्य, नाटय, चित्रपट, कला इ. क्षेत्रात ही विज्ञान व तंत्रविद्येचा परिणाम झालेला दिसतो. नवीन तंत्रे आणि त्यामुळे काही मूल्यहीन विचारही रुजले गेले.

आजच्या काळात 'ॲटम बॉम्ब' ही कल्पना केवळ विज्ञानाच्या क्षेत्रात नाही तर नाटकाची जाहिरात करताना लोक सौंदर्याचा 'मादक ॲटम बॉम्ब' म्हणून करु लागले देहप्रदर्शनीयता वाढली. चित्र नाटयसंगीत या क्षेत्रात 'फास्ट' चा जमाना आला, नी स्त्रीयांना तेच सर्व आवडू लागले. त्यामुळे कलात्मक मूल्यविचार मागे पडतील की काय अशी भीती निर्माण झाली हया सर्वांमध्ये आपण कोणत्या जाहीरातींना बळी पडावयाचे की नाही, हयाचाही तारतम्यबुद्धीने विचार करण्याची वेळ आज ग्रामीण स्त्रीवर आली आहे.

दूरदर्शन व चित्रपटांची लोकप्रियता मोठया प्रमाणांत असली तरी खेडेगावांत असंख्य लोकांपर्यंत आकाशवाणीच पोहचते. आकाशवाणीवरील स्त्री कार्यक्रमांमध्ये भक्तीगीते, पाककृती, नोकरदार स्त्रीची टवाळी करणारी नाटके, रिकामटेकडया गप्पांमधून केलेल्या लावालाव्या अशाबद्दल कार्यक्रम असतात. आकाशवाणीवरील जाहिराती स्त्रीविरोधी प्रतिमांनी भरलेल्या असतात. अशा जाहिराती ऐकवल्या जाऊ नयेत कारण हया जाहिराती स्त्रीचा उपमर्द करुनच थांबत नाहीत तर हुंडापद्धतीला सरळ प्रोत्साहन देतात.

ग्रामीण भागातील 60% स्त्रीया शेतीमध्ये सहभागी असून देखील आकाशवाणीवरचे ग्रामीण कार्यक्रम फक्त पुरुषांसाठीच असतात. स्त्रियांच्या कार्यक्रमांत तंत्रज्ञान बँकेच्या सवलती, नवीन कायदे अशा प्रश्नांवर अजिबात चर्चा होत नाही.

**स्त्री – प्रतिमेवरील अत्याचार**

गृहीपयोगी वस्तूंचे उत्पादन प्रचंड वाढल्यामुळे टूथपेस्ट बनविणाऱ्या दहा प्रकारच्या कंपन्या, त्याच्या दहा टूथपेस्ट अशा उत्पादनामुळे, उत्पादकांना आपल्या उत्पादनांची जाहिरात करावी लागते. आणि आपला माल खपासाठी ग्राहकांच्या गळी उतरावा लागतो. पुरुषांचे कपडे ते प्रसाधनापर्यंतच्या सर्व जाहिराती मध्ये स्त्रीयांचेच प्रदर्शन केले जाते, स्कूटर्स आणि मोटारसायकल यांच्या जाहिरातीमध्ये ग्राहकांना गटविण्याची भुमिकाही स्त्रीयाच करतात. मासिके, जाहिराती, वर्तमानपत्रे अशा सर्व ठिकाणी जाहिरातीमध्ये स्त्रियांच दिसतात.

**प्रचारमाध्यमांद्वारे प्रसारित होणारी स्त्रीची साचेबद्ध प्रतिमा**

बीभत्स व अश्लील असलेल्या जाहिरातीपेक्षा स्त्रींच्या ठोकळेबाज प्रतिमेचे इतर सर्व माध्यमांद्वारे होणारे दर्शन जास्त धोकादायक आहे. भारतीय स्त्रीची साचेबद्ध प्रतिमा म्हणजे धार्मिक सीता व सावित्रीची प्रतिमा साचेबद्ध लैंगिक कल्पनांचा सर्वात जास्त प्रसार चित्रपट या माध्यमाद्वारे होतो आधुनिक काळांत भारतीय सिनेमांत अशी लाट आलेली आहे की, महिलांच्या शरीराचे अधिकाधिक प्रदर्शन करणे, बीभत्स दृश्ये, बलात्कार दाखविले जातात. त्याचा परिणाम तरुण मुलामुलींवर होतो. मुलींवर बलात्कार करण्याचे व छेडछाड करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. ज्या चित्रपटांत बलात्कारांचे बीभत्स दर्शन घडविले जाते, असे चित्रपट बंद करण्यातही स्त्रीयांनी फार मोठा वाटा उचलला होता.

पुस्तकांतील, चित्रपटांमधील व सौंदर्यस्पर्धामधील ही जी स्त्री प्रतिमा घडवली जाते. ती जाहिरातीमधील स्त्री प्रतिमेपेक्षा अधिक धोकादायक आहे. कारण हया माध्यमातील स्त्री प्रतिमेच्या विकृत चित्रणाचे स्त्रियांवर नकळत पण खोलवर परिणाम होतात.

अशा अश्लील माध्यमांचा प्रचार–प्रसार नेमका किती आहे. हयाचा अंदाज करणे कठीण आहे. कारण हे साहित्य बेकादेशीरपणे व अत्यंत नियमित पण छुप्या ग्राहकवर्गासाठी निर्माण केले जाते.

दिल्ली येथील 'स्त्रिची प्रसार माध्यमातील प्रतिमा' ह्या कमिटीने अर्धअश्लील चित्रपटांवर बंदी आणायची मागणी केली अशा प्रकारे महिलांचे असे व्यापारी शोषण बंद होण्याचा कायदा 1986 साली पास झाला पण त्याचा काय उपयोग?

**तात्पर्य**

महिलांच्या या व्यापारी शोषणाला कोणाला जबाबदार धरावे हा एक प्रश्नच आहे. त्याला आपली अर्थव्यवस्था की महिला जबाबदार आहेत? काही अशी महिलाच जबाबदार आहेत. यावर आजच्या काळात विचार करावयास हवा.

**संदर्भ**

1. कवि, माधवी : महिलां कल्याण आणि विकास विद्या प्रकाशन. नागपूर, 2004. पान नं. 42–74
2. गांधी, नंदिता, शाह नंदिता : 'स्त्री संघर्षाची नवी रुपे' पॉप्युलर प्रकाशन. मुंबई, 1994. पान नं. 43–52
3. नॅशनल कॉन्फरन्स ऑन परस्पेंक्टिव्हज फॉर द ऑटोनॉमस वुमेन्स युव्हमेंट इन इंडिया या परिषदेच्या कार्याचा अहवाल डिसेंबर 1985.

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)** AP - 6

# २४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजवादी दृष्टीकोन

**प्रा. दिलीप रामटेके**
सहयोगी प्राध्यापक तथा विभाग प्रमुख, डॉ. आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चंद्रपूर.

**सारांश**

भारतीय आर्थिक सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी तसेच भारतीय समाजशास्त्र व अर्थशास्त्रीय विचार विकसित करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे योगदान ऐतिहासिक व मागदर्शक आहे. त्यांनी सांसदीय लोकशाही, मार्क्सवाद, गांधीवाद, समाजवाद या विविध विचारप्रवाहांचा परामर्श घेवून एक स्वतंत्र चिंतनाची दिशा दिली. भांडवलशाहीने निर्माण केलेले मजुर व त्यांची पिळवणूक, अज्ञान, दारिद्र्य नष्ट करून समतेवर आधारलेला नवसमाज निर्माण करणे हाच त्यांच्या समाजवादी विचाराचा मुख्य गाभा आहे. संविधानाच्या उद्देशपत्रीकेत स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवी मूल्ये आणि समाजवाद या शब्दांचा अंतर्भाव करून राज्यव्यवस्थेने देशाच्या सर्वांगिण विकासाकरीता नेमके कोणते धोरण स्विकारावे याची स्पष्ट दिशादर्शिका आखून दिली. याशिवाय समाजवादी विचाराची मांडणी धर्माच्या आधारे व्हावी हे सांगणारे 'बुध्द की कार्ल मार्क्स' आणि 'बुध्द धम्म आणि साम्यवाद' या ग्रंथातून संपुर्ण जगाला व मार्क्सवाद्यांना वैचारिकतेची एक नवी दिशा दिली. असे असतांनाही आज देखील समाजवादी आर्थिक—सामाजिक कार्यक्रम कोणत्याही राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यात विशेषत्वाने दिसत नाही. त्यामुळे देशात निर्माण झालेल्या विपरीत परिस्थितीत समाजवादाचा आंबेडकरवादी दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता लक्षात घेवून डॉ. आंबेडकर यांच्या समाजवादी विचार व कार्याचे वर्णन व विश्लेषण प्रस्तुत लघु शोधनिबंधातून करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**बिजशब्द:** समाजवाद, साम्यवाद आर्थिक विकास, समता, इत्यादी.

**प्रस्तावना**

समाजवादासंबंधी विचारामध्ये विद्यार्थीदशेपासूनच डॉ. आंबेडकरांचा अभ्यास व चिंतन स्पष्ट दिसतो. सन १९१३—१४ मध्ये कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण घेत असतांना त्यांनी 'मार्क्स एण्ड पोस्ट मार्क्सीयन सोशॅलिझम' हा विषय घेतलेला होता. सिडने वेब यांच्यासारख्या फेबियन सोसायटीशी संबधित असलेल्या प्रसिध्द व प्रकांड पंडिताचे स्नेही आणि कोलंबिया विद्यापीठातील अर्थशास्त्राचे नामवंत एडविड आर. सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. १९१५ मध्ये एन्सीयन्ट इंडीयन कॉमर्स या शोधप्रबंधावर त्यांना एम.ए. ची डिग्री मिळाली. सन १९१६ मध्ये त्यांनी 'कास्ट इन इंडिया — देअर मेकॅनिझम, जेनेसिस ॲण्ड डेव्हलपमेन्ट' हा शोधनिबंध डॉ. गोल्डनवाईझर मानववंशशास्त्र परिषदेत सादर केला होता. या शोधनिबंधात त्यांनी समाजात निश्चित प्रकारचे वर्ग असतात यांची नोंद घेतलेली आहे. 'बंदीस्त वर्ग म्हणजे जात अशी जातीची व्याख्या करून त्यांनी वर्गीय जाणीवेला मान्यता दिली. याचे कारण सांगतांना ते म्हणतात की, 'समाजाचे वर्गीय स्वरूप मान्य केल्याशिवाय स्वत:ला व्यवहारात समाजवादी म्हणवता येत नाही.

तसेच भौतिकवादी दृष्टीने चिंतनाची दिशा असल्याशिवाय समाजवादाची मांडणी करणे अशक्य असते.' यावरून एक अर्थतज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांनी सुत्रबध्द, सुस्पष्ट व तटस्थपणे आपले आर्थिक तत्वज्ञान मांडलेले दिसून येते..

डॉ. आंबेडकरांचे व्यक्तीमत्व विविधांगी होते. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास हे त्यांचे आवडते विषय होते. या विषयांचा तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विचारसरणी आणि सिध्दांताचा त्यांनी अतिशय बारकाईने व सुक्ष्म अभ्यास केलेला होता. समाजकारण, अर्थकारण, राजकारण अशा विविध क्षेत्रात त्यांनी संशोधनपर अनेक ग्रंथांचे लेखन केले. डॉ. नरेंद्र जाधव यांनी आपल्या 'डॉ. आंबेडकर: आर्थिक विचार आणि तत्वज्ञान' या ग्रथांत उल्लेख केल्याप्रमाणे, ''इस्ट इंडिया कंपनी: प्रशासन आणि अर्थनिती' तसेच ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तची उत्क्रांती यासारखे त्यांचे विद्वत्प्रचूर संशोधन 'सार्वजनीय वित' या सदराखाली येते, तर 'रूपयाचा प्रश्न: उद्गम आणि उपाय' हा मौलिक ग्रंथ मौद्रीक अर्थशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या पोटशाखामध्ये मोडतो. 'खोतीपध्दती' आणि 'महार वतने' यांच्या निर्मूलनात डॉ. आंबेडकरांनी बजावलेली भूमिका त्यांना एक नामांकित कृषी अर्थतज्ञ ठरविते, तर औद्योगिक मजुरांसाठी त्यांनी दिलेला लढा डॉ. आंबेडकर एक ख्यातनाम कामगार नेते असल्याची साक्ष देतो. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता यांसारख्या सामाजिक व्याधींच्या आर्थिक परिणामांचे डॉ. आंबेडकरांनी केलेल्या मर्मभेदक पृथ:करणामुळे अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांची सांगड घालणारे ते एक अतुलनिय पंडित ठरतात, तर भारतीय आर्थिक विकासाच्या त्यांच्या योजनांमुळे ते भारतीय नियोजनाचे तज्ञ मानता येऊ शकतात.'' त्यांनी आपल्या 'स्टेट्स ॲण्ड मायनॅरिटिज' या ग्रंथात देशाची आर्थिक विकासाची योजना कशी असावी हे स्पष्ट करतांना खाजगी उद्यमशिलतेला बाधा येऊ न देता राष्ट्राची उत्पादकता जास्तीत जास्त वाढवून आर्थिक संपत्तीचे समान वाटप व्हावे, तसेच शोषित, पीडितांना आर्थिक शोषणापासून संरक्षण मिळावे या दृष्टीने आर्थिक नियोजन व विशेष तरतूदी विषयी विश्लेषण केले आहे. तसेच भारतीय राज्यघटना निर्मितीच्या वेळी देखील स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूलतत्वांचा केवळ राजकीय हक्कांच्या दृष्टीने विचार न करता आर्थिक, सामाजिक लोकशाही प्रस्थापीत करण्यासाठी आग्रह धरला व त्यापध्दतीने आवश्यक त्या तरतूदी करण्याचा प्रयत्न केला. तसेच 'बौध्द धर्म आणि कार्ल मार्क्स' या ग्रंथातून त्यांनी संपूर्ण जगाला समाजवादी विचाराची एक नवी दिशा दिलेली आहे.

डॉ. आंबेडकरांचा समाजवादी दृष्टीकोन कम्युनिष्ट पक्ष व कॉंग्रेस यांच्या समाजवादापेक्षा वेगळा होता. डॉ. आंबेडकरांनी समाजवादाची स्पष्ट सैध्दांतिक माडणी केलेली दिसून येत नाही. परंतु संपूर्ण हयातीत त्यांनी केलेले समाजसुधारणा व परिवर्तनाचे कार्य, आंदोलने, चळवळी, ग्रंथ निर्मिती, सभा—संमेलने व अधिवेशनात विविध प्रसंगी दिलेली भाषणे, संसदेतील वादविवाद यातून त्यांचा समाजवादी दृष्टीकोन आणि भारतात समाजवादी समाजव्यवस्था निर्मितीची त्यांची तळमळ दिसून येते.

**समाजवादाची संकल्पना**

समाजवादी विचारसरणी ही फार पूर्वीपासूनच अस्तित्वात असलेली दिसते. प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' ग्रंथात आदर्श समाजरचनेचा उल्लेख केला आहे. खाजगी मिळकत व त्यावरील हक्क हीच

समाजामधील भांडणाचे व दु:खाचे मूळ आहे, ती निपटून टाकल्यानेच आदर्श समाजजीवन अस्तित्वात येऊ शकते असे प्लेटो म्हणतो. यालाच त्याने कम्युनिझम असे नाव दिले आहे. प्लेटोप्रमाणेच त्याच्यानंतरच्या अनेक विचारवंतांनी कमीअधिक याच प्रकारचा समाजवादी विचार प्रकट केलेला दिसतो. परंतु समाजवाद ही संकल्पना १८२५ च्या सुमारास सर्वप्रथम फ्रेन्च विचारवंत सेन्ट सायमन यांनी मांडली याविषयी एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका मध्ये स्पष्ट उल्लेख आहे. असे असले तरी इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती आणि फ्रान्सची राज्यक्रांती तसेच इंग्लंडमधील भांडवलदारी अर्थव्यवस्था आणि ख्रिश्चन धर्मातील उदारमतवादाचा उदय ही कारणे समाजवादाच्या उदय व विकासाला प्रोत्साहन देणारी ठरली.

समाजवाद ही मुलत: भांडवलशाहीविरूध्द उमटलेली एक नैतिक प्रतिक्रिया आहे. कामगार शोषण व आर्थिक—सामाजिक विषमतेस उत्पादन साधनांची खाजगी मालकी जबाबदार असून ती नष्ट करणारी विचारसरणी म्हणजे समाजवाद. उत्पादन साधनांची खाजगी मालकी नष्ट करून ती सार्वजनीक करणे, नफा हा खाजगी हिताऐवजी सामुदायीक हितासाठी वापरणे, उत्पादनाचे वितरण समान व जास्तीत जास्त न्याय्य करणे हा समाजवादी विचारसरणीचा गाभा आहे. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समानता निर्माण करण्यासाठी मांडण्यात आलेले हे एक तत्वज्ञान आहे. यासंदर्भात वि. अ. नाईक आपल्या 'समाजवाद व मानवी मूल्ये' या लेखात म्हणतात की, ''समाजवाद हा काही निर्जीव व तांत्रिक अर्थशास्त्रीय सिध्दांत नव्हे. समाजवादामागची प्रेरणा ही नैतिक आहे. संस्कृतिची नवी क्षितिजे मानवी समाजाच्या दृष्टीपथात आणून देणे हाच समाजवादाचा उद्देश आहे. सामान्य माणसाबद्दल उत्कट सहानुभूती दाखवून त्याला वरच्या सांस्कृतिक पातळीवर आणून ठेवणे हे समाजाचे खरे कार्य आहे. श्रीमंत व गरीब यांमधील भेदाची तीव्रता कमी करून सापेक्ष समता प्रस्थापित करणे हाच खरा समाजवाद होय. न्याय तत्वावर समाज निर्मिती करणे म्हणजेच समाजवाद, ह्याचाच अर्थ समाजवाद व मानवी मूल्ये यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. स्वातंत्र्य, समता यांसारख्या मानवी मूल्यांचा विजय समाजवादाच्या स्थापनेनेच होणार आहे.''

कार्ल मार्क्स: ''उत्पादन साधनांचे, वितरणाचे आणि विनिमयाचे राष्ट्रीयीकरण म्हणजे समाजवाद होय.''

के. हार्डी : ''समाजवाद म्हणजे समतेच्यासंबंधी विचार होय.''

ह्युगन: ''समाजवाद ही श्रमिक वर्गाद्वारा केलेली अशी राजकीय क्रांती आहे की ज्याचा उद्देश उत्पादन व वितरणाच्या साधनांची लोकशाही व्यवस्था आणि सामुदायीक मालकीद्वारे शोषणाचे उन्मुलन करणे होय.''

यावरून समाजवादाची काही वैशिष्ट्ये लक्षात येतात.

१. अर्थव्यवस्था व अर्थव्यवहार संघटीत करण्याच्या ज्या अनेक पध्दती उपलब्ध आहेत, त्यापैकी समाजवाद ही एक पध्दत आहे. अर्थव्यवस्था सरकारी व सहकारी संघटनांच्या द्वारे कार्यान्वीत करणे समाजवादाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.
२. आर्थिक विषमता वाढणार नाही अशारीतीने निर्माण झालेले उत्पादन वितरीत करण्याची तरतूद अर्थव्यवस्थेत असते.
३. लोकांचे राहणीमान सतत उंचावत गेले पाहिजे.

सेन्ट सायमन यांच्या कल्पनेतून कार्ल मार्क्सच्या समाजवादी कल्पनेचा उदय झाला. आपला समाजवाद वेगळा आहे हे स्पष्ट करण्यासाठी कार्ल मार्क्सने १८४८ मध्ये प्रथम 'साम्यवाद' हा शब्द वापरला. वस्तुत: साम्यवाद हा शब्द प्रथमत: १८३० च्या दरम्यान पॅरिसमधील क्रांतीकारक चळवळीतून निर्माण झाला, पुढे हा शब्द मार्क्सने स्विकारून आपल्या समाजवादी तत्वज्ञानाला साम्यवाद असे नाव दिले. दोघांचेही ध्येय समाजवाद हेच असले तरी ते साकार करण्याचे मार्ग, पध्दती व काही मूलभूत तत्व यामध्ये फरक आहे. साम्यवादाचा हुकुमशाहीवार विश्वास आहे तर समाजवाद्यांचा लोकशाहीवर विश्वास आहे. लोकशाही मार्गाने हळूहळू परंतु निश्चितपणे इष्ट ते परिवर्तन घडवून आणता येईल, अशी समाजवाद्यांची श्रध्दा आहे. मानवी कल्याण मूलत: कशात आहे व ते कोणत्या मार्गाने सिध्द करता येईल यातील मतभेदामुळे अनेक विचारप्रवाह निर्माण झाले आणि त्यातूनच मार्क्सवादी साम्यवाद, लेनीनवादी साम्यवाद, माओवाद, शास्त्रीय समाजवाद, फेबियन समाजवाद, गिल्ड समाजवाद, राज्य समाजवाद, लोकशाही समाजवाद अशा विविध विचारसरणी जन्मास आल्यात. परंतु स्थुलमानाने साम्यवाद आणि समाजवाद हे दोन विचारप्रवाह समाजवादी विचारसरणीचे मुख्य प्रवाह आहेत आणि या दोन्ही विचारसरणीचा प्रभाव संपूर्ण जगावर पडलेला दिसतो.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अनेक नेते समाजवादी विचाराने प्रभावित झालेले होते. त्यामध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, लाला लजपतरॉय, महंमद इक्बॉल, विवेकानंद, रविंद्रनाथ टागोर, भगतसिंह, डॉ. राममनोहर लोहिया इत्यादी प्रमुख होत. एक नवीन विचारधारा ज्यातून वर्गविहीन समाजाची निर्मिती होईल असा विश्वास ठेवणारी व आर्थिक समता प्रस्थापीत करण्याचा मार्ग दाखविणारी, कामगारांना भांडवलशाहीच्या जाचातून मुक्त करणारी विचारधारा म्हणून या तत्वज्ञानाकडे अनेक विचारवंतांचे लक्ष आकर्षित होणे स्वाभाविक होते. डॉ. आंबेडकर हे देखील यापासून अलिप्त राहू शकले नाही. अत्यंत बारकाईने या साम्यवाद व समाजवादाचा अभ्यास करून भारतीय परिस्थितीत तो लागू होऊ शकतो काय? याचा शोध घेतला.

**डॉ. आंबेडकरांचे समाजवादी विचार**

भारतीय समाजवादी धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टीकोनातून भारतात समाजवाद निर्माण करण्याचे स्वप्न पाहत होते. तर काही युरोपमधील समाजवाद्याच्या पाऊलावर पाऊल टाकून भारतातील परिस्थितीला मार्क्सवादी आर्थिक सिध्दांत लागू करण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु डॉ. आंबेडकर म्हणतात की, भौतिकवादी दृष्टी व चिंतन असल्याशिवाय समाजवादाची मांडणी करणे अशक्य आहे. भारतासारख्या जाती, वर्ण, धर्म, भाषा, संप्रदाय, पंथ या विविधतामधून सामाजिक संरचना बनलेली असल्याने युरोपमधील समाजवाद जशाचा तसा भारतात लागू होऊ शकत नाही. भारतातील अनिष्ट चालीरिती दुर करण्यासाठी सामाजिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. भारतातील प्रमुख समस्या म्हणून अस्पृश्यता आणि जातीचे निमूर्लन हे प्रश्न प्रामुख्याने व अग्रक्रमाने घेण्याचा आग्रह डॉ. आंबेडकर करतांना दिसतात. परंतु समाजवादी नेते नेमके याच प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत होते. याचे आश्चर्य व्यक्त करून बाबासाहेब म्हणतात की, या देशातील बहुसंख्य जनता मागासलेली आणि हजारो जातीत विभागलेली असतांना ती वर्गीय क्रांती करण्यासाठी एकत्र कशी येईल

यासाठी देखील कोणताही कार्यक्रम स्वत:ला समाजवादी म्हणविणाऱ्या लोकांकडे नाही. शेकडो वर्षापासून मागास, दलीत व आदिवासी लोकांच्या शोषण व पिळवणूकीमुळे असंतोष खदखदत असतांनाही क्रांती का झाली नाही? असा प्रश्न करून 'असंतोषातून क्रांती जन्मास येते' हा मार्क्सचा सिध्दांत भारतासाठी अयोग्य ठरतो असे बाबासाहेब म्हणतात.

मार्क्सच्या साम्यवादावर टीका करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की मार्क्सने धर्माला 'अफूची गोळी' म्हणून आपल्या साम्यवादात धर्माला स्थानच दिले नाही. 'संपत्ती हीच सत्ता हस्तगत करण्याची एकमेव शक्ती आहे, त्यामुळे राजकीय व सामाजिक सुधारणा करणे हे मोठे ढोंग आहे.' अशी भारतीय समाजवाद्यांची विचारसरणी बाबासाहेबांना मान्य नव्हती. ते म्हणतात, ' धर्म, संपत्ती व सामाजिक प्रतिष्ठा या तिन्ही बाबी सत्ता ग्रहणासाठी सारख्याच महत्वाच्या आहेत त त्याद्वारेच इतरांवर बंधने टाकता येतात. समाजवाद हा व्यवहारात आणावयाचा कृती कार्यक्रम आहे. तो केवळ आदर्शवाद नाही. एक वर्ग दुसऱ्या वर्गावर अन्याय करतो याची चिड समाजवाद्यांस असले पाहिजे. म्हणून जातीव्यवस्थेचे निर्मूलन करून समतेची व एकतेची भावना लोकामध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. क्रांती घडवून आणण्यासाठी हीच बाब अतिशय प्रेरक व महत्वाची आहे. परंतु भारतीय समाजव्यवस्थेने केवळ श्रमाचेच विभाजन केले नाही तर श्रमीकांचे विभाजन हजारो जातीवर्गामध्ये केलेले आहे. त्यातही त्यांना असमानतेची वागणूक मिळत असेल, जातीभेद आणि वर्गभेद पाळल्या जात असेल तर कोणतीच व्यक्ती शोषणाविरूध्द भांडवलदाऱ्यांच्या विरोधात क्रांती करण्यासाठी एकत्र येणार नाही. म्हणून असंतोषातून क्रांती जन्मास येते हा साम्यवादी सिध्दांत अयोग्य आहे. असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणून भारतीय समाजातील विषमता नष्ट करणे हाच सुधारणा कार्यक्रमाचा महत्वाचा भाग असला पाहिजे असे बाबासाहेब म्हणतात. परंतु याबाबतीत मात्र भारतीय समाजवादी उदासीन असल्याचे दिसतात. बंधुभाव निर्मिती ही तर आंतरराष्ट्रीय प्रश्न आहे. असे असूनही भाडवलशाही व साम्यवादी समाजरचनेत याला काहीही स्थान दिलेले दिसत नाही याचे बाबासाहेबांना आश्चर्य वाटते.ऐकीकडे कामगारांचा संप घडवून आणायचा आणि दुसरीकडे भांडवलदाराशी हातमिळवणी करायची, कामगाराच्या स्वतंत्र राजकीय पक्षाला विरोध करायचा हा एकप्रकारचा कामगारांच्या जीवनाशी जीवघेणा खेळ पाहून व भारतीय समाजवाद्यांचा दुटप्पीपणा लक्षात घेवून स्वत:ला समाजवादी म्हणविणाऱ्या कोणाशीही सलगी न करता स्वतंत्रपणे आपली समाजवादी चळवळ उभारतांना दिसतात.

**डॉ. आंबेडकरांचे समाजवादी कार्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२६ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आणि देशातील सर्व स्तरातील कामगारांना संघटीत करून समाजवादी कार्यक्रमाची रणनिती आखली. एक कामगार नेते म्हणून त्यांनी कामगार चळवळीला नवी दिशा दिली. स्वतंत्र मजुर पक्षाचा जाहिरनामा आजही भारतातील शोषीत, पिडित जनतेच्या आर्थिक सामाजिक विमोचनाचा आर्थिक कार्यक्रम म्हणून लागू होतो. १९२८—३७ या कालावधीत मुंबई विधीमंडळात खोती पध्दती आणि महार वतने नष्ट करण्याविषयी विधेयक मांडून त्यासाठी प्रचंड लढा दिला. परिणामी ग्रामिण भागातील असंख्य कुटुंबे सरंजामशाहीच्या जोखडातून मूक्त झाली.

याशिवाय ग्रामीण जनतेला सावकारांच्या जुलुमी पाशातून मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रांतिक विधिमंडळात सादर करण्यासाठी एक विधेयक तयार केले होते.

१९४२—४६ या काळात राष्ट्रीय मंत्रीमंडळामध्ये मजुरमंत्री म्हणून कार्यरत असतांना कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या, त्या आजतागायत सुरू आहेत. या विविध योजनाद्वारे सेवायोजन कार्यालयाची स्थापना, कामाचे तास निश्चित करणे, कामगारांचे वेतनमान ठरविणे, कामगारांना भरपगारी रजा, स्त्रि कामगारांना विशेष सवलती, प्रसुती रजा इत्यादी विविध विधेयक पारीत करून देशात प्रत्यक्ष समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्याकडे यशस्वी वाटचाल सुरू केली. भारताची राज्यघटना तयार करण्याची जबाबदारी आली तेव्हा राज्यघटनेमध्ये समाजवादी तत्वांचा अंतर्भाव केला. मागास घटकांच्या उत्थानासाठी व एकूणच देशाला समाजवादी, लोकशाही व धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनविण्यासाठी अनेक कायदेशीर तरतूदी करून राजकीय संरक्षण दिले.

भारतीय आर्थिक विकासाची योजना कशी असावी यासाठी डॉ. आंबेडकरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. खाजगी उद्यमशिलतेला बाधा येऊ न देता राष्ट्राची उत्पादकता वाढवून आर्थिक संपत्तीचे समान वाटप व्हावे यासाठी आर्थिक नियोजन, शोषित पिडितांना आर्थिक संरक्षण मिळावे यासाठी विशेष तरतूदी यासंबंधीची स्पष्ट रूपरेषा व दिशा त्यांनी आपल्या 'स्टेट्स ॲण्ड मायनॅरिटी' या ग्रंथामध्ये दिली आहे. मार्क्सवादी विचारांचा परामर्श घेतांना आर्थिक शक्तीप्रमाणे धर्म ही सुध्दा मोठी शक्ती आहे. या विचाराचा धागा 'बुध्द की कार्ल मार्क्स' या निबंधात गुंफला आहे. याशिवाय १९३८ मध्ये मनमाड येथील परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चळवळीचे स्वरूप, कामगार संघटनेचा प्रश्न, कम्युनिष्ट व कॉंग्रेस समाजवादी यांची समिक्षा केलेली दिसून येते.

बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांच्या समाजवादी विचार कार्याला समाजवादी तत्वज्ञानाचे मुलभूत सुत्र आहे ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय''. म्हणून प्रज्ञा, शिल, करूणा यावर आधारीत जातीविरहीत, वर्गविरहित आणि लोकशाहीप्रणित समाजाची निर्मिती करण्यासाठी बाबासाहेबांनी १९५६ ला आपल्या लाखो अनुयायांना बौध्द धम्माची दीक्षा दिली. बौध्द धम्म हे केवळ धार्मिक तत्वज्ञान नाही तर ते मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगांचा सर्वांगिण विचार करणारे तत्वज्ञान आहे.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजवादी विचार व तत्वज्ञान हे केवळ दलीतांपुरते मर्यादीत नव्हते तर संपूर्ण देशाची उभारणी समाजवादी तत्वाच्या आधारे व्हावी असा व्यापक दृष्टीकोन होता. स्वतंत्र भारताने आपल्या भावी समाजरचनेचे ध्येय साध्य करण्यासाठी जीवनाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्व दिशा समृध्द करणे आवश्यक आहे. याचसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कृती डोळयासमोर ठेवून नि:स्वार्थ भावनेने कार्य करण्याची गरज आहे. तरच खऱ्या अर्थाने आपल्या जगातील सर्वात मोठी समाजवादी, लोकशाही, धर्मनिरपेक्ष, गणराज्य असलेल्या देशाची प्रगती निर्माण होईल यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. आंबेडकर, डॉ. बि. आर., ''जाती संस्थेचे उच्चाटन'', अनुवादक, वसंत मून, मनोविकास प्रकाशन, मुंबई
२. आंबेडकर, डॉ. बि. आर., ''शुद्र पूर्वी कोण होते?'', संपादक, चां. भ. खैरमोडे, प्रकाश आंबेडकर, मुंबई, १९८०
३. जाधव, डॉ. नरेंद्र, ''डॉ. आंबेडकर: आर्थिक विचार आणि तत्वज्ञान'', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९२
४. जोशी, डॉ. बि. आर, ''समाजवादी डॉ. आंबेडकर'', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५
५. पवार, दया (संपादक), ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ'', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई—१, १९९३
६. खैरमोडे, चां. भ., ''डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (चरित्र) खंड १०, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९३.
७. कसबे, रावसाहेब, ''डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना'', सुगत प्रकाशन, नागपूर, १९७७
८. खरात, शंकरराव, ''डॉ. आंबेडकरांच्या सहवासात'', इनामदार बंधु प्रकाशन, पुणे, १९८२
९. खाडिलकर, नीलकंठ, ''प्रॅक्टिकल सोशॅलिझम'', शलाका प्रकाशन, मुंबई, १९९६
१०. दाभोळकर, सुमन, ''समाजवाद, समाजवादी महिला सभा'', पुणे, १९७७
११. पुराणिक, अ. द., ''समाजवाद: काही समस्या'', स्कुल एन्ड कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर, १९६५
१२. जाटव, डॉ. डी. आर., ''डॉ. आंबेडकर और मार्क्सवाद'', समता साहित्य सदन, जयपुर (राजस्थान), १९९१
१३. सिंह, विनोद प्रसाद, ''समाजवादी आंदोलन के दस्तावेज'', (१९३४—५२)